# प्रचलित अर्थव्यवस्थेवर
# नवा प्रकाश

शरद जोशी

# प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश

शरद जोशी

जनशक्ती वाचक चळवळ

जनशक्ती
वाचक
चळवळ

प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश । शरद जोशी
Prachalit Arthvyavasthevar Nava Prakash by Sharad Joshi

प्रकाशक
जनशक्ती वाचक चळवळ
'पिनाक', २४४, समर्थनगर,
औरंगाबाद - ४३१ ००१.
दूरभाष : (०२४०) २३४१००४.
Email : janshakti.wachak@gmail.com

© शरद जोशी
अंगारमळा, आंबेठाण-४१०५०१
ता.खेड, जि.पुणे.

मुद्रक
रुद्रायणी, औरंगाबाद.

मुखपृष्ठ
श्रीकांत झाडे

अक्षरजुळणी
भीमराव वाघमारे
जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद.

प्रथमावृत्ती
डिसेंबर १९८२

सुधारीत द्वितीयावृत्ती
२४ ऑगस्ट २००९, ऋषीपंचमी.

मूल्य १५० रुपये

## प्रकाशकाचे मनोगत

'प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश' हे पुस्तक डिसेंबर १९८२ मध्ये शेतकरी प्रकाशनाने प्रसिद्ध केले. त्या पुस्तकाची प्रस्तावना या आवृत्तीतही कायम ठेवली आहे. ती वाचून पुस्तकाबाबत स्पष्ट कल्पना येते. शेतकरी प्रकाशनाने 'प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश भाग २' या नावाने दुसरे पुस्तक १९८५ मध्ये प्रकाशित केले. या दोन्ही पुस्तकांचा समावेश सदर पुस्तकात करण्यात आला आहे. दुसऱ्या भागातील सर्व लेख (कार्यक्रम एकच कलमी का? पासून पुढे) 'शेतकरी संघटक' मधून प्रकाशित झालेले आहेत. दुसऱ्या भागातील चार लेख इतर संग्रहांमध्ये समाविष्ट केल्यामुळे वगळण्यात आले आहेत.

शरद जोशी यांचे समग्र लिखाण ग्रंथरूपाने सिद्ध करण्याचा प्रकल्प जनशक्तीने हाती घेतला असून त्या दिशेने टाकलेले हे आणखीन एक पाऊल होय. या पुस्तकामुळे नव्या जागतिक व्यवस्थेचा अभ्यास करणाऱ्यांची सोय होईल याची खातरी वाटते. पुस्तकाच्या प्रकाशनासाठी परवानगी देणारे शरद जोशी व सुरेशचंद्र म्हात्रे यांचे मनःपूर्वक आभार.

**श्रीकांत उमरीकर**

## अनुक्रमणिका


इंदिरा इंडिया झाली, भारताचा वाली कोण/११
विचारवंतांचे बुद्धिदारिद्र्य/१६
४९ कोटींची कर्जमाफी/२३
'भारत' खरोखरच स्वतंत्र आहे का?/२७
इंडियन विद्वानांचा आक्रोशी थाट/३५
सत्तावीस उणे नऊ बरोबर शून्य/४७
सर्व (शेतीविषयक) कर्जे अनैतिकच/५६
कार्यक्रम एकच कलमी का?/६०
दुष्काळाचा खरा अर्थ/६७
इंदिरादेवीचा दुष्काळ/७०
शेतकरी संघटनेचे विरोधक/७५
शेतकरी संघटना आणि डावे विचारवंत/८२
शेतकरी संघटनेचे नैतिक दर्शन/९२
रामदेवरायाचा लढा/१००
कृषिमूल्य आयोग बरखास्त करा/१०८
कृषिमूल्य आयोग : कसाबाचे कसब/११३
२००० सालातील शेतकरी/११८
भारत-इंडिया ते सुपर इंडिया/१२२
राजीव गांधी - राजकीय व आर्थिक आढावा/१३१
आम्ही लटिके ना बोलू/१३९
चंदिगढ आंदोलनाचा बोध/१४२
निवडणूक आंदोलनाची सुरुवात/१४७
स्वातंत्र्ययुद्ध जवह आले आहे/१५२
तुफान आले आहे/१५८
निवडणूक आणि शेतकरी आंदोलनाचे तंत्र/१६३
राजीवजींचा निवडणूक भूलभुलय्या/१६७
शेतीमालाच्या भावाचा प्रभाव/१७१
अरे, पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली/१७९
बनावट धाग्याचा गळफास/१८३
शेतकरी शहरात उतरणार?/१८६
राजीवस्त्रांची गुंतागुंत आणि मुरणारे पाणी/१८९


# प्रस्तावना

शेतकरी संघटनेचा विचार मांडीत मी व माझे सहकारी गावोगाव फिरतो. 'भीक नको, घामाचे दाम पाहिजे' हा गरिबी हटवण्याचा मंत्र तोंडातून कानातून जातो, तेथून पुढे पसरतो. महाराष्ट्राच्या खेड्याखेड्यांतून हा विचार वणव्यापेक्षा जास्त वेगाने परसला. ज्या तालुक्यात आम्ही कधी गेलो नव्हतो तेथल्या निरक्षर बायाबापड्यासुद्धा शेतकरी संघटनेचा विचार बोलून दाखवू लागल्या.

बहुसंख्य निरक्षर समाजात एका अनोख्या विचाराचे प्रसारण म्हणजे एक चमत्कारच.

प्रचार, आंदोलन, तुरुंगवास, शेती या धावपळीत लिहिणे मात्र फारसे झाले नाही.

नोव्हेंबर १९८० मध्ये 'वारकरी' नावाचे एक साप्ताहिक संघटनेतर्फे निघू लागले. वर्ष दीड वर्ष चालले. एका तुरुंगवासात ते बंद करावे लागले.

शेतकरी संघटनेच्या विचारासंबंधाने अनेक वृत्तपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके यांनी लेख, मुलाखती छापल्या. काही पुस्तके, पुस्तिकाही प्रकाशित झाल्या.

बोल्लारी तुरुंगात असताना सर्व सत्याग्रहींसमोर दररोज एक तास मी काही विचार मांडीत असे. प्रा. सुभाष जोशी, निपाणी आणि प्रा. रमेश शिपूरकर, संकेश्वर या दोघांनी परिश्रमपूर्वक त्यांचे संकलन केले होते. पण त्याचे प्रकाशन काही होऊ शकले नाही.

आता अलिबागच्या प्रा. अरविंद वामन कुळकर्णी आणि प्रा. सुरेशचंद्र म्हात्रे यांनी पुढाकार घेतला. गेल्या तीन वर्षांत वेगवेगळ्या ठिकाणी प्रकाशित झालेले इंग्रजी व मराठी लेख शोधून काढले. भाषांतरे करवून घेतली. प्रकाशनाची सर्व जबाबदारी घेतली.

शेतकरी संघटनेचा विचार आणि एकसूत्री कार्यक्रम ही एक संपूर्ण विचारपद्धत आहे. एक वर्गाच्या प्रासंगिक स्वार्थाचे हे तत्त्वज्ञान नाही.

समाज एकत्र बांधला जातो तो वस्तू आणि सेवांच्या परस्पर देवघेवीने. या देवघेवीच्या शर्ती इतर कोणत्याही घटकांपेक्षा समाजातील संबंध ठरवितात.

प्रकृती आणि मनुष्य एकत्र आल्यानंतर पहिला आर्थिक स्वरूपाचा व्यवसाय निर्माण झाला तो शेती. उपभोग्य वस्तूंचा गुणाकार करणारा हा एकमेव व्यवसाय.

वाहतूक, व्यापार, साठवणूक, कारखानदारी या क्षेत्रांत देवघेवीच्या मूल्याची (Exchange Value) वृद्धी होऊ शकते. पण उपभोग्य वस्तूंचा गुणाकार फक्त शेतीतच होऊ शकतो.

या गुणाकाराचा लाभ उठवून त्याचा जास्तीत जास्त हिस्सा मिळविण्यासाठी वेगवेगळ्या वर्गांची, गटांची धडपड चालू असते. अतिरिक्त उत्पन्नाचा ताबा मिळवू शकणारा वर्ग भांडवलनिर्मिती करू शकतो, उत्पन्नाची साधने तयार करू शकतो, त्यांचा ताबा ठेवून शेतीबरोबर श्रमशक्तीचेही शोषण करुन लाभाचे प्रमाण वाढवू शकतो.

समाजाचा इतिहास हा या शेतीतील गुणाकाराच्या वाटपाचा इतिहास असतो. उत्पन्नांच्या साधनांची मालकी ही गुणाकाराच्या वाटपांची एक निर्देश (Index) आहे. औद्योगिकीरण व श्रमशक्तींचे शोषण असा मर्यादित विषय अभ्यासास घेतल्यास हा निर्देश सुटसुटीत, आटोपशीर आणि सोयिस्करही आहे. पण या पलीकडे व्यापक विचार करावयाचा झाल्यास हा निर्देश दिशाभूल करणारा ठरू शकतो. औद्योगिक क्रान्तीच्या पूर्वी बळकावून घेतलेली शेतीतील उत्पादने मुख्यत: चैनऐषारामासाठी वापरली गेली, उत्पादक साधनांच्या उभारणीकरता नाही.

औद्योगिक वाढीमुळे होणाऱ्या कामगारांच्या शोषणाचा विचार औद्योगिक विकास ज्या देशांत झाला त्या देशांतील अर्थशास्त्रज्ञांनी आणि समाजशास्त्रज्ञांनी केला. शेतीच्या शोषणाचा विचार फार तुरळक झाला. शेतीच्या अतिरिक्त उत्पादनांतून प्राथमिक भांडवलाचा संचय आणि त्यानंतरची भांडवलाची वाढ औद्योगिक कामगारांच्या शोषणातून असा विचित्र विचार तयार झाला. एवढेच नव्हे तर भांडवलवादी व्यवस्थेत काय किंवा समाजवादी व्यवस्थेत काय शेतीतील बचत आवश्यक त्या निर्दयतेने औद्योगिक भांडवलासाठी उपलब्ध करून दिली पाहिजे हा विचार बळावला.

भांडवलवादी व्यवस्था सोडून त्यावर ज्या पर्यायी व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न झाला त्या सर्व व्यवस्थेत शेतीचे शोषण गृहीत धरण्यात आले आणि भांडवलनिर्मितीसाठी शेतीतील बचत वापरता यावी यासाठी भरपूर प्रमाणात निर्घृण उपायही वापरण्यात आले.

दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र झालेल्या वसाहतींच्या नवीन स्वतंत्र शासनांनीही आपापल्या देशांच्या अंतर्गत शेतीचे शोषण चालूच ठेवले. देशान्तर्गत वसाहतवाद चालू केला.

शेतीची बाजू मांडली गेली, पण ती अर्थशास्त्रीय पायावर नाही. निसर्गाचे



सान्निध्य, यांत्रिकीकरणाला विरोध झाला. मानवाच्या निसर्गसुलभ वाढत्या राहणीमानाच्या आकांक्षेच्या विरुद्ध दिशेने जाणारा हा विचारप्रवाह. त्याच्या प्रवर्तकांना संत महात्मे म्हणण्यात आले, पण त्यांच्या विचाराचा प्रत्यक्ष अंमलबजावणीत कोठेच परिणाम दिसून आला नाही.

शेती हा मागासलेपणाचा, अडाण्यांचा व्यवसाय आहे, मनुष्यजातीला त्यातून जितक्या लवकर सोडविता येईल तितकी त्याची प्रगती होईल आणि यासाठी शेतीचे शोषण हे एक अपरिहार्य कटू कर्तव्य आहे ही विचारसरणी पुढे आली. विकासासाठी औद्योगिक भरभराटीवर भर देऊन हेतुपुरस्सर असंतुलन आवश्यक व हितप्रद आहे हा विचारही पुढे आला.

नियोजित विकासाची साधने अर्थशास्त्रज्ञांच्या विचारांनी ठरली नाहीत. साम्राज्यवादी देशांनी आपली भरभराट साधण्यासाठी जी तंत्रे वापरली तीच उपयोगात आणून झटपट श्रीमंती मिळविण्याची आकांक्षा बाळगणारा एक वर्ग प्रत्येक वसाहतीत साम्राज्यवाद्यांच्या अंमलाखालीच तयार झाला होता. याच वर्गाच्या हातात स्वतंत्र वसाहतीतील सत्ता आली. त्यांना जी मनमानी करावयाची होती ती त्यांनी केली. त्याचे तात्त्विक समर्थन करणारे अर्थशास्त्रज्ञ पैशाला पासरी उपलब्ध असतातच. सर्व तिसऱ्या जगात दुहेरी समाजव्यवस्था दृढ झाली. एका बाजूला वसाहतवादी शोषणाचा वारसा घेतलेली परभृत उद्योगधंद्याची व्यवस्था, दुसऱ्या बाजूला पुन्हा एकदा वसाहतवादी शोषणाची शिकार बनलेली शेतीवर आधारित ग्रामीण व्यवस्था. आपल्या देशात या दोन व्यवस्थांना मी 'इंडिया' आणि 'भारत' अशी नावे दिली.

शेतीतूनच औद्योगिक भांडवलनिर्मिती करता येते याचा अर्थ शेतकऱ्याला नागवूनच औद्योगिक वाढ करता येते असा केला गेला. वस्तुत: शेतीतील बचत शेतकऱ्याकडे ठेवून सुलभ आणि संतुलित औद्योगिकीकरण साधता आले असते. जपानची प्रगती हे त्याचे जिवंत उदाहरण आहे.

आर्थिक विकासाच्या मार्गात अडथळे असतच नाहीत, सर्व उत्पादनाच्या घटकांची संपूर्ण क्षमता वापरली जातेच हा इंग्रजी अर्थशास्त्रज्ञांच्या पहिल्या पठडीचा विचार अगदी साधा आणि सरळ होता. विविध शास्त्रांच्या उतरंडीत समाज-अर्थशास्त्राला सर्वात जवळचे जीवशास्त्र. जीवशास्त्रीय वाढ जितकी निसर्गसुलभ आणि आनंददायी तितकाच आर्थिक विकासही. विकास खुंटतो तो विकासाच्या नावाखाली व्यवस्थेशी पोरखेळ करण्यामुळे. देशातील गरिबी हटवण्यासाठी काहीच करण्याची आवश्यकता नाही. गरिबी टिकावी आणि वाढावी म्हणून जे सतत

प्रयत्न होतात ते थांबवले तरी दारिद्र्य आपोआप हटणार आहे.

शेतीतील गुणाकारावर ताबा मिळविण्याचे अनेक प्रकार : उघड उघड लुटालूट, सक्तीची वसुली, खंड, वेठबिगारी, स्वस्त मजुरी, अपुऱ्या किमती. कोणत्याही एका देशात कोणत्याही एका कालखंडात यापैकी बहुतेक साधने वापरली जात असतात. त्यांच्या वापराचे प्रमाण बदलत असते एवढेच. सर्वात अप्रगत अवस्थेत लुटालुटीचे, वसुलीचे प्रमाण अधिक. त्याहून प्रगत समाजात वेठबिगार, स्वस्त मजुरी यांचे प्रमाण वाढले. त्यापुढील पायरीत सर्वात जास्त भर अपुऱ्या किमतीवर देण्यात येईल. कोणत्याही नागरी व्यवस्थेच्या प्रगतीचे हे मोजमाप आहे.

शेतीचे शोषण एकाच काळात वेगवेगळ्या पायऱ्यांनीही होताना दिसेल. ज्याला किंमत अपुरी मिळते तो मजुरी अपुरी देतो. वेठबिगार वापरतो. प्रसंगी लुटालूटही करतो. पण सर्व शोषणाचा फायदा औद्योगिक भांडवल निर्मितीकरताच वापरला जातो. शेती क्षेत्रातील अन्तर्गत शोषणामुळे अनेकांचा बौद्धिक गोंधळ झाला आणि मूळ आर्थिक द्वैताच्या समस्येकडे त्यांचे दुर्लक्ष होते.

चालू कालखंडातील शेतीच्या शोषणाचे सर्वात महत्त्वाचे साधन शेतीमालाला अपुरे भाव देणे हे होय. शेतकऱ्यांवर होणारे इतर सर्व अन्याय दुय्यम महत्त्वाचे आहेत. त्याचा व्यवसाय किफायतशीर असला तर इतर कोणत्याही अन्यायाला तो सहज तोंड देऊ शकेल. कोणत्याही समाज-अर्थ-व्यवस्थेचे समर्थ चित्रण हे त्या व्यवस्थेच्या अन्तर्गत वा बहिर्गत देवघेवीच्या शर्तींनी होते, उत्पादनाच्या साधनाच्या मालकीने नाही.

शेतीमालाच्या किमती अपुऱ्या ठेवण्यावर आज आपली भारत-इंडिया द्वैती व्यवस्था संपूर्णपणे अवलंबून आहे. प्रचलित व्यवस्थेचे कोणतेही अंग घ्या, कोणतीही समस्या घ्या. पुरे आकलन होण्यासाठी शेतीमालाच्या शोषणाशी त्याचा संदर्भ जोडल्याशिवाय पर्याय नाही.

स्वातंत्र्य मिळून ३५ वर्षे झाली तरी गरिबी हटली नाही. कारण हेच की स्वातंत्र्य मिळाले पण शोषण थांबले नाही. गोऱ्या इंग्रजांची जागा काळ्या इंग्रजाने घेतली. भारतावरचे इंग्लंडचे राज्य गेले, इंडियाचे आले. त्यामुळे भरभराट काय व्हायची ती इंडियाची झाली. इंडिया जगातील दहावी औद्योगिक सत्ता झाली. भारत खचतच राहिला. इथियोपियाच्या बरोबरीने आपण दारिद्र्याच्या शेवटच्या पायरीवर उभे आहोत. निव्वळ भारत अगदी शेवटच्या पायरीवर उभा आहे.

देशात भ्रष्टाचार माजला आहे, वाढत आहे याचे कारण हे नव्हे की आमचे नैतिक चारित्र्य खालावले आहे. एका बाजूला भणंग दारिद्र्य आणि



त्याच्याबरोबरीने ग्राहक संस्कृतीची बेटे. कष्ट आणि यश यातील पद्धतशीर घटस्फोटाचा भ्रष्टाचार हा अपरिहार्य परिणाम आहे.

शहरांची अफाट वाढ होत आहे. फूटपाथवरसुद्धा राहण्यास जागा नाही. वीज अपुरी, पाणी दूषित, हवाही बिघडलेली, सर्वत्र गलिच्छता, घाण. पण या घाणीतही लक्षावधी लोक जगतात, नव्हे दररोज त्यात हजारोंची भर पडते. याचे कारण हेही अभद्र जीवन शेतीवरच्या उपासमारीपेक्षा परवडले असा शास्त्रशुद्ध विवेक करून ते हे जीवन पत्करतात. शेतीवरील कष्टाची बूज राखल्याखेरीज शहरांकडे वाहणारे हे जनप्रवाह थांबणार नाहीत. शेतीमालाला योग्य भाव मिळाला नाही तर नागरी जीवनाचे प्रश्न सुटणे अशक्य आहे.

किंबहुना कोणत्याही एका क्षेत्रातील आजचे धोरण हे शेतीच्या दैनेशी संबंधित आहे.

अगदी संरक्षणविषयक धोरणही घ्या. परकीय व्यवस्थेखाली व्यावसायिक सैन्य ठेवण्यात आले होते. पण स्वतंत्र देशातही आज व्यावसायिक सैन्य आहे हे खरोखर विचित्र आहे. देशावर झालेल्या प्रत्येक आक्रमणाच्यावेळी आकाशवाणीवर क्रिकेट सामन्याचे समालोचन ऐकावे त्याप्रमाणे 'युद्धस्य कथा: रम्या' इंडियात ऐकल्या जातात. भारतीय सैन्याचेच मुळी दोन ढोबळ भाग आहेत. अधिकारीवर्ग इंडियातील, जवान सगळा भारतातील कोरडवाहू शेतीवर पोट भरता येईना म्हणून भरती झालेला. देशातील प्रत्येक वयात आलेल्या पुरुषास सक्तीची लष्करी सेवा करावयास लागत असती तर युद्धांबद्दलचा दृष्टिकोन बराच वेगळा आढळला असता. प्रत्येक तरुणास दरवर्षी काही आठवडे का होईना, लष्करी सेवा करावी लागली असती तर त्याचे काही फार चांगले परिणाम झाले असते. पण उघड उघड बहुसंख्याकांच्या शोषणावर उभारलेल्या दुहेरी व्यवस्थेला सर्वांना शस्त्रे सोडा, शस्त्रास्त्रांचे शिक्षण देणेही परवडण्यासारखे नाही.

सैन्यांचे आधुनिकीकरण अत्यंत खर्चिक बाब आहे. अद्ययावत् रणगाडे, विमाने, क्षेपणास्त्रे विकण्यास बडी राष्ट्रे आणि आंतरराष्ट्रीय दलाल उत्सुक असतात. अशा विकत घेतलेल्या शस्त्रास्त्रांनी संपूर्ण युद्ध लढणे केवळ अशक्य असते. दिवाळीसाठी आणलेले फटाके पोरे दिवाळीच्या सुरुवातीलाच वापरून टाकतात तसे तिसऱ्या जगातील देश ही महागाईची आयुधे जास्तीतजास्त दोन तीन आठवड्यांत उडवून टाकतात आणि संयुक्त राष्ट्रे किंवा आणखी कोणी तेवढ्या काळात मध्ये पडून शस्त्रसंधी घडवून आणतील अशा आशेने वाट पाहवत बसतात. आधुनिक शस्त्रास्त्रांच्या प्रचंड उपयोगाला तोंड देऊन विएतनामसारख्या देशाने

अमेरिकेसारख्या बलाढ्य देशास वाकवले. अशा तऱ्हेचे संरक्षण धोरण आपले शासन आखण्यास धजावणार नाही. कारण शहरांचे अजिबात नुकसान होऊ न देण्याला आम्ही सर्वप्रथम प्राधान्य देतो आणि त्याकरिता व्यावसायिक सेना आणि शस्त्रास्त्रांची खरेदी यावर अफाट पैसा खर्च करतो.

आमचे शिक्षणविषयक धोरणही असेच इंडियाच्या दृष्टीने आखलेले आहे. मध्यवर्ती सरकारच्या कोणत्याही खात्याचे धोरण शेतीमालास योग्य भाव द्यायचे ठरले तर आमूलाग्र बदलल्याखेरीज राहणार नाही.

शेतीमालाचे रास्त भाव हा एक कलमी कार्यक्रम दिसायला सोपा, पण आमूलाग्र परिवर्तन घडवून आणणारा आहे. आजपर्यन्तच्या सर्व सामाजिक-अर्थशास्त्रीय विचारांचे सर्व संदर्भ बदलून टाकणारा आहे. या विचाराच्या वेगवेगळ्या अंगांचे परिशीलन आणि वेगवेगळ्या परिणामांचे अध्ययन जाणत्यांनी केले पाहिजे.

पण विचाराच्या स्वयंभू गुणांमुळे तो टिकतो, मान्यता पावतो ही कल्पना शास्त्रीय नाही. शेतकरी संघटनेच्या विचाराला मान्यता मिळत आहे ती त्यामागे शेतकरी लक्षावधींच्या संख्येने उभे राहतात म्हणून. अशी संघटनात्मक ताकद निर्माण करण्यासाठी या पुस्तकाचा थोडा तरी उपयोग होवो हीच इच्छा.

२१-१०-१९८२ **शरद जोशी**

अंबेठाण.



**एक**

# इंदिरा इंडिया झाली, भारताचा वाली कोण?

**सा**प्ताहिक 'वारकरी'चा हा अंक वाचकांच्या हाती पडेपर्यंत लोकसभेच्या निवडणुकांचे सर्व निकाल जाहीर होऊन बहुतेक सातव्या लोकसभेच्या बैठकांना सुरुवातही झाली असेल. हा लेख लिहिताना सगळे निकाल माहीत नसले तरी हे उघड आहे की इंदिरा कॉंग्रेसला नवीन लोकसभेत पूर्वी कधी नव्हे इतके प्रचंड बहुमत मिळालेले असेल. डावा कम्युनिस्ट पक्ष सोडल्यास इतर सर्व पक्षांची संपूर्ण वाताहात झाली आहे. या निवडणुकीचा अर्थ मुख्यत: खालीलप्रमाणे-

१. भारतातील बहुसंख्य अडाणी, निरक्षर मतदाराने राजकीय बाबतीत आपण अडाणी नाही हे पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. इंदिरा पक्ष बहुमत मिळवेल अशी अपेक्षा अनेकांनी केली होती, परंतु एवढ्या प्रचंड प्रमाणावर त्यांचे उमेदवार निवडून येतील अशी कल्पनाही कोणी केली नाही. याचा अर्थ असा की देशातील मतदाराने कोणास मत द्यायचे याचा मनाशी निश्चय केला होता. सर्व पक्षांचा प्रचार त्यांनी ऐकून घेतला, गावातील, वस्तीतील पुढारी मंडळीनी त्यांना काय सल्ला दिला असेल तोही ऐकून घेतला आणि शेवटी कोणच्याही इतर गोष्टींचा विचार न करता आपल्या मनाला पटेल त्याच पक्षास मत दिले.

२. या देशातील प्राचीन काळापासून जी परंपरा ती त्यागी राज्यकर्त्यांची आहे, राज्यसत्ता काडीचाही लोभ न ठेवता चालविणाऱ्या राजर्षीची आहे. पंडित जवाहरलाल नेहरूंनी १८५१ साली कलकत्ता येथील एका वर्तमानपत्रात टोपण नावाने लेख लिहून भारतीय जनतेस जवाहरलाल स्वत:च हुकूमशाही आणण्याचा प्रयत्न करतील असा इशारा दिला होता. या लेखाचे लेखक स्वत: जवाहरलालच होते हे कळल्यावर भारतीय जनतेचा त्यांच्याबद्दलचा आदर अनेक पटींनी वाढला. सत्तेची लालसा धरणाऱ्यांचा, तिच्यामागे धावणाऱ्यांचा या देशात कधीही स्वत:हून सन्मान झालेला नाही. १९७५ नंतरच्या काळात इंदिरा गांधींनी स्वत:ची खुर्ची सांभाळण्यासाठी घटनेची मोडतोड केली, आणीबाणी जाहीर केली. तेव्हा त्यांनाही १९७७ च्या निवडणुकांत धडा शिकवायला मतदाराने मागे पाहिले नाही. जनता

पक्षाचे शासन आल्यापासून अर्ध्या गवऱ्या स्मशानात गेलेल्या म्हाताऱ्यांची किळसवाणी सत्तालोलुपता पाहून तर मतदार उबगून गेला होता. सत्तेच्या मागे धावणाऱ्यांना जनतेने पुन्हा एकदा धडा दिला आहे. ही भूमी त्यागी लोकांची कदर करणारी आहे, भोगलोलुपांची इथे पूजा होत नाही.

३ मतदारांनी केवळ राष्ट्रहिताचा विचार करून मते दिली. स्थानिक किंवा राज्यपातळीवरील प्रश्नांचा विचार न करता दिल्लीत इंदिराबाईचे राज्य पाहिजे एवढ्याच विचाराने मतदान झाले. पक्षबदलू लोकांना थप्पड मिळाली. दुर्दैवाने पक्ष बदलून इंदिरा-पक्षात गेलेल्यांनाही हाच धडा मिळावयास पाहिजे होता, तो दिला गेला नाही. इंदिरा गांधींना हा उमेदवार मान्य आहे ना, मग तो कोणीही असो, कसाही असो अशा विचाराने मते दिली गेली. इंदिरापक्षाने विजेचा खांब उभा केला असता तरी बहुसंख्य मतदारसंघातून तो निवडून आला असता. थोडक्यात म्हणजे उमेदवार कोणीही असो, इंदिरापक्षाला मिळालेले प्रत्येक मत हे व्यक्तिशः इंदिरा गांधी यांना मिळालेले मत आहे.

कोणत्याही कारणांनी का होईना, इंदिरा पक्षाचे शासन येणार हे निश्चित. लोकसभेत त्या पक्षाचे प्रचंड बहुमत असणार आहे. तेव्हा या पक्षास त्यांचा कार्यक्रम अमलात आणण्यास कोणतीही अडचण असणार नाही. यापुढे बहुसंख्य गरीब जनतेच्या खऱ्याखुऱ्या हिताचे कार्यक्रम तत्परतेने आखून अमलात आणण्यात आले नाहीत तर कोणतीही सबब सांण्यासारखी नाही.

देशातील सर्व जनतेने आपले भविष्य इंदिरा गांधींच्या हाती सोपविले आहे. आणीबाणीच्या काळात बाईंच्या आसपासच्या विदुषकांतील एकजण 'इंदिरा म्हणजेच इंडिया' असे म्हणाला होता. त्या वेळच्यापेक्षासुद्धा आज 'इंदिरा म्हणजे इंडिया' हे जास्त खरे ठरले आहे.

१९७१ च्या निवडणुकीनंतर अशाच प्रकारची संधी बाईना मिळाली होती. दोन तृतीयांश बहुमत लोकसभेत होते. बाईंची स्वतःची लोकप्रियता अफाट होती. अशी सुवर्णसंधी राष्ट्राच्या इतिहासात क्वचितच कोणास मिळते. बाईंना ती मिळाली पण त्यांनी ती गमाविली. मध्यवर्ती मंत्रिमंडळातील तसेच राज्यसरकारांतील व्यक्तींची प्यादी पुढे मागे हलविण्यात बाईंनी वेळ घालविला आणि हातची संधी फुकट दवडली. भारतातील बहुसंख्य गरिबांची स्थिती इतकी बिकट झाली की त्यांच्या असंतोषाने वादळ निर्माण झाले आणि त्या वादळातूनच शासनाला कोंडीत पकडणारी परिस्थिती व आणीबाणी वगैरे रामायण घडले.

फ्रान्सचे जनरल द गॉल सोडल्यास जगाच्या इतिहासात कोणत्याही व्यक्तीस



अशा प्रकारची संधी दोन वेळा मिळालेली नाही. जनरल द गॉल यास दुसरी संधी मिळाली ती लष्कराच्या उठावामुळे आणि फ्रान्समधील अनेक लोकांच्या इच्छेविरुद्ध. इंदिरा गांधींचे भाग्य असे की एकदा हुकवलेली संधी राष्ट्राने त्यांना पुन्हा दिली. एवढेच नव्हे तर पहिल्यापेक्षा फार मोठ्या बहुमताने दिली. ही संधी जर पुन्हा गमावली गेली तर व्यक्तिशः इंदिरा गांधी यांचे आणि राष्ट्राचे दुर्दैवच म्हणावे लागेल.

आज इंदिरा पक्षाचा सर्वत्र जयजयकार चालू आहे. देशाला स्वच्छ, स्थिर व कार्यक्षम शासन मिळेल अशी आशा जनसामान्याच्या मनात पालविली आहे. अशा वेळी अशुभ बोलू नये. मंगल कामना करावी व सर्वत्र शुभ व्हावे अशी इच्छा व प्रार्थना करावी हेच योग्य.

पण स्वातंत्र्यानंतर या देशात गेल्या तीसबत्तीस वर्षात जे घडले त्याचा अभ्यास केल्यास बाई ही संधी पुन्हा घालवतील अशी आम्हास साधार भीती वाटते. आमचा विचार खोटा ठरल्यास त्याबद्दल आम्हास अत्यंत आनंद होईल. किंबहुना तो खोटा ठरावाच अशी आमची प्रार्थनाही आहे. पण घडलेल्या इतिहासाचे निष्कर्ष इतके स्पष्ट आहेत की? त्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे निखारा थंड असेल अशी अपेक्षा करून त्याला हात लावण्यासारखे आहे. १९४७ सालापासून स्वतःचे भाग्य स्वतःच्या हाती आले. शेकडो वर्षांच्या गुलामगिरीनंतर आणि शोषणानंतर पुन्हा एकदा स्वातंत्र्याची पहाट उगवली. देशातील कोट्यवधी जनतेला आशा वाटली होती की स्वतंत्र भारतात त्यांना न्याय मिळेल, त्यांचे शोषण थांबेल आणि त्यांना काही सुखाचे दिवस दिसतील.

इंदिरा गांधींचे पिताजी जवाहरलाल तेव्हा राष्ट्राचे कर्णधार होते. स्वातंत्र्याच्या लढ्यात सर्वस्वाचा त्याग करुन आयुष्य झोकून देण्याइतक्या उसळत्या रक्ताचे आणि कविमनाचे तरुणांच्या गळ्यातील ताईत, त्यांची लोकप्रियता अशी अफाट की एखाद्या सम्राटाला हेवा वाटावा. प्रखर बुद्धिमत्ता, निर्मळ चारित्र्य, संगिनींना न भीता तोंड देण्याइतका निर्भयपणा. असे नेतृत्व असताना देशाची प्रगती होणार नाही? ती होणार याबद्दल कुणालाच शंका नव्हती.

...तीस वर्षे उलटून गेली.

...पण आज परिस्थिती काय आहे?

ग्रामीण भागातील कोरडवाहू शेतकरी, शेतावर मजुरी करून पोट भरणारे आदिवासी यांची स्थिती दिवसेंदिवस हलाखीची होत चाललेली आहे. ग्रामीण भागातील दरडोई उत्पन्न आहे तेथेच आहे. शहरात लंडन वा न्यूयॉर्क येथे शोभतील

असे इमले उठत आहेत. पाश्चिमात्य श्रीमंतांची सर्व भोगसाधने शहरांत उपलब्ध होत आहेत. ७० टक्के शेतकऱ्यांच्या घरच्यांना नेसायला धड पुरेसे कापडे नाहीत. लक्षावधी शहरी तरुण वैद्यक वा स्थापत्याचे उच्च शिक्षण देशात निघालेल्या महाविद्यालयात घेऊन त्याच्या जोरावर परदेशात जाऊन स्थायिक होत आहेत. खेड्यात कशाबशा चालणाऱ्या प्राथमिक शाळेत जाता येत नाही म्हणून देशातील निरक्षरांची संख्याही वाढते आहे.

राष्ट्राच्या इभ्रतीसाठी जगभर उडणारी भारताची विमानव्यवस्था आवश्यक आहे असे एकीकडे मानले जाते, दुसरीकडे लक्षावधी खेडी पावसाळ्यात सडका बंद पडल्यामुळे दरवर्षी वनवास काढीत आहेत. बहुसंख्य खेड्यात प्यायला स्वच्छ पाणी नाही, खायला पुरेसे अन्न नाही, कामधंदा नाही. आज आनंद इंडियाचे राज्य भारतावर चालू झाले.

स्वातंत्र्यानंतर शहरी अल्पसंख्याकांनी जुन्या वसाहतवादी यंत्रणेची सूत्रे हाती घेतली आणि ग्रामीण भारतावर वसाहतवादी राज्य चालू केले. अनिश्चित पावसावर शेती करणाऱ्या शेतकऱ्याच्या दुर्बलतेचा फायदा घेऊन त्याला लुटले. शेतीमाल पूर्वीप्रमाणेच स्वस्तात विकत घ्यायचा व कारखानदारी माल महागात महाग विकायचा हे वसाहतवादी तंत्र चालूच राहिले. ग्रामीण विकासाच्या नावाने अनेक नाटके झाली, अनेक कार्यक्रम झाले, संस्था उभारल्या गेल्या, पैसा ओतला गेला. पण धन्य त्या योजकांच्या कसबाची, या योजनांचा उपयोग झाला फक्त सरकारी नोकरवर्गाला आणि ग्रामीण भागात परंपरागत वर्चस्व ठेवलेल्या बागायत-जमीनदारांना! कोरडवाहू शेतीधंदा कायमचा बुडीतच राहिला.

शेतीव्यवसाय किफायतशीर करणे हा एककलमी कार्यक्रम कुणीही अमलात आणला नाही. कारण ज्यांच्या हाती शासनाच्या खऱ्या किल्ल्या होत्या त्यांच्या नफ्यावर पाय आला असता. यापुढेही कोणतेही शासन येवो, केवढ्याही बहुमताने येवो, त्याला देशातील चालू व्यवस्थेचे वसाहतवादी स्वरूप समजले आणि त्याविरुद्ध उठण्याची जिद्द त्याने दाखविली तरच त्याला देशातील बहुसंख्य अशा शेतकऱ्यांची स्थिती सुधारता येईल. एरवी जुन्याच नाटकाचे नवे अंक चालू राहतील.

इंदिरा गांधींचे नवे शासनदेखील ग्रामीण भारताच्या शोषणाची वसाहतवादी यंत्रणा बंद करील अशी आशा फार थोडी त्यांच्या पक्षाच्या निवडणुक-जाहीरनाम्यात शेतीमालाच्या किमतीच्या प्रश्नाचा उल्लेखसुद्धा नाही. शाळेतील पोरांना वह्यापुस्तके पुरविण्याचासुद्धा उल्लेख आहे, पण देशातील ७० टक्के शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांची जी किल्ली तिचा उल्लेखसुद्धा नाही. तेव्हा



देशाच्या आजच्या परिस्थितीचे स्वरूप त्यांना समजले तरी नसावे किंवा समजूनसुद्धा त्या प्रश्नाला महत्त्व न देता विकासाचे जुने नाटकच चालू ठेवण्याचे त्यांनी ठरविले असावे. देशातील परिस्थितीचा त्यांचा अनुभव जुना आहे. तेव्हा हे अज्ञान आहे असे म्हणणे धाष्टर्याचे होईल. शेवटी इतर पक्षाप्रमाणे इंदिरापक्षाही इंडियाचा पक्ष आहे. भारताच्या खऱ्याखुऱ्या हिताचे त्यांच्या हातून काहीही घडणार नाही. भूमिहीनांना माळरान जमिनी वाटणे, सावकारी कर्जमुक्ती अशा प्रकारचे निःसंशय म्हत्त्वाचे पण किरकोळ, उपयोगापेक्षा जाहिरातच जास्त असणारे कार्यक्रम हाती घेतले जातील. एक गोष्ट होणार नाही आणि ती म्हणजे शहरी व ग्रामीण भागातील व्यापारी देवघेवीच्या अटी ग्रामीण भागाचा फायदा करणार नाहीत.

तेव्हा, इंदिरा 'इंडिया' झाली, भारताचा वाली कोण?

*सा. वारकरी- १२ जानेवारी १९८०*

□□

## दोन

# विचारवंतांचे बुद्धिदारिद्र्य

**लो**णावळा येथे प्रा. वि. म. दांडेकर यांच्या राजकीय अर्थशास्त्र संस्थेतर्फे २२ व २३ डिसेंबर १९७९ रोजी एक चर्चासत्र भरविण्यात आले होते. 'सध्याच्या देशातील राजकीय अस्थिरतेतून मार्ग कोणता?' या विषयाचा विचार करण्यासाठी या चर्चासत्राची योजना करण्यात आली होती. स्वत: प्रा. वि. म. दांडेकरांखेरीज विधिज्ञ प्रा. सत्यरंजन साठे, अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य प्रा. श्री. अलुदस्तुर, श्री. इंदिरा रोदरमंड याशिवाय श्री. प्रेमशंकर झा, रँग्लर महाजनी, श्री. पी. व्ही. आर. राव, न्या. नाईक, प्रा. कोगेकर, श्री. नवलभाई फिरोदिया, प्रा. सिरसीकर, श्री. आर. ए. गोपालस्वामी, श्री. बाबा यासारखी आपल्या क्षेत्रातील नामवंत मंडळी या चर्चासत्रात भाग घेण्यासाठी हजर होती.

गेल्या ५-६ वर्षांत देशात राजकीय अस्थिरता निर्माण झाली. ७ व्या लोकसभेच्या निवडणुकांचा निकाल काहीही लागो ही अस्थिरता दूर होण्याची चिन्हे दिसत नाहीत. हा अस्थिरचेचा प्रश्न महत्त्वाचा आहे याबद्दल चर्चासत्रातील सर्वांचेच एकमत झाले. या अस्थिरतेस एखादी दुसरी व्यक्ती वा पक्ष जबाबदार नसून राजकीय नीतिमत्तेचे सर्वत्र झालेले अध:पतन हेच प्रमुख कारण आहे. याबद्दलही जवळ जवळ एकमत झालेले दिसले. श्री. प्रेमशंकर झा व प्रा. वि. म. दांडेकर यांनी नैतिक अध:पतनाच्या या निदानाबद्दल काही शंका उपस्थित केल्या परंतु देशातील राजकीय आजाराचे दुसरे काही रोगनिदान त्यांनी दिल्याचे दिसत नाही. सार्वजनिक, नैतिक मूल्यांचे अध:पतन असे सर्वसाधारण रोगनिदान झाल्यानंतर वेगवेगळ्या वैद्यांनी आपपल्या झोळीतील जडीबुटीची औषधे काढून ती गुणकारी व परिणामकारक असल्याबद्दलची ग्वाही देण्यास सुरुवात केली. सर्व वैद्यांनी ज्या उपाययोजना सुचविल्या त्या घटनात्मक बदल घडवून आणण्याच्या होत्या. त्या तीन प्रमुख सूचना खालील प्रमाणे होत्या.

१) सर्व पक्षांचे प्रतिनिधित्व असलेले राष्ट्रीय सरकार बनविण्याची घटनेतच सक्तीची तरतूद असावी.



२) संसदीय लोकशाही फक्त द्विपक्षीय पद्धतीतच यशस्वी होऊ शकते. आपल्याकडे बहुपक्षीय पद्धती रूढ होत असल्या कारणाने आपण स्वित्झर्लंडचे अनुकरण करून लोकसभेस जबाबदार असणारी पण ठराविक कालावधीचे घटनात्मक संरक्षण असलेली सामूहिक कार्यकारी मंडळाची पद्धत उचलावी.

३) पंतप्रधानांची निवडणूक लोकसभेकडून व्हावी. याशिवाय अप्रत्यक्ष मतदानपद्धती, अपक्ष उमेदवारांवर बंदी इत्यादी अनेक उपाय सुचविण्यात आले. या सर्व उपायांवर दीर्घ चर्चा झाली; परंतु कोणाचेच एकमत होऊ शकले नाही. शेवटी चर्चासत्रात विचारांची देवघेव झाली हेही नसे थोडके, असे अळणी समाधान मानून हे विद्वान घरोघर परत गेले.

राजकारणी मंडळी स्वार्थी, नीतीभ्रष्ट, व्यक्तिगत स्वार्थासाठी खुर्चीच्या लोभापायी ते एकत्र संघटितपणे काम करत नाहीत. त्यामुळे देशात अस्थिरता निर्माण होते. त्यावर उपाय सुचवायला सरसावलेले नामवंत बुद्धिमंत. पण त्यांच्या चर्चेची फलनिष्पत्ती झाली राजकारण्यांच्या बैठकीसारखीच. ज्याने त्याने आपल्या उपायाचे समर्थन करावयाचे, त्या योजनेत ते काही दोष दिसतील ते दोष जनतेने व सर्व पक्षांनी राष्ट्रभावनेने काम केल्यास फारसे जाणवणार नाहीत असे लंगडे समर्थने करावयाचे. दुसऱ्यांनी सादर केलेल्या सूचनांतील मात्र असतील नसतील ते सर्व दोष उघड करून त्यांच्यावर तुटून पडायचे आणि आपणच लढाई मारली अशी बढाई मनाशी आणि आपल्या जवळच्या लोकांशी मारायची.

राजकारणी पुढारी बहुतांशी अर्धशिक्षित, लहानपणापासून ५० भानगडी केलेले, पचवलेले, सुसंस्कृतपणाचा, नीतिमत्तेचा त्यांचा फारसा संबंध नाहीच. पैसा, निवडणुका, सत्ता, खुर्ची यांच्या उलाढाली करण्यात आयुष्य घालविलेले गावगुंड, सोयीस्कर पडेल ते तत्त्वज्ञान आणि एखादे पुढारीपण यांच्या आधाराने आपला व्यवसाय चालविणारे. त्यांची एकमेकात लठ्ठालठ्ठी होते. वादावादी होते, चुंबाचुंबी होते, पक्षबदल होतात, मंत्रिमंडळे पडतात व राजकीय अस्थिरता निर्माण होते हे समजण्यासारखे आहे.

पण आमची विद्वान मंडळी तर राजकारणी मंडळींप्रमाणे नाहीत! बहुतेक सर्व सुसंस्कृत, व्युत्पन्न घराण्यात जन्मलेले, शिक्षणाचा फायदा मिळालेले, सुखवस्तू-निदान भुकेचा चटका कधी न लागलेले. अशा मंडळींना सत्याच्या शोधापलीकडे कशातही स्वारस्य नसावे आणि त्यांचे एकमत झाले नाही तरी त्यांच्या विचारात उघड उघड अप्रामाणिकपणा तरी नसावा अशी अपेक्षा ठेवणे अयोग्य होणार नाही.

राजकीय अस्थिरता सार्वजनिक नीतिमत्तेच्या ऱ्हासामुळे निर्माण झाली व त्यावर तोडगा म्हणून राज्य घटनेत योग्य ते बदल केले म्हणजे भागेल हे या विद्वानांच्या विचारमंथनातून निघालेले लोणी. या निष्कर्षाची तपासणी केल्यास त्यात विचारांचाच नव्हे तर प्रामाणिकपणाचाही अभाव दिसतो.

पहिला निष्कर्ष नैतिक ऱ्हासाचा गेल्या पाच वर्षातील राजकीय अस्थिरतेचे कारण सार्वत्रिक नैतिक ऱ्हास असे म्हणणे म्हणजे पाच वर्षांपूर्वी आपल्या देशातील नैतिक पातळी फार उंच होती आणि ती अकस्मात खाली आली असे म्हणणे आहे. ही नैतिक पातळी म्हणजे काय? आणि तिचे मोजमाप करण्याचे काही यंत्र आहे किंवा कसे? उष्णतेचे मोजमाप होऊ शकते तसे नैतिकतेचे होऊ शकते काय? बरे, उष्णतेत चढ उतार कोणत्या कारणाने होतात हे जसे माहीत आहे तसे नैतिकतेच्या पातळीतील चढउताराची कारणे काय? ही नैतिकता या विद्वानांच्या मते स्वयंभू असावी, जगातील सर्व भौतिक गोष्टींची ती आदिकारण असावी. ही नैतिकता स्वयंभू असल्यामुळे या पृथ्वीवरील वा मानवी समाजातील कोणत्याही घटकांवर व घटनांवर ती अवलंबून नाही. या नैतिकतेची पातळी स्वेच्छेने ठरते आणि त्या पातळीवर राजकीय स्थिरता ठरते. असला युक्तिवाद अडाणी समजल्या जाणाऱ्या शेतकऱ्यांकडून आम्ही आजवर ऐकत होतो- 'काय त्या विठ्ठलाच्या मनात असेल ते होईल, आपल्या हाती काही नाही.'

सामाजिक, आर्थिक स्थिती जसजशी बदलेल तसतसे समाजातील संकेत, आचारविचार, विचारपद्धती व त्यातील परस्पर संबंध बदलत जातात असे एक मत आहे. या सर्व गोष्टींना नैतिकता म्हटल्यास ती स्वयंभू नसून सामाजिक, आर्थिक परिस्थितीनुसार बदलणारा एक घटक आहे. हा कार्यकारणभाव केवळ एकतर्फी नाही. काही प्रमाणात तरी ही नैतिकतासुद्धा सामाजिक, आर्थिक संबंधाचे नियमन करते असे दुसरे मत आहे. यापैकी कोणतेही मत ग्राह्य धरले तरी आमच्या विद्वानांना 'नैतिकतेचा ऱ्हास झाला' एवढे म्हणून थांबता येणार नाही.

नीतिमत्तेतील बदलाची कारणे काय, कोणत्या आर्थिक, सामाजिक घटकांमुळे नीतिमत्तेच्या पातळीत बदल झाला हे स्पष्ट करून सांगण्याची जबाबदारी त्यांना टाळता येणार नाही. राजकीय, अर्थशास्त्राच्या नावाने चालणाऱ्या संस्थेच्या छत्राखाली तरी त्यांना ही जबाबदारी टाळता येणार नाही. लोणावळ्यात निघालेल्या अर्धा डझन आध्यात्मिक आश्रमांत जर हे चर्चासत्र झाले असते तर या विद्वानांचे राजकीय अस्थैर्याचे हे रोगनिदान शोभून दिसले असते.

अशा अशास्त्रीय रोगनिदानावर अवलंबून असलेली उपचार योजना, कितपत



शास्त्रशुद्ध असणार हे उघडच आहे. 'एकच प्याला' नाटकातील तळीरामच्या आजारपणात तपासणीसाठी आलेल्या भिषक्‌वर्यांचीच ही गत. रोगनिदान नैतिकतेचा अभाव आणि उपचार राज्यघटनेत बदल. म्हणजे आग रामेश्वरी आणि बंब सोमेश्वरी असा हा प्रकार. नैतिकतेच्या ऱ्हासाचे परिणाम घटनेतील बदलामुळे कसे दूर होतील? का या विद्वानांच्या मते नैतिकता घटनेतील कलमाने दुरुस्त करता येते?

या विद्वानांच्या विचारात इतका गोंधळ पाहून हसावे का रडावे हे समजेनासे होते. विषय इतका गंभीर आणि देशाच्या भवितव्याशी निगडित नसता तर पोटभर हसून भागले असते. कोट्यवधी लोकांच्या पोटापाण्याचा संबंध नसता तर या विद्वानांच्या चर्चेकडे दुर्लक्षही करता आले असते. भारतातील सुशिक्षितांच्या, विशेषत: अर्थ व समाजशास्त्रज्ञांच्या विद्वेतेबद्दल आदर बाळगण्यासारखी स्थिती कधीच नव्हती पण त्यांची अवस्था इतकी दयनीय असेल, असे वाटले नव्हते.

आपपल्या क्षेत्रात मान्यता मिळविलेल्या इतक्या विद्वान व्यक्ती अशा प्रकारचा वैचारिक गोंधळ कसा करतात याचे उत्तर सोपे आहे. बुद्धीने विचार न करता खिशाने विचार करणारी मंडळीच असा घोटाळा करू शकतात. आपल्या देशातील सद्य:स्थितीचे प्रामाणिक निदान करू गेल्यास बाहेर पडणारे सत्य इतके कठोर आहे आणि शहरी समाजास न पेलवणारे आहे की ते सत्य नजरेआड करण्यासाठी नैतिकतेसारख्या अव्यक्त कल्पनांचे जंजाळ उभे करावे लागते आणि ऱ्हासाच्या कड्यावर येऊन पोहोचलेली वसाहतवादी राजकीय अर्थव्यवस्था टिकविण्यासाठी थोडी थोडी हुकूमशाहीच्या इंजक्शनांची शिफारस करावी लागते. शहरी विद्वानांच्या या भाकड चर्चेला या पलीकडे महत्त्व नाही.

आजच्या शासन संस्थेचे स्वरूप काय? देशातील बहुसंख्य जनतेची म्हणजे कोरडवाहू शेतकऱ्यांची आर्थिक पीछेहाट इंग्रज १९४७ साली येथून गेल्यानंतरही का चालू राहिली? दारिद्र्यरेषेखालील जनतेची संख्या वाढत राहिल्याने राजकीय अस्थिरता निर्माण होणे कसे अपरिहार्य आहे, नवीन निवडणुकीनंतर मोठे बहुमत लोकसभेत असलेले सरकार अधिकारावर आले तरीसुद्धा चालू वसाहतवादी व्यवस्था संपुष्टात येईपर्यंत राजकीय अस्थैर्य कायमच राहणे कसे अटळ आहे याची शेतकरी संघटनेच्या विचारांशी परिचय असणाऱ्यांना माहिती आहे. तरीसुद्धा या लेखाच्या वाचकांना सोयीसाठी या विचारांचा थोडक्यात गोषवारा देत आहोत.

दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटानंतर साम्राज्यवादी राष्ट्रांना आपल्या जुन्या वसाहती पूर्वीच्या पद्धतीने सांभाळणे अशक्य झाले. एका मागोमाग एक वसाहतीला स्वातंत्र्य

बहाल करून साम्राज्यवादी राज्यकर्ते निघून गेले. राज्यसत्ता त्या त्या देशातील पुढारलेल्या शहरी वर्गाकडे आली. केवळ आपल्या देशातच नव्हे तर त्या काळात स्वतंत्र झालेल्या शेकडो देशात अशीच परिस्थिती झाली.

नवीन सत्ता हाती आलेल्या वर्गांना खरीखुरी राष्ट्रव्यापी अस्मिता कधीच नव्हती. साम्राज्यवाद्यांचा आर्थिक वारसाही त्यांनी घेतला. कच्चा माल स्वस्तात स्वस्त दराने खरेदी करून कारखानदारी माल जास्तीत जास्त दराने विकणे हे वसाहतवादी तंत्र त्यांनी चालूच ठेवले. परकीयांच्या, मुख्यत: जुन्या वसाहतवादी राष्ट्रांच्या मदतीने देशातील मोठ्या शहरांच्या आसपास उद्योगधंद्यांची वाढ करण्यात आली. देशातल्या देशातच हे सर्व हो तर असल्यामुळे कारखानदारी करण्यासाठी कच्चा माल आता दूरवर वाहून नेण्याचीही गरज राहिली नाही.

भारतात कोरडवाहू शेतकऱ्याचा माल दरवर्षी काही ठराविक काळातच बाजारात येत असल्यामुळे खरेदीदाराच्या बाजारपेठेत त्याला इतका भाव कमी मिळतो की मालाचा उत्पादन खर्चही भरून निघू शकत नाही. पावसाळ्याच्या लहरीपणामुळे शेतीव्यवसायात जो धोका निर्माण होतो तो धोका घेण्याबद्दल शेतकऱ्यांना मोबदला कधीच मिळत नाही. या धोक्याची टक्केवारी दर सात वर्षाच्या काळात निदान ४७% इतकी असते. याची गणना उत्पादनखर्चात केली तर शेतीमाल हा उत्पादनखर्चाच्या निम्म्या दरातच विकला जातो. कोरडवाहू शेती व्यवसाय हा कायमचा बुडीत धंदा राहिला आणि ७०% लोक हा कायम तोट्याचा व्यवसाय करीत हलाखीत राहिले.

शेतीकरिता किंवा ग्रामीण भागाकरिता काढलेल्या योजना या मुख्यत: शहरी नोकरवर्गाच्या व ग्रामीण भागातील बागायतदार, जमीनदारांच्या फायद्याच्या झाल्या. शहर व ग्रामीण भागातील व्यापारी देवघेवीच्या अटी सतत ग्रामीण भागाच्या विरुद्ध जात राहिल्या.

राहणीमान, औषधोपचाराची सोय, शिक्षण, वाहतूक, उद्योगधंदे, रोजगार या सर्व गोष्टींत शहरे व ग्रामीण भाग यातील प्रचंड दरी अधिक रुंदावतच गेली. औपचारिक लोकशाही चालू ठेवण्यासाठी ग्रामीण भागातील लोकांची गरज असल्यामुळे राज्यकर्त्या वर्गात बागायतदार जमीनदारांची भरती करण्यात आली. एवढेच नव्हे तर राज्यपातळीवर महत्त्वाची अधिकारपदे त्यांच्या स्वाधीन करण्यात आली. ग्रामीण भागाच्या प्रतिनिधित्वाची मिरास बाळगणाऱ्या या वर्गाला विकत घेऊन व्यापार व उद्योगधंदे ही क्षेत्रे त्यांच्या ताब्यातून बाजूला ठेवणे काही कठीण नव्हते.



विकसित देश व अविकसित देश यांच्यातील सतत वाढत्या दरीप्रमाणेच अविकसित देशांच्या अंतर्गत शहरी विभाग व ग्रामीण विभाग यातील तफावत वाढतच राहिली. अर्थकारणात देशाची पुन्हा एकदा विभागणी झाली. ग्रामीण शेतीवर जगणाऱ्या 'भारता'वर शहरी उद्योगधंद्यामुळे भरभराटीत असलेल्या 'इंडिया'चे राज्य प्रस्थापित झाले आणि जुनीच वसाहतवादी शोषणाची तंत्रे चालू राहिली.

दिल्लीत किंवा राज्यांच्या राजधान्यांत असलेली सरकारे ही 'इंडियाची' ची सरकारे आहेत. भारताच्या शोषणाकरिता निर्माण केलेल्या यंत्रणेचा तो भाग आहे. सध्याच्या प्रमुख राजकीय पक्षात भारताचा एकही पक्ष नाही. सर्व पक्ष 'इंडिया' चेच आहेत. 'गरिबी हटाओ'च्या घोषणा त्यांनी दिल्या, भूमिहीनांना माळरान जमिनी वाटल्या, हरिजनांना त्यांच्या जमिनी मिळवून दिल्या, कर्जे दिली, कर्जे माफ केली, दवाखाने काढले, शाळा काढल्या तरी ही सर्व फक्त धूळफेक आहे. मूळ शेतीव्यवसाय किफायतशीर केल्याशिवाय बाकीच्या कोणत्याही कार्यक्रमाचा काहीही उपयोग नाही. त्यासाठी ताबडतोब उत्पादनखर्च भरून निघणाऱ्या आधारभूत किंमतीची हमी व शक्य तितक्या लवकर शेतीमाल साठविण्याची व्यवस्था व त्यासाठी पतपुरवठा, उत्पन्नाचे विविधीकरण, शेतीमालाच्या प्रक्रियेचे कारखाने व ग्रामीण भागात शेतीसाठी लागणाऱ्या वस्तूंचे उद्योगधंदे उभारणे हा कार्यक्रम प्रचंड प्रमाणावर राबविण्याची आवश्यकता आहे.

हे करण्यासाठी शहरी क्षेत्रातील चैनशौकाच्या अनेक बाबींवर काटछाट आणणे आवश्यक होणार आहे आणि त्यामुळेच 'इंडिया'तील कोणत्याही पक्षास अशा तऱ्हेचा भारताच्या हिताचा कार्यक्रम घेणे परवडणारे नाही. ग्रामीण विकासाच्या नावाखाली डोळ्यात धूळ फेकणारे कार्यक्रम उभे करून १९४७ सालापासून बरीच वेळ मारून नेता आली. पण भारतातील तणाव आता इतका वाढला आहे की कोणत्याही 'इंडिया'तील शासनाला दोन परस्पर विरोधी गोष्टींची सांगड घालणे अशक्य झाले आहे. राजकारण हे उघडउघड उद्योगधंदे व व्यापार यांच्या दलालांचे झाले आहे. अशा राजकारणात राष्ट्रवाद, ध्येयनिष्ठा वा पक्षनिष्ठा यांना स्थान असूच शकत नाही. जो तो लवकरात लवकर सत्तास्थाने काबीज करून ती ताब्यात ठेवण्यासाठी साध्य-साधनांचा विचार न करता लवकरात लवकर धनराशी जमा करण्याच्या मागे आहे. 'इंडिया'तील राजकीय स्थैर्याचे मूळ भारतातील वसाहतवादी शोषणात आहे. हे शोषण थांबवून समग्र देशातील सर्व जनतेच्या हिताचे राज्य जोपर्यंत प्रस्थापित होत नाही तोपर्यंत इंडियात स्थिर शासन अशक्य आहे.

व्यक्तिमाहात्म्याच्या, हुकूमशाहीच्या किंवा लष्कराच्या आधाराने अशी आसने काही काळ स्थिर वाटली तरी तो केवळ भ्रमच राहील.

भारतातील दारिद्र्याच्या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी 'इंडिया'त अनेक संस्था उदयास येत आहेत, भरभराटीसही येत आहेत. या दारिद्र्याच्या शिध्यावर पोट फुगेपर्यंत चरणारी गिधाडे आणि कावळे न्यूयॉर्क ते दिल्ली, दिल्ली ते गल्ली सगळीकडे पसरली आहेत. ते हे आमचे विद्वान, त्यांच्याकडून अधिक सत्यानिष्ठेची अपेक्षा ठेवणेच चूक आहे.

अर्थतज्ज्ञ एखादी संशोधन योजना पदरात पाडून घेण्याकडे डोळे लावून बसलेले, विधिज्ञांची नजर पुस्तकांच्या विद्यालयांच्या पलीकडे न गेलेली, प्रत्येकजण आपपल्या वीतभर जगाला क्षितिज समजणारा. राष्ट्रव्यापी भूमिका घेतील असे विद्वान शोषणावर अवलंबून असलेल्या 'इंडिया'त तयार होऊ शकत नाहीत आणि तयार झाले तरी टिकू शकणार नाहीत. हीच या विद्वानांची शोकान्तिका.

*सा. वारकरी १२-१-८०*

□□



तीन

# ४९ कोटींची कर्जमाफी

**म**हाराष्ट्राचे नवे तडफदार न् तरुण मुख्यमंत्री बॅ. अंतुले यांनी २७ जून १९८० रोजी मुंबई येथील एका पत्रकार परिषदेत एक महत्त्वाची घोषणा केली. महाराष्ट्रातील ७ लक्ष ८१ हजार अल्पभूधारक शेतकऱ्यांचे व्याजासहित ४९ कोटी रुपयांचे कर्ज माफ करण्याचा निर्णय शासनाने घेतल्याचे त्यांनी सांगितले. ५ एकर बागायती किंवा ७॥ एकर जिरायती जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांना या योजनेचा फायदा मिळू शकेल.

प्रथमत: हा निर्णय घेतल्याबद्दल महाराष्ट्र शासनाचे मन:पूर्वक अभिनंदन करावयास हवे. हा निर्णय शुद्ध बुद्धीने शेतकऱ्यांच्या हितासाठी घेतला आहे असे गृहीत धरून हे अभिनंदन करावयाचे. पण या निर्णयाचे पुढे काय होणार आहे याबद्दल आम्हास काहीही निश्चित वाटत नाही.

प्रथमत: या निर्णयाचा हेतू राजकीय आहे अशी दाट शंका येण्यास जागा आहे. नवीन मंत्रिमंडळाच्या स्थैर्याबद्दल काही शंका व्यक्त केल्या जात असताना काही ठळक लोकप्रिय शेतीसंबंधित निर्णय जाहीर केल्यास पक्षांतर्गत विरोधाची धार बोथटेल या हेतूने हा निर्णय इतक्या तडकाफडकी जाहीर केला असावा असे वाटते. मंत्रिमंडळाच्या या निर्णयाला अजून रिझर्व बँकेची अनुमती मिळाली नाही. ही अनुमती प्रथम मिळवून हा निर्णय शासकीय अध्यादेशाच्या स्वरूपात जाहीर करण्यात आला असता तर आम्हास अधिक आनंद वाटला असता.....

.....बॅ. अंतुले यांना आम्ही एक पाऊल पुढे जाऊन असा प्रश्न विचारू इच्छितो की बॅरिस्टसाहेब, ज्या शेतकऱ्यांना व्याज देता येत नाही, मुद्दल परत करता येत नाही हे तुम्हाला माहीत आहे, हे आम्हाला माहीत आहेच, बँकांना माहीत आहे, ज्यांची कर्जे वेळोवेळी माफच करावी लागतात त्या शेतकऱ्यांची व्यावसायिक आर्थिक स्थिती सुधारावी म्हणून तुम्ही काय करणार आहात? शेतीव्यवसाय जोपर्यंत तुटीचा आहे तोपर्यंत शेतकऱ्याला कोणतेही कर्ज देणे हेच मुळी आर्थिक शहाणपणास धरून नाही. पण अशी कर्जे न दिल्यास शेतीव्यवसायच बंद पडेल व

लाखो शेतकरी दरवर्षी शेती सोडून शहरात रोजगारासाठी येतील आणि देशातील आर्थिक, सामाजिक व राजकीय व्यवस्था कोलमडून पडेल म्हणून अधिकाधिक कर्जाच्या जोरावर तुम्ही शेती जिवंत ठेवू पाहत आहात.

शेतकरी जोपर्यंत शेतीव्यवसाय किफायतशीररीत्या करू शकत नाहीत तोपर्यंत ते कोणाचेही कर्ज फेडू शकत नाहीत. लग्नकरिता, दशपिंडाकरिता, पिकाकरिता किंवा कोणत्याही कारणाने कर्ज काढले की तो खड्डा भरून येतच नाही.

शासनाने वेळोवळी कर्जमाफी करणे म्हणजे आर्थिक अन्यायाविरुद्धचा उद्रेक टाळण्यासाठी केलेली तात्पुरती उपाययोजना होय. नाकातोंडापर्यंत कर्जाच्या चिखलात बुडालेल्या शेतकऱ्याला अधूनमधून गळ्याला धरून वर काढावे आणि पुन्हा सोडून द्यावे असा प्रकार चालू आहे. त्याला घट्ट जमिनीवर आणण्याचा प्रयत्नच होत नाही.

लहान मुले 'व्यापार' म्हणून एक खेळ खेळतात. त्यात खेळातल्या चलनाने स्थावरजंगम मालमत्तेची खरेदीविक्री होते. हातातल्या फाशाच्या दानावर खेळातील जय व पराजय ठरत असतो.

शेतकरी आणि इतर व्यावसायिकात प्रकारचा खेळ चालू असतो. फरक एवढाच की प्रत्यक्ष जीवनातील या खेळात फाशाचे कोणतेही दान शेतकऱ्याविरुद्धचेच पडते. छाप पडला तर शेतकरी हरला आणि काटा पडला तर इतर जिंकले अशाच नियतीने हा खेळ चालू आहे. अर्थातच थोड्याच खेळात शेतकरी भणंग होतो आणि खेळ संपायची वेळ येते. खेळ चालू राहायचा असेल तर शेतकऱ्याला उसने पैसे घ्यावे लागतात. मग खेळ आणखी थोडा वेळ चालतो, पण खेळाच्या नियमात शेतकऱ्याला जिंकण्याची शक्यताच नसल्यामुळे उसने पैसेही हरले जातात व पुन्हा कर्ज काढण्याची वेळ येते.

अशा तऱ्हेच्या डावाने वारंवार कर्ज माफ करण्याची वेळ येणार हे उघड आहे. दोन देशातील व्यापारी-देवघेवीच्या अटी जर सतत एका देशाच्याच बाजूने बदलत असतील तर तो ऋणको देश कधीच कर्जफेड करू शकणार नाही. हा आंतरराष्ट्रीय चलनव्यवहारात प्रस्थापित असलेला सिद्धान्त 'भारत' व 'इंडिया' यांच्यातील व्यवहारालाही लागू आहे.

याचा अर्थ असा की कर्जमाफी ही जुजबी चाल आहे. मूळ रोग बरा करण्याच्या दृष्टीने तिचा उपयोग काही नाही. शेती ही व्यवसाय म्हणून किफायतशीर करणे त्यावर उपाय आहे. कर्जमाफीवर खर्च केलेले ५० कोटी रुपये वापरून निदान ५० शेतीमालाच्या प्रक्रियेचे उद्योगधंदे काढले गेले असते तर दीर्घ मुदतीच्या



उपाययोजनेला सुरुवात झाली असे म्हणता आले असते. गुदामात शेतीमाल ठेवून त्यावर आपोआप ५० टक्क्यापर्यंत तारण मिळावे अशी व्यवस्था झाली असती तरीही शेतीला व्यवसायाचे स्वरूप देण्यास मदत झाली असती. भरपूर उत्पादन असलेल्या मालाची निर्यात शेतकऱ्याच्या पदरात पडेल अशा तऱ्हेने केली गेली असती तरी शेतकऱ्यांना आर्थिक खेळात कधीतरी जिंकण्याची शक्यता निर्माण झाली असती. भाव बांधून देण्याचे धोरण स्वीकारले गेले असते तरी स्वतःच्या पायावर उभे राहण्यास शेतकऱ्यांना मदत झाली असती. एका समाजातील दोन घटकामधील संबंध हे कायमचे दयाधर्माच्या स्वरूपाने असू शकत नाहीत. तर्कशुद्ध विचारावर आधारलेली दूरगामी उपाययोजना करण्याइतकी सवड सवंग राजकारणात क्वचित मिळते. 'शीर समलात तो पगडी पचास' अशा धोरणाने एक एक दिवस काढावा लागतो आणि एक दिवस दीर्घ मुदतीची उपाययोजना करण्या इतके स्वास्थ्य मिळेल अशी करत बसावे लागते.

हे खरे असले तरी कर्जमाफीसारखे हत्यार ओबडधोबड आहे यात काही शंका नाही. बॅ. अंतुले आणि त्यांचे सहकारी यांच्या ही गोष्ट लक्षात आलीच की यापुढे ग्रामीण भागात पतपुरवठ्याचे चित्र कायमचे बदलणार आहे. प्रामाणिकपणे कर्जफेड करणारे अवश्य तर बैला, जमीन विकून कर्जाची रक्कम उभी करणारे मूर्ख ठरले आहेत. यापुढे कर्जाची रक्कम परत करण्याबाबत वाढती अनास्था दिसली तर त्याचे आश्चर्य वाटायला नको. अशा परिस्थितीत विविध सेवा सहकारी संस्थातर्फे सरळसरळ पीकखर्चासाठी लागणाऱ्या रकमांचे अनुदान म्हणून वाटप करणे योग्य ठरेल.

शासकीय कार्यवाहीच्या दृष्टीने थकलेली कर्ज माफ करण्यापेक्षा एका ठराविक तारखेनंतर दिलेली सर्व कर्ज, मग ती परत फिरलेली असोत अथवा नसोत माफ करणे योग्य झाले असते.

ज्या शेतकऱ्यांनी आपली कर्जे फेडली आहेत त्यांच्या रकमा त्यांना परत करणे काही कठीण नाही. ज्या शेतकऱ्यांनी दुसरीकडून कर्जे काढून पीक-कर्जे फेडली त्यांच्या प्रकरणांचा सहानुभूतीपूर्वक विचार केला जाईल असे बॅ. अंतुले यांनी आश्वासन दिले आहे. पण अशा तऱ्हेच्या कार्यवाहीमुळे दफ्तर दिरंगाई व भ्रष्टाचार यांना उदंड वाव मिळून भाऊसाहेब, रावसाहेबांचे शेतकऱ्यावरील वर्चस्व वाढीला लागेल. त्याखेरीज ज्यांनी इतर मार्गांनी कसाबसा पैसा उभा केला असेल त्या शेतकऱ्यांवर अन्यायच होणार आहे.

ही योजना ५ एकर बागायती व ७॥ एकर जिरायती शेती असणाऱ्या शेतकऱ्यांना

लागू होणार आहे. बागायती व जिरायती शेतीचे हे समीकरण अगदी चूक आहे यात काहीही शंका नाही. ५ एकर बागायतीतील उत्पन्न ५० एकर जिरायतीत तरी निघेल किंवा नाही याबद्दल शंकाच आहे. म्हणजे या योजनेत दारिद्र्याचा मूळ गाभा जी कोरडवाहू शेती त्याकडे तुलनात्मकदृष्ट्या दुर्लक्षच होत आहे असे म्हणावे लागेल.

कर्जमाफीच्या या पद्धतीत एकत्र कुटुंबव्यवस्थेवर विनाकारण आघात होत आहे व तुकडे पाडण्यास त्यामुळे प्रोत्साहन मिळेल. समजा एका कुटुंबाकडे १४ एकर शेती आहे. तीन भावांना त्यात समावेश असला तरी खाते मोठ्या भावाच्याच नावावर अशी उदाहरणे हजारोंनी आहेत. या शेतील कर्जमाफीचा फायदा मिळणार नाही. तिथे तिघे भाऊ विभक्त झालेले असते तर तिघांनाही या योजनेचा फायदा मिळाला असता.

राजकीय धकाधकीच्या गरजेमधून निर्माण झालेले असे हे कर्जमाफीचे अर्भक आहे. ते कुरुप, पांगळे असले तरीसुद्धा शासनाचे अभिनंदन करणे योग्य आहे. शेतकरी संघटनेच्या कार्यक्रमपत्रिकेवर कोरडवाहू शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमुक्ती जाहीर करण्याचा कार्यक्रम आहे. त्या दृष्टीने हे एक पुढचे पाऊल आहे. कर्जव्यवहाराच्या कायदेशीर व नैतिक चौकटीला भेग पडलीच आहे, यापुढे संपूर्ण कर्जमुक्ती आणखी सोपी व्हावी. याहीपुढे जाऊन केवळ जुजबी उपायांवर लक्ष न देता हा व्यवसाय म्हणून कसा उभा राहील, कर्ज वा मुंबईचे धनादेश यावर तो अवलंबून राहण्याचे कसे थांबले याचा विचार शासनाने जास्त गंभीरतेने करावा एवढीच कळकळीची इच्छा.

*सा. वारकरी-५ जुलै १९८०*

□□



चार

# 'भारत' खरोखरंच स्वतंत्र आहे का?

राणाप्रताप किंवा शिवाजीराजे यांच्या काळात स्वातंत्र्य आणि गुलामी यांच्यातील सीमारेषा बालबोध म्हणण्याइतपत स्पष्ट होत्या. बाहेरच्या राजांनी एखाद्या देशावर आक्रमण करून त्याचा ताबा घ्यायचा यासारख्या गोष्टी त्याकाळी सरळसोट नि सिध्यासाध्या असत. एखाद्या देशावर विजय मिळवायचा, जे आडवे येतील त्यांना सरळ कापून काढायचे, पाशवी शक्तीचा वापर करून सारे उद्ध्वस्त करायचे, लुटमार करायची, जमेल तितका काळ हा प्रकार चालू ठेवायचा आणि जर विरोध फारच वाढला तर सरळसरळ माघार घ्यायची. आक्रमकांना हुसकावून लावल्यावर स्थानिक बलदंड सत्तेवर यायचे. यालाच म्हणायचे स्वातंत्र्य. आपल्या जातीजमातीच्या मंडळाचे राज्य म्हणजे स्वातंत्र्य आणि स्वातंत्र्याबद्दलची हीच कल्पना अगदी आताच्या काळापर्यंत झिरपत आलेली दिसते. आपणापैकी पुष्कळांच्या मनात ही कातडीच्या रंगभेदावर आधारलेली स्वातंत्र्याची संकल्पनाच रुजलेली आहे. राज्यकर्ते स्थानिक असतील तर तो देश स्वतंत्र! जनतेला राज्यकर्ते रंगरूपाने जितके जास्त जवळचे तितके अधिकच चांगले!

दुसऱ्या महायुद्धानंतर इंग्रज, फ्रेंच, डच, पोर्तुगीज इत्यादी युरोपीय देशांची इतरत्र जी वसाहतीची राज्ये होती ती एकामागोमाग एक संपुष्टात आली. त्या त्या देशांना स्वातंत्र्यानंतर स्वतंत्र राष्ट्रीय ध्वज मिळाला, स्वतंत्र राष्ट्रगीत मिळाले. इतकेच काय पण राष्ट्रीय पशू वा पक्षीही ठरविला.

वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय संघटना, स्वतंत्र सार्वभौम राष्ट्रांच्या बरोबरीने त्यांचे प्रतिनिधी बसू लागले. कोणाच्या मनांत काहीच शंका आल्या नाहीत. भूतकालातच रणमाण होणाऱ्या सरंजामी वृत्तीच्या डॉन क्विग्झोटांची इतकी भाऊगर्दी या पृथ्वीतलावर यापूर्वी कधीच झाली नव्हती.

वसाहतवादी राज्ये आणि मध्ययुगातील परकी सत्ता यांच्यात फार मोठा फरक आहे हे कोणी लक्षातच घेतले नाही. वसाहतवादी अंमल जुन्या जुलमी सुलतानशाहीपेक्षा लुटमार करण्यात मुळीच कमी नव्हती. फरक असा की त्यांनी

हा उद्योग करताना अत्याधुनिक व्यापाराचे सफाईदार तंत्र वापरले. गावेच्या गावे जाळ नि लुटी जमा कर अशा जुन्या पाशवी सुलतानी पद्धतीचा अवलंब त्यांनी केला नाही इतकेच काय ते. या नव्या तंत्राचे काही निश्चित फायदे होते. जुन्या पद्धतीतील क्रौर्याला केव्हा ना केव्हा तशाच क्रूर उठावाच्या रूपाने प्रत्युत्तर मिळाल्याशिवाय राहत नसे. त्यामानाने वसाहती पद्धतीतील शोषणाच्या रूपातील लूट शांत आणि वेदनारहितच होती. रौद्र नरभक्षकांचे घटघटा रक्त पिणे नाही पण मोठे कौशल्यपूर्ण असे जळवांचे शोषणच! यामुळेच वसाहती स्थापणाऱ्यांना शांतता व सुव्यवस्थेसाठी आपल्या देशातून मोठमोठी सैन्ये तिथे न्यावी लागली नाहीत. त्यांचे बव्हंशी काम मोठ्या निष्ठेने आणि कमी खर्चात त्या-त्या देशातील भाडोत्री लोक आणि गलितांग व्यापारी जमीनदार यांच्याकडूनच केले जाई.

जुन्या काळातील लुटमार श्रीमंतांची घरे आणि गुदामे यांच्या पुरतीच मर्यादित असायची. कारण सर्व सपंत्तीचा साठा तिथेच असावयाचा. हरएक खेड्यातील हरएक झोपडी लुटीच्या शोधात तपासत फिरणे अनाठायीच झाले असते. याउलट वसाहतवादी लुटमारीचा पल्ला भलताच सूक्ष्म नि दूरगामी होता; अत्यंत दुर्गम प्रदेशांपर्यंत अगदी सामान्य, तळागाळाच्या माणसापर्यंत लीलया पोहोचणारा होता.

म्हणून वसाहतवादाच्या अशा तऱ्हेच्या अधिक क्रूर जोखडातून मुक्तता झाली किंवा नाही हे ठरवताना जुन्या मध्ययुगीन काळातील स्वातंत्र्याच्या कल्पनेवरून शोधलेल्या फुटपट्ट्या उपयोगी पडणार नाहीत. जुन्याकाळात आक्रमकाला एकदा सीमेबाहेर हुसकून दिले की स्वातंत्र्योत्सवाचा जल्लोष साजरा करता येत असे. कारण त्याचा 'आता लुटमार थांबली' असा सरळसरळ सोपा अर्थ असे. वसाहतवादी जोखडातून तेव्हाच मुक्तता झाली असे म्हणता येईल, जेव्हा शोषणाची खास वसाहतवादी पद्धती संपेल. या पद्धतीची अशी खास वैशिष्ट्ये तरी कोणती?

गुनार मिर्डाल या विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थेची चिकित्सा करणाऱ्या ख्यातनाम अर्थतज्ञाने वसाहतवादी पद्धतीच्या तात्त्विक स्वरूपाचे सार फार चांगल्या तऱ्हेने काढलेले आहे 'स्वस्त (कच्च्या) मालाचा पुरवठा, (पक्क्या मालाचा) खप होऊ शकेल अशा हुकमी बाजारपेठा आणि आशियातील आंतरप्रादेशिक व्यापारातून मिळणारा उदंड नफा यांचा शोध हीच हिन्दुस्थानावरील ब्रिटिश राज्याच्या विस्तारामागील प्रभावी प्रेरणा होती.'

कच्च्या मालाची स्वस्तात स्वस्त खरेदी आणि तयार पक्क्या मालाची महागात महाग विक्री अशा तंत्रामुळेच ब्रिटिश साम्राज्य भरभराटले. हे सर्वांनाच उमजले



होते आणि म्हणून पद्धतशीरपणे ग्रामीण जनसामान्यांची नागवणूक आणि मायदेशांची भरभराट यावर आधारलेल्या ब्रिटिश राजवटीविरुद्ध भारतात सुरू झालेल्या संघर्षाचे प्रतीक 'चरखा' ठरला.

यंत्रयुगात औद्योगिक वाढीसाठी शेतीतील वरकड उत्पादन भांडवलनिर्मितीसाठी उपलब्ध व्हावेही एक निकडीची गरज होती. (समाजाच्या, थोडक्यांत कारखानदाराच्या भल्यासाठी शेतकऱ्याला लुटणे आवश्यक ठरले) हे घाणेरडे काम मायदेशांत करण्यापेक्षा वसाहत करणे सोयिस्कर. यासाठी डचांनी कांगोचा ग्रामीण परिसर वापरला, फ्रेंचांनी व्हिएतनामचा ग्रामीण परिसर वापरला, पोर्तुगीजांनी ऱ्होडेशियाचा वापरला तर ब्रिटिशांना हिंदुस्थानचा परिसर वापरला इत्यादी. या साऱ्यांनी त्या-त्या देशातील सामान्यांचे शोषण केले नि आपल्या तुंबड्या भरल्या.

या अशा वसाहतवादी पद्धतीचा खरोखर शेवट झालेला आहे हे एखाद्याने कसे ठरवायचे? राज्यकर्त्यांच्या कातडीचा रंग, त्यांचे स्वकीयत्व किंवा त्यांनी करायला घेतलेली सार्वजनिक कामे यामुळे ते ठरणार नाही. कारण आपल्या देशात इंग्रजांनीही टोलेजंग सार्वजनिक कामे केली आहेत. संस्था उभ्या केल्या आहेत. रस्ते बांधले. पूल बांधले आहेत. धरणे बांधले आहेत इत्यादी इत्यादी.

या बाबतीत बहुसंख्य सामान्यांनी- म्हणजे शेतकऱ्यांनी-निर्माण केलेला कच्चा माल आणि त्यावरून तुलनेने मूठभर अशा काहींनी बनविलेला पक्का माल या दोहोतील विनिमयाचे नेमके धोरण ठरविण्याची राज्यकर्त्यांची नेमकी हेच यामागचे निर्णायक सूत्र आहे, इतर कोणत्याही गोष्टी नव्हेत.

इंडियन अर्थशास्त्र म्हणजे तर खुले आम निर्लज्जपणे प्रस्थापित वर्गाच्या हातचे बाहुलेच आणि व्यावसायिक अर्थशास्त्रज्ञांचे हस्तलाघव तर आंतरक्षेत्रीय व्यापारविनिमयाच्या प्रश्नाइतके दुसरीकडे कुठेच दिसून येत नाही.

चुकीच्या किमतीच्या तपशिलाचा उपयोग, निरनिराळ्या मालासाठी पायाभूत कालखंडांची चुकीची निवड आणि सदोष पद्धतींचा वापर यामुळे केला गेलेला अभ्यास कमालीचा अविश्वासार्ह झालेला आहे, तरीही ए. एस्. कॅहलॉन यांनीसुद्धा कबूल केले आहे की- 'अलीकडच्या काळात व्यापारी शर्ती या शेतीवर अन्याय करणाऱ्या ठरल्या आहेत.' (पहा-इकॉनॉमिक अॅन्ड पोलीटिकल विकली २७ डिसेंबर ८०)

भारतातील शेतकरी हा या अर्थपंडितांची चलाखी उघडकीस आणण्यास पूर्णपणे असमर्थ आहे. नाहीतर शेतकऱ्यांची पिळवणूक किती भयानकपणे होते हे तो सहज सिद्ध करू शकला असता.

कधीतरी मी शेतकऱ्यांच्या गटांना समजावून सांगतो की श्री. अशोक मित्रांसारखे (अतिजहाल) डावे अर्थतज्ञसुद्धा 'हिन्दुस्थानात शेतीमालाच्या किमती प्रमाणाबाहेर वर ढकलल्या जातात.' हे कसे चुकीच्या चलाख रीतीने सांगतात, तेव्हा त्यांच्याही लक्षात येते की या थापा आहेत आणि श्री. मित्रांसारखा सुबुद्ध डावा माणूस त्या मारू शकतो, यावर त्यांचा विश्वासच बसत नाही. खरे तर शेतीमालाच्या किमतीच्या परिस्थितीचे योग्य मूल्यमापन करण्याचा सोपा व सुटसुटीत मार्ग म्हणजे त्याच्या सध्याच्या किमतीची त्याच्या उत्पादन खर्चाशी तुलना करणे हा होय. पण या बाबतीतही व्यावसायिक अर्थतज्ज्ञांनी शेतीमालाच्या किमती ठरविण्याआडच्या अडचणींचा पाढा वाचून एक अनाकलनीय, धूसर वातावरण तयार केलेले आहे.

या अडचणी अजिबात खऱ्या नाहीत असे नाही. पण अशा अडचणी कोणत्याही आर्थिक हिशेबात येतात. राष्ट्रीय उत्पन्नाचा हिशेब करतानाही येतात. जसे इतर क्षेत्रांत अडचणींचे निराकरण होऊ शकते तसे शेतीमालाच्या किमतीबद्दलच्या अडचणींचेही निराकरण सहज शक्य आहे. पण मौज अशी की शेतीमालाच्या किमतीचा प्रश्न आला की आपल्या अर्थतज्ज्ञांना त्या अत्यंत अवघड वा दुर्घट वाटू लागतात.

शेतीमालाच्या किमतीबाबत शेतकरी संघटनेने जे अभ्यास केला आहे त्यावरून असे दिसते की, ऐन हंगामाच्या दिवसात किमती उत्पादन खर्चाच्य जेमतेम निम्म्या असतात. पण एवढ्यानेच संपत नाही. शेतीमालाच्या किमती सर्वसाधारणपणे अगदी पिळवणुकीच्या स्तरावरच नेहमी ठेवल्या जातात. कारण शेतकऱ्यांना बुद्धिपुरस्सर कोंडीत पकडण्याचेच सरकारी धोरण आहे नि तेसुद्धा अगदी स्वातंत्र्यप्राप्तीच्या काळापासूनचे आहे.

या विषयावरील स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावरच्या भारतीय आशा-आकांक्षाचे प्रतिबिंब आपल्याला श्री. व्ही. टी. कृष्णम्माचारी अध्यक्षस्थानी असलेल्या १९४६ च्या एका कमिटीच्या अहवालातच दिसून येते. 'भारतीय शेती ही फारच बेभरवशाची आहे. कारण ती पावसाच्या लहरीवर, हवामानातील बदलावर व कीटक किंवा रोगराई यांनी होणाऱ्या नुकसानीवर पूर्णत: अवलंबून आहे.'

'भरीस भर म्हणून शेतीमालाच्या किमतीतील घट इतका विपरीत परिणाम करू शकते की बहुसंख्य शेतकऱ्यांच्या बाबतीत शेती हा चक्क आतबट्ट्याचा धंदा होतो. शेतीमालाच्या हुकमी उठावाची शाश्वती हाच एक शेतीला साथ देण्याचा उपाय असून शेतीमालाची उत्पादकता व उत्पादन वाढवण्याची देशव्यापी इच्छा हे त्याचे एक जरूरीचे अंग आहे. शेतीमालाची वाजवी किंमत अशी हवी



की जीमुळे शेतकऱ्याला चांगले उत्पन्न मिळू शकेल आणि समाजातील ज्या वर्गात तो मोडतो त्याच्याशी तुलनेने तो शेतकरी व त्याचे कुटुंब समान स्वरूपाचे जीवनमान उपभोगू शकेल.

वसाहतीवादी धोरणाचा त्याग करायचा असे ठरविले असते तर स्वतंत्र भारताचे शासन अग्रहक्काने शेतीमालाच्या किमतीबद्दलचा प्रश्न नक्कीच सोडवू शकले असते. पण स्वातंत्र्याच्या उदयानंतर जे झाले ते उलटेच. नव्याने स्वतंत्र झालेल्या आपल्या देशातील विकासाच्या योजना मुळातच कमी आणि कमालीच्या स्थिर अशा शेतीमालाच्या किमती हे आवश्यक साधन कल्पून इतर साधनासामग्रीची जुळवाजुळव करु लागल्या.

या प्लॅनिंग कमिशनचे (नियोजन मंडळाचे) दीर्घकाळ उपाध्यक्ष असलेल्या. श्री.व्ही. टी. कृष्णम्माचारींनीसुद्धा आपल्या शेतीविषयीच्या जुन्या ठाम सदिच्छांना मूठमाती देऊन मोठ्या आनंदाने, उत्साहाने शेतकऱ्यांची पिळवणूक जास्तच गडद करणाऱ्या योजना स्वीकारल्या. म्हणजे हा शहरी 'इंडियन' भांडवलाच्या भरभराटीचा काळ बनला.

साधनसामग्रीची साधारणत: हजार कोटींची दरी भरून काढण्याच्या अडचणीत असलेल्या नियोजन मंडळाने शेतीकडे लांडग्याची नजर टाकली. 'नेहमीच्या जुन्या कर-यंत्रणेपेक्षा किमतींच्या पद्धतीद्वाराच जास्त काही मिळविणे शक्य आहे. फार मोठ्या अशा ग्रामीण परिसरात कोणत्या तऱ्हेत्या वस्तू जास्त प्रमाणात वापरल्या जातात हे सर्वांना ठाऊक आहे. जर का राज्य व्यापार संघटनांचे एक जाळे उभे केले गेले आणि योग्य अशा धोरणांचा अवलंब केला गेला तर ग्रामीण भागातून आज जे काही मिळते आहे, त्याहून जास्त मिळू शकेल.'

चौथ्या पंचवार्षिक योजनेतील शेतीमालाच्या किमतीबद्दल विचार करणारा अभ्यासकांचा एक खास गट अगदी शांत, निर्विकारपणे लिहितो की, 'सर्व उत्पादनखर्च भरून काढतील अशा किमान किमती (शेतीमालाला) द्यायचे धोरण अमलात आणण्सास आजच्या परिस्थितीत अनिवार्य अशा व्यावहारिक अडचणी आहेत. कारण त्यामुळे औद्योगिक मालाच्या उत्पादन खर्चात वाढ होईल.

एकंदर शेतीमालाची पिळवणूक करण्याची एक कायम पद्धती इथे रूढ झाली. त्यामुळेच बराच काळ धोरणे ठरविण्याचे अधिकार ज्याच्या हाती होते असा माजी केंद्रीय मंत्री सी. सुब्रह्मण्यम् यांच्यासारखा मोठा माणूसही लिहून गेला, 'भारतीय शेती हा शेतकऱ्यांच्या दृष्टीने बुडीत धंदाच बनलेला आहे. त्यात त्याला तो गुंतवण्यास तयार असलेल्या भांडवलाच्या प्रमाणात किंवा केलेल्या श्रमाच्या

मानाने योग्य तो मोबदला मिळत नाही. दुसऱ्या महायुद्धाच्या काळाचा वारसा सांगणारे जुने किंमत विषयक धोरण स्वातंत्र्यानंतही योजिले गेल्याचाच हा परिणाम आहे.'

शेतीमालाच्या किमती कमी राखण्याची सार्वत्रिक रूढ पद्धत तशी सोपी व सरळ आहे. स्वातंत्र्योत्तर काळात सत्तेवर आलेल्या नव्या (स्वदेशी) मालकांच्या शेतकऱ्यांविषयीच्या निर्दयपणावर प्रकाश टाकणारी काही उदाहरणे सहज देता येतील. १९७७ पर्यंतच्या जवळजवळ सर्व कालखंडात तूट भरून काढण्यासाठी शेतकऱ्यांकडून सक्तीची धान्यवसुली केली गेली. शासनाकडून दिल्या जाणाऱ्या लेव्हीच्या किमती बाजारात असणाऱ्या शेतीमालाच्या किमतीपेक्षा तेव्हा ४० ते ५० टक्क्यांनी कमी होत्या. एखाद्या वेळी शेतकऱ्याकडे धान्य नसेल तर त्याला बाजारातील (चढी) किंमत आणि लेव्हीची (कमी) किंमत या दोहोतील फरक भुर्दंड म्हणून सहन करावा लागे. कारण लेव्ही बसविलेले धान्य त्याला बाजारातील चढ्या भावाने विकत घेऊन लेव्हीच्या कमी भावाने शासनास द्यावे लागे.

याबाबत सी. सुब्रह्मण्यम् लिहितात, 'लेव्हीची वसुली एक क्रूर प्रक्रियाच... त्यासाठी ठरविलेली किंमत ही नेहमीच ग्राहकाला फायदेशीर अशी, उत्पादकाला नव्हे.'

दुसऱ्या बाजूने असे दिसते की भरपूर पीक आल्यामुळे जेव्हा खुल्या बाजारात शेतीमालाच्या किंमती गडगडतात, तेव्हा शेतकऱ्याला मदतीचा हात पुढे करायला हेच शासन अत्यंत नाखुश असते. शेतकऱ्याच्या उत्पादनाला संरक्षण असे मिळतच नाही तेव्हा निपाणी परिसरातील शेतकऱ्यांनी तंबाखू खूपच पिकविला. तेव्हा ८ मे १९८१ रोजी केंद्रीय व्यापार-राज्यमंत्र्यानी शेतकऱ्यांना दराची हमी देणे बाजूलाच राहिले, पण किमतीना काही आधार देण्याबाबतही शासन कसे असमर्थ आहे याचीच पद्धतशीर वकिली केली.

आणि त्याच दिवशी दुपारी केंद्रीय शेतीमंत्र्यांनी त्याच लोकसभेत मात्र मोठ्या टेसात जाहीर केले की तूट असल्यामुळे शासन चार राज्यांतून गव्हाची सक्तीची लेव्ही वसूल करणार आहे!

तेव्हा टंचाईच्या काळात कमी दराने लेव्हीची वसुली आणि मुबलकतेच्या काळात शेतीमालाकडे संपूर्ण दुर्लक्ष असे हे ठरलेले सरकारी धोरण आहे. छाप की काटा, नाणेफेकीचा कोणताही कौल लागो शेतकऱ्याची हार ही ठरलेलीच!

शेतीविषयक नियम हे उघड उघड शेतकऱ्यांबाबत पक्षपात करणारे आहेत. एखादा कारखानदार जेव्हा जेव्हा आपले एखादे औद्योगिक उत्पादन परदेशी पाठवून



त्याद्वारा परकीय चलन मिळवतो तेव्हा तो हिरो ठरतो, त्याचे कोडकौतुक केले जाते. इतकेच काय शासनाकडून द्रव्यसाहाय्य दिले जाऊन त्याला उत्तेजनही मिळते.

शेतीमालाच्या निर्यातीला मात्र नाइलाजानेच परवानगी दिली जाते आणि अशी निर्यात थांबविण्यास कसलेही किरकोळ कारण पुरते. देशातील किमती उत्पादनखर्चापेक्षा कमी असल्या तरी निर्यातीवर निर्बंध घातले जातात. म्हणजे शेतकरी जबरदस्तीने कमी किमतीच्या रिंगणातच कोंडला जातो. त्यातच आपली निर्यातविषयक धोरणे इतकी चंचल नि बिनबुडाची आहेत की त्यामुळे परदेशी खरेदीदार साफ वैतागून जातात. इतकेच काय त्यांनी भारतीय निर्यातदाराशी बोलणीही थांबविली असा अनुभव आहे.

कांद्याच्या निर्यात व्यापाराचा सत्यानाश त्यासंबंधीच्या डळमळीत निर्यात धोरणामुळेच झाला. उलटपक्षी कोणत्याही वस्तूची आयात मात्र अगदी सहजपणे केली जाते. अलीकडे असे दिसू लागले आहे की शासन आपले आयातीचे धोरण आणखीनच मजबूत बनविणार आहे. रास्त भावासाठी लढा उभारू इच्छिणाऱ्या 'भारतीय' शेतकऱ्यांशी सामना करता यावा म्हणून ते साखर, कापूस तेल, गहू यांची परदेशातील खुल्या बाजारात खरेदी करून त्यांचे साठे करण्याच्या प्रयत्नात आहे. म्हणजे शेतकऱ्यांची रास्त मागणी नाकारण्यासाठी परदेशांची धन करायला यांची तयारी! पण नेहमीच आधीच्या युद्धाच्या अनुभवावरून सैन्य नवी तयारी करीत असते या न्यायानुसार या हंगामात शेतकरीही त्याच्या आंदोलनाची दिशा बदलण्याचा संभव आहे.

तयार होणाऱ्या साखरेपैकी हिंदुस्थानात ६५% साखरेवर लेव्ही आहे. या साखरेचा जागतिक मान्यताप्राप्त उत्पादनखर्च किलोमागे चार रुपये ३० पैसे असताना सरकार लेव्ही साखरेला २ रु. ७२ पैसे (१९८०-१९८२) प्रति किलो असा दर देते. गरिबांना वाजवी भावात साखर मिळावी हा यामागचा हेतू असल्याचे सांगण्यात येते.

गरिबांच्या कल्याणासाठी म्हणून करण्यात येणारा हा दावा इतका हास्यास्पद आहे की त्यावर कांही भाष्य करण्याची जरूरीच नाही. या संदर्भात कुठलाही माणूस शासनाला सरळसरळ एक प्रश्न विचारू शकेल- 'औषधांच्या किमती गोरगरिबांना नुसत्या न परवडणाऱ्याच नव्हे, तर अगदी आकाशाला भिडलेल्या दिसत असताना औषधावरच का कसली लेव्ही बसविली जात नाही बरं?' केवळ औषध खरीदण्यासाठी पैसा नाही म्हणून हजारो माणसे आपल्या देशात मरतात. आपल्या देशातील १/३ खेडी नुसत्या खरजेने बरबटली आहेत आणि त्यावर सामूहिक इलाज करणे खेडुतांच्या ऐपतीबाहेरचे काम आहे. तेव्हा असे म्हटले

असता चूक होईल का, की जर औषध-उद्योगाचे फायदे शेतकऱ्यांना मिळतील अशी परिस्थिती असती तर शासनाने त्यावरही नक्कीच लेव्ही बसविली असती?

शेतीमालाबाबत सापत्न भाव ठेवणारी अशी कितीतरी भयंकर उदाहरणे सांगता येतील. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरसुद्धा या देशातील ग्रामीण जनसामान्यांची (म्हणजेच 'भारता'ची) वसाहतवादी समृद्धी आणि जीवनपद्धती यांचा स्वीकार केलेल्या या देशातील काही निवडक 'शहरी' भाग्यवंतांना (म्हणजे 'इंडियावाल्यां'ना) आता या लुटीचा फायदा मिळतो आहे. इंग्रज गेले आणि त्यांचे पिळवणुकीचे तंत्र ही मंडळी पुढे चालवीत आहेत. शासनावर त्यांचाच पगडा आहे. त्यामुळे या साऱ्यांना 'ग्रामीण भारता'ला बळीचा बकरा बनविण्यात आजवर यश मिळत गेले आहे. प्रसिद्ध साम्यवादी विदुषी रोझा लॅक्झेंबुर्गची भीती खरी ठरली आहे.

तिच्या मते भांडवलवादी आणि साम्यवादी या दोघांची वाढीसाठी शेतकऱ्यांची पिळवणूक आवश्यक आहे या विषयावर एकमत आहे. स्टॅलिनची शेतीविषयक धोरणे आता आपल्या देशाला भेडसावीत होती. शेतकरी शेतीमालाला भाव मागत होते त्या संदर्भात तो एकदा म्हणाला म्हणे, 'शेतकरी मागतात त्या गव्हाच्या किमती आपण कबूल केल्या तर उद्या ते सोन्याची घड्याळ मागू लागतील!'

अतिशय शांतपणे आपल्या उत्पादनाला रास्त भाव मागणाऱ्या शेतकऱ्यांना आपल्या देशात आज पाशवीपणे गोळ्या घालून ठार करण्यात येते आहे. कदाचित उद्या रणगाडे व मशीनगन्सही त्यासाठी आणण्यात येतील. कारण सामर्थ्यशाली वसाहतवाद्यांजवळची ती सर्वोच्च साधने आहेत. पण एक गोष्ट सर्वांनीच लक्षात ठेवायला हवी. ती ही की, अशी सारी पाशवी साधने वापरूनही अखेरीला वसाहतवादी इंग्रजांना हिंदुस्थान सोडावाच लागला. त्याप्रमाणे 'इंडियावाल्या'नीही चिरंतन काळपर्यंत 'भारता'वर राज्य करण्याची कांक्षा धरू नये!

□□



पाच

# इंडियन विद्वानांचा 'आक्रोशी' थाट

फिनान्सिअल एक्स्प्रेसने भारतीय शेती या विषयावर चार अग्रगण्य इंडियन कृषितज्ज्ञांना एकत्र आणून एक चर्चासत्र आयोजित केले होते. या चर्चेची फलश्रुती मोठी केविलवाणी आहे. यापेक्षा ती जास्त चांगली निघेल अशी अपेक्षा, अर्थातच कुणाची नव्हती.

तज्ज्ञांच्या मनातील आकस उघड उघड दिसतो. शेतकरी 'सायकली, फटफट्या वापरतात. पूर्ण कपडे, बुट आणि अगदी टेलिव्हिजनसुद्धा वापरतात' याचे शल्य या तज्ज्ञांना सलते आहे. शेतकऱ्यांचा एक वर्ग हा शहरी मध्यमवर्गीयांसारखा जगण्याचा प्रयत्न करतो याचेही त्यांना दु:ख आहे आणि शेतकऱ्यांच्या हालअपेष्टांची वर्णने संपूर्णत: खरी असतील असेही या तज्ज्ञांना वाटत नाही. उलटपक्षी, दरमहा ठराविक वेतन मिळविणाऱ्या वर्गाचे उत्पन्न व क्रयशक्ती मुळापासूनच पोखरली गेली असल्याच्या कांगाव्यावर मात्र अश्रूंचा महापूर ढाळला जातो आहे. 'या मूठभर ग्रामीण श्रीमंतांसाठी हळहळण्याची आपल्याला गरजच काय?' ही त्यांची ठाम भूमिका आहे.

हा आकस इतका पराकोटीचा आहे की त्यामुळे हे तज्ज्ञ निखळ तात्त्विक बाबींमध्येसुद्धा हातचलाखी करण्यात प्रवृत्त होतात. शेती व औद्योगिक मालामधील व्यापाराच्या पडतळीसंबंधी (Terms of Trade) डॉ. थामराजाक्षी यांच्या संशोधनाचा आधार घेतला जातो. पण अगदी अलीकडच्या काळात ए. एस्. कल्हन व डी. एस्. त्यागी यांनी याच विषयावर केलेल्या सखोल संशोधनाचे निष्कर्ष बहुतांशी निराळे असल्यामुळेच की काय त्यांच्या उल्लेखसुद्धा केला जात नाही. काही वर्षापासून शेतीमालाचा उत्पादनखर्च काढताना शेतकऱ्याच्या कुटुंबीयांचे श्रममूल्य हिशेबात धरले जाते आहे आणि हीच बऱ्याचशा इंडियन अर्थतज्ज्ञांच्या मातानुसार एक गैरवाजवी सवलत आहे. यावर कळस म्हणूनच की काय चर्चासत्रात भाग घेणाऱ्या एका विद्वानाने तर शेतकऱ्याचे कुटुंबीय प्रत्यक्षांत शेतावर काम करत असोत किंवा नसोत, सर्वांचेच श्रममूल्य हिशेबात धरले जाते

असा आभास निर्माण करण्याचा प्रयत्न केला आणि नवल म्हणजे बाकीच्या विद्वानांनी त्याला साधा विरोधही केला नाही.

ग्रामीण भागांतील मूठभर संपन्न वर्ग, 'शेतकरी वर्गाच्या दारिद्र्याच्या नाण्याची दुसरी बाजू' आहे असे मानले जाते. ग्रामीण भागातील दारिद्र्य हा एक भारताच्या अंतर्गत प्रश्न आहे, त्याचा इंडियातील अनेक छोटेखानी न्यूयॉर्कशी सुतराम् संबंध नाही. दहा एकर जमिनीचे मालकच ग्रामीण दाद्रिचाला कारणीभूत आहेत आणि शहरी बुद्धिजीवी लोक हेच ग्रामीण निर्धनांचे खरेखुरे मित्र आहेत-हा त्यांचा कांगावा. थोडक्यात 'आक्रोश' सिनेमाचेच तत्त्वज्ञान. चर्चेचे आयोजक शतावधानी आहेत. या तज्ज्ञांना त्यांनी मोठे मार्मिक प्रश्न विचारले आहेत. पण आयोजकांनी एकापाठोपाठ एक विचारलेल्या प्रश्नांना या विद्वानांनी दिलेल्या बगलेतील चलाखी अगदी कौतुकास्पद आहे-कृषिमूल्य आयोगाच्या हिशेबात काही त्रुटी आहेत का? शासनाने आधारतभूत ठरवलेल्या किमतींचा केवळ व्यापाऱ्यांनाच कसा काय फायदा मिळू शकेल? उत्पादकांना वाढीव किमती देऊन व्यापाऱ्यांचा नफा कमी करणे जमणार नाही का? उत्पादनाशी संबंध नसलेले खर्च कारखानदारी मालाच्या वस्तूंच्या उत्पादनखर्चात धरले जात नाहीत का? ग्रामीण भागांतील 'धनदांडगे' आणि शहरी भागांतील उच्चभ्रू यांच्यातही प्रचंड असमतोल आहे हे मान्य केल्यावर तो असमतोल दूर करण्यात ग्रामीण भागांतील दारिद्र्य ही अडचण कशी काय होऊ शकते? चलनवाढ होईल ही शक्यता असली तरी शेतकऱ्यांना रास्त किंमत मिळू नये असे थोडेच आहे?

परिणामांचे स्वरूप जर इतके भयानक नसते तर या प्रश्नांची उत्तरे टाळण्यासाठी तज्ज्ञांनी केलेल्या अजब कसरतीने भरपूर करमणूक झाली असती. भारतातील शेतीविकासाचा तऱ्हेवाईक तोंडवळा व त्यातील अनेक चक्रावणारी कोडी पाहून इंडियन बुद्धिमत्तेचे महामेरू आश्चर्याने थक्क होतात. कोरडवाहू शेतीचे तंत्र आणि तिचा विकास यांच्याकडे दुर्लक्ष केले गेले आहे, अन्नधान्याव्यतिरिक्तच्या पिकांकडे पुरेसे लक्ष पुरवले गेले नाही, नवीन तंत्रज्ञान आवश्यक त्या प्रमाणात आत्मसात केले गेलेले नाही, जे तंत्रज्ञान आयात केले गेले ते येथील स्थानिक परिस्थितीशी अनुरूप नव्हते, शेतीतून मिळालेले अधिक उत्पन्न पुन्हा शेतीतच न गुंतवले जाता सर्वसाधारण शहरी विभागांतल्याप्रमाणेच त्याची वासलात लागते. अन्नधान्याच्या पुरवठ्यातील वाढ व उत्पादकांना देऊ केल्या गेलेल्या किमतींच्या वाढी यात योग्य ती प्रमाणबद्धता नाही. व्यापारी व दलाल हे उत्पादक व ग्राहक या दोघांनाही पिळून काढतात व नफ्याचा मोठा भाग गिळंकृत करतात- लक्ष अशा



अर्थपंडितांनीच परिश्रमपूर्वक एकत्रित केलेली, सर्व लक्ष वेधून घेणारी ही मनोरंजक वैशिष्ट्ये. या सर्व समस्यांना आणि विसंगतींना सांधणारा कुठलाच दुवा नाही का? त्यांची कारणमीमांसा या मान्यवर धुरीणांनी करायला नको काय?

कोणाचीही अशीच अपेक्षा असेल ही इतक्या मेंदूला झिणझिण्या आणणाऱ्या चर्चेतून जे काही निष्कर्ष निघतील त्यातून एखादा नवा मार्ग दिसेल असे काही झालेले दिसत नाही. पूर्वीच्याच औषधांचा आणखी वाढवलेला डोस एवढीच तज्ज्ञांची शिफारस दिसते. वेगवेगळ्या कार्यक्रमांची एक भली मोठी जंत्री करण्यांत आली आहे. त्यापैकी एकाही कार्यक्रमासंबंधी संयुक्तिक विचार नाही. उद्दिष्ट काय? त्यासाठी खर्च किती, त्याचे इतर परिणाम काय? काहीच नाही-सर्व उपायात एकच समान गुणधर्म आहे व तो म्हणजे त्यातील प्रत्येक उपाय हा नोकरशाही व हुकमी वेतनदार यांना अधिक बळकट करण्यात व त्यांचा पाया अधिक घट्ट करणारा आहे. शासकीय पाठिंबा व हुकूम यांनी विकास होणे अशक्य असे हे तज्ज्ञ उघडपणे कबूल करतात. अनंत कचेऱ्यांचे कोणत्याही कामासाठी फेरे, तेथे ओले करावे लागणारे हात यावर पोटतिडिकेने कामासाठी, योजनांची विपर्यस्त स्वरूपातील राबवणुकीची-जसे Harvester Combine ( कापणी, मळणी वगैरे एकत्र करणाऱ्या यंत्रा) बाबत झाले होते-उदाहरणे देतात आणि शेवटी गंभीरपणे 'गरिबी हटाव' ही योजना श्रीमंतांकडून अमलात आणली जाणे अशक्य आहे असे सांगतात.

शासकीय यंत्रणांवर अशी कडाडून टीका केल्यानंतर साहजिक अपेक्षा अशी की भविष्यांतील योजनांच्या अंमलबजावणीत भ्रष्ट शासकीय यंत्रणेचा हात कमीत कमी असावा. सार्वजनिक वाटप व्यवस्था, जमीनसुधारणा, जलसिंचन इत्यादी तसेच काही संस्थामार्फत दिली जाणारी कर्जे, किमान वेतनाचा कायदा, कुटिरोद्योगांना उत्तेजन हे नवे उपाय-हा एक विरोधाभासच आहे. गेल्या ३५ वर्षात हे उपाय जितपत यशस्वी झाले त्यापेक्षा जास्त यशस्वी ते पुढील काळात कशावरून होतील? की आणखी दहा वर्षांनीही आज फिनान्सिअल एक्स्प्रेसने आयोजित केलेल्या या चर्चासत्रासारखीच, तेच पंडित किंवा त्यांचे वंशज यांनी केलेली उत्तरीय तपासणीच आपल्या नशिबी आहे? पराभूत सैन्याच्या सेनपातीला नेहमीच सर्व देशाच्या रोषाला तोंड द्यावे लागते. मात्र अर्थ व योजनातज्ज्ञ यांची आपल्या देशातल्यासारखी भयानक तोंडफोड झाली असली तरी त्यांना लोकांच्या रोषाचे वगैरे भय बाळगण्याचे काही कारण असत नाही! कसलीही चिंता न बाळगता ते आपला मार्ग सुखात आक्रमू शकतात, इतकेच काय, स्वत:ची संस्थानेही उभारू

शकतात.

की असे समजावे, या योजना आखणारे खरोखरच अयशस्वी झाले नाहीत आणि म्हणूनच त्यांना तसेच पुढे जाण्यास व त्या वाढविण्यास परवानगी दिली जाते आहे? कागदी योजनांतील उद्दिष्टे साध्य होऊ शकली नाहीत या दृष्टीने ते कदाचित अयशस्वी ठरले असतील! त्यांनी प्रगट केलेली उद्दिष्टे ही प्रस्थापित चौकटीच्या खऱ्या हेतूपेक्षा काही वेगळी तर नाहीत?

या चर्चासत्रात मुख्यत्वे उत्पादनपरिस्थिती, शेतीविषयक नवीन धोरणाचे परिणाम, किमती निश्चित करण्याचा प्रश्न आणि भविष्यातील कृतीची रूपरेखा यांचा समावेश होता. उत्पादन, तंत्रज्ञान व किमती यांच्यातील तर्कशुद्ध दुव्यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले आहे. तसेच संपूर्ण देशाच्या विकासप्रक्रियेतील शेतीमालाच्या किमतीबद्दलचे निश्चित धोरण याचाही तपशीलवार विचार केला गेला नाही. नवलाची गोष्ट म्हणजे विद्वान डॉ. पी. सी. जोशींनी किमतीच्या प्रश्नावर चर्चा करताना मनमोकळेपणी याविषयी हिहिले आहे. ते कबूल करतात, 'शेतीमालाच्या किमती हे भांडवलाची जमवाजमव आणि शेतीक्षेत्रातून अतिरिक्त बचत काढण्याचे एक साधन असले पाहिजे.' शिवाय, 'संपत्तीची वाटणी पाहिजे तशी बदलता यावी व अप्रत्यक्षपणे शेतीतील बचत काढून घेता यावी यादृष्टीने शेतीमालाच्या भावाची यंत्रणा वापरली पाहिजे...'

ते पुढे म्हणतात, 'किमतीचा प्रश्न संपूर्ण विकासाच्या संदर्भातच पाहिला जाणे वेगवेगळ्या समाजस्तरांत विभागण्याचाच फक्त प्रश्न नाही. अतिरिक्त उत्पादन काढून त्याचा भांडवल म्हणून कमकुवत क्षेत्रांत ओघ वळवला जाणे यासाठी किमतीच्या धोरणाचा उपयोग झाला पाहिजे.'

हे विचार इतिहासात यापूर्वीही मांडण्यात आले आहेत. ही मते म्हणजे प्रिओब्रेझोन्स्कीच्या भांडवल रचनेच्या सिद्धान्ताचे पुनर्प्रतिपादन आहे. सर्वेसर्वा स्टॅलिनने प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी प्रिओब्रेझेन्स्कीच्या मस्तकात मागून गोळ्या झाडल्यानंतरच केली. औद्योगिक विकासासाठी भांडवल पुरविणे हे शेतीचे कार्य आहे. औद्योगिक प्रगतीच्या गतीमध्ये सतत वाढ करण्यासाठी शेतकऱ्यांचे शोषण होणे अनिवार्य आहे. शेतीतील वाजवीपेक्षा अधिक उत्पन्न बळकावण्याच्या या क्रियेला काही नैतिक समर्थन म्हणून बोल्शेविकांनी मोठे शेतकरी (कुलाक) व छोटे शेतकरी (बाट्रक) अशी वर्गवारी केली. ऐतिहासिक कालापासूनच स्वतंत्र विचार करण्याची क्षमता नसलेले इंडियन कृषितज्ज्ञ याच जुन्यापुराण्या वक्तव्यांचा फक्त पुनरुच्चार करताहेत.



स्वस्त दराने कच्च्या मालाचा पुरवठा व्हावा, अतिरिक्त उत्पादनातून भांडवलाची उभारणी व्हावी आणि अन्नधान्याच्या किमती स्वस्त राहिल्याने औद्योगिक मजुरीचे दर कमी राहावेत यासाठी औद्योगिक क्रांतीच्या उदयकाळापासूनच कारखानदारी ही शेतीच्या शोषणावरच अवलंबून राहिली आहे. अगदी अलीकडच्या काळापर्यंत या शोषणाच्या पद्धतीचे दुष्परिणाम अर्थशास्त्र्यांना जाणवले नाहीत, कारण शेतकऱ्यांची पिवळणूक झाली ती मुख्यत: वसाहतींतील शेतकऱ्यांची. दुसऱ्या महायुद्धानंतर ज्या वसाहतीना स्वातंत्र्य मिळाले त्यांच्यासमोर सर्व इतिहासांत प्रथमच एक यक्षप्रश्न उभा राहिला. वसाहतींचे कुरण नसल्याने औद्योगिक विकास कसा साधायचा?

रोझा लॅक्झेम्बर्ग यांनी फार पूर्वीच अशा अवस्थेच्या परिणामांचे भाकित केले होते. देशाबाहेर वसाहती नसणारे देश जर औद्योगिक प्रगतीची आस धरतील तर वसाहती काढायचे फायदे मिळविण्यासाठी ते देशांतर्गत वसाहती निर्माण करतील. 'भारता'ची वसाहत केली आणि एक स्वस्त कच्चा माल पुरविणारे साधन म्हणून त्याचा वापर केला तरच 'इंडिया'चा औद्योगिक विकास साधणे शक्य आहे आणि भांडवलवादी व्यवस्थेत अशा परिस्थितीत दुहेरी समाजव्यवस्था तयार होणे अपरिहार्यच होते.

शेतीतील किमान आवश्यकतेपेक्षा अधिक असलेले वरकड उत्पन्न पूर्णत: निष्ठूरपणे ओरबाडून घेणे हे औद्योगिक विकासासाठी आवश्यक आहे. याविषयी भांडवलवादी व साम्यवादी या दोनही पद्धतीत अगदी एकमत आहे. शेतीतील वरकड उत्पन्न उद्योगधंद्याकडे वळविणे याचा अर्थ ते शेतकऱ्याकडून काढून घेऊन कारखानदारांकडे देणे असा नव्हे या वस्तुस्थितीकडे मात्र साफ डोळेझाक केली गेलेली आहे.

उत्पादनाच्या वास्तविक खर्चापेक्षा कमी किमतीत कच्चा माल खरीदणे हीच इंडियन अर्थधोरणांची व योजनाविषयक डावपेचांची कोनशिला आहे. केंद्रशासनात शेतीविषयक धोरणे सूत्रबद्ध करण्याच्या कामात अकरा वर्षांहून अधिक काळ सहभागी झालेल्या (माजी कृषि-राज्यमंत्री) श्री. अण्णासाहेब शिंदे यांनी एका अनौपचारिक चर्चेच्या वेळी तर अशी स्पष्ट कबुली दिली की, 'शेतीमालाच्या वाजवी किमतींचा प्रश्न कृषिमूल्य आयोगाच्या स्थापनेमुळे समाधानकारकरीत्या सुटेल अशी मला आशा होती. पण हा राजकीय अनिच्छेचाच प्रश्न आहे असे आता माझ्या लक्षात आले आहे.'

शेतीविषयक नव्या रचनेचे शिल्पकार श्री. सी. सुब्रह्मण्यम् म्हणतात,

'भारतीय शेती ही शेतकऱ्याच्या दृष्टीने बुडीत खाती धंदा होता. त्याने केलेले श्रम किंवा जी गुंतवणूक करण्यास तो तयार आहे त्याच्या प्रमाणात त्याला प्राप्ती होत नसे. स्वातंत्र्योत्तर कालात जी किमतीची धोरणे हा दुसऱ्या महायुद्धात वापरलेल्या डावपेचांचा वारसा आहे.'

कांदा, ऊस, कपाशी, तंबाखू, भात, ज्वारी, दूध इ. बऱ्याच वस्तूंचा उत्पादनखर्च काढण्याचा जो उपक्रम शेतकरी संघटनेने हाती घेतला त्यावरून असे दिसून येते की, हंगामात शेतकऱ्यांना मिळणाऱ्या किमती जेमतेम उत्पादनखर्चाच्या अर्ध्या असतात. चर्चासत्रात भाग घेतलेल्यांपैकी निदान ज्यांचा थोडाफार का होईना, पण शेतीशी प्रत्यक्ष संबंध आला आहे असे डॉ. चिमा कबूल करतात '...ग्राहकांचे समाधान करण्यासाठी आम्ही उत्पादकांना द्याव्या लागणाऱ्या किमती खाली दडपण्याचा प्रयत्न करतो...'

या ठिकाणी हे पूर्णपणे लक्षात ठेवणे आवश्यक आहे की आपण किमतींचे सापेक्ष चढउतार किंवा आंतरक्षेत्रीय व्यापारविषयक शर्ती यांची चर्चा करीत नाही आहोत. आपण शेतीमालाच्या व बिगर शेतीमालाच्या किमतीची तौलनिक चर्चा करीत नसून शेतीमालाच्या किमतीची त्यांच्या उत्पादन खर्चाशी तुलना करीत आहोत. आकडेवारी गोळा करण्याच्या पद्धतींतील दोष, किमतीविषयीची चुकीची आकडेवारी यामुळे किमतींची आंतरक्षेत्रीय तुलना निरर्थक झाली आहे. वेगवेगळ्या वस्तूंना द्यायचे सापेक्ष महत्त्व (weightage), पायाभूत कालखंडांची अशास्त्रीय निवड यामुळे अशा तुलनेतून धोरणात्मक निर्णयासाठी तर सोडाच, पण गंभीर चर्चेसाठी लागणारी माहितीसुद्धा हाती येत नाही.

सर्वश्री अशोक धर, सेठी, दांतवाला, अशोक मित्रा, सिद्धू आणि सिंग, तामराजाक्षी वेंकटरामन् एवढेच नव्हे तर कल्हन आणि त्यागी यांच्या अभ्यासांचे निष्कर्ष काहीही असोत, शेतकऱ्यांना ज्या वस्तू खरेदी कराव्याच लागतात त्यांचे भाव दिवसे-दिवस भडकत चालले आहेत, तर उलटपक्षी ज्या वस्तूंचे तो उत्पादन करतो त्यात मात्र किमतीच्या दृष्टीने जवळजवळ काहीच फरक पडत नाही. व्यापारविषयक शर्ती केवळ ३ किंवा १० वर्षांपासून शेतीच्या विरुद्ध नसून किमान १९२० च्या मंदीपासून आहे असे सिद्ध करता येईल.

श्री. व्ही. टी. कृष्णम्माचारी यांच्या नेतृत्वाखालील समितीने १९४६ मध्ये शेतकऱ्यांना निदान त्यांचा उत्पादनखर्च भरून निघेल अशा किमती ठरवून देण्याची हमी द्यावी अशी शिफारस केली होती. अशी शिफारस केल्यावर समितीच्या असे लक्षात आले की, त्यावेळी उपलब्ध असणारी आकडेवारी विविध शेतीमालाचा



उत्पादनखर्च काढण्याइतकी पुरेशी नव्हती. जोपर्यन्त आवश्यक ती आकडेवारी उपलब्ध होणार नाही तोपर्यंत शेती व बिगरशेती क्षेत्रांतील संबंध संतुलित असतील असा एखादा कालखंड निवडावा व त्याच्या संदर्भाने या दोन्ही क्षेत्रांतील किमतीचे संतुलन साधले जावे अशी समितीने शिफारस केली. समितीच्या निदर्शनाला आलेला अगदी नजिकचा काळ म्हणजे १९२४-२५ ते १९२९-३०.

स्वातंत्र्यप्राप्तीच्या उंबरठ्यावर असलेली ही परिस्थिती, जी श्री. सी. सुब्रह्मण्यम् यांच्या मते, यानंतर शेतकरी-विरोधी किमतीविषयक धोरणांची सुरुवात झाली. आज हयात असलेल्या शेतकऱ्याच्या किंवा त्याच्या वडीलधाऱ्यांच्या आठवणींत तरी आंतरक्षेत्रीय व्यापोरविषयक शर्ती सतत खालावत चालल्या आहेत. उत्पादनखर्च भरून निघेल अशा किमती शेतीमालाला मिळत असत्या किंवा दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर शेती हा फायद्याचा व्यवसाय असता तर या खालावत चाललेल्या शर्तींना महत्त्व देण्याचे काहीच कारण नव्हते.

शासनाने आधारभूत किंवा हमी म्हणून ज्या किमती घोषित केलेल्या असतात त्यांची आकडेमोड हे एक संरक्षित गुपितच असते. पण खर्चाच्या बाबींची यादी अपूर्ण आहे असे मानावयाला बराच वाव आहे. शेतीमालाच्या वाहतुकीचा खर्च जमेत धरण्यात यावा अशी सूनचा दिली गेल्याचे केंद्रातील मा. शेतीमंत्र्यांनी मागच्याच वर्षी घोषित केले आहे!

फक्त महाराष्ट्राचा जरी विचार केला तरी १९६५ पासून केवळ वाहतुकीचा खर्च वगळला गेल्याने प्रतिवर्षी ऊसउत्पादकांचे सुमारे चाळीस कोटी रुपयांचे नुकसान झाले. महाराष्ट्रात उसाचा सुगीच्या हंगामावेळचा, तसेच वाहतुकीचा खर्च प्रतिटनास ३३ रुपये आला. कृषिमूल्य आयोगाने या बाबींवरचा खर्च प्रतिटनास फक्त १० रुपये धरला आहे असे बोलले जाते. जर या वर्षापासूनच वाहतुकीचा खर्च जमेल धरला जावयाचा असेल तर उसाच्या किमतीत ५ रूपये ते १३० रूपये प्रतिटनास वाढ मिळायला हवी आहे.

महाराष्ट्र शासनाच्या कृषिमूल्य आयोगाने उसाच्या उत्पादनखर्च प्रतिक्विंटलला २२५ रुपये असा हिशेबात धरला आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर केंद्रशासनाने घोषित केलेल्या कमीतकमी किमतीपेक्षा तो सुमारे ९५ रुपयांनी जास्त आहे. भाताबद्दलचे कृषिमूल्य आयोगाचे खर्चाचे अंदाज हास्यास्पद या सदरात जमा होण्याइतके सदोष आहेत. कृषिमूल्य आयोगाचे हिशेब न्याय्य व पुरेसे आहेत असे ज्या कोणाला वाटते त्याला एकच शिक्षा योग्य आहे व ती म्हणजे त्याला कृषिमूल्यआयोगाने ठरविलेल्या किमतीत शेतीमालाचा पुरवठा

करावयास लावणे.

कृषिमूल्य आयोगाच्या हिशेबातील दोषांचे फलित शेतकऱ्यांना वाजवी भावापासून सतत वंचित ठेवण्याच्या राजकीय धारणेत आहे. मुद्दामच परस्परविरोधी जबाबदाऱ्या (Terms of reference) टाकून कृषिमूल्य आयोग निरुपयोगी बनविला गेला आहे. मूलत: या आयोगाच्याही कामाचे स्वरूप तांत्रिक असतानाही तिच्यावर एकमेकाशी स्पर्धा करणाऱ्या पिकांत बरोबरी ठेवणे, ग्राहकांच्या हितसंबंधांची जपणूक करणे आणि चलनवाढीला आळा घालणे यासारख्या आर्थिक जबाबदाऱ्या का सोपविल्या जातात? अर्थमंत्रालय, नियोजन आयोग, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांसारख्या आर्थिक बाजूचा विचार करणाऱ्या अनेक संस्था आहेतच ना, मग कृषिमूल्य आयोग संपूर्णपणे शेतीविषयक अभ्यासालाच का वाहून घेत नाही?

कृषिमूल्य आयोगाच्या (माहिती) संकलनाच्या पद्धतीही असमाधानकारक आहेत. हा आयोग शेतकऱ्याकडून, कृषिविद्यापीठे किंवा तत्सम संस्थाकडूनही उत्पादनखर्चाची माहिती एकत्र करतो. या संस्थांना आपल्या तथाकथित कार्यक्षमतेचा डांगोरा पिटण्यातच स्वारस्य असते आणि त्यामुळे प्रत्येक बाबीचा कमीत कमी खर्च त्यांच्याकडून दाखविला जात असतो. ज्यांच्याकडे खर्चाचा तपशील मागितला जातो त्यातील बऱ्याचशा शेतकऱ्यांनी खर्चाच्या शास्त्रशुद्ध नोंदी ठेवलेल्या नसतात. शिवाय पुष्कळसे शेतकरी अगदीच अपुऱ्या तंत्रज्ञानाच्या आधारे शेती करीत असतात. त्यांच्याकरवी नैसर्गिक किंवा रासायनिक खतांचा किंवा कीटकनाशकांचा नगण्य वापर केला जातो, जमिनीची मशागतही अगदी जरूरीपुरतीच केली जाते आणि जमिनीची गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी लागणाऱ्या खर्चाला कात्री लावली जाते. कारण तो त्यांच्या आवाक्याबाहेरचा असतो.

आयोगाकडे संकलित केल्या जाणाऱ्या माहितीचे तपशील हे अशा प्रकारचे असतात. यांच्यावरूनच दर हेक्टरी खर्च व उत्पादन यांची सरासरी काढली जाते. अप्रत्यक्ष व अपरोक्ष खर्च अत्यंत नाराजीने वा चेंगटपणे स्वीकारले जातात जमिनीच्या भाडेपट्टीचा हिशेब कालबाह्य महसुली नोंदीवरून किंवा उत्पादनाच्या किमतीवरून केला जातो. जमेस धरलेला मजुरीचा दर हा राज्यशासनाने निर्धारित केलेल्या किमान वेतनापेक्षाही कमी धरलेला असतो. बऱ्याच वस्तूंच्या बाबतीत तर स्वत: शासकीय कार्यालयाकडून आकारल्या गेलेल्या दरापेक्षाही गृहीत धरले गेलेले खर्च कमी असतात.



संस्थांचे असे जुळवाजुळवी करून तयार केलेले हिशेब आणि पराकोटीच्या अप्रगत शेतीचे हिशेब यांच्या सरासरीतून हास्यास्पद अशा अत्यल्प खर्चाची आकडेवारी तयार होते आणि या प्रकारच्या उपक्रमावर आधारित असलेल्या खरेदीच्या निर्धारित किमती मग शेतकऱ्यांना मागासलेल्या अप्रगत शेतीच्या अवस्थेतच राहणे भाग पाडतात.

विकसनशील देशांच्या बाबतीत लागू पडेल अशी अधिक उचित पद्धत म्हणजे कृत्रिम नमुना पद्धती (Synthetic model method) होय. या पद्धतीद्वारे तंत्रज्ञानाची विशिष्ट पातळी, त्या ठिकाणी वापरात असणाऱ्या जमिनीचा प्रकार आणि यांच्याशी सुसंगत असे उत्पादन-अशा एखाद्या कृत्रिम क्षेत्राचा नमुना म्हणून उपयोग करून खर्चाच्या हिशेबाची एक नमुनापद्धती तयार करता येईल. यांत्रिक रीतीने सरासरी काढण्याच्या सध्याच्या पद्धतीपेक्षा या पद्धतीत बरेच फायदे आहेत. पण दुर्दैवाने ती इंडियन शासन कधीच स्वीकारणार नाही. कारण एवढेच की, या पद्धतीमुळे काढले गेलेले खर्च हे शेती व्यवसायातील आणि वास्तविक आणि प्रत्यक्षात उतरण्याजोग्या परिस्थितीशी आपोआपच मिळतेजुळते होतात याची त्यांना खात्री आहे.

शासनाने घोषित केलेल्या खरेदीच्या निर्धारित किमती अपुऱ्या आहेत हे संबंधित अधिकाऱ्यांना ठाऊकच नसेल यावर विश्वास ठेवणेही कठीण आहे. ही स्थिती हास्यास्पदतेच्या कुठल्या पातळीवर जाऊ शकते यावर विडी-तंबाखू उत्पादकांचे उदाहरण प्रकाश टाकू शकेल. १९७८ साली तंबाखू उत्पादक त्यावेळी ५ ते ७ रु. प्रतिकिलो असा प्रचलित बाजारभाव असताना प्रतिकिलो १० ते १० रुपये असा भाव मिळावा अशी मागणी करीत होते. शासनाने शेवटी १ ते १-४० रुपये प्रतिकिलो अशी किंमत निर्धारित केली. यावर अधिक भाष्य ते काय करावे?

आपली शेती ही पूर्णपणे पावसाचा हंगामी काल आणि त्याची अनिश्चितता यावर अवलंबून आहे. विचाराधीन अशा कुठल्याही शेतीक्षेत्रावर त्याचे दोन प्रत्यक्ष परिणाम होतात. पहिला म्हणजे पिकाचे नुकसान आणि त्यायोगे उत्पादनाच्या सरासरी खर्चात वाढ आणि दुसरा म्हणजे हंगामानंतरच्या लगतच्या काळात एकाच वेळी बाजारात झालेली शेती उत्पादनाची आवक व त्यामुळे त्याच्या किमतीत होणारी घट.

निसर्गाच्या या संकटात वरील दोन कारणांमुळे शेतकरी पुरताच कात्रीत सापडला जातो आहे आणि याचा पुरेपूर फायदा पिढ्यानूपिढ्या व्यापाऱ्यांनी आपल्या तिजोऱ्या भरण्यासाठी घेतलेला आहे. याखेरीज खाजगी व्यापाऱ्यांना जे शक्य

होत नाही ते सामर्थ्याच्या जोरावर शासन करीत असतेच.

दुष्काळाच्या काळात व्यापाऱ्यांनादेखील जास्त किमतीने धान्यखरेदी करावी लागते, पण शासन लेव्हीच्या रूपाने म्हणजे सक्तीच्या खरेदीने धान्यउत्पादकावर बाजारभावापेक्षा कमी आणि झालेल्या खर्चापेक्षाही कमी भावात त्याचे उत्पादन विकण्याची सक्ती करू शकते. उलटपक्षी मुबलकतेच्या काळात मात्र किमती स्थिर ठेवण्याच्या जर काही योजना असल्याच तर त्या अंमलबजावणीच्या दृष्टीने अपुऱ्या असतात, नेमक्या वेळा साधण्याच्या बाबतीत दिरंगाईच्या ठरतात; आणि किंमतींच्या बाबतीत इतक्या खालच्या स्तरावरील असतात की त्यामुळे काही काही वेळा बाजारभाव अधिकच घसरण्यात त्याची परिणती होते. आयात निर्यातीची धोरणे तर अत्यंत अक्कलहुषारीने आणि कठोरपणे किमती कोसळविण्यासाठी राबविली जातात.

देशान्तर्गत मागणी नसल्याने भारतात लांब धाग्याच्या कापसाच्या साधारणत: आठ लाख गाठी पडून आहेत. त्या बाहेर खपवाव्यात तर सातत्याने व चिकाटीने प्रयत्न करूनही निर्यात परवानेच मिळत नाहीत. अशा स्थितीत छोट्या व मध्यम धाग्याच्या कापसाची कमतरता असल्याची बातमी झळकताच घाई करून शासनाने तीन आठवड्यांच्या आत या प्रकारच्या कापसाच्या चार लाख गाठी पाकिस्तानातून आयात केल्या.

शासकीय हुकूमनाम्यांच्या जोरावर होणाऱ्या उत्पादकांच्या विधिनिषेधशून्य शोषणाचे साखर हे एक विश्वासही बसणार नाही असे उदाहरण आहे. तसे पाहायला गेले तर शेतीमालाच्या किमती उत्पादकाला तोट्यात आणणाऱ्या पातळीवर ठेवण्यासाठी शासनाने वापरलेल्या खास चालींचा तपशीलवार विचार करण्यात कदाचित फारसा अर्थ नसेलही. चर्चासत्रात भाग घेणारे विद्वान स्वत:च कबूल करतात की, 'हा प्रश्न नुसता संतुलनाचा नसून गरजू क्षेत्राकडे साधनांचा ओघ वळविण्याचा आहे.' आता ही गरजू क्षेत्रे कुठली? तर सामर्थ्यावान कारखाने. पण याच कारखान्यांनी आपल्या देशाला सर्व जगात औद्योगिक सामर्थ्याच्या बाबतीत दहावा क्रमांक बहाल केलेला आहे.

वास्तविक शेतीमालाच्या किमती वाजवी आहेत की नाहीत हा प्रश्नच शेतीशी निगडित अशा सर्व प्रश्नांच्या केंद्रस्थानी आहे. त्यामुळे या वस्तुस्थितीचे आकलन होणे हेच जास्त करून विषयाला धरून होईल. हे प्रश्न समाधानकारकरीत्या सुटण्यासाठी वाजवी किमती दिल्या जाणे किंवा अगदी नि:संदिग्ध शब्दांत सांगायचे तर वाजवी किमती न दिल्या जाण्यालाही वापरण्यात येणारी धोरणे तहकूब करणे



हाच एकमेव मार्ग आहे. शेती, मग ती कितीही लहानमोठी असो, जोपर्यंत केलेल्या गुंतवणुकीपेक्षा जास्त उत्पन्न देत नाही तोपर्यन्त शेतीशी निगडित असा कुठलाच प्रश्न समाधनकाकरीत्या सुटणे शक्य नाही. शासन मात्र वाजवी किमतीची खात्री देण्याऐवजी दुसरे काहीही करायला तयार आहे, हा एक विरोधाभासच!

आकर्षक किमती घोषित केल्या गेल्यास शेतीतील उत्पादन नक्कीच वाढविता येईल. शेतकऱ्यांना वाजवी किमती द्या म्हणजे ते शेतीविकासाच्या अनेक योजना प्रत्यक्षात आणतील. अशा योजना की ज्यांत पाणीपुरवठ्याचे प्रकल्पही असू शकतील. आर्थिकदृष्ट्या सुयोग्य आहे प्रकल्प कुठल्या तरी तुघलकाच्या, स्वप्निल कल्पनाविश्वातील आधुनिक क्षेत्रस्थाने नाहीत.

या चर्चासत्रात भाग घेतलेल्या विद्वानांनी उल्लेखिलेले कुठलेही एखादे कोडे घ्या. त्यांनी दर्शविलेले प्रत्येक कोडे हा शेतीमालाला दिल्या जाणाऱ्या अपुऱ्या किमतीचाच परिपाक आहे असे दाखवून देता येईल आणि या गोष्टीचा परिणाम इंडिया-भारत अशा विभाजनातच होतो आहे. दलालांना म्हणजे शेतीमाल भारतात खरीदला जाऊन इंडियात विकला जातो हीच होय.

यामुळे व्यापाऱ्यांना दिवसाढवळ्या तस्करी फायदे लुटता येतात. आपण परकीय तंत्रज्ञानावर अवलंबून आहोत कारण शेती हे काही फायद्याचे कलम नाही. जर ते तसे असते तर खरोखरीचे आवश्यक ते तंत्रज्ञान पाश्चात्यांच्या आहारी गेलेल्या संस्था किंवा विद्यापीठे या ठिकाणी नव्हे तर ते 'भारता'तील शेतावरच निर्माण झाले असते. आज शेतीखालील जमीन ही एक तोट्याची बाब झाली आहे. भारतातून निघून इंडियात गेलेले लाखो निर्वासित त्यांच्या उत्पन्नातील अत्यल्प हिस्सा गावाकडे पाठवितात-कशासाठी, तर चांगले दिवस येतील तोपर्यंत तरी शेतीचे रक्षण करावे म्हणून.

शेतीव्यवसाय हा सध्या केवळ राष्ट्रीयीकृत बँका व इतर काही कर्ज पुरवणाऱ्या संस्था यांनी दिलेल्या भरपूर कर्जावर चालू ठेवणे शक्य झाले आहे. पण आर्थिकदृष्ट्या किफायतशीर नसलेल्या उद्योगांना पुरविलेली कर्ज जशी पूर्णत: माफच करावी लागतात तशीच स्थिती आज ना उद्या या कर्जाची होईल. सटीसामासी मिळणारा उत्पन्नातील नफाही पुन्हा शेतीत गुंतविला जात नाही. कारण शेती हा बुडीत खाती धंदा आहे हे सर्वांना माहीत आहे. एखाद्या वेळी मिळालेली किमतीतील वाढसुद्धा पुरवठ्यावर फारसा परिणाम करू शकत नाही. कारण या वाढलेल्या किमतीसुद्धा उत्पादनखर्चापेक्षा कमीच असतात.

आपला उद्योग आर्थिकदृष्ट्या सुसह्य व्हावा हीच फक्त शेतकऱ्यांची मागणी

आहे. टाटा किंवा बिर्ला यांनाही त्यांच्या उत्पादनाचा उत्पादनखर्च भरून काढण्याचा हक्क आहे. तसाच दहा, वीस, इतकेच कशाला पन्नास एकरांच्या जमीनमालकाचासुद्धा हा हक्क नाकारला जाता कामा नये.

अलीकडे असे दिसते की इंडियनांना दरिद्री भारताच्या दुरवस्थेचा एकदम साक्षात्कार आणि पुळका आलेला आहे. तसे होणे हेही आताच्या इंडियातील जुन्या 'फोडा नि झोडा' व 'गोऱ्या माणसाचे ओझे' अशा वसाहतवादी वारश्याचेच निदर्शक म्हटले पाहिजे. शेतकऱ्याला वाजवी किमती मिळत नसतानाही जर चलनफुगवट्याचे सर्वकष संकट उभे राहात असेल तर त्याचा शेतकऱ्याशी काहीही संबंध नाही. जर आपल्या अर्थव्यवस्थेला वाजवी किमतीचा भार कुठल्याच क्षेत्रात सहन होत नसेल तर अशी अर्थव्यवस्था नष्टच व्हायला हवी.

कांदा पिकविणाऱ्या भागात झालेल्या बदलावरून वाजवी किमतीच्या आर्थिक परिणामांची गुणवत्ता तपासून पाहता येईल. कांद्याच्या किमतीतील वाढीपेक्षा कितीतरी जास्त असे शेतमजुरीचे दर वाढलेले आहेत. वाढीव उत्पादनाचा उपयोग खाजगीरीत्या गहाण पडलेल्या जमिनी सोडवून घेण्यासाठी व कर्जाची परतफेड करण्यासाठी केला जातो आहे. जमिनीत आणि पाणीपुरवठ्याच्या पद्धतीत सुधारणा होत आहेत. शेतीशिवाय बाकीचे व्यवसाय सुरू करून त्यात रोजगार उपलब्ध होईल अशा हालचाली सुरू झाल्या आहेत. खेड्यात चैतन्य येते आहे असे वाटू लागले आहे आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे सर्व कुठल्याही जादा शासकीय प्रयत्नाशिवाय झाले आहे.

पूर्वापार चालत आलेल्या जुनाट कल्पनातच आपली डोकी गाडून टाकण्यापेक्षा या शांततामय क्रांतीचा अभ्यास प्रत्यक्ष जमिनीवर पाय ठेवून आपल्या अर्थशास्त्रज्ञांनी केला तर किती बरे उत्तर होईल! आर्थिक विकास आणि वाढ ही निसर्गसिद्ध आणि आनंददायी प्रक्रिया आहे. लहान मुलाच्या वाढीसारखीच. पण आपले हे 'इंडियन' अर्थशास्त्रज्ञ शेतीमालाच्या किमतीत लुडबूड करून या बालकाचा गळा घोटताहेत आणि त्याचवेळी ते बाळसेदार दिसावे म्हणून त्याच्यात विषारी सूज भरण्याचीही व्यवस्था करताहेत.

त्या बाळाला त्याच्या या हिंतचिंतकांच्या तावडीतून कोण सोडवेल?

*'इंडियन एक्स्प्रेस' - ४ नोव्हेंबर १९८१*

□□



सहा

# सत्तावीस उणे नऊ बरोबर शून्य

**१४** जानेवारी १९८२ रोजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी देशाला त्यांचा सुधारित वीस कलमी कार्यक्रम सादर केला. त्यावेळी त्या म्हणाल्या, ''पूर्ण विचारांती व शासनातील वेगवेगळ्या पातळ्यांवर सांगोपांग चर्चा करून तयार केलेला हा कार्यक्रम विशेष प्रयत्न केल्यास समाजाच्या अनेक घटकांचा ताबडतोब भरीव फायदा होईल अशा क्षेत्रावर नेमके बोट ठेवतो.'' आता ज्याच्यावर जोर द्यावयास हवा अशा क्षेत्रांची संख्या विसावरच विसावलेली आहे हा एक उल्लेखनीय योगायोगच म्हटला पाहिजे.

'देशासाठीची खास कार्यक्रमपत्रिका' आणि 'तुमच्यातील प्रत्येकासाठी आणि आपल्या या देशाच्या सेवेसाठी, उत्कर्षासाठी आणि बांधणीसाठी' वगैरे वगैरे भलावण फार गंभीरपणे विचारात घेण्याचे कारण नाही. खरे तर ही पालुपदे आता पार झिजून गेली आहेत. पण जनसामान्यांच्या भावना हेलावून टाकण्याचे वक्तव्यातील कौशल्य पंतप्रधानांना शिकवील असा कुणी हरीचा लाल आज आपल्या देशात सापडू शकेल का?

'सत्यमेव जयते' या राष्ट्राच्या बोधवाक्याला Labour Omnia Vincit- श्रममेव जयते-ही पुरवणी जोडलेली आहे. फक्त सत्याचा विजय होईल, फक्त श्रमाचा विजय होतो. 'फक्त' या विशेषणाचा अर्थ मात्र स्वीकारताना त्याच्या केवलत्वाबाबत थोडीफार तडजोड करायची तयारी दाखविली म्हणजे झाले. अर्धपोटी माणसांना व बेकारांच्या जथ्यांना अधिक परिश्रम करा आणि सत्याचा कधीतरी विजय होईल अशी स्वप्ने सोडून द्या असेच सांगितले आहे.

नुसत्या वृत्तपत्रांनीच नव्हे तर बहुसंख्य लोकांनी या सुधारित वीस कलमी कार्यक्रमाविषयीची प्रतिक्रिया व्यक्त करताना जो थंड अलिप्तपणा दाखविला तो त्यांची प्रगल्भताच दर्शवितो असे म्हटले पाहिजे.

एरवी वृत्तत्रांतून मंत्रिमंडळातील खात्यांच्या आलटी-पालटीच्या वार्तेला दुसऱ्याच दिवशी ठळक मथळा लाभतो आणि ३५ वर्षांच्या सरावाने दाटलेल्या

कंठाने उद्घोष झालेल्या नव्या २० कलमी कार्यक्रमाला जुन्या २० कलमी कार्यक्रमाप्रमाणेच दप्तरखान्याच्या धूळ भरल्या थडग्याचाच आश्रय घ्यावा लागतो.

लक्षात घ्या, या प्रकारामुळे कुणालाच फारसा खेद वा खंत नाही. कारण प्रचलित शासन हे घटनांचा क्रम वा ओघ बदलेल आणि काही खऱ्याखुऱ्या सुधारणा घडवून आणील असे आज कुणी मानतच नाहीत. प्रत्येकाला हे माहीत आहे की, शासन हे अर्थव्यवस्थेच्या डगडगत्या गाड्याखाली चाललेल्या कुत्र्यासारखे आहे आणि आपणच या गाड्याचे नेतृत्व, तेही योग्य दिशेने करतो आहोत अशी त्याची कल्पना आहे. लोकांच्या या विचारसरणीत दोष काढण्यासारखे काहीच नाही. या सुधारित कार्यक्रमाच्या शिल्पकारांपेक्षा इतर लोकांना याची अधिक गंभीरपणे दखल घेण्याची गरजच काय? आता हेच पाहा ना, १९८२ हे वर्ष 'उत्पादकता वर्ष' म्हणून जाहीर केले गेले आहे. म्हणजेच उत्पादकता व उत्पादन यातील वाढ हे या वर्षाचे प्रमुख लक्ष्य आहे. असे असतानादेखील याच वर्षी मांडल्या गेलेल्या या वीसपैकी फक्त चारच कलमे उत्पादकतेतील वाढीच्या उपायाशी निगडित आहेत.

ज्यावर्षी शासनाला गहू, साखर, कापूस आणि खाद्यतेलांच्या आयातीची आवश्यकता वाटली त्यावर्षी तरी शासनाकडून शेतीमालाच्या उत्पादनातील वाढीसाठी काही निश्चित उपाययोजना राबविल्या जातील अशी प्रत्येकाची अपेक्षा होती. वीसपैकी १० कलमांना तरी ग्रामीण परिस्थितीचा व शेतीचा प्रत्यक्ष संदर्भ आहे. आणखी पाच कलमांचा तरी त्या क्षेत्रावर परिणाम पुष्कळसा असू शकतो. काही असो, पण फक्त दोन कलमांचा ('पाणीपुरवठ्याच्या क्षमतेतील वाढ व कोरडवाहू जमिनीबाबत अधिक मदतीची तरतूद' आणि डाळी व खाद्य तेले यांच्या उत्पादनातील वाढ यासाठीचे विशेष प्रयत्न') शेतीमालाच्या उत्पादनावर प्रत्यक्ष परिणाम होईल. कोरडवाहू जमिनीबाबत पाणीपुरवठ्याची क्षमता वाढविण्याचे प्रयत्न केले तरी ते ताबडतोब भरीव फायदे देऊ शकतील असे वाटत नाही.

डाळी व तेलबियांचे उत्पादन वाढविण्यासाठी बी-बियाणे, खते, औषधे वगैरेंचा पुरवठा व विशेष प्रयत्न करणे म्हणजेच आताच्या राबविल्या जाणाऱ्या योजनांची तीव्रता वाढविणे होय. पण त्यामुळे थोड्या काळापुरता उत्पादनवाढीचा झटका येईल. पण जसे उत्पादन वाढते आहे, तसेच आपले नुकसानही वाढते आहे हे जेव्हा शेतकऱ्यांच्या लक्षात येईल तेव्हा हा झटका नक्कीच शमेल.

या वीस कलमी कार्यक्रमाचे सगळ्याच मोठे वैशिष्ट्य काय तर त्यात शेतकऱ्याला कुठलाही दिलासा दिलेला नाही हे होय. निसर्गाच्या लहरी व



बाजारभावातील चढउतार यांच्यापासून शासनाने कुठलेही संरक्षण त्याला दिलेले नाही किंवा उत्पादनखर्च भरून निघावा अशा किमान रास्त किमती तरी शेतीमालाला मिळाव्यात अशी खात्रीही दिली गेलेली नाही.

अलीकडील काही वर्षांत रास्त किमतीचा प्रश्न इतक्या वेळेला चर्चिला गेला आहे की त्यावरील आश्वासनांचा अभाव हेतुपुरस्सर आहे हे उघड आहे. नुकत्याच पार पडलेल्या प्रचंड कर्जासंबंधीच्या वाटाघाटी पूर्ण करताना भारत सरकार व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांनी शेतीमालाच्या रास्त किमतीच्या मिषाने ज्या ध्येय धोरणांना पाठिंबा दिला आहे त्यांचा विचार केला तर कुठल्याही प्रकारच्या आश्वासनांच्या अभावामागे एक वेगळाच हेतू जाणवू लागतो.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा अहवाल सांगतो, 'अन्नधान्ये, त्यातही विशेषतः कडधान्यांच्या बाबतीत उत्पादन, खरेदी व सार्वजनिक वाटपव्यवस्था यांच्यावर किमती ठरविण्याच्या धोरणांचा मोठा परिणाम होतो. शिवाय यापुढे अन्नधान्यांच्या सक्तीच्या खरेदी किमती ठरवताना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील किमतीशी स्पर्धा करण्याची आवश्यकता लक्षात ठेवली पाहिजे. सार्वजनिक वाटपव्यवस्थेतील द्यावे लागणारे अनुदान (subsidy) मर्यादेत ठेवण्याची गरजही खरेदीच्या किमती ठरवताना लक्षात घेतली पाहिजे.

शक्य तेथे प्रशासकीय किमतीची (Administrativeprices) परवडणाऱ्या किमतीशी हळूहळू सांगड घालत जाणे आणि त्यायोगे साधनसामग्रीची जमवाजमव व तिचा कार्यक्षम वापर या दुहेरी ध्येयांची पूर्तता करणे हे या कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.' (हिन्दु-२०-२१ ऑगस्ट १९८१ वरून उद्धृत)

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीला हिन्दुस्थानातर्फे देण्यात आलेले उत्तर पुढीलप्रमाणेआहे-

'१९६० च्या दशकाच्या उत्तरार्धातील राबवल्या गेलेल्या शेतीविषयक धोरणांचा पाठपुरावा केला जाईल व जरूर तर ती धोरणे अधिक बळकट केली जातील. त्याशिवाय उत्पादनाचा समतोल साधणे हे शतीविषयक धोरणांचे ध्येय आहे. त्यातही तेलबिया, ऊस व डाळी यांची देशातील कमतरता भरून काढण्यावर विशेष भर दिला जाईल. यामुळे आयातविषयक गरजा कमी होतील व चलन फुगवट्यालाही आळा बसेल. तसेच ज्या वस्तूंचे आधिक्य असेल व ज्या निर्यात करता येतील अशांचे आधुनिक पद्धतीने उत्पादन करण्यास चालना मिळेल. उत्पादनांच्या किमतीची धोरणे अशा रीतीने विस्तृत करता येतील की त्यायोगे आर्थिकदृष्ट्या शेतीउत्पादनाची अपेक्षित पातळी आणि स्वरूप साधण्यास उत्तेजन

मिळावे व सर्वसाधारणा किमतीच्या धोरणाशी सुसंगती साधावी.'

बिगर अन्नधान्याच्या उत्पादनाबद्दल नाणेनिधीला दिलेले आश्वासन पुरे करण्यासाठी एक कलम 'सुधारित' वीस कलमी कार्यक्रमात अंतर्भूत आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या उत्तेजनाचा अभाव याला एक अभद्र अर्थ प्राप्त होतो. यावरून भारत सरकारला आपल्या जाहीरनाम्यातील कलमांची पूर्तता करण्याची इच्छा नाही हेच स्पष्ट होते.

आयातीला उत्तेजन मिळावे अशा हेतूने रूपयाचा विनिमयाचा दर ठरविला गेला असूनही आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील शेतीमालाच्या किमती या देशांतर्गत किमतीपेक्षा बऱ्याच जास्त आहेत हे नुकत्याच केलेल्या विदेशी खरेदीवरून तरी सरकारला समजून यावयास हवे होते. या ठरविलेल्या किमती उत्पादन खर्चाच्या मानाने बऱ्याच कमी आहेत या आरोपाचे कोणीही जबाबदार व्यक्ती खंडन करीत नाही. हे सारे लक्षात आलेले असल्यामुळेच बरेचसे भारतीय अर्थतज्ज्ञ शेतीमालाच्या किमतीविषयी चर्चा करताना अगदी अस्वस्थ होतात आणि शेतकऱ्यांच्या शोषणाचे, ते राष्ट्रीय भांडवल संचयासाठी अत्यावश्यक असल्याचे लंगडे समर्थन करण्याचा प्रयत्न करतात.

केंद्रीय शेतीमंत्री दस्तूरखुद्द राव वीरेंद्रसिंग यांनी स्वत:च एक खुल्लमखुल्ला कबुलीजबाब देऊन माफीचे साक्षीदार बनले आहेत. २८ डिसेंबर १९९८१ रोजी इंडियन सोसायटी ऑफ अॅग्रीकल्चरल स्टॅटिस्टिक्स (ISAS) च्या ३५ व्या वार्षिक परिषदेचे नवी दिल्ली येथे उद्घाटन करताना मंत्रिमहाशय म्हणाले, 'विविध शेतीमालाच्या किमती ठरविण्याची प्रक्रिया अधिक वास्तव व्हावी यासाठी कृषिमूल्य आयोगाने अंगीकृत केलेल्या पद्धतीत सुधारणा करण्यात आली आहे. यापुढे शेतकऱ्यांना कच्च्या मालासाठी, अवजारांच्या दुरुस्तीसाठी तसेच शेतापासून बाजारपेठ किंवा कारखान्यापर्यंतच्या शेतीमालाच्या वाहतुकीसाठी करावा लागणारा खर्च या सर्वांचा उत्पादनखर्चात समावेश केला जाईल.

'चार पिकांपैकी एकच पीक समाधानकारक असते असे आतापर्यंतचा सर्वसाधारण अनुभव सांगतो. बाकीच्या पिकांत शेतकऱ्याला नुकसान तरी सहन करावे लागते किंवा केलेला खर्च भरून निघाला यावरच समाधान मानावे लागते.' ('टाइम्स ऑफ इंडिया,' २९ डिसेंबर १९८१)

कृषिमूल्य आयोगाचे हिशेब निर्दोष असल्याचे आजवर सतत सांगणाऱ्या राव वीरेंद्रसिंग यांनी आता त्यातील दोषांची कबुली दिली आहे. आजवरच्या या भूमिकेचा संकलित परिणाम म्हणजे नेहमीच उत्पादनखर्च हा २५ ते ३०% कमी



धरला गेला. यामुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची व्याप्ती किती मोठी आहे हे वानगीदाखल एखादे उदाहरण घेतले तरी कळून येईल. महाराष्ट्रातील ऊसउत्पादक शेतकऱ्यांना वाहतुकीचा खर्च दिला गेला नाही म्हणून १९८०-८१ या एका वर्षात त्यांना ६६ कोटी रुपयांवर पाणी सोडावे लागले! जिच्या अपुरेपणाला आज कृषिमंत्री जाहीर मान्यता देत आहेत त्या पद्धतीनेच कृषिमूल्य आयोगाने निश्चित केलेल्या किमती ऊस, गहू, कपाशी इत्यादी पिकविणाऱ्या शेतकऱ्यांची भवितव्ये आजवर ठरवित होत्या. इतर औद्योगिक उत्पादनांच्या बाबतीत मात्र त्यांच्या किमती उत्पादक ठरवू शकतात पण शेतकऱ्यांना मात्र वास्तविक उत्पादन खर्चाच्या बऱ्याच खाली असणाऱ्या किमतीस त्यांची उत्पादने विकावी लागतात. तरीपण पूर्णपणे बिनभरवशाच्या पावसावर अवलंबून असण्यातील धोका वा जोखमीचाही या किमतीत कोठेच अंतर्भाव केला जात नाही.

ज्या शेतकऱ्यांकडे पाणीपुरवठ्याची हुकमी व्यवस्था आहे व जे विक्रीस योग्य आणि अधिक उत्पादन घेऊ शकतात अशांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष द्रव्य साहाय्य देण्याकडे, विशेषत: १९६० पासून शासनाचा कल आहे. १९८१-८२ च्या भुईमुगाच्या किमतींचा अभ्यास केल्यास हे धोरण कसे राबविले जाते याची कल्पना येईल. महाराष्ट्र सरकारने भुईमुगाच्या उन्हाळी पिकाच्या उत्पादनासाठी बऱ्याच प्रकारचे अर्थसहाय्य दिले. अर्थात हे फक्त काही मूठभर शेतकऱ्यांच्या बाबतीतच शक्य होते. या उपक्रमाची अंमलबजावणी अत्यंत अकार्यक्षमतेने केली गेली तरी आणि उत्पादकांचा प्रतिसाद हा उत्पादनातील तूट भरून काढू शकेल इतका नसला तरीही समाधानकारक होता. खाद्यतेलांच्या किमती मात्र चढ्याच राहिल्या व शेवटी प्रतिकिलोस १६ रुपये इतक्या झाल्या.

१० जून १९८१ रोजी शेतकरी संघटनेच्या प्रतिनिधींनी तत्कालीन मुख्यमंत्री श्री. अंतुले यांच्यासमोर 'शासनाने भुईमुगास प्रतिक्विंटल ४०० रुपये आधारभूत भाव द्यावा' असा प्रस्ताव मांडला. ही किंमत उत्पादनखर्चापेक्षा किंवा त्यावेळी अस्तित्वात असलेल्या बाजारभावापेक्षा पुष्कळच कमी होती. शेतकरी संघटनेने असेही आश्वासन दिले की हा भाव जर पेरणीपूर्वी घोषित केला तर राज्यातील शेतकरी भुईमुगाचा डोंगर उभा करतील आणि भुईमुगाच्या बाबतीत राज्य संपूर्णपणे स्वावलंबी होईल.

४०० रुपये प्रतिक्विंटल हा भाव जर भुईमुगाला दिला तर खाद्यतेलाचा उत्पादनखर्च काय होईल हा एकच प्रश्न मुख्यमंत्र्यांनी विचारला. संघटनेच्या हिशेबाप्रमाणे हा खर्च जास्तीत जास्त प्रतिकिलोस रुपये १०.५० इतका होता. ही

बोलणी चालू असताना शेतीमंत्री श्री. भगवन्तराव गायकवाड हेही हजर होते. त्यांनी हस्तक्षेप करून खाद्यतेलाचा उत्पादनखर्च जास्तीत जास्त प्रतिकिलोस १० रुपये होईल असे प्रतिपादन केले. शेतकरी संघटनेने भक्कम पाठपुठरावा केला, मुख्यमंत्र्यांनीही पुष्कळच उत्साह दाखविला पण यातून फारसे काहीच निषपन्न झाले नाही. जूनच्या अखेरीस शासनाने खाद्यतेलांचे भाव १५ रुपये प्रतिकिलो यापुढे जाऊ नयेत करार केला. व्यापाऱ्यांनी त्याला कबुली दिली आणि प्रत्यक्षात मात्र खाद्यतेलांचे भाव प्रतिकिलोस १८ रुपये असे सरळ सरळ वाढवले!

हे भाव २१ रूपयांच्या घरात जातील अशी सध्या अवस्था आहे. खाद्यतेल आयात करून वाढत्या किमतीचा प्रश्न सोडवता येईल अशी अपेक्षा करणे व्यर्थ आहे. कारण पुढील वर्षी रास्त किमतीच्या अभावामुळे भुईमुगाची तूट आणखी वाढेल आणि त्यामुळे तेलाच्या किमती वाढण्यास मदतच होईल. यावरून असे स्पष्ट दिसते की, शासकीय धोरण शेतकरी व ग्राहक या दोघांच्याही बाबतीत घातक आहे. जर पंतप्रधानांना खरोखरच शेतीमालाचे उत्पादन वाढवायचे असेल तर त्यांनी उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादन करणे परवडेल अशी किमतीविषयक ध्येयधोरणे मूलतः बदलायला हवीत. त्यासाठी कृषिमूल्य आयोगाची घटना व कार्यपद्धती यांचे संपूर्ण विश्लेषण करून सफाई करणे ही पहिली पायरी ठरेल.

१९६५ साली कृषिमूल्य आयोगाची निर्मिती झाली. या नवीन बाळाच्या जन्माबद्दल नाखुश असलेल्यांनी त्याच्या कार्यक्षेत्राची व्याख्याच अशी केली की त्याला परिणामकारकरीत्या काम करताच येऊ नये.

या आयोगाच्या घटनेकडे काळजीपूर्वक पाहिल्यास तिच्याकडून अपेक्षित कार्याच्या पूर्ततेची अपेक्षा करणे धाष्टर्याचेच होईल. शेतीमालाच्या उत्पादन खर्चाबरोबरच इतरही अनेक घटक लक्षात घेण्याची जबाबदारी आयोगावर टाकण्यात आली आहे. पर्यायी पिकांच्या फायद्यात समतोल राखणे, ग्राहकांच्या हितसंबंधाची जपणूक करणे, चलनवाढीला आळा घालणे. इ. इ. खरे म्हणजे ही कामे नियोजन आयोग, अर्थमंत्रालय, रिझर्व्ह बॅंक ऑफ इंडिया व तत्सम संस्था यांच्या कार्यक्षेत्रातील नाहीच त्यामुळे हे सर्व कृषिमूल्य आयोगाच्या गळ्यात मारण्याने काहीच निष्पन्न होणार नाही.

शेतीमालाच्या भावातील लक्ष्यार्थाचे विश्लेषण करता येईल अशा बऱ्याचशा सार्वजनिक संस्था असल्या तरी या प्रश्नाची शेतीविषयक दृष्टिकोनातून सर्वांगीण छाननी करण्यासाठीच केवळ वाहून घेतलेली अशी एकही संस्था नाही. कृषिमूल्य-आयोगाची अधिकारकक्षा पुढे सांगितल्याप्रमाणे सुधारणे आवश्यक आहे.



शेतीमालाच्या किमती ठरविण्याविषयी सल्ला देणे की ज्या योगे त्याला किमान भावात बाजारपेठेची शाश्वती मिळेल. असा तोडगा सुचविताना आयोगाने खालील बाबींकडे लक्ष पुरविणे आवश्यक आहे.

१) वेगवेगळ्या प्रान्तांतील सर्व समावेशक किमतीचा, तसेच शेतीसाठी लागणारा माल व अन्य उपभोग्य वस्तूंच्या किमतींचा निर्देशांक लक्षात घेऊन शेती परवडेल अशी करणे.

२) आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यास व उत्पादनात वाढ करण्यास प्रोत्साहन देणे.

३) जमिनीचा तसेच उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या इतर साधनसामग्रीचा योग्य तऱ्हेने वापर केला जावा यासाठी दक्षता घेणे.

४) शक्य तितक्या लवकर शेतीक्षेत्रातील लोकांचे राहाणीमान बाकीच्या क्षेत्रातील लोकांइतके उंचावणे.

नव्या कृषिमूल्य आयोगाने केलेल्या शिफारसींवरील अंतिम निर्णय अर्थातच इतर संलग्न मंत्रालयांशी सल्लामसलत करून अखेरीस शेती मंत्रालयाचाच असणार. केन्द्रीय शेतीमंत्र्यांनी नुकतेच दृष्टोत्पत्तीस आणल्याप्रमाणे खर्चाच्या तपशिलांची कृषिमूल्य आयोग मानीत असलेली यादी ही अजूनही अपूर्णच आहे. तिचे सिंहावलोकन करणे व ती नेहमी अद्ययावत ठेवणे अत्यंत जरूरीचे आहे.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे खर्चाच्या तपशिलाची सरासरी काढण्याची नेहमीची पद्धत आता टाकून द्यावयास हवी. सध्याच्या पद्धतीनुसार एखाद्या विशिष्ट बाबीखाली काही निवडक गोष्टींच्या खर्चाची बेरीज केली जाते व तिला त्या संपूर्ण क्षेत्राने भागून त्या विशिष्ट बाबीखालचा सरासरी खर्च काढला जातो. देशातील शेतीची प्रगती खुंटून राहण्यामागचे हे प्रमुख कारण आहे.

७००० हेक्टरमध्ये पिकविल्या जाणाऱ्या ज्वारीचे आपण उदाहरण घेऊ. केलेल्या पाहणीवरून असे दिसते की ७००० पैकी फक्त ५०० हेक्टर्समध्येच कीटकनाशकांचा उपयोग करण्यात आला व त्यांची किंमत रुपये ७५,५३० इतकी होती. म्हणजे कीटकनाशकांचा दर हेक्टरी सरासरी खर्च ७५,५३० : ५००= १५१.०६ रु. इतका येतो. कृषिमूल्य आयोगाच्या हिशेबानुसार मात्र हाच खर्च ७५, ५३० : ७०००= १०.७९ रु. इतका येईल! बाकीच्या ६५०० हेक्टरमध्ये कीटकनाशके न वापरण्याचे मुख्य कारण म्हणजे ती शेतकऱ्याला परवडत नाहीत हेच होय.

कृषिमूल्य आयोगाच्या हिशेबात या बाबीचा वाजवी खर्च न धरला गेल्याने

पुढील वर्षात देखील कीटकनाशकांचा खर्च ही न परवडणारी चैनीची बाब ठरेल, उत्पादनात घट होईल आणि त्यापुढील वर्षात तर हा आयोग इतका कमी खर्च हिशेबात धरील की त्या खर्चात कीटकनाशके सोडाच, पण पाण्याचा साधा फवारा मारणेही शेतकऱ्याला अशक्य होईल.

आताही कृषिमूल्य आयोगाच्या कार्यकक्षेतील 'उत्पादकाला आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यास व उत्पादन वाढविण्यास उद्युक्त करणे' हे नियामक सूत्र आयोगाला उपरिनिर्दिष्ट तऱ्हेच्या कल्पनाहीन कारकुनी पद्धतीचा वापर टाळण्याची सवलतही देऊ शकले असते. पण दुर्दैवाने तसे होत नाही, तेव्हा जाणीवपूर्वक शेतकऱ्यांना लुबाडून इतर उद्योगधंद्यासाठी भांडवल संचय होईल.

वेगवेगळ्या ठिकाणच्या उत्पादनांचा विचार करून प्रत्यक्ष उत्पादनाच्या परिणामांचे संयोजन (Synthetic) नमुने तयार करणे ही योग्य पद्धत होय. प्रत्येक कलमाखालील खर्चाचे आकडे त्या त्या ठिकाणच्या उत्पादनाच्या परिस्थितीशी संलग्न असावेत व त्यात अंतर्गत सुसंवाद असावा. कायद्याप्रमाणे द्याव्या लागणाऱ्या कमीत कमी रोजगाराच्या दराप्रमाणे नव्हे तर नियोजकांना सर्वसामान्यपणे इष्ट वाटेल अशा रोजगाराच्या दराचा या आदर्श नमुनाखर्चात विचार केला जावा.

अलीकडील अधिवेशानात शेतकरी संघटनेने या संदर्भातील एक धाडसी झेप सुचविलेली आहे. कृषिमूल्य आयोगाने शेतावरील, तसेच रोजावर घेतलेल्या मजुरांची मजुरी प्रतिमाणशी दर दिवसाला १२ रुपये धरावी अशी मागणी शेतकरी संघटनेने केली आहे. आयोगाने काढलेली अंतिम किंमत अशी असावी की विचाराधीन असलेल्या वस्तूंचे उत्पादन प्रत्यक्षात या खर्चाच्या मर्यादांमध्ये करणे शक्य व्हावे.

ही अखेरची अट फार महत्त्वाची आहे. कृषिमूल्य आयोगाच्या शिफारशी नेहमीच प्रत्यक्ष शेतावरील वस्तुस्थितीशी ताडून पाहिल्या जाव्यात. आयोगाकडून त्यात काही चूकभूल झाली असल्यास ती अल्प कालावधीतच हेरली जावी. नाही तर खर्चाचे महत्त्वाचे घटक हिशेबात धरण्याचे नजरचुकीने राहून गेले आहेत याची आणखी कोण्या एका राव वीरेन्द्रसिंगाने कबुली देईपर्यंत आपल्याला १५ वर्षे वाट पाहावी लागेल!

खरी गोष्ट अशी की आपल्या देशातील योजनाविषयक धोरणे बऱ्याच काळापासून 'स्टॅलिनी' प्राथमिक समाजसत्तावादाच्या संचयाच्या कल्पनेवर बेतलेली आहेत. सरकारने कितीही गाडण्याचा प्रयत्न केला तरी या अन्यायामागील सत्याला



वाचा फुटून ते अखेरीस विजयी झाल्याशिवाय राहणार नाही. काहीही झाले तरी 'शेतकरी सत्य' एक ना एक दिवस सर्वांना मान्य करावेच लागणार. प्रधानमंत्री इंदिराजींनी त्यांचा कार्यक्रम वीस कलमी न ठेवता २१ कलमी करावा आणि शेतीमालाला 'किफायतशीर किंमत' हे त्यातील पहिले कलम करावे असा उपयुक्त सल्ला त्यांना कुणीतरी द्यायला हवा. या नव्या एकाच कलमामुळे बाकीच्या कलमांनाही काहीसा अर्थ प्राप्त होईल. मात्र 'शेतीमालाला उत्पादन खर्चाची भरपाई करणारा किफायतशीर भाव' हे कलम नसेल तर पंतप्रधानांची प्रस्तुत वीसही कलमे पार निर्जीव आणि कदाचित निरर्थकही ठरतील!

हे जे झाले आहे ते शेतकऱ्याच्या भाषेत समर्पकरीत्या सांगायचे तर 'सत्तावीस उणे नऊ बरोबर शून्य' असे झाले आहे. पावसाची नऊ नक्षत्रे वजा केली तर सत्तावीस नक्षत्रांतून शेवटी शून्यच पदरी पडते!

*ब्लिट्झ- ६ फेब्रुवारी १९८२*

□□

# सर्व (शेतीविषयक) कर्जे अनैतिकच

कोणत्याही व्यवसायाला कर्ज पुरवठा होतो तो भांडवलाच्या तात्पुरत्या अभावाची अडचण दूर करण्याकरता. भांडवली खर्चाकरिता लागणारे दीर्घ मुदतीचे कर्ज असो, उत्पादकता वाढविण्याकरिता आवश्यक असलेले मध्यम मुदतीचे कर्ज असो, की खेळत्या भांडवलाकरता लागणारे अल्प मुदतीचे कर्ज असो. ही सर्व कर्जे देताना मूलभूत कल्पना अशी पाहिजे की व्यवसायात होणाऱ्या फायद्यातून कर्जाची परतफेड करून कर्जदार काही ठराविक काळात मोकळा होऊ शकेल.

शेतीला होणाऱ्या कर्जपुरवठ्याचा विचार करताना सर्वप्रथम विचार व्हावयास पाहिजे तो शेतीच्या कर्जपात्रतेचा. स्वातंत्र्य मिळाल्यापासून दोन डझनावर अहवाल आणि अक्षरशः शेकडो अभ्यास व प्रबंध शेतीच्या कर्जपुरवठा-व्यवस्थेसंबंधी झाले. गमतीची गोष्ट अशी, की एकाही विद्वानाने शेतीच्या कर्जपात्रतेचा उल्लेखसुद्धा केलेला नाही. ग्रामीण भागात कर्जपुरवठा करणे म्हणजे नळाने पाणीपुरवठा करण्यासारखे आहे असे गृहीत धरून सर्व तज्ज्ञांनी नळांनी वेगवेगळी जाळी व कोंडाळी सुचविली आहे.

असल्या शिफारशींच्या आधारावर ग्रामीण कर्जपुरवठ्यासाठी सहकारी व सरकारी क्षेत्रांत साम्राज्ये उभारण्यात आली. अनेक भद्र लोकांनी आपापली उखळे पांढरी करून घेतली. आपल्या राजकीय ताकदीचा उपयोग करून कर्ज फेडणे ते सहज टाळू लागले. निव्वळ शेतीवर अवलंबून असलेल्यांना कर्जाची परतफेड करता येणे केवळ अशक्यच होते. अशा परिस्थितीत शेतकरी कर्जबुडवा आहे, त्याच्याकडून बळजबरीनेच वसुली होऊ शकेल, वसुलीसाठी कठोर पयाय योजिले पाहिजेत अशा तऱ्हेची विचारधारा एका बाजूला अधिकारी तज्ज्ञ मांडू लागले तर राजकारणी स्टंटबाज 'कर्जमाफी' सारख्या स्वस्त लोकप्रियतेच्या योजना मांडू लागले.

शेतकरी संघटनेने मांडलेल्या विचाराने विकासाच्या अर्थशास्त्रात प्रचंड



उलथापालथ घडून आली. सर्व दारिद्र्याचे मूळ शेतीत आहे. शेती तोट्यात आहे. कारण ती तोट्यात राहावी असे सरकारी धोरण आहे. औद्योगिक विकासासाठी लागणारा भांडवलसंचय निर्माण करण्यासाठी शेतीचे हेतुपुरस्सर शोषण करण्यात येते.

वेगवेगळ्या शासकीय अहवालांच्या आणि तज्ज्ञांच्या हवाल्याने शेतकरी संघटनेने आपला हा विचार सिद्ध करून दिला. तुटवड्याच्या काळात लेव्ही, मुबलकतेच्या काळात मात्र शेतीमालाचा खुला लिलाव, चढ्या भावाने परदेशातून शेतीमालाची आयात करून त्यांच्या देशांतर्गत किमती पाडणे, निर्यातीवर अवाजवी बंधने, रुपयांचे मूल्य आंतरराष्ट्रीय नाणेबाजारात अतिशयोक्त ठरविणे, शेतीविरोधी उघडउघड पक्षपाती धोरणे ठरविणे अशा अनेक मार्गांनी शासन हे शोषण राबवते याचे दाखले दिले.

या शोषणाच्या धोरणाने देशाचा विकास खुंटला आहे. देशातील दारिद्र्या हटविण्यासाठी वास्तविक काहीच करण्याची गरज नाही; गरिबी टिकावी आणि वाढावी म्हणून जे प्रयत्न चालू आहेत ते बंद केले तरी गरिबी हटणार आहे. हा विचार लक्षावधी शेतकऱ्यांना पटला आणि ते रस्त्यात उतरले व त्यांनी देशभर नव्या विचाराने एक वादळ उठवून दिले.

या विचारांच्या प्रकाशात शेतीसाठी कर्जपुरवठ्याची जी यंत्रणा आहे ती तपासून घेणे उपयोगी ठरावे.

१) शेती तोट्यात आहे याची स्पष्ट जाणीव श्रीयुत व्ही. टी. कृष्णम्माचारींपासून सी. सुब्रमणियमपर्यंत सर्वांनी दाखविली आहे. २८ डिसेंबर १९८१ रोजी सध्याचे अन्नमंत्री राव वीरेंद्रसिंग यांनी कबूल केले आहे की कृषिमूल्य आयोग कारभाराचा खर्च, औत-औजारांच्या दुरुस्तीचा खर्च, वाहतुकीचा खर्च, तसेच पीकबुडीचा धोका उत्पादन खर्चाचा हिशेब करताना धरत नाहीत.

म्हणजे शेतीतील एवढे महत्त्वाचे खर्चाचे घटक हिशेबात धरले जात नाहीत व पर्यायाने त्यामुळे शेतकरी तोट्यात राहतो हे त्यांनी कबूल केले. कर्ज पुरवठ्यासंबंधी विचार करताना शेती हे फक्त तोट्याचे साधन आहे याचा विचार, मग, का बरे केला गेला नाही किंवा जात नाही?

२) कृषिमूल्य आयोगाचे उत्पादनखर्चाचे हिशेब बरोबर आहेत असे धरले तरी आयोगाने गृहीत धरलेला १२ [१] फायद्याचा दर आजच्या कोणत्याही व्याजाच्या दरापेक्षा कमी असल्यामुळे शेतकऱ्यास कर्ज काढणे व फेडणे या गोष्टी परवडण्याची शक्यताच नाही.

३) शेतकरी कर्जपात्र नाही हे जाणूनबुजूनही आणखी कर्जाचा पुरवठा, निदान काही शेतकरी गटांना केला जातो त्याचे इंगित काय? शेतीचे सतत शोषणच करीत राहिले तर शेतीव्यवसाय खलास होईल व देशाला लागणाऱ्या कच्च्या मालाचा पुरवठाही अपुरा पडेल यासाठी शेती तोट्यात ठेवूनही उत्पादन वाढत राहील अशी व्यवस्था करणे हे शासकीय धोरण आहे. त्यासाठी पाण्याची व्यवस्था असणाऱ्या काही शेतकऱ्यांना अनुदाने व इतर मार्गांने उत्तेजन देऊन उत्पादन वाढविणे ही क्लृप्ती सरकारने अवलंबिली आहे. खाजगी बँकांनी केवळ शेतीच्या आधारावर या 'इंडिया'च्या रावसाहेब रावबहादूरांना कर्जे कधीच मंजूर केली नसती. राष्ट्रीयीकृत बँकांनी वा इतर संस्थांनी दिलेली कर्जे परत येण्याची शक्यता नाही हे धोरण ठरविणाऱ्यांना तरी निश्चितच माहीत आहे.

४) रावसाहेब रावबहादूरांना खुश ठेवले तरी खालील शोषित शेतकरी शोषणाविरुद्ध खडा होण्याचा धोका राहतोच. तो टाळण्यासाठी दुर्बल घटक, आदिवासी, अपंग यांना करणे हे शासकीय धोरण आहे.

५) व्यवसाय म्हणून जर शेती किफायतशीर असती तर शेतीकर्जपुरवठ्यासंबंधी इतके अभ्यास आणि अहवाल करण्याची व कृत्रिमरीत्या यंत्रणा उभी करण्याची गरजच पडली नसती. त्या फायद्याचा वाटा मिळविण्यासाठी मग वेगवेगळ्या प्रकारच्या संस्था आपोआपच अहमहमिकेने कर्ज देण्यासाठी पुढे झाल्या असत्या.

६) शेतकऱ्याची गरिबी व कर्ज वाटपातील बाजारीपणा हे पुढाऱ्यांचे सर्वात मोठे भांडवल आहे. ज्या दिवशी शेतकऱ्याच्या उरावरील कर्जाचा बोजा उतरेल त्या दिवशी ग्रामीण राजकारणाचा रंगच बदलेल. गेल्या वर्षी उसाला रुपये २००/- प्रतिटन उचल मिळाल्यावर राजकारणावर काम परिणाम झाला हे सर्वांनी पाहिले आहे. १९८१-८२ साली शेतीमालाचे भाव पाडण्यासाठी शासनाने जी आघाडी उघडली ती केवळ शेतकरी कर्जमुक्त होईल या भीतीनेच. कर्ज पुरवठ्याच्या मिषाने काढलेल्या वेगवेगळ्या संस्थांवर पुढाऱ्यांची वर्णी लावता येते. त्यामुळे राजकीय पकड घट्ट होऊन पुढाऱ्यांचीही चंगळ होते.

७) कर्ज फेडू न शकणाऱ्या शेतकऱ्यांच्या घरासमोर डबडी, बेंडबाज वाजविणे, त्यांच्या घरची भांडी मडकी जप्त करून नेणे, जमिनीचा लिलाव करणे, शेतीमालाच्या विक्रीच्या रकमेतून ४० टक्के रक्कम- कर्ज असो वा नसो-कापूस घेणे असले प्रकार 'इंडिया'तील नागरिक कदापि सहन करणार नाहीत. 'भारता'तील शेतकऱ्यास ते प्रत्यही सहन करावे लागतात.

८) शेतीसाठी घेतलेली कर्जे लग्नासारख्या कामासाठी वापरली जातात असा



आरोप शेतकऱ्यांवर केला जातो. लग्नासारख्या सामाजिकदृष्ट्या आवश्यक खर्चाची गणना घरातील माणसांच्या श्रममूल्याचा विचार करताना केली जात नसल्याने अशा कर्जाचा गैर उपयोग होणे अपरिहार्य आहे. शासनाच्या दुष्ट धोरणाचाच तो परिणाम आहे.

९) १९८०-८१ साली महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी दाखवून दिले आहे की रास्त किमती मिळाल्यास ते प्रथम कर्जफेडीकडे लक्ष देतात. गेल्या वर्षी स्वातंत्र्यानंतर प्रथमच उसाची पीककर्जे फेडली गेली. ज्या एका बँकेच्या शाखेत अडीच लाख रुपयांची कर्जवसुली मोठ्या जिकिरीने होत असे तेथे शेतकऱ्यांनी स्वखुशीने साडेतीस लाख रुपयांचा भरणा केला. यावरून शेतकरी कर्जबुडवे आहेत, असा त्यांच्यावर केला जाणारा आरोप 'इंडिया'ची त्यांच्याविषयीची दुष्टबुद्धीच सिद्ध करतो.

१०) कर्जदात्याने जर कर्जदाराच्या व्यवसायात तोटाच व्हावा व त्याला कर्ज फेडताच येऊ नये अशी हेतुपुरस्सर योजना केली असेल तर दोघांमधील कर्जाचा करार भारतीय कायद्याप्रमाणे अनैतिक करार म्हणून रद्दबातल ठरवता येतो. शासनाचे शेतीच्या शोषणाचे धोरण आता उघडे पडले असल्याने सर्व शेतीव्यावसायिकांस शासकीय (पर्यायाने सहकारी) संस्थांनी दिलेली कर्जे अनैतिक आहेत असा दावा करून एकतर्फी कर्जमुक्ती जाहीर करता येईल आणि अशी घोषण कायद्याने, तसेच नीतितत्त्वाने संपूर्णतः समर्थनीय ठरेल.

*किर्लोस्कर-(विशेष शेती पुरवणी) जुलै १९८२*

□□

आठ

# कार्यक्रम एकच कलमी का?

शेतकरी संघटनेचा एककलमी कार्यक्रम आहे. 'शेतीमालाला उत्पादनखर्चावर आधारित रास्त भाव.'

या एकाच कार्यक्रमाने शेतकऱ्यांचे सर्व प्रश्न सुटतील असा संघटनेचा आग्रह आहे. म्हणजे शेतमालकांचे, मोठ्या शेतकऱ्यांचे, मध्यम शेतकऱ्यांचे, छोट्या शेतकऱ्यांचे, अगदी भूमिहीन शेत मजुरांचेसुद्धा प्रश्न सोडवण्याची 'शेतीमालास रास्त भाव' ही गुरुकिल्ली आहे असे संघटनेचे कार्यकर्ते वारंवार ठासून सांगतात.

एवढेच नव्हे, तर शेतीमालाला भाव मिळाल्यास देशातील इतर व्यावसायिकांचेही भले होईल. त्यांत ग्राहकांचेही हित आहे. अगदी छोट्या-मोठ्या व्यापाऱ्यांचेच नव्हे, तर देशांतील गरिबी हटवण्याचा आणि आर्थिक विकासाचा हा एककलमी कार्यक्रम आहे अशी शेतकरी संघटनेची भूमिका आहे.

याउलट इतर संघटनांनी, राजकीय पक्षांनी गरिबी हटवण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या भल्यासाठी केवढ्या व्यापक योजना आखल्या आहेत. इंदिरा पक्षाची जुनी वीस कलमी योजना, सुधारित वीसकलमी योजना, पुलोदचा चाळीसकलमी कार्यक्रम, संजय गांधींचा पाचकलमी कार्यक्रम. त्याशिवाय पंचवार्षिक योजना, प्रत्येक खात्याचे विकासाचे कार्यक्रम इ.

टपालखाते गावोगाव टपाल कचेऱ्या उघडू पाहते, एस. टी. प्रत्येक वस्तीवर जाऊ पाहते. जमीन सडक बांधण्याचे कार्यक्रम झाले. गावोगाव शाळा झाल्या. तालुक्यात जागोजागी दवाखाने आले, पाटबंधाऱ्यांच्या योजना झाल्या. लक्षावधी एकर पाण्याखाली आली. जमिनींच्या बांधबंदिस्तीचा कार्यक्रम झाला.

जमिनीवर मर्यादा आली, जमिनीचे वाटप झाले, फेरवाटप झाले. कुळकायदा झाला, किमान वेतन लागू झाले, रोजगार हमी योजना आली.

सुधारित बी-बियाणी आली, वरखते आली, औषधे आली, पंचायती आल्या, तालुक्यावर पंचायत समित्या आल्या, जिल्हा परिषदा आल्या, कृषी उत्पन्न बाजार समित्या आल्या, गावोगाव विक्री संघ आले, एकाधिकार खरेदीसुद्धा काही बाबतीत



आली, विविध कार्यकारी सोसायट्या आल्या, भू-विकास बँका झाल्या, सहकारी बँका इकडे तिकडे दिसू लागल्या, सहकारी सूतगिरण्या, सहकारी साखर कारखाने भकाभक धूर ओकू लागले.

शेती कशी करावी हे शेतकऱ्यांना समजावे म्हणून शेतकीतज्ज्ञ नेमले गेले. विद्यापीठांतून, संस्थांतून शेतीसंबंधी संशोधन झाले.

अनेक गावी वीज आली, ग्रामीण भागांत कारखाने आले नसले तरी शहरांत कारखाने निघाले. त्यामुळे वरखते, औषधे, जंतुनाशके, बुरशीनाशके, तणनाशके मिळू लागली. घमेली, खोरी, फावडी, फाळ, नांगर, ट्रॅक्टर, इंजिने, मोटारी, पाईपलाईन उदंड झाली. रेडिओ घरोघर येऊ लागले.

वनीकरणाचा कार्यक्रम धडक्याने अनेक वर्षे चालू आहे. दूध मुबलक करण्यासाठी संकरित गायींचा कार्यक्रम आहे. कोंबड्या पाळण्याचा कार्यक्रम आहे. मधमाशा पाळण्याचा आहे, डुकरेसुद्धा पाळण्याचा आहे.

शाळा आल्या, शाळेत्त जायच्या आधीच्या वयाच्या मुलांसाठी बालवाड्या आल्या. अगदी न जन्मलेल्या मुलांच्या कल्याणासाठी अंगणवाड्या आल्या. कुटुंब नियोजन झाले, कुटुंबकल्याण झाले.

कर्जे वाटली, अनुदाने दिली. कर्जमाफी दिली. विहिरी खणून देण्याची घोषणा झाली.

एवढेही करून पूर आला तर पूरनिवारण योजना आहे. दुष्काळ पडला तर शेतकऱ्यांना पोटाला देण्यासाठी दुष्काळाची कामे आहेत- तगाई आहे.

प्रत्यक्षात सरकारी कार्यक्रमांची यादी याहीपेक्षा खूपच लांब आहे

शासनाखेरीज गरीब शेतकऱ्याच्या कल्याणासाठी निघालेल्या अनेक व्यक्ती आहेत. संस्था आहेत. प्रतिष्ठाने आहेत. गाव, तालुके, जिल्हे दत्तक घेतले जातात. देशातून, परदेशांतून गोळा करुन पैसा आणला जातो. शेती सुधारण्याचे कार्यक्रम होतात. गावाची सर्वांगीण सुधारणा-सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, नैतिक, करण्याचे कार्यक्रम होतात.

गरिबी हटवण्यासाठी केवढा प्रचंड उद्योग, किती विविध कार्यक्रम, केवढी प्रचंड साधने कामात येत आहेत. न्यूयार्कपासून ते गाववस्तीपर्यंत 'गरिबी हटाव' हा सगळ्यांत मोठा उद्योगधंदा झाला आहे.

एवढ्या विविध कार्यक्रमांनी, साधनांनी पस्तीस वर्षे अखंड प्रयत्न चालले आहेत; पण काही यश दिसत नाही. देशातील १५ टक्के लोकांची परिस्थिती सुधारत आहे. त्यांतीलही ५ टक्केच श्रीमंत म्हणता येतील असे. बाकीचे ८५ टक्के लोक

गरिबीच्या गाळात रुतत चालले आहेत.

एवढ्या सर्वंकष कार्यक्रमांनी जे जमले नाही ते 'शेतीमालाला भाव' एवढ्या साध्यासुध्या कार्यक्रमाने कसे काय जमेल? हा काय जादूचा मंत्र आहे, की त्यामुळे सर्व गरिबीचा रोग आपोआप दूर व्हावा? असा प्रश्न शेतकऱ्यांच्या मनात येतो. संघटनेच्या कार्यकर्त्यांनाही हा प्रश्न त्रास देत असतो.

उसाला, कांद्याला भाव मिळाला तेव्हा त्याचे परिणाम प्रत्यक्षात दिसले. कर्जे फिटू लागली, उत्पादन वाढू लागले, मजुरीचे दर वाढले. त्यामुळे कार्यकर्त्यांना संघटनेच्या एककलमी कार्यक्रमाबद्दल खात्री वाटली. त्यानंतर शासनाने शेतीमालाचे भाव पाडण्याचा कार्यक्रम हाती घेतला. उसाचा भाव पडला. कांद्याची खरेदी बंद झाली. कपाशीची खरेदी कमी केली. ज्वारी, भाताचे भाव गोठवून ठेवले.

त्याबरोबर वेगवेगळ्या सरकारी योजना राबवत पुढारी मंडळी गावोगाव फिरू लागली. इतरांना योजनांच्या फायद्याकरिता लाचार होऊन पुढाऱ्यांमागे जावे लागले. दुष्काळ पडला, प्यायच्या पाण्यासाठी दुष्काळी कामासाठी शासनाकडे जावे लागले. गारपीट झाली, मदतीसाठी शासनाकडे तोंड वेंगाडावे लागले. कालव्यासाठी, उपसासिंचन योजनांसाठी प्रयत्न झाले तर संघटनेने त्यापासून दूर राहणे बरोबर नाही असे वाटू लागले.

शेतकरी संघटनेने शेतीमालाचा भाव एवढा एकच एककलमी कार्यक्रम घेतला हे योग्य आहे किंवा नाही अशी शंका शेतकऱ्यांच्या, कार्यकर्त्यांच्या मनांत सहजच येते.

अनेक औषधोपचांजराच्या माऱ्यानेसुद्धा रोग बरा तर झाला नाहीच; पण वाढला. याचा अर्थ औषधाची उपाययोजना चुकत असली पाहिजे. रोगाचे निदान पुन्हा एकदा संपूर्ण तपासून घेतले पाहिजे हे उघड आहे.

शेतकरी संघटनेचा विचार आणि कार्यक्रम म्हणजे गरिबीच्या प्रश्नाचा संपूर्ण फेरविचार आहे. हा विचार आता अनेकवेळा स्पष्टपणे मांडला गेला आहे. लिहिला गेला आहे. तो पुन्हा येथे मांडण्याचे कारण नाही.गोऱ्या इंग्रजांनी त्यांच्या देशातील उद्योगधंद्योंची वाढ हिंदुस्थानांतील कच्च्या मालाचे म्हणजे शेतकऱ्याचे शोषण करून केली. स्वातंत्र्यानंतरचे राज्यकर्ते देशाच्या काही कोपऱ्यात उद्योगधंद्याची वाढ करू इच्छितात आणि त्यासाठी गोऱ्या इंग्रजांप्रमाणेच तेही शेतकऱ्याचे शोषण करतात. गोऱ्या इंग्रजांनी देश गरीब केला. काळा इंग्रज त्याला भणंग करीत आहे. गरिबी हटण्याचा किंवा कमी होण्याचा अशा परिस्थितीत काही संभवही नाही.

सरकारी धोरणामुळे शेती तोट्यात असली तर बाकीच्या विकासयोजनांना



काहीच अर्थ राहत नाही. एवढेच नव्हे, तर या विकासयोजनांनी दिशाभूल आणि फसगत करण्याचाच हेतू असतो.

गोऱ्या इंग्रजांनी देशाची लूट केली हे तरी सर्वांना मान्य आहे? पण त्याच इंग्रजांनी देशाला ठाऊक नसलेल्या अनेक सुधारणा आणल्या. देशात पेंढारीलुटारूंचे वर्चस्व होते ते मोडून काढले. काठीला सोने बांधून काशीयात्रेला जावे अशी शांतता प्रस्थापित केली, न्यायालये तयार केली. शासन केले, शिक्षणाची सोय केली, आधुनिक दवाखाने आणले, पक्क्या सडका केल्या, वीज आणली, टपालखाते आणले, तारा आणल्या, फोन, आगगाड्या, मोटारी, विमाने आणली. जमिनींची पहिल्यांदा मोजणी केली, नकाशे केले. नंबर दिले, महसुलाची व्यवस्था केली, जमीन सुधारण्याचे कार्यक्रम घेतले. पहिली धरणे, पांटबंधारे, कालवे बांधले, इंग्रजांनीही विकासाची कामे थोडी नाही केली; पण इंग्रजांच्या सुधारणांचा उद्देश देशाचे भले करणे हा नव्हता. त्यांनी विकासाचे कार्यक्रम हाती घेतले ते स्वार्थासाठी, देशातील शेतकऱ्यांचे शोषण अधिक सुलभपणे करता यावे, अधिक मोठ्या प्रमाणावर करता यावे यासाठी.

काळा इंग्रज एका बाजूला गरिबी वाढवण्याचे कारस्थान करतो; पण दुसऱ्या बाजूला विकासयोजनांचेही कार्यक्रम आंखतो हे काय गूढ रहस्य आहे हे समजून घेणे फार महत्त्वाचे आहे.

कारखानदारीकरिता लागणारे भांडवल शेतीतून काढावयाचे कारण इंडियाच्या दृष्टीने जास्तीत जास्त लाभाचे ठरावयाचे असेल तर त्यासाठी शेतीचे उत्पादन वाढावयास हवे. शेतकऱ्यांची उत्पादकता वाढायला हवी. फक्त शेतकऱ्याला वाढत्या उत्पादनातून उत्पन्न मात्र मिळता कामा नये.

उत्पादन वाढले, की त्यामुळे कारखान्यांना लागणारा कच्चा माल उदा. कापूस, ज्यूट, तेलबिया, ऊस, मसाल्याचे पदार्थ इ. भरपूर व स्वस्त मिळतात.

अन्नधान्याचे उत्पादन वाढले म्हणजे बिगरशेती कामगारांना जीवनावश्यक वस्तू स्वस्त मिळू शकतात. परिणाम असा होतो, की कामागारांचे वेतन कारखानदार अगदी कमी ठेवू शकतात.

शेतकऱ्यांची उत्पादकता वाढली म्हणजे शेतीवरील काम कमी होते. मग हजारो शेतकऱ्यांना कामाच्या शोधात शहरात जावे लागते. बेकार कामगारांची शहरांत भीडगर्दी झाली, की 'मला काम द्या,' 'मला काम द्या' असा जो तो प्रयत्न करतो. कमी वेतनावर अवजड, धोक्याची कामेसुद्धा करावयास तयार होतो. म्हणजे पुन्हा एकदा कारखानदारांचाच फायदा होतो.

**शेतीतील उत्पादन वाढल्यामुळे फायदा कारखानदारांचाच होतो, शेतकऱ्याचा नव्हे**. कारण शेतीमालाचे रास्त भाव मिळू नये याची शासनाने आधीच व्यवस्था केली आहे.

शेती तोट्यात ठेवायची; पण उत्पादन तर वाढवायचे ही कसरत कशी साधावी? बाजारपेठेत येणारा बहुतेक शेतीमाल काही पाण्याचा मुबलक पुरवठा असलेले आणि बऱ्यापैकी जमीन असलेले शेतकरीच करतात. हरितक्रांतीच्या नावाखाली, आधुनिकीकरणाच्या नावाखाली सरकार अशा शेतांवर बियाणे, औषध, खते, कर्ज, तांत्रिक सल्ला यांचा पुरवठा करते. अनुदान देऊ करते.

अनुदानाच्या योजना कागदोपत्री सगळ्यांसाठी असतात; पण छोट्या शेतकऱ्याला ही सामग्री वापरण्यासाठी फुरसत नसते. योजनांचा फायदा मिळवण्यासाठी लागणारा वशिला नसतो. अधिकाऱ्यांना खूष करण्यासाठी लाच देण्याची ताकद त्याच्यात नसते.

त्यामुळे प्रत्यक्षात या सर्व योजनांचा फायदा काही पुढारी शेतकरीच घेतात. ते अनुदानाचा, कमी व्याजातील कर्जाचा, उत्तम बियाण्यांचा उपयोग करीत असल्यामुळे स्वस्त दरात शेतीमालाला बाजारात विकणे त्यांना परवडते. सर्वसाधारण शेतकरी तोट्यात राहूनही शेतीचे एकूण उत्पादन वाढत आहे.

शासकीय योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी यंत्रणा अशी उभारली जाते, की काही पुढारी मंडळींच्या हाती सर्व सत्ता एकवटली जावी. शेती तोट्यात ठेवल्यामुळे सर्व जमीन कोरडी ठणठणीत पडलेली. त्यावर उगाचच थोडे पाण्याचे शिडकावे मारले तर ते पाणी सर्व जमिनीत सारखे पसरत नाही. जिथे पडेल तिथेच शोषले जाते. तसे योजनांचा फायदा ज्यांच्या ओंजळीतून शेतकऱ्यांच्या तोंडात पडावयाचा असतो त्या पुढाऱ्यांच्याच पोटात जातो. खासदारकी, आमदारकी, महामंडळे, जिल्हा परिषद, पंचायत समित्या, सहकारी संघ, सहकारी करखाने, बॅंका, कृषी उत्पन्न बाजार समित्या अशी पुढाऱ्यांची ही भुतावळ शासकीय खर्चावर पोसली, की तिला शेतीत तोटा होतो वा नफा याची काही पर्वा राहत नाही. राजकारण हाच त्यांचा धंदा होतो. राजकारणासाठी शेतकरी संघटनेलासुद्धा दडपून टाकायला ते तयार होतात. जुन्या इंग्रजांनी काही मूठभर रावसाहेब रावबहादुररांकरवी राज्य चालवले. काळ्या इंग्रजांचे हे पुढारी म्हणजे नवे रावसाहेब राबहादूरच आहेत. शेतकऱ्यांच्या लाचारीचा उपयोग करून आपापल्या पक्षांच्या दावणीला त्यांना बांधून ठेवणे एवढेच या हरामखोरांचे काम.

शासकीय योजनेचा फार मोठा मलिदा अधिकारीवर्ग खातो. दिल्लीपासून



गावापर्यंत योजना येईपर्यंत पगार, महागाईभत्ते, प्रवासभत्ते, जीपगाड्या, खादाडी यातच योजना खपून जाते. अनुदानाची कोणतीही योजना म्हणजे अधिकाऱ्यांना खादाडीची पर्वणी. शासकीय सेवेतही पुढारी मंडळी आपापले पित्ते घुसवून देतात. त्यामुळे पुढाऱ्यांची पकड आणखीनच मजबूत होते.

शेतीच्या हितासाठी म्हणून काढलेल्या अनेक योजना या वस्तुत: कारखानदाराच्या फायद्यासाठी तयार केलेल्या असतात. ट्रॅक्टर, डिझेल इंजिने, विजेच्या मोटारी, पंप, पाईप याच्याकरिता कर्ज देण्याच्या योजना या त्या त्या कारखानदारांचा माल खपावा यासाठी केलेल्या योजना आहेत. शेतीत उत्पन्न तर होता कामा नये; पण शेतकऱ्याने शहरांतला माल खपवायला तर मदत केली पाहिजे म्हणून त्याला कर्ज देऊन माल विकत घ्यायला मदत करायची आणि कर्जात बुडवून अधिकच लाचार करायचे अशी ही करामत आहे.

इंडिया- भारत यांचा एक विचित्र जुगाराचा खेळ चालू आहे. प्रत्येक वेळी दान टाकले, की ते इंडियाच्या बाजूनेच पडणार. कारण फाश्यावर दाने सर्व इंडियाचीच लिहिली आहेत; पण असा जुगाराचा खेळ चालणार किती वेळ? भारत कफल्लक केव्हाच होईल आणि खेळ बंद पडेल.

खेळ बंद तर पडता कामा नये; मग त्यासाठी उसने पैसे भारताला देऊन त्याला खेळ चालू ठेवू द्यायचे. जितका कर्जात बुडेल तितका खेळ चालू ठेवणे त्याला भाग पडेल. फारच झाले तर मधून मधून कर्जमाफीची घोषणा केली म्हणजे तेवढेच त्याला बरे वाटेल.

शेतीमालाला भाव नसल्यामुळे शेतकऱ्यांची दरवर्षी अंदाजे हजार कोटी रुपयांची लूट होते. या शोषणाचे प्रमाण वाढावे व शोषण अधिक सुलभपणे व्हावे म्हणून सर्व विकास योजना आखल्या. त्यांचा फायदा पुढाऱ्यांना मिळण्याची व्यवस्था केली; पण बाकीच्या कोट्यावधी शेतकऱ्यांना त्यांचा काहीच लाभ नाही. त्यांना काहीच दिले नाही तर ते चिडून उठतील म्हणून त्यांच्या तोंडावर दवापाण्याच्या, शाळा-आश्रमाच्या, प्यायच्या पाण्याच्या सोयी टाकल्या म्हणजे बिचारे चूप बसतात. शेतीवर जगता येत नाही म्हणून शहरांत झोपपट्टीत जाऊन राहिलेल्या लोकांनी चिडून दंगाफसाद करू नये म्हणून त्यांना काही संडास, मोऱ्या बांधून दिले, नळाची कोंडाळी दिली की झाले.

शासकीय विकासयोजनांचा खरा अर्थ हा असा आहे. घामाचे दाम सोडून काहीही मिळेल. शेतकरी संघटनेने म्हणूनच नेमकी भूमिका घेतली. घामाचा दाम पाहिजे. दुसरे काहीच नको. भीक नको घामाचे दाम हवे. सूट- सबसिडीचे नाही

काम, आम्ही मागतो घामाचे दाम.

शेतीपुढे अजस्र सहस्र प्रश्न आहेत. जमिनींचा, पाण्याचा, तंत्राचा, बियाण्याचा, औषधांचा, खतांचा, मजुरीचा. शेतकऱ्यांपुढे गरिबीची हजार तोंडे जिव्हा काढून उभी आहेत. अपुरे पोषण, वस्त्रांची कमतरता, आडोसा नाही. छप्पर नाही, विद्या नाही, औषधपाणी नाही, पाणी नाही. लोकसंख्या वाढते, रोग वाढतात. गरिबी वाढते. कशा कशाला तोंड द्यावे?

हे हजारो प्रश्न अंगावर फुटलेल्या हजारो फोडांसारखे आहेत. एका एका फोडाला मलमपट्टी करून मिळणारा आराम फसवा आहे. एक फोड बरा झाला तरी दुसरे दहा उठणार आहेत. कारण सर्व शरीरातील रक्तच बिघडले आहे. रक्त सुधारल्याखेरीज फोड संपूर्ण नाहीसे होणार नाहीत. शेती किफायतशीर झाल्याखेरीज कोणताच प्रश्न सुटू शकणार नाही.

याचा अर्थ इतर विषयांत संघटनेस स्वारस्य नाही असे नाही. संघटनेचे पहिले आंदोलन भामनेर खोऱ्यांतील सडकेकरिता झाले. विजेसंबंधी जागोजाग स्थानिक आंदोलने झाली आहेत. अहमदनगर जिल्ह्यांतील अकोला तालुक्यातील शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी दशरथ सावंत यांच्या नेतृत्वाखाली पाण्यासाठी नुकतेच यशस्वी आंदोलन केले. रस्ता, पाणी आणि वीज यांसाठी स्थानिक आंदोलने करावीत अशी कार्यकर्त्यांना पहिल्यापासूनच मुभा आहेच. फक्त शेतीमालाला भाव मिळाला नाही तर या बाकीच्या गोष्टींना काहीच अर्थ नाही.

वेगवेगळ्या समस्यांनी भांबावलेल्या, निरनिराळ्या विकासयोजनांनी चक्रावलेल्या शेतकऱ्यांना मार्ग सरळ स्पष्ट दिसावा यासाठी आमचा घोष एकच- शेतीमालाला रास्त भाव.

*-२१ एप्रिल १९८३*

□□



## नऊ

# दुष्काळाचा खरा अर्थ

**यं**दा महाराष्ट्राच्या अनेक भागांत अपुरा पाऊस पडला. योग्य वेळी पडला नाही. रब्बीच्या सुरुवातीला दोन झडी बऱ्या झाल्या. त्या भागात निदान शाळू (ज्वारी) बरा आला. धान्याचा तुटवडा नाही; पण अगदी पिण्याच्या पाण्याचीही पंचाईत आहे.

सरकार पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेसाठी धावपळ करीत आहे. दुष्काळी काम चालू करत आहे. इंग्रजांच्या काळात दुष्काळ पडला म्हणजे इंग्रज सरकार जे जे करत असे ते ते कदाचित् जरा गलथानपणाने, पण करते आहे.

दुष्काळी कामे चालू करून घेण्यासाठी शेतकरी पुढाऱ्यांच्या मागे धावत आहेत. पुढाऱ्यांना बरे वाटत आहे. शेतकरी अजून आपल्या ताब्यात आहे याची जाणीव झाल्याने त्यांना समाधान आहे.

दुष्काळाच्या कामावर शेतकरी, त्याची बायकापोरे काम करतील. खडी फोडण्याची हातांना सवय नाही. हातातून रक्त येत आहे. चिंधी गुंडाळून खडी फोडताहेत. त्यात सर्व आहेत. शेतमजूर आहेत, छोटे शेतकरी आहेत. अगदी वीस एकरांचे मालकसुद्धा आहेत. केवळ शेतीवर ज्यांचे पोट आहे त्यांना दुष्काळी खडी फोडण्याखेरीज गत्यंतरच नाही.

पाऊस वाईट पडला, की दुष्काळ आणि दुष्काळ पडला, की शेतकरी खडी फोडायला हे पिढ्यान्‌पिढ्या चालू आहे. पाऊस पडला नाही तर त्याची शिक्षा एकट्या शेतकऱ्याला का? पाऊस काय एकट्या शेतकऱ्याचा आहे? पाऊस सगळ्या देशाचा नाही? पाऊस कमी पडला हा काय शेतकऱ्याचा दोष आहे? त्याचे परिणाम सगळ्यांनी सोसायला नकोत?

चांगला पाऊस पडला, अन्नधान्याची लयलूट झाली, तर त्याचा फायदा काय एकट्या शेतकऱ्याला होतो? भाजीबाजारात भाजीपाला भरपूर येतो. सगळ्यांना आनंद होतो. धान्य स्वस्त होते. सगळे खूष. खरे म्हणजे चांगला पाऊस पडला तरी शेतकरी दु:खीच असतो. त्या वर्षी पोटात दोन घास जास्त जातात एवढाच

आनंद. चांगले पीक आले तर पुढच्या दुष्काळी वर्षाकरिता सोय म्हणून काही धान्याची, पैशांची साठवणूक करावी म्हणावे, तर शक्य होत नाही. कारण सगळे भाव कोसळतात. हाती काहीच राहत नाही.

चांगल्या वर्षी बाकी सगळे खूष, दुष्काळात शिक्षा फक्त शेतकऱ्याला. हा असा न्याय आहे.

दुष्काळी कामावर शेतकरी सोडून कोणीच येत नाही. कलेक्टर येत नाही, पोलिस येत नाही, बँकेचे कामगार येत नाहीत, कारखान्याचे कामगार नाहीत, फक्त शेतकरी फरफटत येतो.

देशातील निम्मे उत्पन्न शेतीतून येते. शेती बंद म्हटल्यावर इतर कामेपण कमी होत असली पाहिजेत. तेथली माणसे काही दिवस तरी दुष्काळी कामावर का येत नाहीत? पाऊस कमी पडला म्हणजे फक्त शेतीचेच नुकसान होते असे नाही.धरणात पाणी कमी पडते. कारखाने दोन दोन महिने बंद ठेवावे लागतात. त्या कारखान्याचे मालक सोडा, कामगार तरी दुष्काळी कामावर खडी फोडायला येतात? कधीच नाही.

ते म्हणतात, 'यंदा दहाच महिने कारखाना चालला. जेवढा माल तयार झाला तेवढ्यावरच बारा महिन्यांचा सगळा खर्च टाकू किंवा आधी झालेल्या फायद्यातून या दोन महिन्यांचा खर्च चालवू. आता दोन महिने कारखाना बंद राहणारच आहे, ठीक आहे. यंत्राचे तेलपाणी, दुरुस्ती राहिली होती. या काळात ती उरकून घेऊ. म्हणजे वीज सुरू झाली, की झपाट्याने उत्पादनाला लागू.'

त्यांना घरदार फुंकून दुष्काळी कामावर खडी फोडायला यावे लागत नाही.

दुष्काळ पडला तर शेतकऱ्यालासुद्धा म्हणता आले पाहिजे, 'यंदा पाऊसबाबाची मर्जी दिसत नाही. ठीक आहे. तो आपला काही नोकर नाही. तो आपल्या मर्जीनेच पडणार. यंदा पिकाचे काम कमी तर जमिनीची पडून राहिलेली कामे उरकून घेऊ. हरळी फार माजली आहे. नागरमुथा वेचून घ्यायला पाहिजे. चर सावरून घ्यायला पाहिजेत, बांधबंदिस्ती सुधारायची राहिली आहे. गेल्या वर्षीचे धान्य आहे, थोडी फार पैशाची शिल्लकही आहे. यंदा ही कामे उरकून घेऊ म्हणजे पुढच्या वर्षी चांगला पाऊस पडला तर बंदा रुपया पीक येईल अशी व्यवस्था करू.'

शेतकऱ्याला असे कां म्हणता येत नाही ? त्यालाच दुष्काळी कामावर खडी फोडावयास का जावे लागते? जेव्हा चांगला पाऊस पडतो, पीक चांगले येते, तेव्हाही त्याच्या हाती काही येत नाही म्हणूनच ना? आपल्या देशात दोनचार



वर्षांतून एकदा दुष्काळ येतोच. शेतकऱ्यांचे हाल होतात ते पाऊस न पडल्यामुळे नाही. जेव्हा पाऊस पडतो तेव्हासुद्धा त्याला काहीच मिळत नाही म्हणून, पिकते त्यालाही भाव नाही, म्हणूनच ना? दुष्काळात शेतकरी खडी फोडतो तो त्याच्या मालाला भाव नाही म्हणून. पाण्याच्या अडचणीचेही कारण शेतकऱ्याची आर्थिक अडचणच आहे. आमच्या पूर्वजांनी जी गावे वसविली ती काही वेड्यासारखी वसवली नाहीत. पाण्याची सोय, सुरक्षिततेची सोय पाहूनच वसविली. तिथले पाणी संपले तर हलण्याची आमची ताकद नाही. असेल तिथून पाणी पंपाने गावाजवळ आणण्याची ताकद नाही म्हणून पाण्याचा प्रश्न आहे. शेतकऱ्याच्या प्रत्येक हलाखीचे मूळ कारण शेतीमालाला भाव नाही हेच आहे.

काय गंमत आहे पहा. पोट भरण्यासाठी शेतकरी खडी फोडतो म्हणजे काय फोडलेली खडी पोटात भरतो काय? नाही, तो खातो ज्वारीच. ते धान्य देशात आहे, भरपूर आहे, ते पोटात घालावयास मिळावे म्हणून त्याला खडी फोडावी लागते ही काय भयानक अवस्था आहे. दुष्काळी कामावर हात फोडून घेणाऱ्या शेतकऱ्यांचे साखर कारखान्यांत पैसे ठेवीच्या रूपाने पडून आहेत. सोसायटीत, बँकेत भागाच्या रूपानें त्याचे पैसे अडकले आहेत. त्या पैशावर उचल मिळाली तरी तो खडी न फोडता पोट भरू शकेल; पण शेतमालाला भाव नाही तोपर्यंत हे शक्य होणार नाही. त्याला खडीच फोडावी लागणार आहे.

खडीबरोबर हातही फोडून घ्यावे लागणार आहेत. एवढेच नाही, हात फोडून घ्यायचे भाग्य मिळावे म्हणून दुष्काळी कामे चालू व्हावीत यासाठी पुढाऱ्यांचे पाय धरावे लागणार आहेत. मनधरणी करावी लागणार आहे. पुढारी आणि अधिकारी मात्र दुष्काळी कामावर पैसे कमवणार आहेत.

दुष्काळी कामावर काम करताना खडी फोडण्यासाठी प्रत्येक हातोडीचा घाव घालताना प्रत्येक शेतकऱ्याने स्वत:ला बजावून सांगावे, 'मी खडी फोडतो आहे. कारण माझ्या घामाला दाम नाही. शेतीमालाला भाव नाही, भाव नाही, भाव नाही.'

*२१ जून १९८३*

□□

दहा

# इंदिरादेवीचा दुष्काळ

**आ**ज ११ जून १९८३. आम्बेठाण गावच्या माझ्या कोरडवाहू शेतात सावलीला बसून चौफेर पसरलेल्या शुष्क करड्या काळ्या जमिनीच्या पसाऱ्याकडे पाहत आहे. आकाशात नावालासुद्धा ढग नाही. खाली थेंबभर पाणी नाही.

विहिरी खरवडून खरवडून तळाला पोचल्या आहेत. आम्बेठाणचे निदान पिण्याच्या पाण्याचे हाल नाहीत. आजूबाजूच्या गावांना टँकर आला तरच प्यायला पाणी मिळते. जवळच्या चाकण गावी पाण्याच्या पिंपाची किंमत पाच रुपये झाली आहे.

शेतजमिनी नांगरुन, पाळ्या घालून केव्हाच्या तयार आहेत. कधी एकदा पाऊस येतो आणि कधी पेरण्यांना सुरुवात करता येते अशा उत्सुकतेने सर्व शेतकरी आकाशाकडे डोळे लावून बसलेले आहेत. घरात खायचं धान्य संपत आलं आहे. पुढे भीषण भवितव्य दिसत आहे. या पाऊसबाबाला झाले तरी काय?

खरे म्हणजे एव्हाना सर्व महाराष्ट्रभर एक तरी जोरदार पाऊस होऊन जायला पाहिजे होता; पण अजून तर तो देशाच्या अगदी दक्षिण टोकाला म्हणजे केरळ राज्यातसुद्धा पडलेला नाही.

आजच्या सकाळच्या वर्तमानपत्रात म्हटले आहे--

मॉन्सून पुढे सरकण्यास अनकूल परिस्थिती नसल्यामुळे केरळमध्ये मॉन्सूनच्या प्रवेशाची अगोदर निर्माण झालेली आशा पुन्हा कमी झाली आहे. उत्तर कामोरीत आणि मालदीव बेटांपाशी म्हणजे पार हिंदी महासागरात मॉन्सून थबकला आहे.

म्हणजे अजून ८-१० दिवस, पार २१ जूनपर्यंत, पाऊस येण्याची काही शक्यताच नाही. त्यानंतर काय होणार याची काय खात्री आहे? जुलै महिन्यात तरी पाऊस येणार काय? आणि तोपर्यंत शेतीचे काय? निदान प्यायच्या पाण्याची सोय काय?

हवामान विभागाचे तज्ज्ञ म्हणतात, गेल्या शंभर वर्षांत दोन वर्षं लागोपाठ मॉन्सून वाईट झाला, असे फक्त एकदा झाले होते. गेल्या शंभर वर्षांत फक्त एकदा



१५ जूनपर्यंत पाऊस झाला नाही असे झाले होते. याचा अर्थ काय? गेल्या वर्षी दुष्काळ झाला म्हणजे यंदा होणार नाही, कारण असे लागोपाठ दुष्काळ शंभर वर्षांत एखादे वेळीच होतो असे त्यांना सुचवायचे आहे काय?

पण महाराष्ट्रात दुर्गादेवीचा दुष्काळ पडला तेव्हा पाच वर्षे सतत पाऊस झालाच नव्हता. सातशे वर्षांपूर्वी सगळीकडे घनदाट जंगले असताना पाच वर्षे पाऊसच झाला नाही! विसाव्या शतकांत इतकी भयानक जंगलतोड झाल्यानंतर, पुन्हा एकदा दुर्गादेवीच्या दुष्काळासाखा दुसरा दुष्काळ पडणार नाही याची खात्री काय देता येते?

एका रोग्यावर शस्त्रक्रिया व्हायची होती. त्याने डॉक्टरला विचारले, 'मी यातून वाचेन का हो?'' डॉक्टर म्हणाला, ''अगदी निश्चित वाचाल.'' रोग्याला खूप धीर आला. तरी त्याने विचारले, ''डॉक्टर! एवढ्या खात्रीपूर्वक तुम्ही कसे सांगू शकता, की मी बरा होईन?'' डॉक्टर म्हणाला , ''ही शस्त्रक्रिया इतकी कठीण आहे, की तिच्यात सरासरीने रुपयात नव्वद पैसे रोगी मरतात. माझे आधीचे नऊ रोगी मेलेले आहेत. तुम्ही दहावे. तेव्हा तुम्ही वाचणारच.''

दोनदा लागोपाठ दुष्काळ क्वचितच पडतो. म्हणून यंदा तो पडणारच नाही असे समजणे इतकेच शहाणपणाचे आहे.

महासागरातील गरम व थंड पाण्याच्या प्रवाहांची दिशा बदलली तर भारतातील पावसाळ्याचे सर्व वेळापत्रक, सर्व प्रमाण बदलू शकते. निसर्गाची अशी वेगवेगळी चक्रे फिरत असतात, त्या सर्वांचा परिणाम ऋतूंवर होतो. पावसाळ्यावर होतो. त्याचा नियम म्हणून सांगता येणार नाही.

यंदा जुलै महिन्यात का होईना पाऊस सुरू व्हावा अशी सर्वांचीच प्रार्थना आहे. लक्षावधी तहानेले जीव पहिल्या पावसाच्या धारांची चातकाप्रमाणे वाट पाहत आहेत. मीही अशी आशा करतो, की अखेरीस उशिराने का होईना पाऊस येईल. पण महादुष्काळाच्या आणि सर्वनाशाच्या आपण किती जवळून जात आहोत याची कल्पना आली म्हणजे पोटात गोळा उठतो.

क्षणभर कल्पना करू या, की यंदा अजून महिनाभरच पाऊस लांबला. या उशिराचे परिणाम काय होतील? सगळीकडे नापेर होईल. खरिपातील पिके बुडतील. ठीक आहे. धान्याचे साठे देशात आहेत. ते संपले तर दुसऱ्या देशांतून धान्य आणवता येईल, परदेशात धान्य विकत घ्यायला पैसे नसले तरीसुद्धा प्रचंड प्रमाणावर धान्य कर्ज म्हणून, मदत म्हणून, भीक म्हणूनसुद्धा आणता येईल.

पण पिण्याच्या पाण्याची व्यवस्था काय? एखाद्याच्या विहिरीतील वाहता झरा,

अनेक वर्षे चालला आणि एकदम कमी पडला, आटला, नाहीसा झाला असे पुष्कळदा होते. पाण्याच्या आधाराने गावकूस वसले होते, तो आधार संपून गेला. गावात पाणी राहिले नाही, गावाला उठून जाणे शक्य नाही. पाण्याची योजना करायची ताकद नाही; मग आमची सत्ता फक्त घरच्या बायकामंडळीवर. त्यांनी सर्वांगाला कळ लागली तरी दूरदूरवरून घागरींच्या उतरंडी वाहायच्या. देवगिरी, पंढरपूर, तुळजापूर, पैठण, अंबाजोगाई या सारखी एका काळची संस्कृती व्यापार उदीम आणि सगळेच वैभव यांची केंद्रे. ही काही पाण्याच्या तुटवड्याच्या जागा म्हणून निवडणाऱ्यांनी निवडली नव्हती. एके काळी पाण्याचा उदंड साठा पोटात बाळगणारे हे प्रदेश. आगोठीला शेतात घरात असली नसलेली सगळी ज्वारी पेरून दिली म्हणजे उभ्या महाराष्ट्रातला शेतकरी वारकरी बनून पंढरपूरला जाई. वाटेत त्याला कधी भाकरी कमी पडली नाही. आज हे सगळे दुष्काळी प्रदेश बनले. भूगर्भातील पाणी आटले.

आता पाणी आटले आहे ते एका विहिरीचे नाही, गावाचे नाही, एका जिल्ह्याचे नाही, सगळी राज्येच्या राज्ये आता कोरडी पडत आहेत. जगातल्या तेलाच्या खाणींमधील तेलाचा साठा संपतो आहे. पृथ्वीच्या पोटात तेल राहणार नाही याची चिंता पुढारलेल्या राष्ट्रांना पडली. इंडियालाही पडली. प्रचंड खर्च करून तेल संशोधन झाले. मिळेल तेथे उपसायला सुरुवात झाली. तेल महत्त्वाची वस्तू आहे. शेतकऱ्याची घरधनीण जितक्या काळजीने घरात उरलेले धान्य वारंवार तपासून बघते, कणाकणाने काटकसरीने वापरते, पशापशाने, मुठीमुठीनेसुद्धा साठा वाढवायला बघते, तितक्याच काळजीने देशाच्या घरधनिणींने तेलाच्या पुरवठ्याकडे लक्ष दिले पाहिजे; पण त्याहीपेक्षा शतलक्ष पटींनी प्यायचे पाणी महत्त्वाचे आहे. धान्य पिकवायला लागणारे पाणी महत्त्वाचे आहे. पृथ्वीच्या पोटातले पाणीच आटत आहे याकडे तर फार बारकाईने अगदी डोळ्यात तेल घालून लक्ष द्यायला पाहिजे होते.

आकाशातून पडलेल्या थेंबाथेंबाचा हिशेब व्हायला पाहिजे. तो थेंब कसा वापरला जातो, प्यायला किती, शेतीला किती, इतर कामांना किती? पाणी कुठेकुठे थांबवता येईल, जिरवता येईल, तेथे तेथे थांबवले गेले पाहिजे, जिरवले गेले पाहिजे. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' याची जाणीव राज्यकर्त्यांना फार आधी असावयास पाहिजे होती.

मोठ्या धरण योजना या आपल्या देशाच्या परिस्थितीस योग्य नाहीत. अगदी छोट्या छोट्या, प्रत्येक गावपातळीवरच्या योजनांचे भरगच्च जाळे देशभर विणावे



लागेल, हा विचार अनेकांनी अगदी तपशीलवार मांडला आहे. महाराष्ट्रातील जुने व्यासंगी तज्ज्ञ एन्. एस्. जोशी यांनी १९५५ मध्ये फार ठासून हा विचार मांडला आहे. मी स्वत: १९५७ मध्ये हा विचार सुचवला आहे. विलासराव साळुंख्यांसारखी तपस्वी इंजिनीयर मंडळी स्वत:च्या हिमतीवर आज प्रत्यक्षात पाण्याच्या आदर्श उपयोगाच्या पद्धतीचे नमुने घालून देत आहेत.

गावोगाव 'डोंगर टेकड्यांचा अभ्यास करून' जागोजाग युक्तीप्रयुक्तीने पाणी अडवल्यामुळे जास्त पाणी उपलब्ध होते, पाण्याचे वाटप जास्त विस्तृतपणे होते, जास्त जमिनीला पाणी मिळू शकते, हे सर्व कमी खर्चात होते, नैसर्गिक घटकांचा समतोल सुयोग्य राखला जातो, हे काही नियोजनकर्त्यांस माहीत नाही असे नाही. अशी कोणाची समजूत असेल, की छोट्या योजनांची तांत्रिक आणि आर्थिकदृष्ट्या निर्विवाद श्रेष्ठता शासकीय तज्ज्ञांना अज्ञात आहे तर त्यांनी ती कल्पना अजिबात मनातून काढून टाकावी.

समग्र देशाच्या कल्याणाकरिता होणाऱ्या कोणत्याही नियोजनात छोट्या पाणी योजनांकडेच जास्तीत जास्त लक्ष दिले गेले असते. भांडवल आणि इतर साधनांचा तुटवडा असलेल्या देशात तरी प्रचंड धरण योजनांवर मोठ्या प्रमाणावर दुर्मीळ साधनांचा उपयोग शुद्धबुद्धीने होऊच शकत नाही. मोठ्या आधुनिक कारखान्यांवरील गुंतवणूक जितकी चूक, तितकीच मोठ्या धरणांवरची उधळपट्टी ही अशास्त्रीय, हे उघड आहे.

पण ही चूक सातत्याने घडली यामागेही इंडिया -भारत धोरण आहे. इंडियाच्या गरजेकरिता लागणारे अतिरिक्त उत्पादन तयार करणे, ते करण्याकरिता काही मूठभर मंडळींच्या हाती पाण्याची साधने सोपवणे, इतर अनुदाने आणि साह्य देऊन शेतीमालाचे भाव अपुरे असताही आवश्यक ते अतिरिक्त उत्पादन तयार करवून घेणे, अशा निश्चित; पण अदूरदर्शी धोरणाने पाण्याचे नियोजन करण्यात आले. शेतीव्यवसाय किफायतशीर असता तर गावपातळीवर, गटपातळीवर पाणी अडवण्याच्या आणि जिरवण्याच्या योजना केव्हाच झपाट्याने पार पडून गेल्या असत्या.

इंडिया-भारत धोरणाने बहुसंख्य शेती बुडवण्यात आली. साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर शहरांवर आणि कारखानदारीवर वापरण्यात आली. उरलेल्या भांडवलातून शेतीवर उत्पादकतेची मोजकी बेटे तयार करण्यात आली. बराच काळ हे धोरण चालून गेले. या धोरणाचे परिणाम किती घातक आहेत याची पुरेशी जाणीव फारशी दिसली नाही.

पण निसर्ग आपले काम शांतपणे बजावतच होता. त्याच्या क्रोधाची दुहेरी जाणीव आता होऊ लागली आहे. एका बाजूला धरणयोजनांतून तयार झालेल्या भागातील जमिनी खारवू लागल्या, तर दुसऱ्या बाजूला जमिनीच्या पोटातील पाणीच संपू लागले. शेकडो वर्षांपासून साठत आलेले हे वाडवडिलांचे संचित धन आम्ही उधळून टाकले आहे. यंदा पाऊस झाला तर कदाचित लगेच प्यायच्या पाण्याचे संकट भेडसावणार नाही; पण दुसऱ्या आघाडीवर जमिनी खारवण्याचे प्रमाण वाढत राहणार; पण जर का पावसाने ताणायचे ठरवले तर महिन्याभरात हाहाकार उडून जाईल. पाण्याच्या दुर्भिक्षामुळे रोगराईचे प्रमाण वाढेल. साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव होईल. पुढील दुरवस्थेचे वर्णन करून सांगण्याची आवश्यकता नाही.

हे संकट आज टळले तरी एक दिवस आपल्याला या संकटाच्या सामोरे व्हावे लागणार आहे. इंडियावादी धोरणाने सामाजिक, राजकीय पातळीवर देशाचे तुकडे पडण्याची वेळ आली आहे. दुसऱ्या बाजूने निसर्गाने दुहेरी प्रकोप मांडला आहे.

शासनाला आजही या संकटाला तोंड देण्याकरिता काही करावे असे वाटत नाही. पंतप्रधान परदेश दौऱ्यात मश्गुल आहेत. पिण्याच्या पाण्याचा दुष्काळ यंदा येवो का नंतर येवो, तो येणार. दुर्गादेवीच्या दुष्काळाइतकाच तो भयानक असेल. त्याला 'इंदिरादेवीचा दुष्काळ' हेच नाव समर्पक होईल.

□□



अकरा

# शेतकरी संघटनेचे विरोधक

संघटनेविषयी काहीजण अतोनात संतापात तिरीमिरीने बोलतात, लिहितात. त्यांच्या पोटात क्रोध मावत नाही. एवढा राग कोणालाही येण्याचे कारणच काय? शेवटी संघटना मागते काय? खर्च भरून येईल एवढी शेतीमालाची किंमत कोणीही मागितली तर एवढा जळफळाट होण्याचे कारण काय?

शेतकरी संघटनेने मांडलेल्या विचारात एक संपूर्ण नवे अर्थशास्त्र आहे. विकासाचा एककलमी कार्यक्रम आहे. गरिबी हटविणे अत्यंत सोपे आहे, असे म्हटल्यावर गरिबी हटवण्याच्या कार्यक्रमाचा ज्यांनी व्यवसाय केला, त्यांना राग येणारच. यात अर्थशास्त्रज्ञ आले, तथाकथित डावे कार्यकर्ते आणि नेते आले, पांढरपेशे आले, पुढारी आले. हे विरोधक जे युक्तिवाद करतात त्यांची तपासणी अनेकवेळा झाली आहे. युक्तिवाद इतके पोकळ असूनही हे संघटनेविषयी इतक्या विषारीपणे का बोलतात? त्यांचे हेतू समजावून घेतले म्हणजे त्यांच्या आकांडतांडवाचे रहस्य लक्षात येईल.

प्रस्थापित अर्थशास्त्रातील अनेक प्रमेये संघटनेच्या विचाराने उलथवून टाकली आहेत. व्यावसायिक अर्थशास्त्री शिकतात, शिकवतात ते अनेक सिद्धान्त धोक्यात आले आहेत.

संघटनेचा विचार कोणा एका व्यक्तीचा नाही. कोणी एकाने मांडलेला नाही. शेकडो शेतकऱ्यांच्या, शेतमालकांच्या, शेतमजुरांच्या अनुभवात त्याचा जन्म आहे. कष्टून, राबून नवी तंत्रे, साधने संपादून कुशलतेने शेती करणाऱ्या; पण राजकारणाशी संबंध टाळलेल्या माधवराव मोरे, प्रल्हाद पाटील कराड, भाई धारिया, भास्करराव बोरावके यांच्यासारख्या निष्णात शेतकऱ्यांच्या अनुभवातून हा विचार जन्मला. चंद्रकांत वानखेडे, शेषराव मोहिते यांच्यासारख्या शेतमजुरांच्या लढ्याच्या कामासाठी आयुष्य समर्पित केलेल्या कार्यकर्त्यांच्या अनुभवातून हा विचार स्फुरला.

हा विचार मांडला चाकण, बागलाण, निपाणीच्या लक्षावधी शेतकऱ्यांनी. ज्या देशात पक्षाच्या सभांना काही तासांसाठीसुद्धा माणसे ट्रक, ट्रॉली, ट्रेनने आणावी

लागतात, त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था करावी लागते, वर पैसे वाटावे लागतात, त्या देशात लक्षावधी शेतकरी एकत्र जमले, स्वत:ची भाकरी बांधून घेऊन आले, बैलगाड्यांतून आले, पायी आले, मिळेल त्या साधनांनी आले. लहानमोठा नाही, जातपात नाही, धर्मभेद नाही, भाषाभेद नाही. सर्व आले. हजारोंनी तुरुंगात गेले. हजारोंनी लाठ्या खाल्या. जन्माचे अपंग झाले. गोळीबारांत ठार झाले आणि तरीही संघटनेच्या मागे उभे राहिले. त्यांनी हा विचार मांडला. कृतीने मांडला, लेखणीने नाही.

दुसऱ्या महायुद्धानंतर लिखित शब्द मरण पावला. लिहिणारे उदंड झाले, छपाई उदंड झाली. लिखाणाला आता कोणी विचारीत नाही, मानत नाही. व्यावसायिक अर्थशास्त्री लिहीत असतात. व्यवसायबंधूचेसुद्धा ते क्वचितच काळजीपूर्वक वाचतात. देशाच्या आर्थिक धोरणावर अर्थशास्त्र्यांचा परिणाम शून्य झाला. आर्थिक सत्ताधाऱ्यांचे राजकीय कारभारी सोईस्कर लिहिणाऱ्या अर्थशास्त्र्यांना पदरी बाळगतात. त्यामुळे बाकीचेही शिस्तीत राहतात. देशातील अर्थव्यवस्था खचत चालली आहे, विकास खुंटला आहे, गरिबी वाढत आहे, हे सर्वांना मान्य करावेच लागत आहे, पस्तीस वर्षांच्या नियोजनात, धोरणात प्रचंड चूक झाली असली पाहिजे हे उघड आहे. किरकोळ थातूरमातुर सुधारणा सुचवून आता भागणार नाही. साम्राज्यवादी शोषणाचा अंत झाल्यावर विकासांच्या मार्गातील मुख्य धोंड दूर झाली; पण तरीही तिसऱ्या जगात विकासाचा प्रयत्न फसला आहे. या अपयशाचा आमूलाग्र विचार होणे अपरिहार्य होते.

हा विचार आला तो विद्यापीठ किंवा संशोधन संस्थांच्या मुखरातून नाही तर राजरस्त्यावर बसलेल्या शेतकऱ्यांकडून. विद्वान जेथे मूढ झाले तेथे अडाण्यांनी मार्ग दाखविला. या चमत्काराचा अर्थ लावायला, प्रस्थापित विद्वानांना समजावून सांगायला कोणी समर्थ अर्थशास्त्री पुढे व्हायला पाहिजे होता. दुर्दैवाने ते झाले नाही.

अर्थशास्त्रात नवे सिद्धांत इंग्लंड -अमेरिकेत मांडले जातात. विलायती पुस्तके काखेत धरून देशी इंग्रजीत त्यावर विद्वत्तापूर्ण चर्चा करायची असते. आपल्याच देशात नवीन विचारांचा चमत्कार घडू शकतो याची विद्वानांना कल्पना असावयाचे काहीच कारण नव्हते, कारण असे काही यापूर्वी कधी घडलेच नव्हते. एखाद्या व्यावसायिक अर्थशास्त्रज्ञाने धाडस करून शेतकऱ्यांनी सुचविलेला विचार पाश्चिमात्यांच्या परिभाषेत मांडता असता तर त्याची कुचेष्टा तर झाली असतीच; पण बहुतेक त्याला नोकरीसही मुकावे लागले असते. शक्य असते तर व्यावसायिक



अर्थशास्त्र्यांनी शेतकऱ्यांच्या आंदोलनाला काही अर्थविचार आहे हेच नाकारले असते. आज शेतीमालाच्या भावाची चर्चा चालू आहे, याचे कारण शेतकरी आंदोलनाची ताकद आहे.

सामर्थ्यहीन नेपोलियन एल्बा बेटावरून सुटला तेव्हा 'धोकेबाज पळाला' अशी बातमी देणारे, तोच प्रचंड सामर्थ्यानिशी पॅरिसच्या वेशीवर येऊन ठेपल्यावर 'सम्राटाचे भव्य स्वागत' असे मथळे छापतात. ही बुद्धिजीवींची परंपरा आहे. शेतकरी संघटनेच्या ताकदीमुळे तिच्या विचाराकडे दुर्लक्ष करणे आज अशक्य झाले आहे.

औद्योगिक क्रांतीनंतर अर्थक्षेत्रातील महत्वाच्या घडामोडी पाश्चिमात्य जगतात घडल्या. त्याबाबतचा भलाबुरा विचार तेथील देशात जन्मावा हे साहजिकच आहे.

आज अर्थकारणाचा इतिहास पूर्वीच्या वसाहतीत भारतासारख्या देशात घडत आहे. त्या संबंधीचे सिद्धान्तही पाश्चिमात्यांकडूनच येतील अशी अपेक्षा ठेवणे उष्णकटिबंधातील संशोधन लंडनच्या संशोधन संस्थेत होईल अशी अपेक्षा ठेवण्यासारखे आहे, पण परभृततेची परंपरा तोडणेही सोपे नाही.

साम्राज्यवादी शोषणाचा मोठ्यात मोठा बळी ठरलेल्या भारतात आज विकासाचा प्रश्न सर्वात विक्राळ स्वरूप धारण करीत आहे. तेथेच नवीन विचाराचा उगम व्हावा हे साहजिकच आहे, पण ते प्रस्थापित देशी अर्थशास्त्र्यांना रुचण्यासारखे नाही. मार्क्सलाही अजून अर्थशास्त्री म्हणून प्रवेश मिळालेला नाही. संघटनेला तर प्रवेश मिळणे लांबच राहिले.

संघटनेच्या अर्थशास्त्राने केन्सने संपविलेल्या सेच्या सिद्धांताला आधार दिला. सर्व उत्पादक घटकांचा निसर्गत: परिपूर्ण उपयोग होतो ह्या सनातन विचाराचे पुनरुत्थान केले. आर्थिक वर्गाच्या कल्पनेचे रूप बदलले, उत्पादनाच्या साधनांच्या मालकीवर समाजरचना ठरते हा विचार मर्यादित कालातच लागू आहे, अविकसित समाजाचा विचार करावयाचा झाल्यास शेतीच्या शोषणाच्या पद्धतीच समाजरचना ठरवतात असे मांडले. विकसित राष्ट्रातील औद्योगिक व पारंपारिक व्यवस्थेतील द्वैत हे त्यांच्या दारिद्रयाचे लक्षण नसून कारण आहे, भांडवल निर्मितीकरता शेतीतील बचत शेतकऱ्यांकडून काढून घेण्याची गरज नाही, वसाहतवाद संपला तरी गरिबी संपली नाही, याचे कारण नवा अन्तर्गत स्वरूपाचा वसाहतवाद आहे. गरिबी हटविण्यासाठी फक्त गरिबी टिकविण्याचे व वाढविण्याचे प्रयत्न थांबले, तरी पुरे आहे असे प्रस्थापित श्रद्धा उलथवून टाकणारे विचार पुढे ठेवले. अर्थशास्त्र्यांची

टाळकी फिरवून टाकणारा हा प्रकार. या विषयावर कोणा मान्यवर पश्चिमी अर्थशास्त्रज्ञाने प्रकाश टाकला, तर देशी शास्त्र्यांची थोडी फार सोय होण्याची शक्यता आहे.

अनेक सामाजिक, राजकीय कार्यकर्त्यांची परिस्थिती याहीपेक्षा नाजूक आणि कठीण झाली आहे. आर्थिक, सामाजिक विचारांच्या चुटपुटत्या अभ्यासाने एखाद्या प्रेषिताप्रमाणे गावात जाऊन कामाला लागले, गावतल्या धनदांडग्यांच्या विरुद्ध थोडीफार चळवळ केली, गरिबांना त्यातून काही मिळाले नाही तरी थोटक्या वर्तुळात का होईना एक तेजोवलय निर्माण झाले. चळवळी विरून गेल्या तरी झिंग उतरली नाही असे अनेक कार्यकर्ते देशभर आहेत. ग्रामीण 'धनदांडगे' शहरी भांडवलदारांशी सोडा, तेथील मध्यमवर्गीयांशीसुद्धा बरोबरी करू शकतात किंवा नाही याचा विचार त्यांनी केला नाही. अठरा एकरांच्या मालकाचा उल्लेख टाटा-बिर्ला, मोठा शेतकरी असा करण्यात काही अनौचित्य आहे असा संशयसुद्धा त्यांना आला नाही. तीन हजार रुपये मिळकतीच्या कामगारांचे पगारवाढीचे लढे लढविणाऱ्यांनी दहा एकर बागायतीत कष्ट काढणाऱ्यांचा दु:स्वास केला. मोटारी उडविणाऱ्या धनदांडग्यांचे उत्पन्न शेतीचे असू शकत नाही हे कळण्याइतकासुद्धा त्यांनी शेतीचा अभ्यास केला नाही. शेतमालक व शेतमजूर यांच्यातील फरक फक्त सुपातील आणि जात्यातील एवढाच आहे. मजुरांची मिळकत काढायची असेल, तर शेती किफायतशीर व्हायला हवी याचेही त्यांना भान राहिले नाही. गावोगाव तणाव उत्पन्न करून आपण सर्व शेतीचे शोषण करणाऱ्या खऱ्या धनदांडग्याचे हित जोपासतो आहोत हेही त्यांना समजले नाही.

यातील अनेक कार्यकर्ते खरोखर तळमळीचे आणि नि:स्वार्थ होते. ते निघालें जायला देवाच्या आळंदीला आणि येऊन पोचले चोरांच्या आळंदीला. वाट चुकली हे उमजले, तरी नवी वाट सापडली नाही. त्यातल्या काहींनी तेजोवलयाचा उपयोग करून निदान स्वत:ची वैयक्तिक सोय लावून घेतली. बाकी तसेच कोंडीत राहिले. अनुयायांचा उत्साह मावळत होता. चळवळीत हेवेदावे निघत होते, पण काही तरी वळवळ तरी करीत राहणे जरूर होते.

अशांपैकीच काही जास्त भाग्यवान पक्षाच्या राजकारणात शिरले. समाजवादाचे, गरिबांच्या कल्याणाचे नाव घ्यावे, शेतकऱ्यांविषयी बोलावे, पण काम करावे तुलनेने सोपे. कामगार चळवळीचे आणि पांढरपेशांचे. राजकारणात डाव्या विचारांची मक्तेदारी मिरवीत काहींनी मोठेपण मिळविले, काहींनी मालमत्ता.

शेतीमालाला उत्पादन खर्चाइतका भाव मिळत नाही, शेती तोट्यात चालते हे



तत्त्वत: तरी ही मंडळी मान्य करतात, पण कोणत्याही मालाला रास्त भाव द्यायचा म्हटले, की त्यांना मनात न लपणारी नाखुषी वाटत असते. शेतजमीन तोट्याचे साधन आहे हे एकदा मानले, की जमिनीच्या मालकीतील विषमतेविषयी, तिच्या फेरवाटपाविषयी आपले पूर्वीचे विचार हास्यास्पद ठरतात हेही त्यांना उमजत नाही. जमिनीचे फेरवाटप करावयाचे झाले, तरी त्याआधी जमीन फायद्याचे साधन बनली पाहिजे हे समजत नाही. शेतकरी त्यांच्यामागे कधीच आले नाहीत - शेतमालक नाहीत, भूमिहीन नाहीत आणि शेतमजूरही नाहीत. पाच पंचविसांचे केविलवाणे मोर्चे मधून मधून काढण्यावर त्यांना समाधान मानावे लागत आहे.

शेतकरी संघटनेच्या हाकेसरशी लक्षावधी शेतकरी उठतात याचे या मंडळीना मोठे वैषम्य वाटते. कारण संघटनेचे अपयश हे त्यांच्या आयुष्याचे अपयश आहे.

शहरात वास्तव्य असलेल्या तथाकथित बुद्धिजीवींनी शेतकरी संघटनेच्या विचाराला विरोध करावा हे समजण्यासारखे आहे. अन्नधान्याचे, भाजीपाल्याचे, दुधाचे भाव वाढले तर त्यांना काही जगणे अशक्य होणार आहे असे नव्हे, पण जेवण्याखाण्यावरील खर्च किमान रहावा, पगार-महागाई भत्ता वाढता रहावा, बाकीच्या रकमेतून शहरात नाटक सिनेमात दिसणाऱ्या आधुनिक राहणीचा एक छोटा प्रवाह तरी आपल्या घरात वळवावा ही त्यांची माफक इच्छा. रेडिओ घ्यायचा आहे, पंखा घ्यायचा आहे. कितीक अपुऱ्या इच्छा. शेतकऱ्यांना न्याय देणें ठीक आहे, पण त्याचा परिणाम आपल्यावर होता कामा नये.

झोपडपट्टीत राहणाऱ्या शहरातील गरिबांवर शेतीमालाचे भाव वाढल्यास काय भयानक परिणाम होतील याचे ते गहिवरून वर्णन करतात. शेतीमालास भाव मिळाल्यास चलनवृद्धीचा धोका असल्याचा बागुलबुवा दाखवितात. शेतकऱ्याच्या हाती पैसा आल्यास ते लग्नसमारंभावर, दारू गुत्त्यावर खर्च करून टाकतील याची त्यांना चिंता वाटते. केवळ आर्थिक प्रगती करून भागणार नाही सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक विकास व्हावयास पाहिजे असे प्रतिपादतात.

झोपडपट्टीतील भणंग आणि या पांढरपेशांचा अर्थाअर्थी काही संबंध नाही. दोघांची जगे वेगळी.अगदी भुसाराची व भाजीची दुकानेही वेगळी. आधी झोपडपट्टीवाला शहरात आला, तो त्याची शेती तोट्यात गेली यास्तव निर्वासित म्हणून आला. शेतीमालाला रास्त भाव मिळाला, तर त्यातीलही थोडेफार अजूनही परतू शकतील. निदान नवीन आवक निश्चित मंदावेल, पण खिशाने विचार करणाऱ्या बुद्धिजीवींना त्याचे काय होय!

ग्रामीण भागाच्या उद्धारार्थ अनेक सार्वजनिक तळमळीच्या भद्रजनांनी संस्था

काढल्या, विश्वस्त निधी उभे केले. अशा प्रतिष्ठानांना देणग्या चांगल्या मिळतात. त्यांनी गावेच्या गावे दत्तक घेतली. पैसा पुरवला, पाणी मिळवून दिले, शेती सुधारली, उत्पादन वाढवून दिले. वैद्यकीय सेवा मिळण्याची व्यवस्था केली. लाचार शेतकरी गहिवरून गेले. कार्यकर्त्यांना आपल्या मानवतेच्या सेवाकार्याबद्दल धन्य धन्य वाटले. गावांना मोठी मोठी माणसे भेटी देऊ लागली-अगदी विलायतीसुद्धा. आता असाच प्रयोग साडेपाच लाख वेळा केला की झालीच सर्व गावांची सुधारणा असे वाटू लागते न लागते तो कर्जफेडीची वेळ येते. सुरुवातीला बरे पीक देणारी जमीन जास्त जास्त खायला मागू लागते. कधी बियाणातून उगवण मार खाते. कधी हवामान मार देते. पिके बुडतात. चांगली आली तर भाव पडतो, आणि ज्या आदर्शाच्या नमुन्यावर इतर गावांनी प्रगती करावयाची तो आदर्शच डळमळू लागतो.

शेतकरी संघटनेच्या अर्थविचाराने ही भाबडी सेवार्थी मंडळीही पार उघडी पडली आहेत. अर्थशास्त्री काय, डावे कार्यकर्ते काय किंवा बुद्धिजीवी वा संस्थासेवक काय-त्यांच्या विचाराला, कार्यपद्धतीला धक्का बसला म्हणून विव्हळतात. या विरोधकातील अनेक अखेरीस संघटनेच्या कामास लागतील. ज्यांची नियती साफ आहे ते सगळे या नवीन आघाडीत सामील होतील. पण शेतकरी संघटनेने खरोखरे दुखावले असतील, तर ते गावोगावचे पुढारी. आणि खास करून सहकारातील पुढारी. गावपंचायती, तालूका पंचायत, जिल्हा परिषद, सहकारी संस्था, कारखाने बँका, बाजार समित्या अन् पुढे जाऊन आमदारकी, खासदारकी, मंत्रीपद या देदीप्यमान मार्गाची आस राखणारे, त्यात अगदी गडगंज पैसा कमावलेले पुढारी. शेतकरी कायमचा कर्जात सापडलेला, लाचार. त्याच्या छोट्या मोठ्या अडचणी दूर करण्याचे आश्वासन देणे, त्या थोड्याफार हलक्याही करणे आणि त्यांना कायमचे सलाम करीत ठेवणे हा धंदा. शेतीबाहेरची उत्पन्ने गडगंज झाल्याने शेतीमालाला काय मिळते याची त्यांना काहीच पर्वा नाही. शेतकऱ्याला रास्त भाव मिळाला की पुढऱ्यांचा भाव संपतो हे त्यांनी ओळखले आहे.

शेती बरकतीत चालली, की पुढारकी दिवाळ्यात म्हणून ही मंडळी मिळेल त्या मार्गाने, मिळेल त्या साधनाने संघटनेला विरोध करावयास ठाकली आहेत. विचाराला विरोध किंवा पाठिंबा हे त्यांच्या क्षेत्रात येत नाही. जातपात, पैसा, सत्ता, गुंड, पक्ष ही साधने वापरून शेतकरी संघटनेला दडपण्यास हे कुऱ्हाडीचे दांडे सज्ज झाले आहेत. शेतकऱ्यांचे सर्वात मोठे विरोधक हे पुढारीच. इंडियावाले



त्यांना वापरूनच शेतीमालाला भाव न देण्याचे राजकारण चालवतात.

गरिबीचे मूळ कारण बाजूला ठेऊन गरिबी हटवणे हा ज्यांनी व्यवसाय केला, ते सर्व संघटनेविरुद्ध उभे राहिले आहेत. पण त्यांच्या पायाखालची वाळू घसरत चालली आहे. गरिबी हटविण्याचे नाटक आता फार काळ चालणार नाही. गरिबी वाढत गेल्याने गोरा गेला तसाच काळाही जाईल, त्याची लक्षणे स्पष्ट दिसू लागली आहेत.

*(६ एप्रिल १९८३)*

□□

बारा

# शेतकरी संघटना आणि डावे विचारवंत

शेतीमालाला उत्पादनखर्चावर आधारित रास्त भाव हा एककलमी कार्यक्रम घेऊन महाराष्ट्रात ठिकठिकाणी आंदोलने झाली. शेतकऱ्यांनी त्याला अभूतपूर्व प्रचंड पाठिंबा दिला. शेतकरी संघटनेचा विचार हे एक नवे अर्थशास्त्र आहे. आर्थिक विकासाचा, गरिबी हटवण्याचा तो मूलभूत कार्यक्रम आहे असे मांडल्यावर देशातील बहुतेक डाव्या विचारवंतांच्या मनांत एकच गोंधळ माजून गेला आहे.

संघटनेला पाठिंबा देणाऱ्यांत काही अति डावे विचारवंत आहेत. काहींनी सशर्त पाठिंबा दाखवला आहे. मार्क्स, लेनिन आदींच्या लिखाणातील अवतरणे उद्धृत करून सर्व शेतकऱ्यांची एकसंच फळी बनविणे हे लोकशाही क्रांतीच्या काळात योग्य असले तरी त्यापुढील समाजवादी क्रांतीच्या काळात मोठ्या शेतकऱ्यांना चिरडून टाकावे लागेल असे प्रतिपादन त्यांनी मोठ्या पांडित्याने केले आहे. राहिलेले डावे छोट्या मोठ्या शेतकऱ्यांच्या एकत्र आघाडीला तात्त्विक विरोध करतात.

संघटनेवर डाव्या विचारवंतांनी केलेल्या टीकेत असे वेगवेगळे रंग असले तरी तरी काही प्रश्न या तीनही रंगांच्या विचारवंतांना सलत आहेत.

तत्त्वतः शेतीमालाला उत्पादनखर्च भरून येईल इतकी किंमत मिळाली पाहिजे या मागणीला डाव्या विचारवंतांचा विरोध नाही. निदान विरोध असला तर ते तो उघड करत नाहीत. असा विरोध उघड केला तर ग्रामीण जगातून नेस्तनाबूत होण्याची भीती त्यांना वाटत असावी.

भांडवलनिर्मितीच्या प्रक्रियेत कामगाराच्या शोषणातून तयार होणाऱ्या अतिरिक्त मूल्यावर मार्क्सने भर दिला. याउलट समाजवादी बांधणीची जबाबदारी ज्यांना उचलावी लागली त्यांनी समाजवादी उद्योगधंद्यांच्या बांधणीसाठी शेतीच्या शोषणातून भांडवलनिर्मिती करण्याची आवश्यकता स्पष्टपणे सांगितली आहे. कदाचित समाजवादी राज्यव्यवस्था आल्यानंतर शेतकऱ्यांना लुटायचे असेल तरी तोपर्यंत खुलेपणे शेतीमालाचा रास्त भाव मिळणे अयोग्य आहे, असे सांगणे शक्य



नसावे. अभ्यासू डाव्यांना हा प्रश्न तात्त्विक पातळीवर सतावतो आहे.

डाव्या कार्यकर्त्यांची परिस्थितीही मोठी विचित्र झाली आहे. शेतकऱ्यांचे, शेतमजुरांचे नाव घ्यावे, पण काम करावे कामगारांचे, पांढरपेशांचे. त्यांची मजुरी वाढवून द्यावी, बोनस मागावे, इतर अटी सुधारून घ्याव्यात, महागाईला विरोध करावा. हे कार्यक्रम त्यांनी वर्षानुवर्षे राबविले आणि गरिबांचे कैवारी म्हणून ते मिरवले. संघटनेच्या ताकदीवर कार्यक्षेत्रातील कामगारांची परिस्थिती भाग्यवंतांच्या पातळीवर आणली. आता काही संस्था बांधाव्यात आणि राजकीय सत्तेला हात घालावा अशा प्रयत्नात डावे असताना मळकी धोतरे नेसलेले लक्षावधी शेतकरी रस्तांत उतरले आणि त्यांनी डाव्यांची सर्व समीकरणे विस्कटून टाकली.

गरिबांच्या कैवाराची डाव्यांची मक्तेदारी संपली. आर्थिकदृष्ट्या कामगारापेक्षाही हीन अवस्थेतील एक समाज प्रचंड संख्येने उठतो आहे. भाववाढ कमी करा अशी कानाला सवय पडलेल्या घोषणेऐवजी एक प्रचंड समुदाय भाववाढ मागतो आहे ही अनपेक्षित घटना होती. देशातील काही कोपऱ्यात औद्योगिक प्रगती घडवून, त्यासाठी बाकीचे प्रदेश भणंग ठेवण्याची प्रस्थापितांची नीती आणि त्या नीतीचा फायदा घेऊन स्वतःची स्थिती सुधारून घेणारे संघटित कामगार आणि त्यांचे नेते यांना आपण डावे राहिलो नसून, 'उजवे' झालो आहोत, हा पालट पेलण्यासारखा नव्हता. अशा परिस्थितीत प्रस्थापितांची जी सहज प्रतिक्रिया असते, तीच डाव्यांची झाली. उपहास, शिवीगाळ, इतिहासाने खोट्या ठरवलेल्या आपल्या श्रद्धांची वारंवार पुनरुक्ती, आरोपांच्या फैरी यांची झोड उठवण्यात आली. अशा आशेने, की नवी चळवळ मुळात खुडून टाकली तर आपल्या डावेपणाला आव्हान निर्माण होणार नाही. 'आहे रे' च्या आर्थिक हितसंबंधाइतकेच विचारवंताचे अहंकार प्रखर असू शकतात.

पहिला संघटनेवर आरोप केला गेला तो म्हणजे रास्त भाव ही फक्त बड्या शेतकऱ्यांची मागणी आहे. जे शेतकरी स्वतःच्या गरजा भागवून बाजारात विक्री करण्याइतके उत्पादन करू शकतात त्यांचीच ही मागणी आहे.

हा आरोप खरा आहे असे क्षणभर मानले, तरी संघटना काही चुकीचे करते आहे असे म्हणता येईल काय? आपला उत्पादनखर्च भरून निघाला पाहिजे हा प्रत्येक व्यावसायिकाचा हक्क आहे, अगदी टाटा- बिर्लांचासुद्धा हा हक्क आहे. टाटा-बिर्लांनीसुद्धा आपले उद्योगधंदे तोट्यात चालवले पाहिजेत, असे कोणी म्हणू शकणार नाही. मग मोठ्या शेतकऱ्यांनी शेतीव्यवसाय तोट्यात आणील असे धोरण शासनाने आखू नये असे म्हटले तर त्यात गैर काय आहे? शेतकरी

संघटना शेतीव्यवसायातील इतरांचे प्रतिनिधित्व करत नाही असे कोणाला वाटत असेल तर त्यांना योग्य वाटेल तो कार्यक्रम हाती घेण्यास त्यांना कोणी प्रतिबंध केलेला नाही.

वस्तुत: भारताच्या संदर्भात मोठा शेतकरी किंवा श्रीमंत शेतकरी असा भेद अस्तित्वातच नाही. शेती लहान असो वा मोठी असो, ती तोट्याचेच साधन आहे. त्यातून आर्थिक लाभ किंवा भांडवल निघूच शकत नाही. ग्रामीण भागात मोजकी सधन मंडळी आहेत; पण त्यांची सधनता शेतीतून आलेली नाही. १९४७ नंतर शेतीच्या शोषणाची गोऱ्या इंग्रजांची परंपरा अधिक कठोरतेने चालवणाऱ्या काळ्या इंग्रजांनी एक व्यवस्था निर्माण केली. राजकीय सत्तेच्या आधाराने ग्रामपंचायतीपासून लोकसभेपर्यंतच्या खुर्च्या, शासकीय सहकारी व्यवस्था, बँका, बाजार समित्या यांच्या जाळ्यांतून नव्या रावसाहेब-रावबहादुरांचा एक वर्ग जन्माला आला. सहकारी योजना, सहकारी व्यवस्था यांतील खादाडीने त्याने अमाप पैसे मिळवला. सत्ता आणि संपत्ती वापरून कर्जात बुडालेल्या शेतकऱ्यांना लाचार बनवावे आणि त्यांची मते गठ्ठ्यांनी योग्य त्या पेट्यात टाकवावीत हे त्यांचे काम. ग्रामीण भागांमधील सधन हे खासदार आहेत, आमदार आहेत, सभापती आहेत, संचालक आहेत, निदान दूध सोसायटीचे चेअरमन आहेत. या वर्गाला शेतीमालाच्या रास्त भावात स्वारस्य नाही. शेतीव्यतिरिक्त उत्पादनाची उदंड साधने हाताशी आहेत. उलट शेतकरी जितका लाचार, पराधीन राहील तितके त्यांच्या नेतृत्वास सोईस्कर. शेतकऱ्याचे भले करण्याच्या नावाखाली शासनाची अनुदाने गिळावीत, विकासयोजना ओरबाडून खाव्यात आणि शेतकरी लाचार ठेवावा ही त्यांची योजना. कै. तात्यासाहेब बोरस्ते सोडले तर साखर-सम्राटांपैकी एकानेही उसाला रास्त भाव मिळावा या मागणीस पाठिंबा दिला नाही. शेतीव्यतिरिक्त उत्पन्नातून श्रीमंती कमावलेल्या या शेतकऱ्यांचा रास्त भावाच्या आंदोलनास विरोधच राहिलेला आहे. यातील बहुतांशी सत्ताधारी पक्षांत राहून सत्तेकडे जाण्याची वाट पाहत आहेत.

शेतीच्या आधारावर शेतकरी किती श्रीमंत असू शकतो? कोरडवाहू शेती कितीही मोठी असली तरी ती तोट्याची असते. याबद्दल कोणाच्याही मनात फारशी शंका नाही; मात्र ज्यांना पाण्याची सोय आहे असा बागायती शेतकरी प्रचंड पैसा कमावत आहे अशी समजूत डावे करून घेताना आणि देताना दिसतात. सर्वंकष उत्पादनखर्चाचा विचार केल्यास कोणत्याही बागायती पिकाससुद्धा किफायतशीर भाव मिळत नसल्याने दीर्घकालीन दृष्टीने पाहिले तर बागायती शेतीही



तोट्याची आहे. ऊस पिकवणारा शेतकरी सधन म्हणून बदनाम आहे; पण सहकारी साखर कारखान्यांची अवाढव्य प्रगती होऊनही उसाला सर्वसाधारणपणे एकूण उत्पादनखर्चाच्या निम्मीच किंमत मिळाली आहे. अतीव फायदा होतो असे ज्यांना अज्ञानामुळे वाटले त्यांच्या जमिनी खारवून चालल्या आहेत आणि त्यांचे एकरी उत्पादन झपाट्याने खालावत आहे.

पण काहीजण असे मानतात, की ऊसाच्या शेतीत प्रचंड फायदा आहे. तो आगदी प्रति एकर तीन हजार रुपये होतो इतकी हास्यास्पद विधानेही केली जातात. क्षणमात्र का होईना हे खरे आहे असे धरू. जमिनीची कमाल धारणा आज बागायतीत अठरा एकरांची आहे. काही मंडळींनी वेगवेगळ्या युक्त्या योजून यापेक्षा जास्त जमीन ठेवली असेल; पण त्यामुळे कमाल धारणेचा अंमल जास्तीत जास्त एका पिढीने पुढे ढकलता येतो. बेकायदेशीर कृत्यांची व्यवस्था लावण्यासाठी कायदे आहेत. त्यांची दखल येथे घेण्याचे कारण नाही. या अठरा एकर बागायतीत जास्तीत जास्त ४॥ एकर ऊस लावण्याची परवानगी मिळते; पण आपण असेही गृहीत धरू, की हा लुच्चा अठरा एकर ऊस लावतो. लुच्चा पाटकऱ्याला मलिदा चारून अठराचे अठरा एकर ऊस लावतो. १८ महिन्यांचे आडसाली ऊसपिकात त्याला एकूण रु.५४००० चा फायदा मिळतो किंवा त्याचे मासिक उत्पन्न रु.३००० येते. एवढी तर्कविसंगत गृहीततत्त्वे घेऊनही अशा परमधनाढ्य शेतकऱ्यास महिन्यास रु. ३००० मिळतात. हा पगार झाला एखाद्या तरुण अधिकाऱ्याचा किंवा आयुर्विमा महामंडळाच्या वयस्क कारकुनाचा. टाटा-बिर्ला-बडा बागायतदार अशी नामावली तोंडात घोळवणाऱ्यांनी याचा विचार करावा.

रास्त भावाची मागणी त्यातल्या त्यात मोठ्या शेतकऱ्यांची आहे असे मानले तरी त्यात गर्हणीय काहीच होणार नाही; पण शेतीमालाची रास्त किंमत ही केवळ मोठ्या शेतकऱ्यांची मागणी आहे काय? जो बाजारात काहीही विकावयास नेत नाही असा शेतकरी फार कमी प्रमाणात आहे. अगदी छोटा भूधारकदेखील कधी आठवड्याच्या बाजाराला नेण्यासाठी किलो दोन किलो का होईना बडीशेप, धने पिकवतो. चाकण, नाशिक, निपाणी आंदोलनात ज्या प्रचंड संख्येने छोट्या शेतकऱ्यांनीच नव्हे तर शेतमजुरांनीही भाग घेतला त्यावरून त्यांना या मागणीत प्रचंड स्वारस्य आहे हे उघड आहे. या स्वारस्याचे कारण फक्त समजून घ्यायला हवे.

ज्यांच्याकडे अपुरी शेती आहे ते आपल्या शेतीवर कामे करून राहिलेल्या

वेळात इतरांच्या शेतीवर कामे करतात. संपूर्ण वेळ शेतीवर काम मिळत नसले तर बिगरशेती रोजगार करतात. सर्व मोकळा वेळ वापरला जाण्याइतका रोजगार मिळत नाही हे भयानक सत्य आहे.

शेतीमालाला रास्त भाव मिळाल्यास शेतमजुरीचे दर वाढल्याने त्याचेही उत्पन्न वाढते. हा काही शुष्क तर्काचा किंवा भोळसट आशावादीपणाचा भाग राहिलेला नाही. कांद्याला १९७८ ते १९८१ या चार वर्षात सर्वसाधारणपणे उत्पादनखर्च भरून येईल असा भाव मिळाल्यानंतरचा अनुभव पाहता आता हे ठामपणे सांगता येईल, की शेतीमालास रास्त भाव मिळाल्यास शेतमजुरीचे दर शेतीमालाच्या भावाच्या वाढीच्या गतीपेक्षाही जास्त गतीने वाढतात. एवढेच नव्हे तर परत शेतीमालाचे भाव उतरल्यास मजुरीचे दर कमी होत नाहीत. १९७८ ते १९८१ या काळात कांद्याच्या खरेदीचा हमी दर प्रतिक्विंटल रु.४५ पासून रु. ६० पर्यंत वाढला, पण याच काळात मजुरीचा किमान दर रु. ३ पासून रु. ६ पर्यंत वाढला. शासकीय खरेदीच्या अभावी यंदा दुष्काळाच्या वर्षातही भाव घसरण्याची शक्यता असूनही यंदा मजुरीचे दर उतरले नाहीत.

शेतमालक न्यायी आहे, दयाळू आहे म्हणून चांगला भाव मिळाला तर तो मजुरालाही जास्त देतो असले मूर्खपणाचे विधान कोणीच करत नाही. आर्थिक फायद्यांची अशी झिरपण होत नसते. शेतीच्या हंगामात सर्वत्र मजुरांचा तुटवडा असतो. किफायतशीर किंमत मिळावी या अपेक्षेने शेतकरी उत्पादन वाढवतो. गेल्या काही वर्षांत कांद्याच्या व ऊसाच्या उत्पादनात जी लक्षणीय वाढ झाली त्यावरून शेतकरी किमतीच्या उत्तेजनास किती झपाट्याने प्रतिसाद देतो हे सिद्ध झाले आहे. उत्पादन वाढण्यासाठी भांडवली खर्चाची कामे -विहिरी खोदणे, बांधकाम इ. वाढतात. तसेच प्रत्यक्ष शेतीवरीलही कामे वाढतात. मजुरांची मागणी वाढल्यामुळे मजुरी वाढणे अपरिहार्य होते.

पंजाबमध्ये, महाराष्ट्राच्या ऊस-जिल्ह्यात उत्पादन-वाढ होऊनही त्या प्रमाणात मजुरीची वाढ झालेली दिसत नाही. या अपुऱ्या वाढीचे प्रमुख कारण हे, की गहू, भात या पंजाबातील उत्पादनास अत्यंत अपुऱ्या किमती मिळतात. तर ऊसासही १९८० सालचा अपवाद सोडल्यास वाजवी किमती सतत मिळाल्या नाहीत. उत्पादनवाढ होऊनही उत्पन्नवाढ न झाल्यामुळे मजुरीच्या दरातील वाढ कमी राहिली. याहूनही जास्त महत्त्वाचा एक घटक लक्षात घेतला पाहिजे. पंजाबमधील गरजा भागविण्यासाठी मध्य प्रदेश व बिहारमधील लक्षावधी मजूर आज पंजाबमधील शेतावर काम करीत आहेत. महाराष्ट्रातील ऊस- जिल्ह्यात मराठवाड्यातील बीड,



उस्मानाबादकडील शेतकरी मोठ्या प्रमाणावर काम करण्यासाठी आले. या प्रवाहामुळे उत्पादनवाढीच्या प्रदेशात मजुरीची अपेक्षित वाढ दिसून आली नाही. तरी मध्य प्रदेश, बिहार व मराठवाडा या आधीच दरिद्री प्रदेशात मजुरीचे भाव कडाडून एक नवीन समस्या तयार झाली आहे.

शेतीमालाचे भाव व मजुरीचे दर यातील संबंध स्पष्ट आहे. शेतमजुरांची चळवळ बांधून मजुरीचे दर वाढवून घ्यायचे म्हटले तरी शेतमालकाची कुवत नसेल तर त्या चळवळी यशस्वी होण्याची सुतराम शक्यता नाही. मजुरीवर पोट भरणाऱ्यांनाही हे कळते, पोथीनिष्ठ चळवळ्यांना कळत नाही. यातच शेतमजूर चळवळीच्या आजच्या विफलतेचे कारण आहे.

एखादा कारखानदार म्हणू लागला, की मला मजुरांच्या मागणीप्रमाणे वेतन देणे शक्य नाही तर आपण त्याल्या रोखठोक सांगू, 'तुला गरजेइतके वेतन देता येत नसेल तर तू व्यवसाय सोडून दे.' शेतमालकांनाही हेच सांगितले पाहिजे. हे सांगता येत नाही याचे कारण एकच. त्याची अगतिकता शासकीय धोरणामुळे आलेली आहे, त्याच्या अकार्यक्षमतेमुळे नाही.

समजा, पुढे कोण्या काळी असे दिसून आले, की प्रत्यक्षात शेतमजुरापर्यंत रास्त भावाचा फायदा पोहोचत नाही; तर निदान शेतमजुरांच्या चळवळीला आवश्यक ती परिस्थिती निर्माण होईल आणि अशा वेळी शेतकरी संघटना शेतमालकांविरुद्ध आंदोलने उभारण्यास प्रतिज्ञाबद्ध आहे.

शेतमजुरांची परिस्थिती केवळ मजुरीचे दर वाढून सुधारणार नाही. प्रचंड प्रमाणावर नवे शेती व बिगरशेती रोजगार तयार होणे आवश्यक आहे. शेतमजुराच्या बेरोजगारीच्या समस्येस आजच्या कार्यव्यवस्थेत उत्तर असूच शकत नाही. प्रचंड संख्येने शेतकरी शहरांकडे धाव घेत आहे. शेतीचा हंगाम संपल्यावर गावागावात बेकार बसून राहतो आहे. एक रोजगार तयार करण्यास लाख दोन लाख रुपये भांडवली खर्च लागतो. म्हणून बेकारीची समस्या भयानक रूप धारण करीत आहे. रास्त भावांच्या धोरणाने शेतीतील रोजगारांची क्षमता वाढेल. एवढेच नव्हे, शेतीतील बचतीतून कमी भांडवल लागणारे उद्योग-धंदे ग्रामीण पातळीवर तयार होतील. जपानमध्ये, कोल्हापूरमध्ये झाले. इतरत्रही होतील. शेतकऱ्यांकडून शेतीतील बचत अपुऱ्या किमतींच्या धोरणाच्या साधनाने लुटून नेण्याचे धोरण सोडून दिले तर रोजगार मोठ्या प्रमाणावर झपाट्याने, थोड्या खर्चात तयार होतील.

शेतीमालास रास्त भाव मिळाले तर शेतमजुरीच्या वाढीने छोट्या व भूमिहीन शेतकऱ्यांचा ताबडतोब फायदा होतो. दीर्घ काळात रोजगार तयार झाल्याने त्यांचा

फायदा होणार आहे. ही जाणीव डाव्या विचारवंतांना नसली तरी छोट्या शेतकऱ्यांना आहे, भूमिहीनांना आहे. म्हणूनच ते संघटनेच्या मागे उभे राहतात. मोठा शेतमालक व छोटा शेतमालक हे वेगवेगळे वर्ग आहेत, त्यांच्या आर्थिक हितसंबंधांत संघर्ष आहे हा डाव्या विचारवंताचा एक आवडता सिद्धांत आहे. अनुभवाची कसोटी लावता या सिद्धांताला काहीही आधार सापडत नाही.

आर्थिक तोट्यामुळे शेतीत भांडवलनिर्मिती होत नाही. त्यामुळे दर पिढीत जमीन वाटली जात आहे. जमिनीचे अधिकाधिक छोटे तुकडे पडत आहेत. छोट्या शेतकऱ्यांच्या जमिनीचा आकार कमी होत आहे व मोठ्यांकडील जमिनीचा आकार वाढत आहे. असे दोन विरुद्ध प्रवाह दिसत असते तर वर्गसंघर्षाच्या सिद्धांताला काही अर्थ राहीला असता. प्रत्यक्षात आकडेवारी प्रत्येक पायरीच्या शेतकऱ्यांची घसरण होत आहे आणि भूमिहीनांची संख्या वाढते आहे हेच दाखवते (सोबतचा तक्ता पहा).

१९५४ ते १९७१ या काळात पंधरा एकरांवर जमीन असलेल्यांची संख्या घटली, त्याचे प्रमाण घसरले, एकूण जमीन आणि तिची टक्केवारीही कमी झाली. ही घसरण काही शोषकवर्गाचे लक्षण नव्हे. समग्र शेतीव्यवसायचे योजनाबद्ध शोषण होत आहे आणि त्याचा अपरिहार्य परिणाम म्हणून शेतीचे आकार घटत आहेत. छोट्या आणि मोठ्या शेतकऱ्यांतील फरक जात्यातला आणि सुपातला इतकाच आहे.

याच अर्थ असा नव्हे, की जमिनीच्या फेरवाटपास संघटना विरोध करते. गरिबीचा प्रश्न जमिनीच्या फेरवाटपाने सुटणार आहे असे वाटत असेल तर तेही करून पहा. आजपर्यंतचे प्रयत्न फसले. ज्यांना शेतजमीन मिळाली तेही खलास झाले. कुळकायद्यामुळे जमीन गमावल्यामुळे जे गाव सोडून गेले त्यांची मुले, नातवंडे आज कोठच्या कोठे पोहोचली आहेत. ज्यांना जमीन मिळाली तेमात्र भुईसपाट झाले आहेत. आणीबाणीच्या काळात वाटलेल्या जमिनी पडून का राहिल्या याचाही विचार होणे आवश्यक आहे.

पण तरीही जमिनीच्या फेरवाटपास संघटनेने विरोध केलेला नाही. १८ एकर बागायती जमिनीच्या मालकाची मालमत्ता फार फार तर तीन चार लाख रुपयांची होते. एवढी किंमत तर पुण्यामुंबईतल्या एका छोटेखानी मध्यमवर्गीयाच्या फ्लॅटची होते. तरीसुद्धा शेतीची कमाल धारणा कमी करण्यापूर्वी त्याच प्रकारचा कायदा शहरी मालमत्तेवरही लागू करावा असा आग्रहसुद्धा संघटना धरणार नाही; पण गरिबांतील गरिबांना जे द्यायचे ते फायद्याचे साधन हवे असा आग्रहमात्र संघटना



## प्रत्यक्ष लागवडीखालील जमिनीची धारणा

| जमीनधारणेचा आकार (एकरात) | सन १९५४-५५ खात्याची संख्या लाखात | टक्केवारी | कसलेली एकूण जमीन लाखात | टक्केवारी | सरासरी आकार (एकरात) | १९७१-७२ खात्यांची संख्या लाखात | टक्केवारी | कसलेली एकूण जमीन लखात | टक्केवारी | सरासरी आकार एकरात |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ० ० ० | १७.२ | २८.२ | -- | -- | २१.९ | २७.४ | -- | -- | | -- |
| ०.०१-०.९९ | ८.६ | १४.२ | ३६ | १.१ | ०.४१ | ११.९ | १४..२ | ६.२ | १.७ | ०.५१ |
| १.००-२.४९ | ८.५ | १४.१ | १४.६ | ४.३ | १.७१ | १४.४ | १८.० | २७.७ | ७.६ | १.९२ |
| २.५०-४.९९ | ९.१ | १५.० | ३३.६ | १०. | ३.६९ | १३.२ | १६.४ | ५४.५ | १४.९ | ४.१३ |
| ५.००-७.४९ | ५.३ | ८.७ | ३३.२ | ९.९ | ६.२६ | ६.९ | ८.७ | ४८.७ | १३.३ | ७.०५ |
| ७.५०-९.९९ | ३.३ | ५.४ | २९.३ | ८.७ | ८.८७ | ३.४ | ४.३ | ३४.० | ९.३ | १०.०० |
| १०.००-१४.९९ | ३.४ | ५.६ | ४२.१ | १२.५ | १२.३८ | ३.८ | ४.७ | ५२.० | १४.२ | १३.६८ |
| १५ आणि जास्त | ५.५९.० | | १७९.३ | ४३.४ | ३२.०६ | ४.५ | ५.६ | १४२.७ | ३९.० | ३.७ |

(नॅशनल सँपल सर्व्हे)

अवश्य धरील. शेतीमालाला रास्त भाव मिळू न देण्याचे धोरण बंद करा, शेती हा फायद्याचा व्यवसाय होऊ द्या, जमीन हे फायद्याचे कलम होऊ द्या आणि मग खुशाल फेरवाटपाचे कार्यक्रम आखा, त्यात निदान काही तर्कशुद्धता येईल.

आजच्या परिस्थितीत 'इंडिया'त गडगंज मालमत्ता उभारण्याची परवानगी आणि 'भारता'तील कंगालांमध्ये त्यांच्या दारिद्र्याची फेरवाटणी असले आचरट प्रस्ताव सूडबुद्धीने मांडले जातात. हे मान्य करणे अशक्य आहे. शेतकरी संघटनेने एक संपूर्ण नवा अर्थविचार मांडला आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र झालेल्या वसाहतींच्या गरिबी हटवण्याच्या प्रयत्नात त्याचा सुसंगत खुलासा करणारा हा विचार आहे. हा खुलासा करणे प्रस्थापित भांडवलदारी अर्थशास्त्र्यांना जमलेले नाही. समाजवादी अर्थशास्त्र्यांना तर नाहीच नाही. भांडवलनिर्मितीचे साधन श्रमशक्तीच्या शोषणातून होणारे अतिरिक्त मूल्य हे सूत्र मार्क्सकालीन आर्थिक समस्येस पुरेसे होते. आजच्या समस्या सोडवण्यास ते फार तोकडे पडत आहे. औद्योगिक प्रगतीसाठी लागणारी भांडवलनिर्मिती प्रमुखत: शेतीत होणाऱ्या नैसर्गिक गुणाकारातून होते. साम्राज्यवादाचा प्रमुख हेतू वसाहतीतील कच्च्या मालाच्या शोषणातून भांडवलनिर्मिती करणे हा होता. त्या काळात वसाहती दरिद्री होत गेल्या याचे कारण साम्राज्यवादी शोषण हे होय. स्वातंत्र्यानंतर पूर्वीच्या सर्व वसाहतींत गरिबी वाढत राहिली याचे कारण नव्या राज्यकर्त्यांनी साम्राज्यवाद्यांचे शोषणाचे धोरण देशाच्या हद्दीच्या आत वापरणे सुरू ठेवले. औद्योगिक विकासासाठी शेतीत होणारी बचत वापरणे अपरिहार्य आहे; पण याचा अर्थ ती बचत शेतकऱ्याकडून काढून नेली पाहिजे असे नाही. शेतकऱ्याच्या हाती या बचतीचे भांडवलात रूपांतर अधिक सुयोग्य, सुसंगत आणि संतुलित रीतीने होऊ शकते. शेतकऱ्यांच्या शोषणाशिवायही औद्यागिक विकास होऊ शकतो, इतका साधा, सोपा, सरळ आणि स्पष्ट असा विचार आहे. तिसऱ्या जगातील राष्ट्रांना आर्थिक आघाडीवर आलेल्या अपयशाचा पर्यायी तर्कशुद्ध खुलासा दिल्याखेरीज हा विचार आता कोणालाही सहजासहजी दूर सारता येणार नाही.

शहरी संपन्नांकडून संपत्ती काढून घेऊन ग्रामीन गरिबांना ती वाटावी अशा धर्मादायांचे हे वांझोटे तत्त्वज्ञान नाही. अशा धर्मादायांच्या विचाराला रोजगार हमी योजनेसारखा कार्यक्रम पुरा वाटेल. मग त्यात कितीही लाचारी आणि भ्रष्टाचार असो. समाज कायमचा रोजगार हमी योजनेवर जगू शकत नाही. विकासाची तर गोष्टच दूर. अर्थव्यवस्थेतील तुंबारे काढून अभिसरण पुन्हा एकदा सुरू करून द्यावे म्हणजे विकासाची निसर्गसिद्ध प्रक्रिया जिवंतपणे चालू होईल.

हा विचार प्रत्यक्षात उतरवण्याचे काम शेतकऱ्यांना करावे लागणार आहे. क्रांतीच्या



प्रक्रियेत कामगार व शेतकरी यांच्या तौलनिक भूमिकांविषयी अनेकवार डाव्यांमध्ये चर्चा झाली आहे. चीनमध्ये हा विवाद शेतकऱ्याच्या बाजूला किंचित झुकला. या वादाचे तर्कशुद्ध उत्तर संघटनेच्या विचारात मिळते. भारताचे इंडियाकडून होणारे शोषण ही आजची महत्त्वाची संघर्षरेषा आहे. याचा अर्थ असा नाही, की भारताच्या अंतर्गत संघर्ष नाहीत. अवश्य आहेत. उद्या कदाचित ते अधिक प्रखरही होतील; पण भारताच्या शोषणाविरुद्ध सामना छोट्यामोठ्या सर्व शेतकऱ्यांना एकसंध आघाडीनेच करावा लागेल. हा बाहेरचा संघर्ष सुटल्याखेरीज अंतर्गत संघर्ष सुटण्याची सुरुवातसुद्धा होणे शक्य नाही.

डाव्यांच्या क्रांतितत्त्वज्ञानाबाबत कळत न कळत एक मोठी चूक वारंवार आढळते. शोषित शोषकांविरुद्ध लढा उभारतात. कमालीचे शोषण झाले, की शोषित उफाळून क्रांती करतात. प्रस्थापित व्यवस्था उधळून देण्यास कंबर बांधतात असा काहीतरी विचार त्यांच्या मनात खोल रुजलेला असतो.

अगदी शरीरशास्त्राच्या दृष्टीनेसुद्धा ही कल्पना अवास्तव आहे. अतिशोषितांत उठण्याची ताकद नसते. शोषणाच्या अगदी सुरुवातीच्या पायरीत त्यांची प्रतिकारक्षमता खलास होते. प्रत्यक्षात शोषक क्रमांक एकविरुद्ध आघाडी उघडतात असे दिसते. शोषितांचे नाव घेऊन ते ही आघाडी उघडतात. इंग्रजांविरुद्ध आघाडी स्थानिक भांडवलदार उघडतात. गांधींचे तत्त्वज्ञान धारण करुन उघडतात. इंग्रजांना दूर केल्यावर गांधींना स्मरण्याची त्यांना काहीच आवश्यकता राहत नाही.

परिवर्तनात गुणात्मक बदल घडवून आणायचा असेल तर क्रांतीच्या प्रक्रियेत योग्य वेळी दुसरी छलांग मारावी लागते. ती मारण्याची ताकद गांधीवाद्यांत मुळातच नव्हती. म्हणूनच भारतीय स्वातंत्र्याची चळवळ फसली. शेतकऱ्यांच्या या आंदोलनातही योग्य वेळी दुसरी उडी मारण्याची तयारी भारताचे अंतर्गत शोषणही ज्यांना दूर करावयाचे आहे त्यांना ठेवावी लागेल. आंदोलनापासून दूर राहून किंवा त्याला विरोध करून हे साधणार नाही.

सर्व डाव्या विचारवंतांनी अशा परिस्थितीत वस्तुत: शेतकऱ्यांच्या या नवीन आंदोलनात स्वत:स सर्व ताकदीने झोकून द्यावयास हवे. ते न करता जुन्या पोथ्यांच्या आधाराने ते भारताच्या अंतर्गत संघर्षावर भर देत राहतील तर ते मोठे दुर्दैवाचे ठरेल. शेतकऱ्यांत भेदाभेद पाडावेत, वर्ग, धर्म, जात, पक्ष अशा भेदांनी त्यांना फोडावे हे प्रयत्न इंडियावाले करत आहेत, करणार आहेत. त्यांत डावेही सामील होऊन इंडियाच्या फोडा व झोडा नीतीस हातभार लावतील तर ती डाव्या विचारसरणीची शोकांतिका ठरेल.

*२१ मे, ६ जून १९८३*

□□

## तेरा

# शेतकरी संघटनेचे नैतिक दर्शन

शेतीमालाला रास्त भाव हा शेतकरी संघटनेचा एकसूत्री कार्यक्रम आहे. उत्पादनवाढीमुळे, औद्योगीकरणाने मानवी जीवनाच्या स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावतात. परंतू आजपर्यंतचे औद्योगीकरण भांडवलदारी व्यवस्थेत असो का समाजवादी अवस्थेत, शेतीच्या शोषणातून तयार होणाऱ्या भांडवलातून तयार झाले. त्यामुळे त्याचे फायदे विशिष्ट गटांपुरते मर्यादित राहीले. विकासाची गती मंद राहीली. आर्थिक विषमता वाढत गेली, नैसर्गिक व सामाजिक प्रदूषणाचे विक्राळ प्रश्न निर्माण झाले. हे दुष्परिणाम औद्योगीकरणाचे नाहीत. औद्योगीकरणाकरिता वापरण्यात आलेल्या भांडवलनिर्मितीच्या विपरीत प्रक्रियेचे आहेत. निसर्गसिद्ध भांडवलनिर्मितीच्या प्रक्रियेतून निरोगी औद्योगिक समाज तयार होऊ शकेल. त्या समाजाच्या स्वत:च्या अशा समस्या असतीलच पण सध्या समोर दिसत असलेले प्रश्न सोडवण्याची सुरुवात 'शेतीमालाला रास्त भाव' या कार्यक्रमापासूनच होते हा विचार संघटनेने मांडला आहे.

ही एक संपूर्ण विचारपद्धती आहे, पण ती अपुरी आहे असे अनेकांना वाटते. शेतकऱ्याच्या स्वार्थाच्या मागणीवर उभी राहणारी चळवळ कर्तव्य भावनेची जोपासना करणार नाही. तिला नैतिकतेचे अधिष्ठान असणार नाही अशी त्यांनी भीती वाटते. शेतकरी आंदोलनातून उभ्या राहणाऱ्या नव्या समाजाचे काही स्पष्ट चित्रण केले पाहिजे असा त्याचा आग्रह असतो. संघटनेच्या विचारपद्धतीतील नैतिकता आज तपासून पहावयाची आहे.

नैतिकता ही काय चीज आहे? नैतिकतेचा मार्ग कोणता? महात्माजींना एकदा विचारले, 'शांतीचा मार्ग कोणता?' बापूजींनी उत्तर दिले, 'शांतीचा मार्ग नाही, शांती हाच मार्ग आहे.' तसेच नैतिकता ही काही विवक्षित अवस्था नाही. नैतिकतेचा काही मार्ग नाही, नैतिकता हाच मार्ग आहे.

नीतिमत्तेच्या कल्पना वेगवेगळ्या काळात वेगवेगळ्या समाजात बदलताना दिसतात. माणसाच्या आर्थिक व्यवहारासंबंधी आणि त्या अनुषंगाने लैंगिक



वर्तणुकीविषयी प्रत्येक समाजात काही संकेत, रूढी, धर्मशास्त्र, नियम, कायदे असतात. स्त्रीसत्तेपासून स्त्रीदास्यापर्यंत, ब्रम्हचर्यापासून ते प्रौढसंमतीच्या स्वैराचारापर्यंत सर्व प्रकारचे नीतीनियम इतिहासात सापडतात. वर्णाश्रमधर्मापासून ते महम्मदाच्या सामायिक व्यवस्थेपर्यंत, पूर्वजपूजेपासून व्यक्तिस्वातंत्र्यापर्यंत नैतिकतेच्या अनेकविध छटा पहावयास मिळतात. अर्थव्यवस्थेच्या विकासाबरोबर नीतिव्यवस्थाही बदलताना दिसते. शेतीप्रधान समाजाची धारणा औद्योगिक समाजासारखी नसते. खाजगी मालमत्तेवर आधारलेले समाज, आपली वेगळी नैतिकता तयार करतात. स्थिर समाजाचे नियम लढाया, उत्पात इत्यादींनी वारंवार हादरे खाणाऱ्या समाजापेक्षा साहजिकच निराळे असतात. अर्थव्यवस्था बदलली की नीतिमत्ताही बदलते.

तरीही बहुतांश समाजांनी मानलेल्या नियमांत एक सूत्र सापडते. स्वार्थाचा त्याग करून दुसऱ्याचे भले करण्यात काही एक मोठेपण आहे असे बहुतेक काळात मानले गेले आहे. दुसऱ्यासाठी जगलास तर अमर झालास, स्वत:करता जगलास तर मेलास अशा अर्थाची अनेक बोधवचने सतत वापरली जात असतात. अमक्याने जातीसाठी, धर्मासाठी, देवासाठी स्वार्थत्याग केला असे गुणगान केले जाते. स्वार्थ ही पाशवी प्रवृत्ती, परसेवा ही नैतिकता, गरिबांना दान, धर्मार्थ दवाखाने, शाळा, धर्मशाळा इ. ही औदार्याची आणि म्हणून नैतिकतेची कामे मानली जातात.

'संसार करावा नेटका' किंवा 'जोडोनिया धन उत्तम वेव्हारे' सारखी अपवादात्मक वचने सोडल्यास संतवाणी ही वैराग्याची, नि:संगत्वाची आणि गरिबीची गुणगाने करण्याकरताच राबली आहे. स्वार्थ ही सहजप्रवृत्ती आहे, तर स्वार्थ सोडून देण्याकडे सर्व महापुरूषांची शिकवण.

जे दुर्लभ त्याची किंमत जास्त या मागणीपुरवठ्याच्या अर्थशास्त्रीय सिद्धांतानुसार परहितरत वर्तणुकीला अलोट महत्त्व मिळाले असावे. परार्थाच्या महत्त्वाचे दुसरेही एक कारण असू शकेल. (व्यावहारिक जगातील आणि व्यवहारात प्रत्यक्ष संबंध न येणाऱ्या व्यवस्थेविषयी व्यक्तीची मते किंवा समाजधारणा नेमक्या उलट्या असतात. असा अनूभव आहे. उदाहरणार्थ, विश्वाची स्वयंभू उत्क्रांती मानणारे मार्क्सवादी अर्थव्यवस्थेला नियोजनाची आवश्यकता प्रतिपादतात तर, विश्वकर्त्यावर श्रद्धा सांगणारे अर्थव्यवस्थेचा खूल्या विकासाची महती सांगतात.) व्यवहारात स्वार्थाने वागल्यानंतर शब्दात परार्थाचे गुणगान गायले, तर मन:शांती सुलभ होते म्हणूनही परार्थाचे हे कौतुक असावे. बलाढ्यांनी ताकदीच्या बळावर जगावर प्रभूत्व गाजवायच्या दिवसात दीनदुबळ्यांच्या साहाय्याला क्वचितच यातील काही संतवचने आली असतीलही. सत्तेच्या भर सद्दीत कोणा सुलतानाला संतांच्या शिकवणीमुळे

बंधने पडल्याचे इतिहास क्वचितच सांगतो. तरीही आक्रमणे, लढाया, लुटालुटींनी आजउद्यावर, हातातोंडावर जगणाऱ्या समाजाला संतांनी, तत्वज्ञांनी निव्वळ स्वार्थाच्या विचाराने मान्य न होण्यासारखी उद्दिष्टे स्वीकारायला लावली हे मानले पाहिजे.

एकेकाळी मुंबईतील माणसे बसच्या रांगेची शिस्त कटाक्षाने पाळत. एका बसमध्ये जागा मिळाली नाही, तर शांतपणे दुसरी येण्याची वाट पाहात थांबत. त्या काळी दिल्लीकर बस पकडताना पराकोटीची बेशिस्त आणि हुल्लड दाखवत असे. याचा अर्थ दिल्लीवाले कमी नीतीमान आहेत, असा नाही. मुंबईच्या व्यवस्थेत एक बस गेली तरी दुसरी, नाही तरी त्या पुढची मिळण्याची जवळ जवळ खात्री वाटत असे. दिल्लीत तर तशी आशाही नसे. यामुळे दोघांच्या वर्तणुकीत फरक पडतो.

भविष्यात जितके दूर पाहण्याची शक्यता तितका मनुष्य नागड्या स्वार्थापासून दूर जातो. डोंगराच्या शिखरावरून पाहिले, विश्वाच्या व्यापकतेच्या तुलनेने स्वतःची, स्वतःच्या इच्छा- आकांक्षांची क्षुद्रता जाणवली, की काही काळ विचार बदलतात, तसाच हा प्रकार आहे. आजची भ्रांत आहे, उद्याची आशा नाही, कोण काय म्हणेल याची चिंता करण्याचे कारण नाही या अस्वथेत नागड्या तात्काळ स्वार्थाची उपज सहज होते. आजचा प्रश्न सुटला आहे, उद्याचा विचार करण्याची फुरसद आहे, तर मनुष्य थोडा दूरचा विचार करून दुरच्या फायद्यासाठी आजच्या स्वार्थाला मुरड घालू शकतो. सर्व व्यवस्थित असले, तर अगदी जन्मांतराचीसुद्धा चिंता वाहता येते. आर्थिक स्थैर्याची भावना व परार्थाची नीतिमत्ता यांच्यात निश्चित संख्याशास्त्रीय संबंध आहे.

आर्थिक विपन्नतेतही परार्थाची आवड आणि संपन्नतेतही दुष्टता अनेक व्यक्तीत सापडतातही, पण संख्याशास्त्रीय संबंध त्यामुळे नाकारता येणार नाही. परार्थ हा व्यापक स्वार्थच असतो. परार्थाचा हा अर्थ समजून घेऊन अवघ्या मानवजातीला एका मानसिक गुलामगिरीतून सोडविणे आवश्यक आहे. खावे, पहावे, उपभोगावे या नैसर्गिक प्रेरणा. त्यांचे यथायोग्य पोषण झाले, तर सहभोगाचीही गोडी वाटू लागते. गावाबरोबर जगण्यात आनंद वाटू शकतो. राष्ट्राकरता प्राण देण्याची उर्मीही तयार होऊ शकते. त्यातही एका अलोट आनंदाचा अनुभव घेता येऊ शकतो.

प्रचंड दुःख आणि यातना सोसून केवळ दुसऱ्याच्या भल्याकरता मी हे दिव्य करीत आहे असे कोणी म्हटले, की माझ्या मनात भीतीच्या घंटा वाजू लागतात. असे म्हणणारा निरोगी मनाचा नाही. याने काही लपवलेले आहे, या बोकेसंन्याशाच्या मनात काही क्षुद्र स्वार्थ आहे. ते तो धूर्तपणे लपवित आहे. मी हे माझ्या आनंदाकरिता करतो आहे, स्वार्थाकरिता करतो आहे, हे सांगण्यात कोणालाही शरम का वाटावी? परार्थाची साखर पेरणारा क्षुद्र स्वार्थ साधतो. त्यापेक्षा स्वार्थी बना, जितक्या व्यापक



अर्थानी, जितक्या मार्गांवर आयुष्य परिपूर्ण करता येईल तितके करा. दुसऱ्याचे हक्क लाथाडू नका. परार्थ म्हणून नव्हे, निव्वळ स्वतःच्या आयुष्याची परिपूर्णता कमी होऊ नये म्हणून, अशी शिकवण ठीक. हीच खरीखुरी नैतिकता होईल.

हक्क आणि कर्तव्य यातील विभिन्नता ही अशाच काल्पनिक आहे. हक्क मागताना कर्तव्याची जाणीव विसरता कामा नये हे प्रबोधन वापरून अगदी गुळगुळीत झाले आहे. या दोघात असा काही भेद खरोखरच आहे काय? जे स्वतःच्या हक्काचे आहे, केवळ तेवढेच आहे, त्यापेक्षा लवमात्र जास्त नाही ते कर्तव्याविरुद्ध जाऊच शकत नाही. प्रत्येक फुगवलेली मागणी आणि चढवलेला हक्क हे आरंभापासूनच कर्तव्यच्युत असतात. दुसऱ्याचे हक्क संकुचित करणारे असतात.

शेतकरी संघटना भविष्यातील आदर्श समाजाचे काहीच स्वप्न देत नाही; स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणे हा मार्ग सांगते, पण या कक्षा रुंदावत पोचायचे कोठे हेही सांगत नाही. नैतिकता ही कोणत्याही एका विवक्षित व्यवस्थेत नाही, ती मार्गक्रमणात आहे असे मानल्यानंतर आदर्शभूत समाज ही कल्पनाच अर्थहीन होते. आदर्शाची चित्रणे करणाऱ्या विचार पद्धतीपैकी मार्क्स व गांधी यांच्या स्वप्नसृष्टीचे काय झाले हे पाहण्यासारखे आहे. मार्क्सवादाच्या समग्र विचारपद्धतीवर विसाव्या शतकातील कामगार चळवळ उभी राहीलेली आहे. जडवाद, विरोध-विकासवाद, विपरीत उत्पादनसंबंध, खाजगी मालमत्ता, अतिरिक्त मूल्य, मजुरांचे शोषण, वर्गसंघर्ष यातून भांडवलशाहीचा अटळ विनाश, यातून समाजवादी वर्गरहीत, शोषणरहीत समाजाची निर्मिती व त्यांतून मानवी मनाची मुक्ती एवढे सर्व विश्वाला व्यापून दशांमुळे उरणाऱ्या तत्वज्ञानाच्या पायावर शास्त्रीय समाजवादाची उभारणी झाली. जगातील सर्व कामगारांना एक करण्याचे स्वप्न पहात कामगार चळवळ जगभर उभी राहीली. आपल्या देशात अनेकांनी या चळवळीत स्वतःला झोकून दिले, बलिदान केले. मजुरीच्या रूपात, बोनसच्या रुपात, नोकरीच्या अटी, शर्तीबाबत सुधारणा असे अनेक फायदे मजुरांनी पदरात पाडूनही घेतले, पण मार्क्सवादी दर्शनाची बांधिलकी तयार झाली नाही.

कामगार नेतेपण हा एक व्यवसाय होऊ लागला. जो पाच दहा रुपये जास्त मिळवून देईल, त्याच्यामागे कामगार जाऊ लागले. कामगारक्रांतीच्या मार्गाने मानवजातीच्या मुक्तीचे स्वप्न पाहणाऱ्या कार्यकर्त्यांना सोडून. ही हकीकत आहे. ज्या देशात तथाकथित मार्क्सवादी राजवट आली तेथे घडून आलेले बदलही किरकोळ, भांडवलशाही व्यवस्थेचा हा नवा अवतार असे वाटावे अशा धर्तीचे. हे असे का झाले? मार्क्सने नैतिक प्रश्नावर मौन पाळले होते. कामगारांचे शोषण थांबवा,

उपयोगमूल्य व विनिमयमूल्य यातील तफावत रद्द करा अशी निव्वळ 'मागणीबहाद्दर' भूमिका त्याने घेतली नव्हती, तरी त्याच्या आंदोलनाची नैतिक परिणती त्याला पाहिजे तशी झाली नाही. अर्थव्यवस्थेच्या बदलांतून अपेक्षित परिवर्तन घडून आले नाही.

नैतिकतेवर अर्थव्यवस्था आधारू पाहणाऱ्या महात्मा गांधींची शोकांतिका याहूनही भयानक आहे. जगाच्या इतिहासात म. गांधींइतका कोणत्याही युगपुरुषाशी त्यांच्याच शिष्यांनी द्रोह केला नसेल. गांधीवादाला अपेक्षित आर्थिक व्यवस्थेच्या नेमकी उलटी व्यवस्था त्यांच्या परमशिष्यानी उभारू घातली. गांधीवादी नैतिकतेला त्यांच्या शिष्योत्तमांनीच उलथवली. इतर जगात तर विचारायलाच नको. महात्मा गांधींनी तर त्यांच्या विचारात नैतिक बाजू कोठेही लंगडी ठेवली नव्हती, पण प्रत्यक्षात तिचा समाजजीवनावर काहीच परिणाम झाला नाही.

जगन्मान्य थोर विचारवंत लोकधुरिणांच्या दर्शनाची ही शोकांतिका विचार करावयास लावणारी आहे.

पहिला प्रश्न निर्माण होतो तो हा, की या प्रेषितांनी आदर्श समाजाची पाहिलेली स्वप्ने योग्य होती का? तत्कालीन समाजातील समस्यांचे अचूक विश्लेषण त्यांनी केले. ते दोष दूर केल्यानंतर या आदर्श समाजाची निर्मिती होईल त्याचे मोठे मनोहारी चित्रण हर 'पैगंबराने' उभे केले. ॲरिस्टॉटल, प्लेटो पासून क्रोपोटकीन-मार्क्स-गांधीपर्यंत प्रत्येकाने एक आदर्श समाजाचे लोभस चित्र लोकांसमोर ठेवले.

अतिरिक्त मूल्याचे विश्लेषण मार्क्सने केले. तेवढ्या आधारावर कामगारक्रांतीची आणि वर्गहीन समाजाची स्वप्ने रंगवणे हे मार्क्ससारख्या प्रक्रांड बुद्धिवाद्याला कसे काय योग्य वाटले? अहिंसा, सत्य अस्तेय, बह्मचर्य आणि अपरिग्रह या आदर्शावर समग्र समाज उभा राहिल्याची कल्पना करणे कितपत वास्तववादी होते?

प्रत्येक छायाचित्राचा एक केन्द्रबिन्दू असतो. त्या बिन्दूत प्रतिमा सर्व स्वच्छ आणि स्पष्ट असते. त्या बिन्दूपासून जितके दूर जावे तितकी प्रतिमेची गुणवत्ता कमी होत जाते. प्रत्येक छोट्या-मोठ्या विचारवंताच्या विचारपद्धतीचेही असेच असते. काही केन्द्रबिन्दूत त्यांना त्यांच्या काळात व परिस्थितीला अनुरूप असा साक्षात्कार होतो. बुद्धिनिष्ठ सचोटी राखून आपला विचार तेवढ्यापुरताच मर्यादित ठेवावा हे आजपर्यंत थोराथोरांना जमलेले नाही. आपल्याला गवसलेल्या सत्यकणांच्या आधारे विश्वव्यापी पसाऱ्याला गवसणी घालण्याच्या मोहाला मोठे-मोठे बळी पडले आहेत. विश्वाला गवसणी घालण्याच्या प्रयत्नात त्यांनी स्वत:च्या पराभवाचा पाया घातला.

मडक्यातलं दूध विकेन, त्यातून शेळी घेईन, शेळ्यांचा कळप झाला म्हणजे



विकून गाई घेईन, त्यांची संख्या वाढली म्हणजे त्या विकून श्रीमंत होईन, राजकन्येशी लग्न लावीन, तिला रागावून लाथ मारेन अशा दिवास्वप्नात समोरच्या मडक्यालाच लाथ मारणाऱ्या पोराप्रमाणे प्रेषितांचीही स्थिती झालेली दिसते.

आपल्या विचाराचा भविष्यावर परिणाम काय होईल याचे चित्रण करताना बुद्धिनिष्ठ कठोर तर्कशास्त्राला सोडून देण्याचा मोह त्यांना का पडला? आसपासच्या पंडितांचा बौद्धिक कंड शमविण्याकरिता? अनुयायांना एक विशाल दर्शन देऊन सर्वसंगपरित्यागाला तयार करण्यासाठी? स्वप्ने विकण्याच्या धंद्यात ते का पडले हे सांगणे कठीण आहे.

मुळात आदर्श, सुखी, शांतिपूर्ण समाज ही कल्पनाच हास्यास्पद आहे. मनुष्यप्राणी संपूर्ण सुखी होऊच शकत नाही. कधी काळी तो असा सुखी झाला, तर त्याकारणानेच तो दु:खी होईल. विरोधविकासवादाच्या जनकालासुद्धा परिपूर्ण समाजाचे स्वप्न रंगवावेसे वाटले म्हणून आश्चर्य ते कोणते? समाज एका दोषास्पद अवस्थेतून दुसऱ्या दोषास्पद अवस्थेकडे जातो. प्रयत्नांना वाचा हवी असते, ती वाचा पुरवण्याचे काम तत्कालीन पैगंबराकडे जाते.

मग प्रश्न निर्माण होतो तो हा, की परिवर्तनात थोर व्यक्तींनी नेमकी काय भूमिका बजावली. पैगंबराच्या विचारांच्या आधारे समाज परिवर्तन घडून येते ही कल्पनाही पूर्णपणे भ्रामक आहे. रुसो, वॉल्टेअर यांच्या विचारांनी फ्रेंच राज्यक्रांती घडली नाही, मार्क्समुळे रशियन क्रांती घडली नाही. गांधीवादामुळे भारतातील स्वातंत्र्य चळवळ उभी राहिली नाही. समाज परिवर्तनाची दिशा ठरवत असतो, मार्गक्रमण करीत असतो. मार्गक्रमाचे समर्थन करणारा सोयिस्कर विचार आसपासच्या विचार-मंडीत शोधला जातो, आवश्यक तर उत्खनन करून काढला जातो. वाळवंटातील भटक्या टोळ्यांना इस्लाम प्रसाराचे तत्वज्ञान सोयिस्कर होते. सर्व युरोपखंडात एकाकाळी प्रभुत्व असलेल्या, पण औद्योगिकरणाचा विचार रुचणारा होता. इंग्रजांना हटवून त्यांची जागा पटकावू पहाणाऱ्या हिंदुस्थानातील नव्या व्यापारी कारखानदार वर्गाला गांधीतत्वज्ञान सोयिस्कर होते. आर्थिक गरजांनी तत्वज्ञान निवडले. तत्वज्ञान्यांनी आर्थिक व्यवस्थेला गती दिली नाही.

रशियात मार्क्सवादाचा पराभव झाला हे म्हणणे चूक आहे. गांधीवादही भारतात हरला नाही. या विचारांचा प्रयोग रशियात, भारतात झाला हे म्हणणे चूक आहे. या देशात जे घडले त्याला एक सोयिस्कर पाटी लावण्यात आली आहे. 'सुभाषचंद्र बोसांशी जितका संबंध तितकाच या देशातील घटनांचा मार्क्सशी व गांधींशी संबंध.

मार्क्सला सापडलेले सत्यकण हे स्थलकालसापेक्ष होते. अतिरिक्त मूल्याचा प्रमुख

स्त्रोत कामगारांच्या शोषणात नाही, तिसऱ्या जगाच्या शोषणात आहे हे मार्क्सला समजले नव्हते असे नाही. साम्राज्यवादाच्या आर्थिक परिणामांचे तपशीलवार वर्णन त्याने दिले आहे. रोझा लुक्झेबुर्गला तिसऱ्या जगातील तुटीचे भांडवलनिर्मितीच्या प्रक्रियेतील महत्त्व उमगले होते. मार्क्सला ते स्वच्छ दिसत असले पाहिजे; पण १८४८ च्या उठावाच्या अनुभवाने केवळ कामगारच क्रांती करू शकेल ही कल्पना मनात दृढ झालेली. त्या कामगारावर्गाला क्रांतीसाठी उद्युक्त करावयाचे, तर त्याच्याच शोषणांतून अर्थशास्त्र उभारावयास पहिजे. वर्गजाणिवेसारखी, तादात्म्यासारखी मार्क्सच्या जडवादांत अजिबात न सामावणारी कल्पनाही तयार करावी लागली. कोणत्याही व्यवस्थेच्या उत्पत्ति-स्थिती-लयाची मीमांसा करणाऱ्या मार्क्सलाच वर्गविहिन परिपूर्ण समाजाच्या स्वप्नांची भाकडकथा तयार करावी लागली. ती प्रत्यक्षात येण्याचा काहीच संभव नव्हता. इतिहासाला मार्क्सवर इतकी मेहरेनजर करण्याची काहीच आवश्यकता नव्हती.

भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनाचे महात्माजी सरसेनापती होते. आर्थिकदृष्ट्या दुबळ्या, नि:शस्त्र, असंघटित जनांना बलाढ्य ब्रिटिश समाजाविरूद्ध उभे करण्याचे प्रचंड काम त्यांनी घेतले. चंपारण्य, बारडोलच्या अनुभवानंतर अस्पृश्य शेतमजुरांना, खेडुतांना चळवळीत गोवून घेतले पाहिजे हे ओळखणारा, चौरीचौरापासुन ''करेंगे या मरेंगे'' पर्यंत झेप घेणारा हा रणधुरंधर आंदोलनासाठी नवनव्या आघाड्या व फौजा तयार करण्याकरिता पारंपारिक नीतीकल्पना वापरत होता. त्यातून पारंपारिक नैतिकतेवर आधारित असा समाज निर्माण होईल. अशी महात्माजींची अपेक्षा असती, तर शासनाचे नेतृत्व त्यांनी उघड उघड आधुनिकीकरणवादी पंडितजींकडे सोपविले असते किंवा नाही याबद्दल जबरदस्त शंका घेण्यास जागा आहे.

विचारवंतांनी केलेल्या स्वप्नरंजानाची परिपूर्ती न झाल्यामुळे आरामखुर्चीत विद्वानांना कितीही वेदना झाल्या, तरीही काळपुरुषाला त्याची काही पर्वा वाटताना दिसत नाही.

शेतकरी संघटनेची विचारपद्धती ही बुद्धिवादी तर्ककठोर आहे. औद्योगिक व्यवस्थेच्या आर्थिक सामाजिक समस्यांमुळे विकासाचा, स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावण्याचा मार्ग कुंठीत झाला किंवा कसे, आता पुन्हा एकदा तोंड फिरवून उलटी वाटचाल करणे अपरिहार्य आहे किंवा कसे या चिंतेने त्रासलेल्या मनुष्यजातीला निदान आर्थिक अडथळ्यातून सोडवण्याचा मार्ग संघटनेने दाखवला आहे. ऊर्जा, नैसर्गिक साधनसंपत्ती यांच्या तुटवड्याचे प्रश्न मनुष्य आपल्या दुर्दम्य बुद्धिसामर्थ्यावर यथावकाश सोडवेल. अगदी सूर्य कोसळायला आला, तर त्याच्या जागी मनुष्यनिर्मित



सूर्य ठेवण्याचीही त्याची झेप आहे. परार्थाच्या खोट्या नैतिकतेपासून आणि त्याच्या बरोबरीने जाणाऱ्या संकुचित हितसंबंधी स्वार्थापापासून त्याला स्वत:चा बचाव करून घेतला पाहिजे.

२७ जूलै १९८४

□□

## चौदा

# रामदेवरायाचा धडा

'हे असे घडले, इति ह आस' या प्रतिज्ञावाक्याला शोभेसा इतिहास कोणत्याही काळात, कोणत्याही समाजात लिहिला गेला असेल असे वाटत नाही.

भाट शाहिरांच्या मौखिक परंपरेत, धनी, श्रोत्यांना खूष करण्यावर भर असणे अपरिहार्य होते. त्यासाठी धन्याच्या किंवा त्याच्या पूर्वजांच्या शौर्यादी गुणांची काव्यरम्य अतिशयोक्ती तसेच नादान, भेकड शत्रूंच्या जुलुमाची भयानक वर्णने हा त्यांच्या व्यवसायाचा मुद्देमालच होता.

अधिकृत दप्तरे, नोंदी, पत्रव्यव्हार यांतील लिखाण म्हणजे काही सत्याची गंगाभागीरथी नाही. अगदी आधुनिक काळातदेखील शासकीय कागदपत्रांची ढवळाढवळ होते. पूर्वीच्या काळात तर ती प्रचंड प्रमाणावर होत असणार.

ज्या देशात ऐतिहासिक दस्तऐवज व्यवस्थित लिहिले जातात, ठेवले जातात, सांभाळले जातात त्या देशांतसुद्धा केवळ इतिहासात नेमके काय घडले हे सांगणे कठीण होते. भारतासारख्या देशात, जिथे लेखी नोंदी क्वचितच् ठेवल्या जातात- ठेवल्या तर सत्याच्या आग्रहापेक्षा स्वत:ची किंवा धन्याची भलावण करण्याच्या बुद्धीने -दप्तरे सांभाळली जात नाहीत. अगदी शिवरायांचे दस्तुरखुद्द कागदपत्र, पहारेकरी हिवाळ्यांत क्षणभराच्या उबेसाठी शेकोटीला वापरतात, तेथे तर कागदपत्रावरून इतिहास समजणे तर आणखीच दुरापास्त. लढाया, लुटालुटी, जाळपोळ यांतून अपघाताने बचावलेले कागद आणखी एखाद्या अपघाताने नजरेखाली घालायला मिळाले तर त्या आधारावर इतिहास उभा करणे धाष्टर्याचेच होईल. महाराष्ट्राचा इतिहास तर अभिनिवेशानेच जास्त भरलेला आहे. पाश्चिमात्य इतिहासकारांनी साम्राज्यशाही राजवटीस आधार देणारा इतिहास मांडला. त्यांत नेटिव्ह राजेरजवाडे, सरदार, दरकदार यांचे अज्ञान, भेकडपणा, कर्तत्वशून्यता, आळस, स्वार्थ, लंपटपणा, देशभक्तीचा अभाव यांवर भर टाकला. यावर प्रतिक्रिया म्हणून भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या काळात भारतीय अस्मितेचे, राष्ट्रीयत्वाचे संरक्षण करण्याच्या बुद्धीने अनेक इतिहासकार लेखणी सरसावून निघाले. 'या दोन्ही



पद्धतींमध्ये सत्यसंशोधनाला आवश्यक असणाऱ्या अलिप्त व तटस्थ संशोधक दृष्टीला मर्यादा पडल्या. निर्भय वास्तववाद कित्येकदा गमावला गेला आहे.'[१]

'आम्ही प्राचीन आहोत, एवढेच नव्हे तर आज जगात शास्त्र, तत्त्वज्ञान, राजकारण वगैरे ज्या ज्या म्हणून काही गोष्टी आहेत त्या सर्व एकेकाळी आमच्याजवळ होत्या व आम्हाला ठाऊक होत्या; हे सिद्ध करण्याचे भारतीय लेखकांना व इतिहासकारांना एक प्रकारचे वेडच लागले होते, तुम्ही म्हणता कांट हा महान तत्त्वज्ञानी होता काय? तर मग आमचा शंकराचार्य त्याहूनही महान होता, वाङ्मयांत शेक्सपीयर श्रेष्ठ म्हणता तर आमचा कालीदास त्याच्यापेक्षा मोठा साहित्यिक होता. तुमच्याकडे राजकारणांत रुसोचा 'सामाजिक कराराचा' सिद्धांत निघाला ना! तसा आमच्याकडेही होता. आमच्याकडे विमाने, रेल्वे, स्फोटक द्रव्ये सर्व काही होते. विशेष म्हणजे ज्या वेळी युरोप खंडातले लोक अस्वलाची कातडी परिधान करण्याच्या रानटी अवस्थेत होते, त्या वेळी आम्ही तलमदार कापड वापरीत होतो.'

'ज्या वेळी युरोपियन लोक निव्वळ रानवट होते त्यावेळी आम्ही संस्कृतिसंपन्न होतो ही कल्पना म्हणजे आमच्या इतिहासकारांची फारच मोठी प्रेरक शक्ति. आमच्या देशाचा संपूर्ण धुव्वा उडवू पाहणाऱ्या परकीय शत्रूंना तोंड देण्यासाठी सुसज्ज व्हावे म्हणून आम्ही आमचे पुरातन किल्ले, खंदक, सनदा, भूर्जपत्रे गतेतिहासाच्या गर्तेतून उकरून काढली.'[२]

एका खोट्याचा प्रतिकार करण्यासाठी दुसरे खोटे सांगून काही समजू शकत नाही. इतिहासाचे सार काढताना मग अशा बांधिलकीच्या विचारवंतांची त्रेधातिरपीट उडू लागते. विष्णुशास्त्री चिपळूणकरांना 'सर्वश्रेष्ठ भारतीय संस्कृती निव्वळ अधम अशा इंग्रजी व्यवस्थेपुढे कां नमली' याचे उत्तर देण्यासाठी चक्रमेनिक्रमाने - रहाटगाडग्याप्रमाणे इतिहासात वर गेलेले खाली येतात, खाली गेलेले यथाक्रम वर जातात त्यासाठी कोणत्याही प्रकारे भारतीय व्यवस्थेत ढवळाढवळ करण्याचे काहीच कारण नाही असे खास पुणेरी निदान मांडावे लागले.

इतिहासाचा अर्थ सलगपणे, सूसूत्रपणे लावण्याचे पहिले काम महात्मा जोतिबा फुल्यांनी केले . अगदी विष्णूच्या मस्त्यावतारापासून ते वासुदेव बळवंत फडक्यांच्या बंडापर्यंत- 'शूद्रांची गुलामगिरी' या एकसूत्रांत त्यांनी सर्व घटना गुंफून दाखवल्या. राष्ट्रवादी आघाडीची पर्वा न करता त्यांनी मोगलांना शूद्रांच्या मुक्तीचे श्रेय दिले [३] आणि राष्ट्रवाद्यांच्या महापुरुषांवर कडाकड असूड उडवले. [४]

'तेव्हा अखेरीस शंकराचार्याने तुर्की लोकांस मराठ्यांत सामील करून घेऊन

त्यांकडून तरवारीचे जोराने येथील बौद्ध लोकांचा मोड केला... त्यावर काही काळ लोटल्यानंतर हजरत महमंद पैगंबराचे जहामर्द शिष्य, आर्यभटांचे कृत्रिमी धर्मासहित सोरटी सोमनाथसारख्या मूर्तीचा तरवारीचे प्रहारांनी विध्वंस करून शूद्र शेतकऱ्यास आर्यांचे ब्रह्मकपटांतून मुक्त करू लागल्यामुळे भट ब्राह्मणांतील मुकुंदराज, ज्ञानोबांनी भागवत बखरींतील कांही कल्पित भाग उचलून, त्यांचे प्राकृत भाषेत विवेकसिंधू व ज्ञानेश्वरी या नावाचे डावपेची ग्रंथ करून शेतकऱ्यांची मने इतकी भ्रमिष्ट केली, की ते कुराणासहित महंमदी लोकांस नीच मानून त्यांचा उलटा द्वेष करू लागले. नंतर थोडा काळ लोटल्यावर तुकाराम या नावाचा साधू शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाला. तो शेतकऱ्यातील शिवाजीराजास बोध करून त्याचे हातून भटब्राह्मणांच्या कृत्रिमी धर्माची उचलबांगडी करून शेतकऱ्यास त्यांच्या पाशातून सोडवील, या भयास्तव भटब्राह्मणातील अत्यंत वेदांती रामदासस्वामींनी महाधूर्त गागाभटाचे संगनमताने अक्षरशून्य शिवाजीचे कान फुंकण्याचे ठरवून अज्ञानी शिवाजीचा व नि:स्पृह तुकारामबुवांचा पुरता स्नेह वाढू दिला नाही.'

महात्मा जोतिबा फुल्यांच्या इतिहास मांडणीला संशोधनाचा वा कागदोपत्री साधनांचा आधार नव्हता. अशा तऱ्हेचा पुरावा पाच हजार वर्षांचा इतिहास लिहिणाऱ्याला मिळवणे शक्यही नव्हते. शूद्रांच्या गुलामगिरीच्या सूत्रावर प्रचंड प्रतिभेने एक इतिहासाचा प्रपंच त्यांनी उभा केला; पण विद्वन्मान्य इतिहासकारांत आज जोतिबांना काहीच मान्यता नाही.

आपले विशिष्ट ऐतिहासिक तत्त्वज्ञान लक्षात घेऊन त्याच्या अनुरोधाने गतकाळ तपासून बघण्याचा कार्यक्रम काही मार्क्सवादी लेखकांनीही पार पाडला आहे. डांगे, राजवडे, जयस्वाल, देवीप्रसाद चट्टोपाध्याय, शरद पाटील यांनी आदिभारतकाळातील अर्थव्यवस्थेचा विकास हा मार्क्सच्या अनुमानाप्रमाणेच झाला असे मोठ्या विस्ताराने मांडले. त्यासाठी शंकास्पद विश्वसनीयतेच्या वेदोपनिषदकालीन साहित्याचे त्यांनी एखाद्या महामहोपाध्यायापेक्षा विस्ताराने अवगाहन केले. याउलट मुसलमानी आक्रमणापासूनच्या इतिहासाचा अन्वय लावण्याचे काम मार्क्सवाद्यांची फार किरकोळ केले. मध्ययुगीन राजेरजवाड्यांच्या एकमेकांतील लढाया असा शिक्का मारून हा उभा कालखंड त्यांनी दुर्लक्षित केला. सैद्धांतिक दृष्टिकोनातून त्यांनी हा इतिहास तपासून बघितला असता तर इतिहासाचा पुरा अर्थ मार्क्सच्या विश्लेषणातही लागत नाही हे त्यांच्याही लक्षात आले असते.

पश्चिमी इतिहासकारांचे लिखाण वाचताना जागोजाग असमाधान राहते.



लेखकाला देशाची कल्पना किती तुटपुंजी आहे याची ओळीओळीला जाणीव होते. ते साहजिकही आहे; पण भारतीयांनी लिहिलेला भारताचा वा महाराष्ट्राचा इतिहास वाचतानाही त्याचप्रकारचे असमाधान वाटते. या इतिहासातले धागे एकमेकांशी जुळत नाहीत. कुठेतरी काहीतरी चुकते आहे अशी रुखरुख लागून राहते.

एखाद्या पोलीस चतुरकथेत अजागळ पोलिस अधिकाऱ्याने खून कसा आणि कोणी केला असावा या संबधी आपली अटकळ मोठ्या आत्मविश्वासाने मांडावी आणि त्याच्या अटकळीत अनेक गोष्टींचा खुलासा होत नाही असे लक्षात आले म्हणजे ज्या प्रकारची रुखरुख लागते त्या प्रकारची रुखरुख मला राष्ट्रवादी इतिहास वाचताना लागते. इतिहासाची साक्ष काहीतरी दडवण्यासाठी काढली जात आहे; काहीतरी लपवले जात आहे, इतिहासात प्रत्यक्ष ते काहीतरी वेगळंच असलं पाहिजे असे वाटत राहते.

'आपला तो बबड्या आणि लोकाचं ते कारटं' या वृत्तीने महाराष्ट्राच्या इतिहासात काही आत्मकौतुकाचा भाग यावा हे समजण्यासारखं आहे. पुण्यातील पेशव्यांचा विश्रामबागवाडा पाहिला आणि त्याच्या दीडदोनशे वर्षे आधी दिल्लीश्वरांनी केलेली बांधकामे पाहिली म्हणजे सर्व देशाच्या इतिहासात पेशव्यांचे स्थान काय होते याबद्दलची वर्णने अवास्तव असावीत हे स्पष्टच होते. छत्रसाल, बंदा बहादूर, सूजमल जाट, हैदर, टिपू यांसारख्या इतर प्रदेशातील पुरुषांच्या कार्याच्या संदर्भात मराठ्यांचा इतिहास आत्मकौतुकाने भरला आहे आणि अवाजवीपणे आत्मकेंद्रीही आहे.

पण याहीपेक्षा एक फार मोठे कोडे इतिहास वाचताना मला पडते. देवगिरीचे एवढे बलाढ्य राज्य; पण मुसलमानी फौजा अगदी बिनधास्त गडाच्या पायथ्यापर्यंत येऊन पोचल्या कशा? महाराष्ट्राच्या मध्यकेंद्रापर्यंत पोचण्याच्या आधी या परकी सैन्याला वाटेवरच्या शेतकऱ्यांनी, जनसामान्यांनी काहीच विरोध केला नाही? त्यांना नेतृत्व नसले मिळाले तरी काय झाले? राजारामाच्या वेळी कोठे होते नेतृत्व? तरी उभा महाराष्ट्र जागोजाग लढला, मग रामदेवरायाच्या वेळी का नाही उभा राहिला? बरे शत्रूच्या फौजा किल्ल्यापाशी येऊन पोहोचल्या, त्यानंतर तरी वेढ्याच्या बाहेरच्या लोकांनी वेढ्याची कुत्तरओढ का नाही केली? हरपालदेवाने केलेल्या बंडालाही पाठिंबा इतका कमी मिळाला, की तो जिवंत पकडला गेला. त्याला जिवंत सोंडून गडाच्या मुख्य दरवाजापाशी टांगून ठेवला, तरी जनसामान्यांनी काहीच स्वयंस्फूर्त प्रतिक्रिया दिली नाही?

सोपपत्तिक इतिहासात जागोजाग वाचावे लागते, रजपूत/मराठा सैन्य शिकस्तीने लढले; पण अखेरीस शत्रूच्या प्रचंड संख्याबळापुढे त्याचे काही चालले नाही. मोगल हजारो मैलांवरुन येथे आलेले. त्यांची संख्येची ताकद स्थानिक राजांच्या त्यांच्या स्वत:च्या प्रदेशातील ताकदीपेक्षा जास्त कशी राहिली?

हे कोडे अनेकांनी मांडले आहे. अगदी १८५३ मध्ये मार्क्सने एंगल्सला लिहिलेल्या पत्रात मांडले आहे. भारतातील गावगाड्याबद्दल तो लिहितो,

'खेड्यात राहणाऱ्यांना राज्ये फुटली, मोडली याचे काहीच सुख:दुख नाही. खेड्याला धक्का लागला नाही तर ते कोणत्या राजाकडे जाते, कोणत्या सुलतानाची अधिसत्ता चालते याची त्यांना काहीच चिंता नसते, गावगाडा अबाधित चालत राहतो.'

'राधामाधवविलासचंपू' च्या प्रस्तावनेत हे कोडे वेगळ्या पद्धतीने राजवाड्यांनी मांडले आहे. हिंदू राजवटीतील महाराष्ट्र संस्कृतीची व्याप्ती अत्यल्प ब्राह्मणांपुरती व उत्तरेकडील क्षत्रियांपुरती होती. बहुसंख्य नागवंशादी मराठे अत्यंत मागासलेले असून त्यांत राष्ट्रभावनेचा उदय झालेला नसल्यामुळे ते अभिमानाने लढण्यास पुढे येऊ शकले नाहीत आणि त्यामुळे अल्पसंख्य आर्यक्षत्रियांचा पराभव होताच महाराष्ट्रात मुसलमानी झाली. सेनापती पडताच सैरावैरा पळत सुटण्याच्या प्रवृत्तीची पानिपताच्या तिसऱ्या लढाईच्या संदर्भात राजवाड्यांनी मीमांसा केली आहे. त्यात अधम, पशुतुल्य, द्विपाद इत्यादी विशेषणे वापरून राजवाडे म्हणतात, 'एक अन्नदाता गेला म्हणजे दुसऱ्याच्या शोधांत हे पोटभरू ताबडतोब सुटत.' 'महिकावतीची बखर' पुस्तकाच्या प्रस्तावनेत हा विचार त्यांनी अधिक स्पष्ट केला आहे.

'गेल्या तीन हजार वर्षांत हिंदुस्थानात जी देशी व परदेशी सरकारे होऊन गेली ती सर्व एक प्रकारच्या पोटभरू चोरांची झाली व सरकार म्हणजे एक उपटसुंभ चोरांची टोळी आहे अशी हिंदू गावकऱ्यांची अंत:स्थ प्रामाणिक समजूत आहे.'

राजवाड्यांनी वास्तवस्थिती निर्भीडपणे मांडली; पण ब्राह्मण क्षत्रिय एकाकी का पडले यांची कारणमीमांसा त्यांची मोठी विचित्र होती. या देशातील सर्व राजकीय घडामोडी अल्पसंख्यांकांनी घडवलेल्या असत हे त्यांना मान्य होते; पण त्याचे कारण या देशातील बहुसंख्यांक लोक अन्नवैपुल्यामुळे व अन्नसौलभ्यामुळे अन्नसंतृप्त अर्थात आळशी बनले आणि त्याच त्यांच्या वृत्तीचा परिणाम समाज उदासीन, तुटक व मुक्तद्वारी बनण्यात झाला असे त्यांचे प्रतिपादन होते. स्वजातिसमर्थनाची राजवाड्यांची प्रवृत्ती इथे त्यांच्या कर्मयोगी नि:स्पृहतेवरही मात करून जाते.



त्र्यंबक शंकर शेजवलकर या प्रवृत्तीचे विश्लेषण अधिक शास्त्रीय रीतीने करतात.

'एतद्देशीय अल्पसंख्यक ब्राह्मण क्षत्रियांना इतर आडमुठ्यांच्या साहाय्याने स्वातंत्र्य का टिकवता येऊ नये? तर त्यांच्या सामाजिक उच्चनीचतेच्या मूर्ख भावनांमुळे समाज दुभंगलेला व धार्मिक होता, आपापसात द्वेषबुद्धी व कदाचित सूडाचे वातावरण निर्माण झाले होते. आपले वर्चस्व टिकावे म्हणून इतरांना सर्व बाजूंनी दुबळे ठेवण्याची पद्धत या उच्चवर्णीयांच्या अगंलट आली होती.'

राष्ट्रवादी इतिहासकारांनी उदोउदो केलेल्या १८५७ च्या स्वातंत्र्यसमरातील बंडखोरांची सर्वसामान्य जनतेला किती धास्ती वाटत होती याचे वर्णन इतिहासकाराचा अभिनिवेश नसलेल्या गोडसेभटजींनी आपल्या प्रवासर्णनात सविस्तर केले आहे.

सर्वसामान्य जनता आणि स्वदेशी, स्वधर्मी राज्यकर्ते यांच्यामधील या विरोधी भक्तीचे कारण शेतीच्या सुपीकतेतून आलेले आळशीपण असू शकत नाही. समाजातील विषमता हे कारण मानले तरी त्या विषमतेचा आर्थिक पाया काय होता हा प्रश्न शिल्लक राहतोच.

जोतिबांच्या इतिहासात या प्रश्नाची विद्वत्तापूर्ण मांडणी नसेल; पण प्रश्नाच्या गाभ्याला सरळ हात घालणारी प्रतिभा निश्चित होती.

शूद्रातिशूद्रांचा राणा जोतिबा फुले यांनी मुसलमानी आक्रमणाला सरळ विमोचन असा शब्द वापरून गावांतील सर्वसामान्यांची भावना व्यक्त केली आहे. इंग्रजांची राजवट आल्यानंतरही, 'सामाजिक प्रगतीला नि क्रांतीला प्रतिकूल ठरलेल्या ब्राह्मणी राज्यापेक्षा इंग्रज राज्य परवडले. नानासाहेब पेशवे यशस्वी झाले असते तर ब्राह्मणांचे जातिश्रेष्ठत्व मानणारे, अन्यायी नि प्रतिगामी ब्राह्मणी राज्य पुन्हा महाराष्ट्रात आले असते अशी त्यांना भीती वाटत होती.''[५]

जोतिबांची भावना हीच देवगिरीच्या आसपासच्या कुणब्या शूद्रांची भावना असली पाहिजे. हीच भावना सर्वसाधारण प्रजेची त्यांच्या जवळच्या गढीत किंवा किल्ल्यावर राहणाऱ्या तथाकथित देशबांधव स्वधर्मीय सरदार-राजांबद्दल असली पाहिजे. रामदेवराय आणि अल्लाउद्दीन यांत फरक एवढाच, की पहिला दरवर्षी उभी पिके हक्काने काढून नेई तर दुसरा कधी तरी एकदा येणार. रामदेवरायाच्या पराभवात प्रजेला थोडे तरी सूडाचे समाधान मिळत असले पाहिजे. रामदेवरायाकडून लुटले जायचे का अल्लाउद्दीनाकडून असा आणि एवढाच पर्याय रयतेपुढे असेल तर परकीय लुटारूच्या रूपाने मोचकच आला अशी त्यांची भावना का होऊ नये? किमानपक्षी दोन लुटारूंच्या लढाईत स्वत: मरण्यात त्याला का

स्वारस्य वाटावे? बंदा बहादुराच्या व त्यानंतरच्या पंजाबमधील लढायांसंबंधी कुशवंतसिंग म्हणतात, 'शिखांकडून किंवा मराठ्यांकडून लुटून घ्यायचे का अब्दालीकडून एवढाच पर्याय पंजाबी शेतकऱ्यांसमोर असे आणि त्यांना त्यातले त्यांत मुसलमानांकडून लुटले जाणे हा सौम्य पर्याय वाटे.'

राष्ट्रवादी इतिहासकारांनी मध्ययुगांतही राष्ट्र ही संकल्पना अस्तित्वात होती हे गृहीत धरले आहे; पण असे राष्ट्र त्या वेळी अस्तित्वात नव्हते. जोतिबांच्या वेळीही नव्हते 'अठरा धान्यांची डाळी होऊन त्याचे चरचरीत कोडबुळे म्हणजे एकमय लोक (Nation) कसे होऊ शकेल?'' असा प्रश्न त्यांनी विचारला. (सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक). एकमय लोक या अर्थाने राष्ट्र त्यावेळी अस्तित्वात नव्हते आणि दुर्दैवाने आजही नाही.

आजपर्यंतच्या इतिहासाची खरी प्रेरणा ही शेतीमध्ये दरवर्षी एका दाण्याचे शंभर दाणे होण्याचा जो गुणाकार होतो, तो लुटण्याची आहे. लुटण्याची वेगवेगळी साधने वापरली गेली. दरोडेखोरी, सैन्याची लूट, राजांचा महसूल, गुलामगिरी, वेठबिगारी, सावकारी, जमीनदारी. सर्व समाजाचा इतिहास हा शेतीला लुटण्याच्या साधनांच्या विकासाचा इतिहास असतो.

लुटीचे प्रकार बदलतात, तसे लुटीचे उपयोगही बदलतात. ऐषाराम, चैनीसाठी पहिल्या काळात शेतीच्या गुणाकाराची लूट वापरली गेली असेल, लुटारूंच्या फौजांची ताकद वाढवणे, त्यांना शस्त्रसज्ज करणे, गड बांधणे, खंदक खणणे, किल्ल्यांत वेढ्याची तयारी करणे यांवरही प्रचंड खर्च झाले; पण फिरत्या लुटारूंच्या हाती गड किंवा महाल लागला म्हणजे सगळेच गमवावे लागे. देवळांमध्ये धनसंपत्ती ठेवण्याची क्लृप्ती यामुळेच निघाली असावी. देवाचे धन म्हटल्यावर भले बेरड, दरवडेखोर, राजेसुद्धा त्याला हात लावावयास धजत नसत. जागोजाग, गावोगाव प्रचंड संपत्ती देवळांत साठली होती. ही देवळे देवाच्या नावाने लुटण्याचा खुला परवाना-परिणामी पाप तर नव्हतेच; पण पुण्य देणारा धर्म हा लुटारूंच्या नव्या टोळ्यांना अत्यंत सोईस्कर होणार होता आणि तसा तो झाला.

प्रजेला राजाचे कौतुक नव्हते. राजांना प्रेजेचे त्याहूनही कमी. प्रजेच्या शिक्षणाची सोय नाही; कारण त्यावर धर्मानेच बंदी घातलेली. पाणीपुरवठ्याची, शेतीसुधाराची व्यवस्था करणारा राजर्षी दुर्मिळच. कला, हुन्नरांना प्रोत्साहनही चैनीपुरतेच. अंती करावयाचे काय तर देवळे बांधायची आणि ब्राह्मणांची धन करायची. देशरक्षणाचा विचार राजांच्या मनालाही शिवत नव्हता. नवे तंत्रज्ञान आले. तोफा, दारुगोळा आला. त्याचे नियंत्रण परकीयांच्या हाती राहिले. इब्राहिम गारदी आणि फ्रेंच



यांच्या हाती तोफखाना राहिला. सर्वसामान्य लोहारातांबटांपर्यंत तो आलाच नाही. तंत्रज्ञानाच्या एतद्देशीय विकासाला उत्तेजन देण्याचे राजांना सुचलेच नाही. कारण त्यांना एतद्देशीय हेही आपले वाटतच नव्हते. त्यांच्याशी संबंध आर्थिक शोषणाचेच होते. सैन्य बनवावे, जुजबी का होईना तोफखाना, बंदुका ठेवाव्यात. त्यांच्या जोरावर जमले तर परकीय आक्रमणाचा प्रतिकार करावा; पण निदान आपल्याच प्रजेला ताब्यात ठेवण्याचा, लुटण्याचा हेतू तर साध्य होतच होता. राजाचा हेतू आसपासच्या रयतेस लुटून गढी संपन्न करण्याचाच असे. आर्थिक शोषणाचे हे सूत्र ध्यानात घेतले म्हणजे इतिहासातील अनेक कोडी आपोआप सुटताना दिसू लागतात.

इतिहासाचा प्रश्न सुटला, पण भविष्याचा नाही. इंग्रज गेले आणि पुन्हा नवीन सुधारित भटशाहीचेच नव्या स्वरूपात राज्य आले. शेतकऱ्यांच्या लुटीवर पोसणाऱ्या 'इंडिया' चे राज्य चालू झाले आहे. शेतकऱ्याला लुटण्याचे साधन आता शेतीमालाचे भाव झाले आणि लुटीचा उपयोग उद्योगधंद्याच्या भांडवलासाठी होऊ लागला, एवढाच काय तो फरक. प्रजेला अंगावर धड सुती कपडा नसला तरी टेरीलीन, टेरीकॉटना उत्तेजन देणारे राज्य आले आहे. शस्त्र आणि विज्ञानाची थोरवी गाणारी; पण ग्रामीण भागातील निरक्षरता वाढवणारी व्यवस्था आली आहे. राष्ट्राच्या एकात्मतेची घोषणा करणारे शास्त्र आले आहे. पुन्हा एखादा अल्लाउद्दीन चालून आला तर या वेळी तरी राजाच्या मदतीला धावून येण्याची प्रेरणा जनसामान्यांना होण्याचे काहीच कारण तयार झालेले दिसत नाही.

*(१५ सप्टेंबर १९८५)*

□□

१ : लक्ष्मणशास्त्री जोशी, पुरस्कार, दासशूद्रांची गुलामगिरी-लेखक-शरद पाटील

२ : श्री. अ. डांगे- आदिभारत, पृष्ठ १४

३ : आर्यधर्म श्रेष्ठ भट वाखाणीती। जुलमी म्हणतो मोगलास भटपाशांतून शूद्र मुक्त केले। ईशाकडे नेले। कोणी दादा? मानरमहंमद - महात्मा फुले समग्रवाङमय, पृष्ठ ९०

४ : शेतकऱ्यांचा असूड- समग्र वाङमय पृष्ठ २०१

५ : महात्मा जोतिबा फुले- धनंजय कीर, पृष्ठ ९१; २ : The shikh- khushwant, singh vol.I

पंधरा

# कृषिमूल्य आयोग बरखास्त करा

औद्योगिक विकासासाठी आवश्यक ते भांडवल शेतीमधून मिळणाऱ्या वाढाव्यामधून निर्माण करण्याच्या हेतूनेच स्वातंत्र्योत्तर काळामध्ये आर्थिक धोरणे आखली गेली. या धोरणाची अंमलबजावणी इतक्या निर्दयपणे केली, की अवघ्या ३६ वर्षांतच भारताचा क्रमांक औद्योगिक प्रगत राष्ट्रांमध्ये नववा लागूनही भारत जगातला सर्वात दरिद्री देश बनला.

ब्रिटिशांचे वसाहतवादी धोरणच या तथाकथित नव्या आर्थिक नीतीने पुढे चालू ठेवले आहे. एकीकडे शेतकऱ्यांचे शोषण साम्राज्यवादी सत्ता करीत असे, त्या धर्तीवरच चालू आहे; मात्र त्याचा लाभ शहरातल्या उद्योगांना न मिळता देशामधल्या काही विशिष्ट भागातच वाढणाऱ्या काही उद्योगांनाच मिळत आहे. मूठभर उद्योगपतींना अत्यंत स्वस्त कच्चा माल आणि देशात प्रचंड बेकारांचे थवे खेड्याकडून शहराकडे सतत वळत असल्यामुळे आणि स्वस्त अन्नधान्यामुळे अतिशय कमी रोजगारीवर उपलब्ध होणारा मजूर वर्ग सतत मिळत राहावा अशा हुशारीच्या आर्थिक क्लृप्त्या शासन यंत्रणेनेच शोधून काढल्या आहेत.

राज्ययंत्रणेचे वरील हेतू साध्य होण्यासाठी आर्थिक, महसुली, नियोजनविषयक आणि नाणेव्यवस्था सर्व हत्यारे वापरली जात आहेत. आर्थिक धोरणाचा मुख्य भर अजूनही शेतीमालाचे दर शेतीच्या प्रत्यक्ष उत्पादनखर्चापेक्षा कमी ठेवण्यावरच आहे.

न परवडणाऱ्या भावाने तुटीच्या काळात लेव्ही पद्धतीने सक्तीची वसुली, मुबलकतेच्या काळात शेतकऱ्याला अगदी अपुरे आधारभाव' अवास्तव किमतीवर शेतीमालाची आयात (P. L.४८० कराराने आलेले धान्य, दूध भुकटी, लोणी, खाद्यतेल), परदेशी शेतीमालाने देशी बाजारपेठा भरून टाकून किमती पाडणे, अतिरिक्त शेतीमालाच्या निर्यातीवर कठोर नियंत्रण किंवा निर्यातविषयक धोरणातील पद्धतशीर धरसोड, आंतरराष्ट्रीय मूल्य भरमसाट पातळीवर ठरविणे इ. अनेक मार्गांनी शेतीव्यवसाय तोट्यात राहील अशी व्यवस्था केली जाते.

शेतीमालाचे दर शास्त्रीय तत्त्वावार निर्धारित करण्यासाठी १९६५ च्या जानेवारी महित्यात कृषिमूल्य आयोगाची स्थापना झाली. गेल्या १८ वर्षांत या आयोगाची



अधोगती शेतकऱ्याचे शोषण करण्याच्या एका प्रमुख षड्यंत्रामध्ये झाली आहे

शेतीचा गळा घोटण्याचेच सरकारचे धोरण असल्यामुळे एका लहानशा आयोगाचे त्यापुढे काही चालू नये हे स्वाभाविकच आहे. कृषिमूल्य आयोगाची कार्यपद्धती काहीही असो, ती शास्त्रीय निश्चितच नाही. कृषिमंत्रालयाच्या पातळीवरील किमती केवळ राजकीय सौदेबाजीनेच ठरतात. सुगीनंतरच्या खुल्या बाजारातल्या भावापेक्षा कमी भाव सामान्यपणे ठरवण्यात येतात आणि शेतकऱ्याच्या साहाय्यासाठी सरकारी यंत्रणा कठीण वेळी पुढे येत नाही. त्यामुळे कृषिमूल्य आयोगाने निर्धारित केलेले दर केवळ शेतीमालाचे भाव जास्तीत जास्त काढेपर्यंत चढू दिले जावेत याबद्दल व्यापाऱ्यांना मिळालेला इशाराच असतो. त्यांना प्रत्यक्ष फारसे महत्त्व नसतेच. अशा कृषिमूल्य आयोगामुळे शेतकऱ्याच्या डोळ्यात धूळफेक करून सरकारची शेतकरीद्रोही धोरणे दडवणे शासन यंत्रणेला सुलभ होते एवढाच त्याचा उपयोग. हा असला कृषिमूल्य आयोग मोडीत काढून नव्या आयोगाची निर्मिती याआधीच करायला हवी होती.

सध्याचा कृषिमूल्य आयोग निरुपयोगी ठरावा अशी योजना त्याच्या जन्मदात्यांनीच करून ठेवल्यामुळे तसे झाले. आयोगाच्या सनदेत त्याचे स्वरूप आणि कार्यपद्धती अशा प्रकारे ठरवली गेली, की अनेक न झेपणाऱ्या जबाबदाऱ्या त्यावर लादण्यात आल्या.

कृषिमूल्य आयोगाने, ''शेती उत्पादनांच्या मूल्यविषयक धोरणाबद्दल सल्ला द्यावा, अशी अपेक्षा आहे;'' मात्र शेतीमालाच्या किंवा संबंधित वस्तूंच्या किमती सुचवताना आयोगाने इतर अनेंक घटकांचाही विचार केला पाहिजे. उदा. देशातील जमीन आणि अन्य उत्पादक घटकांचा यथायोग्य वापर, शेतीमालाच्या किमतीचा बाकीच्या अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम, विशेषत: सर्वसाधारण राहणीमान, मजुरीचे दर आणि औद्योगिक किमतीवर होणारा परिणाम इत्यादी.

हा खटाटोप कशासाठी तर अर्थव्यस्थेच्या एकंदर गरजा लक्षात घेऊन परस्परसंबंध, संतुलित मूल्यव्यवस्था निर्माण व्हावी यासाठी व उत्पादक आणि उपभोक्ता यांच्या हिताच्या रक्षणासाठी.

कृषिमूल्य आयोगासारख्या काड्यामोड्याच्या घोड्यावर इतक्या दुष्कर, अवजड जबाबदाऱ्या लादण्यात आल्या आहेत, की त्या त्याला पेलूच शकणार नाहीत.

तुलनात्मक किंमत सुचवणें या आयोगाच्या कुवतीबाहेरचे आहे. जडबंबाळ वाक्यरचना केली खरी, पण तिचा अर्थ काय? उदाहरणार्थ उसाचा भाव सुचवताना आयोगानें उसासाठी लागणाऱ्या सर्व वस्तूंचे भाव सुचवायचे काय? का उसापासून निर्माण होणाऱ्या इतर असंख्य वस्तूंचे भाव आयोगाने बांधून द्यायचे? का पर्यायी

उत्पादनांची किंमत निश्चित करायची, साखरेच्याबरोबर वापरल्या जाणाऱ्या वस्तूंच्या किमती ठरवायच्या? याचा उलगडा नाही. आयोगाने शहाणपणा एवढाच केला, की असल्या अनेक संभाव्य प्रश्नांना स्पर्शदेखील केला नाही, त्या भानगडीतच पडले नाहीत.

किमती ठरवण्यामधून कृषिमूल्य आयोगाने प्रत्येक पिकाखाली किती जमीन ठेवावी आणि भांडवल, साधनसामुग्री, खते, कीटकनाशके यांची पीकवार विभागणी कशी करावी याचेही नियंत्रण करणें गृहीत आहे काय? शेतीमालाच्या किमतीचा जीवनमान, मजुरी, औद्योगिक किमती यावर होणारा बरा-वाईट परिणाम ठरवण्याची कोणती साधने आयोगाजवळ आहेत? अर्थव्यवस्थेच्या एकूण गरजा आणि संतुलित किमती हे शब्द कशाशी खातात हे या आयोगाला माहीत आहे काय? कारण या प्रश्नांचा ऊहापोह नियोजन, वित्त, शेती, व्यापार मंत्रालये, नियोजन मंडळ आणि रिझर्व्ह बँक अशा वरच्या पातळीवरील संस्थांमधून केला जातो. कृषिमूल्य आयोगाच्या गरीब बिचाऱ्या सदस्यांनी हे शब्द शिकत असताना आणि पोट भरताना ऐकलेही असतील; पण या संकल्पनांची त्यांना अधिक माहिती असणे संभवतच नाही.

जर कृषिमूल्य आयोगाने अशा प्रचंड गुंतागुंतीच्या राष्ट्रीय महत्त्वाच्या घटकांची चर्चा करणे खरोखरच अभिप्रेत असेल तर आयोगाचे काम सध्यासारखे एकमार्गी राहून चालणार नाही. त्यासाठी सर्व संबंधित मंत्रालये आणि समित्यांनी आयोगाला वेळोवेळी स्वत:ची उद्दिष्टे, योजना आणि कार्यक्रम यांची माहिती देणे आवश्यक होईल. आयोगाच्या गेल्या १८ वर्षांच्या कारकिर्दीत असे एकदा तरी घडले काय? त्यामुळे इतर गोष्टींचा विचार करण्याची भलतीच जबाबदारी आयोगावर टाकणे निरर्थकच ठरते. यापूर्वीच कृषिमूल्य आयोगाची अशा जखडून टाकणाऱ्या जबाबदारीमधून सोडवणूक करून त्याचे रूपांतर शास्त्रीय पद्धतीने विविध पिकांचे उत्पादनखर्च ठरवणाऱ्या संस्थेमध्ये करायला हवे होते. यासाठीच कृषिमूल्य आयोगाऐवजी कृषिउत्पादनखर्च आयोग नेमणे आवश्यक झाले आहे. शेतीमालाची किंमत आंतरमंत्रालयीन पातळीवरील एखाद्या मंडळाद्वारे उत्पादकाला प्रगत तंत्रज्ञान वापरून अधिकाधिक उत्पादन करण्यासाठी योग्य उत्तेजन मिळावे आणि त्या किमतीचा मूल्यव्यवस्था , मजुरीचे दर, औद्योगिक किमती व अर्थव्यवस्थेच्या एकूण गरजा यांवर होणारा परिणामही विचारात घेऊन ठरवता येईल. मात्र असे करताना शेतकऱ्याला मिळणारे किमान दर उत्पादन-खर्चापेक्षा कधीही कमी असणार नाहीत हेही पाहावे लागेल.

कृषिमूल्य आयोगामध्ये नेमके कोणते व कसे हिशेब केले जातात याविषयी अत्यंत गुप्तता राखली जाते. त्यामुळे त्याचे कामकाज सुधारण्याच्या दृष्टीने नेमक्या



सूचना करणे कठीण आहे; तथापि काही उघड दिसणारे दोष तातडीने दुरुस्त करण्याची आवश्यकता आहे. प्रतिहेक्टरी उत्पादनखर्च ठरवताना सध्याचा कृषिमूल्य आयोग त्याला पुरविण्यात येणाऱ्या उत्पादनखर्चविषयक माहितीचा वापर करतो. ज्या शेताची सरसकट निवड होते त्यामध्ये प्रगत तंत्रे न वापरणाऱ्या शेतांची संख्या फार मोठी असते. खते आणि कीटकनाशकांचा या शेतामध्ये फारच कमी वापर झालेला असतो. त्यामुळे अशा माहितीवरून निघणाऱ्या वेगवेगळ्या सरासरी उत्पादनखर्चाचा एकमेकांशी काही संबंध नसतो आणि असे खर्च होणारे एखादे शेतही प्रत्यक्ष पृथ्वीवर पाहवयास मिळणे शक्य नसते.

समजा ७००० हेक्टरांच्या पाहणीमध्ये केवळ ५०० हेक्टर्समध्येच कीटकनाशके वापरली असली तरी एकूण हिशेबात सरासरी काढताना ५०० हेक्टर्सवरचा खर्च ७००० हेक्टर्सनी भागून काढल्यावर येणारी सरासरी रक्कम केवळ दिशाभूल करणारी असेल. अशा रूक्ष आकडेमोडीमधून मिळणारे भाव इतके कमी असतील, की प्रगत तंत्र वापरून अधिक उत्पादन काढण्याची शेतकऱ्याचीच इच्छाच खच्ची होईल. अनेक युरोपीय देशांनी यासाठी संख्याशास्त्रीय नमुना पद्धत वापरून हे आक्षेप दूर केले आहेत. नमुना पद्धतीप्रमाणे जमवलेल्या आकडेवारीच्या आधाराने एक शेताचा सुसंगत नमुना उभा केला जातो. शेतात वापरली जाणारी सामुग्री आणि निघणारे उत्पादन यांची पातळी प्रत्येक वेळी देशातील प्रत्यक्ष परिस्थिती आणि राजकीय धोरणे लक्षात घेऊन ठरवली जाते.

'कृषिमूल्य आयोगाच्या हिशेब करण्याच्या पद्धतीत इतर अनेक त्रुटी आहेत. अनेक महत्त्वाच्या खर्च-घटकांचा त्यात विचारच नाही. आयोगाने कारभाऱ्याचा खर्च, अवजारांच्या दुरुस्तीचा खर्च, शेतापासून खरेदी केंद्र, जवळचा बाजार वा प्रक्रिया करणाऱ्या कारखान्यापर्यंत माल नेताना होणारा वाहतूक खर्च याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे.' (राव वीरेंद्रसिंग यांनी नवी दिल्ली येथे दि. २८ डिसेंबर १९८१ रोजी इंडियन सोसायटी ऑफ ॲग्रिकल्चरल स्टॅटिस्टिक्सच्या ३५ व्या बैठकीत केलेल्या भाषणामधून )

कृषिमूल्य आयोगाने पीक बुडण्याचा धोकाही विचारात घेतलेला दिसत नाही (राव वीरेंद्र सिंग यांचे उपरोक्त भाषण) व्यवस्थापनाच्या खर्चाकडेही दुर्लक्ष केले आहे. (राष्ट्रीय शेतीआयोग १९७६). जमिनीच्या किमतीचा अंदाज महसूल खात्याकडून कागदपत्रांवरून घेतला जातो. ही शेवटची पद्धत कायद्याप्रमाणे कदाचित योग्य असेल; परंतु त्यामुळे भांडवली खर्चाची रक्कम प्रत्यक्षापेक्षा फारच खाली उतरते.

कृषिमूल्य आयोगाच्या अहवालावरुन असेही स्पष्ट दिसते, की आयोगाने शेतीसाठी पाणी उपलब्ध करण्यासाठी येणारा खर्च, साधनसामुग्री बसवण्याचा खर्च,

घसारा भरुन काढण्यासाठी लागणारी राखीव रक्कम, किमतीमधले चढउतार, संशोधन व विकसनासाठी येणारा खर्च, साधने किंवा पद्धती कालब्राह्य जुन्या झाल्यामुळे होणारे नुकसान यांचा विचारच केलेला नाही.

कृषिमूल्य आयोगाने मजुरीचा हिशेब करताना सालदार मजुरांना मिळणारे दर विचारात घेतले आहेत असे दिसते. आयोगाच्या मजुरीच्या हिशेबासाठी पायाभूत मानलेले दर त्यामुळेच सध्या कायद्याने ठरवलेल्या किमान मजुरीपेक्षा खूपच कमी आहेत. शिवाय मजुरीचा खर्च मजूर-दिवस पद्धतीने काढला जात असल्यामुळे सालदाराचे वार्षिक मजुरीचे दर विचारात घेणेही तर्कसंगत वाटत नाही.

नव्या कृषिउत्पादनखर्च आयोगाने उत्पादनखर्चाच्या हिशेबाने सर्व घोटाळे काढून टाकले पाहिजेत. आयोगाने ठरवलेल्या उत्पादनखर्चामध्ये विविध पिके घेता येतात याचे प्रात्यक्षिक दाखवणारी अनेक नमुना शेते आयोगाने देशभर तयार केली पाहिजेत. १८ वर्षे कागदी घोडे नाचवून शेतकऱ्यांच्या जिवाशी चाललेला आयोगाचा हा खेळ आता यापुढे चालू देता कामा नये.

अगदी अलीकडे (१९८१ मध्ये) केंद्राने ठरवलेल्या किमतीमध्ये काही प्रमाणात वाढ करण्याची परवानगी राज्य सरकारांना देण्यात आली होती. आपल्या देशाच्या विविध भागांतली शेतीच्या उत्पादनक्षमतेमधला फरक लक्षात घेता ही पद्धत वाजवीच होती. राष्ट्रीय शेती आयोगानेही अधिक उत्पादन करणाऱ्या वाहतूक खर्चाच्या रकमेइतकी लवचिकता स्वत:च्या राज्यातील दरात ठेवण्यास मान्यता दिली होती. ही पद्धत १९८१ मध्ये एकाएकी रद्दबातल करण्यात आली. निदान तिचा परत एकदा स्वीकार केला पाहिजे.

टंचाईच्या काळात सक्तीने लेव्हीने धान्य- वसुली करण्याचा मार्ग सरकारला खुला असल्यामुळे त्या मानाने सुबत्तेच्या काळात आधारभूत किमतींना धान्य खरेदी करण्याचे बंधनही सरकारवर असलेच पाहिजे.

सरकारी खरेदी यंत्रणा उपलब्ध नसल्यामुळे जर शेतकऱ्याला त्याचा शेतीमाल उत्पादनखर्चापेक्षा कमी भावात विकावा लागला तर सरकारवर त्यामधील फरकाची शेतकऱ्याला भरपाई करून देण्याची जबाबदारी असली पाहिजे.

एवंच, सध्याचा कृषिमूल्य आयोग मोडीत काढून त्याच्या ठिकाणी अधिक आटोपशीर आणि काम करणारा कृषिउत्पादनखर्चआयोग आणण्यातच शेतकऱ्याचे हित आहे. या नव्या आयोगामुळे शासनाची शेतकरी-द्रोही धोरणेच मुळांतून बदलतील असे नाही; मात्र ती लपवून ठेवणे शासनाला अवघड होईल.

□□



## सोळा

# कृषिमूल्य आयोग : कसाबाचे कसब

१९८१ साली विदर्भात एका गावच्या सभेनंतर एक तरुण अधिकारी मला भेटावयास आला. केंद्रीय गुप्तहेर खात्यातर्फे त्याला दिल्लीहून मुद्दाम पाठविण्यात आले होते. पूर्वी मी सनदी नोकरीत असल्यामुळे अनेक सनदी अधिकाऱ्यांना शेतकरी संघटनेविषयी बरेच कुतूहल वाटत असते. बोलता बोलता तो म्हणाला ''वर्षा दीड वर्षात शेतकरी संघटनेची जी विलक्षण झपाट्याने वाढ होत आहे त्याचे रहस्य काय?'' मी हसत म्हटले, ''त्यात रहस्य वगैरे काही नाही. आमचा एक फार ताकदवान कार्यकर्ता आहे. त्याच्यामुळेच संघटना इतक्या अफाट वेगाने वाढत आहे.'' अधिकारी कान टवकारून ऐकू लागला. ''हा कोण बुवा कार्यकर्ता?''

''तुम्हाला म्हणून त्याचे नाव सांगतो. राव वीरेंद्रसिंग. रावसाहेब शेतकीमंत्री नसते तर शेतकरी संघटनेची वाढ इतकी झपाट्याने होऊच शकली नसती. आता पाहा. ज्वारीचा भाव दोन वर्षे झाली १२४ रु. क्विंटल कायम आहे. इतर सगळ्या वस्तूंच्या किमती कडाडल्या; पण ज्वारीची, भाताची किंमत जिथल्या तिथे. क्विंटलमागे एक रुपया वाढवून दिला असता तरी संघटनेचे काम कठीण झाले असते. शेतकऱ्यांना पटवून द्यावे लागले असते, की एक रुपया वाढ ही अपुरी आहे. ज्वारीच्या भावात काहीच वाढ नाही. यातला घनघोर अन्याय समजून सांगण्याची गरजच राहत नाही.''

शासनाचे धोरण शेतकरीविरोधी तर कायमचेच राहिले आहे; पण धोरण राबविणारा गोड बोलणारा, सौजन्य दाखवणारा असेल तर शेतकऱ्यांचा क्षोभ कमी होतो. कोणताही मुद्दा आडदांडपणे, उर्मटपणे मांडण्याची राव वीरेंद्रसिंग यांची शैली शेतकरी आंदोलनाला मोठे वरदान ठरली आहे.

रावसाहेबांच्या कर्झनशैलीचे अगदी ताजे उदाहरण पहा.

कृषिमूल्य आयोगाच्या कामकाजाविषयी असमाधान, असंतोष काही नवा नाही. आयोगाची भूमिका, कार्यपद्धती याबद्दल अनेकांनी टीका केलेली आहे.

कृषिमूल्य आयोग म्हणजे काही आदरपात्र सर्वोच्च न्यायालय नाही. पंढरपूरच्या साकडे मेळाव्यानंतर शेतकरी संघटनेने हा आयोग बरखास्त करून त्या जागी कृषिउत्पादनखर्च आयोग नेमावा ही मागणी पहिल्यांदा केली. या विषयावर तपशीलवार निवेदनही दिले. संघटनेच्या या मागणीला इतर राज्यांतील शेतकरी संघटनांनीही पाठिंबा दिला. लोकदलासारख्या राजकीय विरोधी पक्षांनी दिला. आयोग बरखास्त करा अशी मागणी राज्यकर्त्या पक्षांच्या नेत्यांनीसुद्धा केली. लोकसभेचे सभापती बलराम जाखर यांच्या भारत कृषक समाजानेही ही मागणी केली.

या मागणीचा पाठपुरावा करण्यासाठी शेतकरी संघटनांच्या आंतरराज्य समन्वय समितीने परभणी अधिवेशनात आंदोलनाचा कार्यक्रम जाहीर केला. धान्यबंदी, कर्जबंदी, गावबंदी, इंडियाबंदी. असा प्रचंड व्यापक आंदोलनाचा कार्यक्रम जाहीर केला. कार्यक्रम शेतकरी संघटनांना एवढा मोठा कार्यक्रम पेलवेल किंवा नाही अशी शंका बाळगणाऱ्यांना चंडीगड येथील राजभवनाच्या यशस्वी घेराओने चोख उत्तर मिळाले. १ मे ते ७ मे १९८४ पर्यंत पंजाबच्या गृह बाजारात शुकशुकाट राहिला. धान्यबंदीची सुरुवात झाली. जून महिन्याच्या मध्यापासून गहू वाहतूक थांबवण्याची मोहीम पंजाबमध्ये घेतली जाणार आहे. अशा परिस्थितीत लोकसभेत आणि राज्यसभेतही हा प्रश्न उठविण्यात आला. वादविवादाला उत्तर देताना राव वीरेंद्रसिंग बोलते झाले, 'कृषिमूल्य आयोग ही शास्त्रीय स्वरूपाची संघटना आहे. गाव पंचायतीसारखी त्यात मेंबरांची भरताड करुन चालणार नाही.'' कृषिमूल्य आयोग हा शास्त्रीय स्वरूपाचा आहे हे वाक्य ऐकून खूप हसू आले. स्वतः राव वीरद्रसिंग यांनी डिसेंबर १९८१ मध्ये या कृषिमूल्य आयोगाच्या कामासंबंधी काय उद्‌गार काढले होते माहीत आहे?

शेतीविषय संख्याशास्त्राच्या ३५ व्या अखिल भारतीय अधिवेशनात दिल्ली येथे बोलताना रावसाहेबांनी स्वतः मान्य केले होते, ''शेतीसाठी लागणाऱ्या सामुग्रीची जमवाजमव, औत-अवजारांचा दुरुस्तीखर्च, वाहतूकखर्च इ. खर्च कृषिमूल्य आयोगाने आजपर्यंत हिशेबात घेतले नव्हते.''

स्थापनेपासून १६ वर्षे एवढे महत्त्वाचे खर्च हिशेबात घेण्याचे विसरून गेलेल्या आयोगाला रावबहादूर आज शास्त्रीयतेचे प्रमाणपत्र खुले आम लोकसभेत देऊ करत आहेत.

कृषिमूल्य आयोगाची कागदपत्रे अत्यंत गोपनीय समजली जातात. शास्त्रीय काम करणाऱ्या आयोगाला अशा तऱ्हेचे गुप्तता राखण्याचे काहीच कारण नाही. त्यामुळे मी आजपर्यंत आयोगाच्या कामकाजासंबंधी मिळालेली माहितीसुद्धा



प्रकाशात आणली नव्हती. अशा हेतूने, की ज्या मित्रांनी ही माहिती उपलब्ध करून दिली ते धोक्यात येऊ नयेत; पण राव वीरेंद्रसिंगच्या घमेंडखोर थापेबाजीचा समाचार घेण्यासाठी मी काही गुप्त आकडेवारी प्रकट करुन कृषिमूल्य आयोगाच्या शास्त्रीय ढोंगाचा बुरखा फाडण्याचे ठरवले आहे.

विहिरी खणून, नलिकाकूप तयार करून, दूरदूरचे पाणी खेचून आणून शेती यशस्वी करण्याचे भगीरथ प्रयत्न अनेक शेतकरी करीत असतात. अशा तऱ्हेचे शेतात पाणी आले म्हणजे घरी लक्ष्मी पाणी भरेल अशी वेडी आशा. यापुढे असे प्रयत्न करण्याआधी शेतकऱ्यांनी खालील हिशेब लक्षात घ्यावा.

पंजाबमध्ये विजेचा दर हॉर्स पॉवरमागे महिना रु. १७-५० एवढा आहे. तीन हॉर्स पॉवरच्या मोटारीवर विजेचे बिल सहा महिन्यात रु. ३१५।- इतके होईल. एवढ्या मोटारीवर दोन हेक्टर म्हणजे ५ एकर गव्हाला पाणी देता येईल. याचाच अर्थ एक हेक्टर गव्हाला पाणी देण्याचा केवळ विजेच्या बिलाचा खर्च रु. १५७-५० इतका होतो. यात विहीर खणणे, विहीर बांधणे, मोटार, स्टार्टर, विजेचे कनेक्शन कशा-कशाचा खर्च धरलेला नाही. कोणत्याही पिकास दर हेक्टरी दरमहा रु. २६-२५ इतका विजेचा खर्च आहे. महाराष्ट्रात हाच खर्च पुष्कळच कमी आहे. महाराष्ट्रात विजेचा खर्च दर हेक्टरी दरमहा रु. १५-६८ इतका येतो. आता कृषिमूल्य आयोग किती खर्च लक्षात घेत असेल म्हणता? खालील आकडे डोळे उघडून बघा.

| राज्य/पीक | पाणी देण्यासाठी येणारा विजेच्या बिलाचा खर्च | | कृषिमूल्य आयोगाने पाणी पुरवठ्यासाठी धरलेला एकूण खर्च |
|---|---|---|---|
| पंजाब/ गहू | ११७-०० | १९७७-७८ | १२३-४९ |
| | ११७-०० | १९७८-७९ | १०५-१० |
| | ११७-०० | १९७९-८० | ११८-४६ |
| | ११७-०० | १९८०-८१ | ७०-८६ |
| | १५७-५० | १९८१-८२ | ७८-०० |
| पंजाब/भात | ११७-०० | १९७८-७९ | २९८-०० |
| | ११७-०० | १९७९-८० | ११९-०० |
| पंजाब/ऊस | २३४-०० | १९७५-७६ | २६८-९९ |

पाणीपुरवठ्याखाली धरलेली रक्कम विजेचे बिल भरण्यासही अपुरी आहे. एवढेच नव्हे तर पाणीपुरवठ्याच्या खर्चाची रक्कम वर्षानुवर्षे कमी होताना दाखविली जात आहे. हा खर्च कमी होण्याचे काय कारण आहे? मग शास्त्रीय कृषिमूल्य आयोगाच्या नजरेतून हा प्रकार कसा निसटला?

तुम्ही शेणखत काय भावाने विकत घेता? यंदा आंबेठाणमध्ये सर्वसाधारणपणे ३ क्विंटल शेणखताच्या गाडीला रु.५० द्यावे लागतात. कृषिमूल्य आयोग अशा गाडीचा खर्च किती धरते? फक्त ३ ते ३ ।। रुपये. म्हणजे जवळपास रुपया क्विंटल. हे पहा कृषिमूल्य आयोगाचे हिशेब.

| | साल | वापरलेले खत क्विंटल | खताचा खर्च रुपये | खाताची किंमत प्रति क्विंटल रुपये |
|---|---|---|---|---|
| पंजाब-गहू | ९७७-७८ | २६.३३ | ३३.६२ | १.२७ |
| | १९७८-७९ | ५.७३ | ६.७६ | १.१८ |
| | १९७९-८० | ५.१९ | ६.८४ | १.३२ |
| | १९८०-८१ | ३.४० | ३.८७ | १.१४ |
| पंजाब-भात | १९७८-७९ | १७.७८ | २२.०८ | १.२४ |
| पंजाब-ऊस | १९७३-७४ | १२९.९७ | १२९.७३ | ०.९९ |
| | १९७४-७५ | ८५.२१ | ८६.७४ | १.०२ |
| | १९७५-७६ | ६४.९० | ९०.०९ | १.३७ |
| पंजाब-कापूस | १९७९-८० | २१.९१ | २९.८५ | १.३७ |
| | १९८०-८१ | १२.७१ | १८.९६ | १.३९ |

वर्षानुवर्षे, प्रत्येक पिकात ही चूक होऊ शकतेच कशी? दरवर्षी दर पिकात शेणखताचा वापर घटत आहे, याच्या कारणांचा आयोगाने काही अभ्यास केला नाही. रुपयाला क्विंटल शेणखताचा खर्च धरणाऱ्या या आयोगाला काय म्हणावे? शेतकीमंत्री म्हणतात शास्त्रीय आणि आर्थिक!

आता कडेलोट पाहा.

एक हेक्टर औषध फवारणीचा खर्च कृषिमूल्य आयोग किती धरत असेल?



| | साल | एक हेक्टर पिकावर औषध फवारणीचा खर्च (रुपये) |
|---|---|---|
| पंजाब-गहू | १९७०-७१ | १.४१ |
| | १९७१-७२ | ०.४७ |
| | १९७२-७३ | ३.३७ |
| | १९७३-७४ | ७.१२ |
| | १९७४-७५ | १.१६ |
| | १९७५-७६ | २.२२ |
| | १९७६-७७ | ०.०१ |
| | १९७७-७८ | ०.९५ |
| | १९७८-७९ | ५.७३ |
| | १९७९-८० | ९.९७ |
| | १९८०-८१ | १४.१६ |
| पंजाब-भात | १९७८-७९ | ५६.७८ |
| | १९७९-८० | २२.७५ |
| पंजाब-ऊस | १९७३-७४ | ११.९८ |
| | १९७४-७५ | ८.२९ |
| | १९७५-७६ | १२.७५ |

भाताच्या पिकासाठी १९७८-७९ साली सर्वात जास्त औषध फवारणी खर्च करण्यात आला आहे, म्हणजे रु. ५६-७८. हा खर्च एका फवारणीसाठीसुद्धा अपुराच आहे; पण १९७६-७७ साली गव्हासाठी हा खर्च केवळ एक पैसा झाला आहे. म्हणजे औषध फवारणीसाठी कृषिमूल्य आयोगाने त्या साली काय वापरले तरी काय होते? ठरवूनसुद्धा असेल अचरट हिशेब काढणे कठीण होईल!

वर्षानुवर्षे अशा ढालगज हिशेबांनी शेतकऱ्यांना फसविण्यात कृषिमूल्य आयोगाने शासनाला मदत केली आहे. हे भयानक हिशेब लपविण्यासाठी आपले सगळे कागदपत्र गुप्त ठेवले. आमच्या पुढाऱ्यांनी आम्हाला हे कारस्थान कधी सांगितले नाही. वर रावबहाद्दर वीरेंद्रसिंगजी या आयोगाला शास्त्रीयतेचे सर्टिफिकेट देऊ करतात! गावपंचायती म्हणजे काही कार्यक्षमतेचा अवतार नाहीत. पण त्यासुद्धा निव्वळ गळधटपणात कृषिमूल्य आयोगाच्या पासंगालासुद्धा पुरणार नाहीत. रावबहाद्दुरांनी निदान गावोगावच्या पंचायतींची माफी मागायला हवी.

□□

# २००० सालातील शेतकरी

पंतप्रधान राजीव गांधी यांनी देशाला एकविसाव्या शतकात घेऊन जाण्याची घोषणा केली आणि जिकडे-तिकडे २००० साली देशाची स्थिती कशी असेल याची कल्पनारम्य, स्वप्नमय चर्चा सुरू झाली.

शहरांतील उच्चभ्रू भद्रलोकांत तरी ही चर्चा खूपच रंगते आहे. वर्तमानपत्रांत, मासिकांत २००० साली माणसे कशी राहतील? कशी दिसतील? कसे काम करतील? गृहिणी घरकामात मदतीला काय काय वापरतील? कपडे धुण्याचे यंत्र, भांडी घासण्याचे यंत्र, स्वयंपाकाचे यंत्र, केर काढण्याचे यंत्र, सकाळी एका यंत्राला नुसती बटने दाबून सूचना दिल्या, की घरी परतेपर्यंत हा यांत्रिक नोकर सगळंच घरकाम आटोपून गरमागरम चारी ठाव स्वयंपाक वाढून तयार ठेवील.

कारखान्यांत, कचेऱ्यांत सगळीकडे अद्ययावत यंत्रे आणि ती यंत्रे चालविणारी गणकयंत्रे. आधुनिक शास्त्र आणि विज्ञानाचे नाव घेऊन स्वातंत्र्यानंतर पंडित जवाहरलाल नेहरूंनी औद्योगिकीकरणाचा दरवाजा उघडला. त्यांचाच नातू आता तीन पिढ्यांनंतरचे शास्त्र आणि विज्ञान यांचे युग आणू पाहत आहे.

खेड्यापाड्यांतील उघड्या-नागड्या शेतकऱ्यांना- ते मालक असोत वा मजूर, या येणाऱ्या नव्या शतकाचे काहीच कौतुक वाटताना दिसत नाही. काळ आपोआपच जात असतो. वर्षामागून वर्षे जातात. शतकेही उलटतात. विसावे शतक आले, आता संपत आले. एकविसावे येईल. राजीव गांधींनी मधल्या पंधरा वर्षांत काही केले नाही तरी वर्ष २००० उगवल्याखेरीज राहणार नाही. पण अशा अनेक शतकांच्या हालचाली खेड्यापाड्यांनी तटस्थपणे पाहिल्या आहेत. काळाच्या गतीबरोबर लुटणारे बदलले, लुटणाऱ्यांची वेशभूषा बदलली, त्यांची हत्यारे बदलली.

दिवसाढवळ्या उभी पिके कापून नेणारे, चीजवस्तू पळवून नेणारे लुटारू गेले. झगमगीत रुबाबात सरदार, दरकदार आले. राजे, महाराजे आले. त्यानंतर दाढीवाले आले, गेले. टोपीवाले आले, गेले. गोरे गेले, काळे आले. लुटारूंच्या हातातील काठीच्या जागी तलवारी आल्या. तमंचे आले, बंदुका आल्या, गेल्या. त्यांच्या जागी तराजू आला.



गाव होता तिथंच राहिला. १९८३ साली 'शेतकऱ्याचा आसूड' मध्ये महात्मा जोतिबा फुल्यांनी आठ बैलांच्या धन्याच्या घरातील अवस्थेचे वर्णन केले. १९८३ सालापर्यंत त्यात काहीच फरक पडला नाही. मग १९८३ पासून सतरा वर्षांत म्हणजे २००० सालापर्यंत असा काय चमत्कार घडून यायचा आहे? एकविसाव्या शतकाच्या आगमनाबद्दल खेडी उदास आहेत. उद्याच्या भाकरीच्या चिंतेने खचत चाललेला माणूस २००० सालची चित्रे रंगवणार तरी कशी?

स्वातंत्र्यानंतरच्या ३५ वर्षांत जग बरेच बदलले. मुंबईत ६-७ मजल्यांच्या इमारतींच्या जागी ४०-४० मजल्यांच्या गगनचुंबी इमारती उभ्या राहिल्या. एखाद-दुसरी फोर्ड गाडी खानदानी इतमामाने जाताना अधून-मधून दिसे. आता मधमाश्यांचे पोळे उठल्यासारख्या विविध आकारांच्या, रंगांच्या मोटारी घोंघावताना दिसतात. शहरात लोकांचे सगळेच बदलले. त्यांच्या घरात आपल्याला प्रवेशही मिळणे दुरापास्त. कधी काळी कुठे शहरात किंवा पंचायतीत शेतकऱ्यांनी दूरदर्शनवरचे कार्यक्रम आणि जाहिराती अवश्य पहाव्यात. ही तुकतुकीत नवनवीन फॅशनचे कपडे घातलेली, सुबक सजावटीत राहणारी मंडळी आणि त्यांचे जीवन पाहिले म्हणजे भारत आणि इंडियातील फरक व त्यांची दारुणता डोक्यात घणाचा टोला बसावा त्याप्रमाणे लक्षात येते. दूरदर्शनवरील मुलायम जीवन पाहून शेतकऱ्यांच्या मुलांच्या मनात संतापाची लाट तयार झाली पाहिजे.

स्वातंत्र्यानंतरच्या ३५ वर्षांत गावात एकच नवीन वस्तू काही प्रमाणात आली.ट्रॅन्झिस्टर रेडिओ. येत्या १५ वर्षांत अगदी स्वस्तातला कॉम्प्युटर कदाचित शेतकऱ्यांच्या घरात येईल. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री नारायण दत्त तिवारी नुकतेच म्हणाले म्हणे, की थोड्या काळात शेतकऱ्यांच्या नांगरावर गणकयंत्र दिसेल. दिसेलही. गणकयंत्र कर्जावर मिळणार असेल तर आम्ही गणकयंत्रही घेऊ; पण शेतकऱ्यांची पडकी झोपडी, फाटके कपडे, हजारो सालांपासूनचा लाकडी नांगर यात काहीच फरक पडणार नाही. २००० सालापर्यंत शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती घडवून आणल्यासारखे नवीन शास्त्रीय शोध लागतील. हवामान खाते हवामानाचा अंदाज अचूक सांगू लागेल, एवढेच नव्हे तर हवामानात बदलही घडवून आणू शकेल. पाऊस हवा असेल तेव्हा पाडता येईल. गाई म्हशी दुधाकरिता ठेवणाऱ्यांना गोऱ्हे - रेडे जन्माला येऊ नयेत अशी व्यवस्था करता येईल. नवनवीन अधिकाधिक उत्पादने देणारी बी बियाणे निघतील.अगदी गणकयंत्राद्वारे बटने दाबूनही जगात इतरत्र शेती होऊ शकेल; पण शेतकऱ्यांच्या आया-बहिणी २००० सालीसुद्धा तांब्या घेऊन कुपाटीलाच जाऊन बसणार आहेत हे ब्रह्मवाक्य.

**दोन हजार साली शेतकऱ्यांची अवस्था असेल तरी कशी?**

पहिली गोष्ट म्हणजे देश शेतकीप्रधान राहिला नसेल. तसा आजही आपला देश शेतकीप्रधान नाही. १९६० साली देशाच्या एकूण उत्पन्नापैकी निम्मे शेतीचे होते. १९८३ सालापर्यंत हे प्रमाण ३३ टक्क्यांवर आले. वीज, पाणी, रेल्वे, टपाल,बँका, शासन इत्यादी सेवांचे उत्पन्न शेतीपेक्षा जास्त मोजले जात आहे (४० %). याउलट शेतीवर जगणाऱ्या माणसांचे प्रमाण १९६० साली ७४ % होते, ते आता तिसऱ्या हिश्श्याने कमी झाले असेल काय? नाही, ते कमी झाले; पण फक्त तीन टक्क्यांनी. आज लोकसंख्येत शेतकरी ७१ % आहे, पण त्यांनी दिवस-रात्र राबून केलेल्या उत्पादनाची किंमत ३३ टक्केच आहे.

२००० साली देशाची लोकसंख्या जवळजवळ १०० कोटी असेल. त्यापैकी २० कोटी फक्त मोठ्या शहरांत-म्हणजे लाखावर वस्ती असलेल्या शहरात असतील. इतर शहरांत १० कोटी आणि उरलेले ७० कोटी पुन्हा खेड्यात शेतीवरतीच राहतील. शेतीच्या उत्पादनाचे प्रमाण राष्ट्रीय उत्पन्नाच्या केवळ २० % असेल.

आजच्या ७० कोटी लोकसंख्येसाठी १६ कोटी टन धान्य पिकवले जात आहे. म्हणजे दरडोई दर दिवशी ६०० ग्रॅम. दरडोई निदान आजच्याइतके धान्य पिकवायचे म्हटले तरी २००० साली २१ कोटी टन धान्य पिकवावे लागेल. १९७१ ते १९८४ या काळात धान्याच्या उत्पादनात सगळ्यात जलद वाढ झाली (११ कोटी ते १५ कोटी टन.) याच गतीने येती १५ वर्षे वाढ होत राहिली तरी एकूण उत्पादन १९ कोटी टनाच्या वर जाणे दुरापास्तच दिसते.

१९७१ सालापासून अन्नधान्याखालील जमिनीचा आकार साडेबारा कोटी हेक्टर होता तेव्हापासून या आकड्यात काहीही फरक पडलेला नाही. याचा अर्थ लागवडीखालील जमिनीचा आकार वाढवून उत्पादन वाढविण्याची आता शक्यता नाही.

लागवडीखालील जमिनीवर केवळ बी-बियाणे, खते, औषधे यांसारख्या गोष्टींत नवीन तंत्रांचा वापर करून आता फार पुढे जाता येणार नाही. आता शेतीमध्ये मूलभूत फरक घडवून सधन शेतीची सुरुवात करावी लागेल. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवली गुंतवणूक करावी लागेल. आजच्या शेतीच्या आर्थिक परिस्थितीत शेतकरी आपण होऊन अशी गुंतवणूक करायला तयार होतील अशी शक्यता नाही.

गेल्या दोन-तीन दशकांतील शेतीउत्पादनाची वाढ ही अत्यंत तुटपुंज्या भांडवली गुंतवणूकीच्या आधारे झाली. कालव्याखाली भिजणाऱ्या जमिनींचा आकार ८२ लाख हेक्टरपासून १४३ लाख हेक्टर पर्यंत १९६० ते १९८० या २० वर्षांत वाढला; पण ओलिताखालील एकूण जमिनीपैकी कालव्याखाली भिजणाऱ्या जमिनीचे प्रमाण ३० टक्क्यांच्या आसपास कायम राहिले. ओलिताखालील खरी वाढ विहिरी, कूपनलिका यांमुळेच झाली. अशा ओलिताखालील जमिनीचे प्रमाण २१ % वरुन ४३ % झाले (८३ लाख ते १६४ लाख हेक्टर). तरीही एकूण ओलिताखालील जमीन १९८० साली ४०५ लाख हेक्टर म्हणजे एकूण लागवडीच्या जमिनीपैकी फक्त ३१ % झाली. आकाश-पाताळ एक केले तरी ११०० लाख हेक्टरच्या वर ओलिताखालील जमिनीचा आकार जाऊ शकणार नाही असा तज्ज्ञांचा निर्वाळा आहे.

प्रत्यक्षामध्ये ओलिताखालील जमीन वाढण्याऐवजी कमी होण्याचा धोका डोळ्यासमोर दिसत आहे. शेकडो वर्षांपासून जमिनीच्या पोटात साठत असलेले पाणी विहिरी खोदून पंप लावून बाहेर काढण्यात आले. ओलिताची वाढ होत आहेसे वाटले; पण आता विहिरीतील पाण्याची पातळी झपाट्याने खाली खचत आहे. विहिरी कोरड्या पडत आहेत, महाराष्ट्रातील एकूण ३५००० गावांपैकी जवळ-जवळ निम्म्या गावांत पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अधिकाधिक भेडसावतो आहे. पाण्याचे टँकर इकडे-तिकडे पळवून हा प्रश्न सुटणार नाही. जमिनीच्या पोटात पाणी जिरवण्याचा प्रचंड कार्यक्रम हाती घ्यावा लागणार आहे. अन्यथा महाराष्ट्राचा मोठा हिस्सा लवकरच वाळवंट बनणे अपरिहार्य आहे.

कालव्याने भिजणाऱ्या जमिनी खारवण्याचा प्रश्न भेडसावतो आहे. येत्या काही वर्षांत आजची धरणे आणि कालवे अगदी निरुपयोगी ठरतील.

सध्या शेतीत ४० लाख टन नत्र आणि १४ लाख टन पलाशाचा वापर होतो. २००० साली १९ कोटी टन धान्य उत्पादन करायचे म्हटले तरी १ कोटी टन नत्र आणि ३० लाख टन पलाशाची गरज पडेल. भूगर्भातील पेट्रोलियम पदार्थांचा साठा झपाट्याने संपुष्टात येतो आहे. शेतीकरिता वरखते तयार करण्यासाठी लागणारा नाफ्था इतक्या मोठ्या प्रमाणावर मिळण्याची शक्यता फार दूरची वाटते.

इतक्या कठीण परिस्थितीत कष्टाने शेती पिकवावी तरी शासनाच्या दुष्ट धोरणामुळे किमती पडणार आणि त्यातून शेतमालकही बुडणार आणि शेतमजूरही उपाशी राहणार. जमिनीचे आणखी बारीक तुकडे होणार. थोडक्यात शेतकरी आणखी खचत जाणार.

२००० सालच्या शेतकऱ्यांचे हे चित्र आहे. शासनाच्या धोरणात बदल होण्याचा काहीच संभव दिसत नाही. राजीव गांधींच्या राजवटीत हरी उच्चभ्रूंची हुकूमशाही झपाट्याने तयार होत आहे. शेतकऱ्यांची संघटना आणि आंदोलन तुडवून काढण्याच्या तयाऱ्या सुरू आहेत. परिस्थितीला तोंड देऊन मर्दुमकीने लढण्याची तयारी करण्याचा मराठी बाणा दाखवण्याऐवजी दिल्लीश्वरास कुर्निसात करण्याची भल्याभल्यांची घाई चालू आहे.

महाराष्ट्र भूमीत पुन्हा एकवार संताजी- धनाजी तयार करण्याची ताकद असेल, तरच २००० सालचे हे भयाण चित्र दूर होण्याची शक्यता.

*१४ जून १९८५*

□□

अठरा

# भारत – इंडिया ते सुपर इंडिया

२ जानेवारी १९८५ रोजी पुणे येथे शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीची बैठक झाली आणि पुढील धोरणे निश्चित करण्यासाठी धुळे येथे तातडीने अधिवेशन घ्यावयाचे ठरले. या अधिवेशनात सर्व राजकीय पक्षांना 'आपली शेतीमालाच्या भावाविषयी'ची भूमिका स्पष्ट करण्याविषयी पाचारण करण्यात आले. लोकसभा निवडणुकीत शेतकरी संघटनेचा ग्रामीण भागातील प्रभाव अनुभवलेल्या सत्तारूढ काँग्रेस (आय) पक्षाचे नेते श्री. वसंतदादा पाटील यांनी अधिवेशनात पक्षाचा प्रतिनिधी पाठविणे सयुक्तिक होणार नाही असे कळविले.

शेतकऱ्यांनी संघटनेपासून दूर राहावे या हेतूने मुख्यमंत्र्यांनी लाठीकाठीची भाषा वापरून पाहिली; वेगवेगळ्या घोषणा करण्याचा सपाटा लावला. वसंतदादांनी म्हटले, 'शेतमालाच्या भावाचा प्रश्न सोडविण्याकरिता आम्ही प्रयत्नशील आहोत; पण भाव वाढवून हा प्रश्न सुटणारा नाही, शेती करण्याकरिता ज्या-ज्या वस्तू लागतात त्यांच्या किमती कमी करणे हा योग्य मार्ग आहे.' गेली पाच वर्षे शेतकरी संघटना वेगवेगळ्या मार्गांनी शेतकऱ्यांची जी मागणी मांडत आहे, तिचा अर्थ यांना कळत नाही, यावर माझा विश्वास नाही. १९८० सालापासून आम्ही म्हणत आहोत, की तुम्ही युरियाची किंमत १० रु.गोणी ठेवा, की १०,००० रु. गोणी ठेवा; जी काही किंमत तुम्ही ठेवाल ती धरून शेतीमालाच्या उत्पादनखर्चावर आधारित जो काही भाव निघेल तो द्या. शेतकरी संघटनेने शेतीमालाला जास्त भाव कधीही मागितला नाही, रास्त भाव मागितला आहे.

आता काय म्हणे शेतकऱ्यांना १२ टक्क्यांऐवजी १० टक्क्यांनी कर्ज देणार आणि हा दर रिझर्व्ह बँकेला मान्य नसल्यामुळे वरचे दोन टक्के महाराष्ट्र राज्य सहकारी बँक सोसणार, म्हणजे भुर्दंड पुन्हा शेतकऱ्यांच्याच माथी. बरं, १२ टक्क्यांऐवजी १० नाही, अगदी ६ % जरी व्याजाचा दर ठेवला तरी प्रश्न सुटतो का? कृषिमूल्य आयोगाच्या शेतीमालाच्या उत्पादनखर्चाच्या हिशेबात व्याजाचा खर्च एकूण खर्चाच्या १ ते २ % दाखवला जातो. व्याजाचा दर १२ वरुन ६



टक्क्यांवर आणला तर हे प्रमाण एकद्वितियांश टक्क्यांवर येईल, त्याने प्रश्न कसा सुटणार?

आणखी एक घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. ज्यांची जमीन नदीकाठी आहे, पण नदीला बारमाही पाणी नसते, त्या शेतकऱ्यांना म्हणे पाणीपट्टी माफ! वर्तमानपत्रातून लगेच ठळक मथळे 'शेतकऱ्यांना पाणीपट्टी माफ!!' शहरवाल्यांना वाटते, की शेतकऱ्यांची चंगळच झाली; पण कुणी विचार नाही करत, की याने शेतीमालाच्या उत्पादनखर्चात कितीसा फरक पडणार आणि अशा किती शेतकऱ्यांच्या जमिनी नदीकाठी आहेत?

अशा उपायांनी हा प्रश्न सुटणार नाही हे वसंतदादांना समजत नसेल असे नाही. शेवटी तेही एका शेतकरी कुटुंबात जन्माला आलेले, शेतीचा अनुभव असलेले आहेत. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याच्या त्यांच्या प्रयत्नांबाबत त्यांचे त्यांच्या पक्षात किंवा सरकारात काही चालत नसावे म्हणून हे खुळखुळे वाजवून शेतकऱ्यांना 'उगी' करण्याची त्यांची धडपड चालू आहे.

तिकडे दिल्लीत नव्याने सत्तेवर आलेल्या तरुण, उमद्या, तडफदार नेतृत्वास तर शेतकऱ्यांना खुळखुळे दाखविण्याचीसुद्धा गरज वाटत नाही. त्यांना शेतीबद्दल काहीही करावयाचे नाही असे त्यांच्या धोरणातून स्पष्ट होते. राज्यावर आल्या-आल्या श्री. राजीव गांधींनी प्रथम एक गोष्ट केली, ती म्हणजे अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक वस्तूंवरील जकातकर कमी केले. म्हणजे आता रंगीत टेलिव्हिजनसारखी वस्तू खूप स्वस्त मिळणार! अशा रंगीत टेलिव्हिजनवर आपल्या बायकोचं तीन दांडांचं लुगडं तीन रंगांमध्ये पाहण्याची सोय झाली यातच शेतकऱ्यांनी समाधान मानायचं!

लोकसभा निवडणुकीच्या काळात राजीव गांधींनी प्रचार सभांतून आपले उद्दिष्ट मांडले, 'सबंध देशातल्या लोकांच्या राहणीमानाचा स्तर वर करायचा आहे. जगामधला सगळ्यांत सुखी मनुष्य हिंदुस्थानात सापडला पाहिजे असे नाही; पण इतर देशांमध्ये जे तंत्रज्ञान वापरले जाते त्याच्याबरोबरीचे तंत्रज्ञान इथे वापरले गेले पाहिजे,' आणि निवडणुका जिंकून मंत्रिमंडळ तयार झाल्यानंतर याचा केवळ पुनरुच्चार नाही तर कार्यवाहीही सुरू झाली आहे. मंत्रिमंडळाच्या सर्व कार्यालयांमध्ये गणकयंत्रे येऊन दाखल झाली आहेत. उद्या प्रत्येक पोलिस चौकीत शेतकरी सत्याग्रहींची यादी करण्यासाठी गणकयंत्रे बसवली गेली तर त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही.

आपल्या देशातील तंत्रज्ञान अमेरिकेच्या बरोबरीचे असेल पाहिजे ही देशातील

कोणत्या लोकांची महत्त्वाकांक्षा असू शकते? शहरांमध्ये राहणारे, ज्यांची मासिक मिळकत ५००० ते ७००० रुपये आहे, ज्यांना या देशात तयार झालेल्या शिक्षणपद्धतीचा फायदा मिळून उच्च शिक्षण मिळाले आहे आणि ज्यांना भीती वाटते, की आपण इतर देशांतल्या शास्त्रज्ञांपुढे कुठे तरी कमी पडू की काय, अशांची ही महत्त्वाकांक्षा आहे.

या देशातील स्वातंत्र्यलढा ज्या गांधीवादावर उभा राहिला तो समजावून घ्यायचा झाला तर महात्मा गांधींचे एकच वाक्य पुरेसे आहे. म. गांधीनी म्हटले होते, 'कोणतीही गोष्ट करायची असेल तर ती करण्यापूर्वी स्वतःच्या मनाला एक प्रश्न विचारा- या देशात सगळ्यांत दीनदुबळा, फाटके कपडे घातलेला, अर्धपोटी राहणारा जो मनुष्य आपण पाहिला असेल त्या माणसाच्या आयुष्यात तुम्ही जे करणार आहात त्याने एखादा तरी आशेचा किरण निर्माण होणार आहे का? होणार असला तर तुम्ही करता ते योग्य आहे.'

तंत्रज्ञानाची पातळी वाढवून तळागाळातल्या माणसाच्या आयुष्यात प्रकाशाचा किरण तरी येतो आहे का? केवळ तंत्रज्ञानाने नव्हे तर राजीव गांधींनी त्यांच्या लोकसभेच्या पहिल्या दिवशी जो दहाकलमी कार्यक्रम जाहीर केला त्यातून सामान्य माणसाच्या आयुष्यात काहीही बदल घडण्याची शक्यता नाही. आज राजीव गांधींचा पक्ष बहुमताने निवडून आला आहे. मतदान करणाऱ्या ६० % लोकांतील ५१ % लोकांनी त्यांना मते दिली आहेत. पण अगदी १०० % मतदान होऊन ९९ टक्के लोकांनी जरी राजीव गांधींना मतदान केलं असतं तरी तळागाळातील लोकांशी यांचा काहीही संबंध राहीलेला नाही. हेच या कार्यक्रमामुळे म्हणावं लागेल.

हा कार्यक्रम तरी काय आहे? निवडणूक व्यवस्थेत सुधारणा, शासन व्यवस्थेत सुधारणा, १९८५ हे युवकवर्ष साजरे करणे, कापड धंद्याची फेररचना, वन्यपशू संरक्षण, पडीत जमीन सुधारणा, गंगाजलशुद्धी! वगैरे. यांतला कोणता कार्यक्रम ते आर्थिक स्वरूपाचा म्हणतात कुणास ठाऊक? कदाचित गंगाजल-शुद्धीच्या कार्यक्रमाला नव्या शासनाच्या लेखी अग्रक्रम असावा. कारण युरोप अमेरिकेतून येणारे पर्यटक गंगेवर गेले तर त्यांना तेथील पाणी घाण दिसेल आणि परदेशांत या देशाबद्दलचे मत फार वाईट होईल अशी यांना भीती वाटते.

कापड धंद्याची फेररचना करणार म्हणजे काय करणार? कापडउद्योग आजारी का आहे याची दखल घेतली आहे का? इकॉनामिक टाईम्समध्ये हिंदुस्थानातील उद्योगधंद्यांविषयी लिहितांना श्री. अहलुवालिया यांनी म्हटले आहे, 'कापड धंद्याला बरकत न येण्याचे, कापडगिरण्या तोट्यात चालण्याचे एकच कारण आहे.



गावागावात राहणाऱ्या शेतकऱ्याला व शेतमजुराला साधं कापड घेण्याचीसुद्धा ताकद राहिलेली नाही. त्यांची मिळकत वाढत नाही म्हणून त्यांची क्रयशक्ती वाढत नाही.'

ही वस्तुस्थिती नजरेआड करून कापड उद्योगात अत्याधुनिक गणकयंत्राद्वारे चालणारी यंत्रसामुग्री जरी बसवली तरी जोवर ग्राहकाच्या हाती क्रयशक्ती येत नाही, तोवर कापड उद्योगाची स्थिती सुधारूच शकत नाही. मागील अहवाल पहिला असता जे चित्र आपल्याला स्पष्टपणे दिसू शकते ते कार्यक्रम बनविणारांच्या लक्षात का येऊ नये?

आज देशातील आर्थिक परिस्थिती काय आहे? १९७० साली किमतीची पातळी १०० मानली तर आज किमतीची पातळी कशी आहे? १९७० ते १९८५ या काळात सर्वसाधारण किमती ३३७ पर्यंत वाढत्या आहेत. अन्नधान्याच्या आणि इतर शेतीमालाच्या किमती या काळात २९४ पर्यंत वाढत्या व तेल, वीज, जळण आणि इतर कारखानदारी वस्तूंच्या किमती मात्र ५१९ पर्यंत वाढत्या. १९७० च्या तुलनेत शेतीमालाच्या किमती वाढलेल्या असल्या तरी ती काही शेतकऱ्याला मिळालेली जास्त किंमत नाही. ग्राहकाला द्यावी लागणारी किंमत लक्षात घेऊन हे निर्देशांक काढले जातात. शेतकऱ्याला मिळणाऱ्या किमतीमध्ये गेल्या ५ वर्षांत वाढ झाली नाहीच, उलट घट झाली आहे. भाताची किंमत गेल्या वर्षीच्या तुलनेत ११ टक्क्यांनी कमी झाली आहे. बाजरीची १० टक्क्यांनी तर मक्याची २४ टक्क्यांनी कमी झाली आहे. पंजाबमधील शेतकरी विजेच्या बिलांची वसुली थांबावी म्हणून आंदोलन करीत आहेत तर शासन त्यांच्यावर भयानक अत्याचार करीत आहे. पंजाबमधील शेतकरी काय मागतो आहे? आज पंजाबमधील शेतकऱ्याला बटाटा २८ पैसे किलोने विकावा लागत आहे. शासनाने निदान ५० ते ४० पैसे दराने विकत घ्यायची व्यवस्था करावी अशी त्यांची मागणी आहे. आज सातारा जिल्ह्यातील लोणंद येथे कांद्याचा भाव ४५ पैसे किलो आहे. याचा अर्थ फेब्रुवारी मार्च महिन्यात जेव्हा कांद्याचा हंगाम असेल तेव्हा त्याचे भाव २५ ते २० पैसे किलोपर्यंत येतील हे उघड आहे. ज्या उसाला चार वर्षांपूर्वी ३०० रु. प्रतिटन किंमत मिळत होती त्या उसाला आज जेमतेस १८० रुपये मिळताहेत. हेच चित्र सर्व शेतमीमालाचे आहे. ही परिस्थिती देशाचे कार्यक्रम बनविणारांना का दिसत नाही?

कारण उघड आहे आणि शेतकरी संघटना गेली पाच वर्षे ते सातत्याने मांडीत आहे. शेतीमालाला भाव मिळता कामा नये हे शासनाचे धोरण आहे, एवढेच नव्हे

तर आजच्या समाजव्यवस्थेचा हा पाया आहे. शेतकऱ्याला लुटून कारखानदारी तयार करण्याचे, भांडवलदारी करण्याचे हे धोरण या देशाचेच नव्हे तर साऱ्या जगाचे धोरण आहे. इंग्रजांनी इथल्या शेतकऱ्याला लुटून इंग्लंडमध्ये कारखानदारी वाढवली. इंग्रज गेले, पण गरिबी हटली नाही. देश अधिकाधिक गरीब होत गेला. याला कारण एकच; गोरा इंग्रज गेला असला तरी त्याच्या जागेवर बसून त्याच्याच किंबहुना अधिक क्रूर अशा रीतीने काळा इंग्रज या देशातील शेतकऱ्यांचे शोषण करीत आहे. गेली पाच वर्षे आम्ही हे सातत्याने सांगत आहोत.

राजीव गांधींचा कार्यक्रम या देशाच्या आर्थिक परिस्थितीपासून दूर चालला आहे; पण त्यांना दिल्लीत बसून देशाची आर्थिक परिस्थिती समजत नाही म्हणून त्यांच्या हातून अशा चुका होतात अशी कल्पना करणे चुकीचे ठरेल. जाणूनबुजून, समजून उमजून ही धोरणे आखली जातात. ती अशी का आखली जातात हे कुणाला कळत नाही याचा अर्थ त्यांच्या विचारात काही गोंधळ आहे.

१९७४ नंतरचा या देशाचा इतिहास समजून घ्यायचा असेल तर त्याच्या तीन पायऱ्या लक्षात घ्याव्या लागतीत. पंडित नेहरूंचा एक काळ, इंदिरा गांधींचा एक काळ आणि राजीव गांधींचा नवीन चालू होणारा काळ. या तीनही काळात व्यवस्था एकच-शेतीला लुटून कारखानदारी उभारणे-इंग्रजांचीच व्यवस्था पुढे चालविणे.

पंडित नेहरू हे उदारमानस्क सहृदय होते. अनेक अर्थशास्त्रज्ञांनी शेतकऱ्यांना लुटणे आवश्यक आहे हे समजावून दिले असले तरी त्यांना त्याचे वाईट वाटले असणार; पण याला काही पर्याय नाही हे जेव्हा त्यांना पटवून देण्यात आले असणार तेव्हा मग शेतीच्या शोषणाने निर्माण होणाऱ्या तणावावर औषध म्हणून त्यांनी जनसामान्यांना-शेतकऱ्यांना आवाहन केले, 'दीडशे वर्षे गुलामगिरीत खितपत पडलेल्या या देशाचा आता विकास आपल्याला करावयाचा आहे. देशाच्या विकासाकरिता औद्योगिकीकरण आवश्यक आहे आणि औद्योगिकीकरणाला शेतीतून मिळणारा कच्चा माल स्वस्तात मिळायला पाहिजे. शेतीमधून मिळणाऱ्या बचतीतून निर्माण होणारे भांडवल कारखान्यासाठी मिळाले पाहिजे. म्हणून देशबांधवांनो, देशासाठी आणि देशाच्या विकासासाठी त्याग करण्यास सिद्ध व्हा.' नुकतीच मिळालेली स्वातंत्र्याची बेहोशी होती, दुसरीकडे पाकिस्तानची भीती होती, इतरही अनेक संकटे होती, नव्या आशा होत्या, ऊर्मी होती. त्यामुळे लोक त्यागाला तयार झाले; त्यांना परिणामांची जाणीव नव्हती. त्यागाच्या नावाखाली पंधरा पर्षे शेतकऱ्याचे शोषण होत राहिले.

परिणाम काय झाला? शेतकरी लुटला गेला. शेती तोट्यात चालत राहिली.



त्यामुळे तो कर्जात बुडत गेला. त्यांना पोटभर खायला मिळेनासे झाले. हजारो शेतकरी- शेतमजूर शेती सोडून शहराकडे धावले, जगण्यासाठी! गावात जे शिल्लक राहिले त्यांच्यावर सत्ता राहिली 'पुढारी शेतकऱ्यांची.' गावाच्या विकासाच्या नावाने तयार झालेले शासनाचे प्रकल्प ज्यांनी गिळंकृत केले, अनेक सहकारी संस्था ज्यांनी पिळून खाऊन टाकल्या असे गावोगावचे गुंड गावांचे पुढारी बनले. इकडे जगण्यासाठी शहरात आलेले शेतकरी, शेतमजूर झोपडपट्टीमध्ये गलीच्छ वस्त्यांमध्ये राहू लागले. त्यांच्या दरिद्री अवस्थेमुळे आणि शहरात जगण्याच्या धडपडीमुळे नेता निवडायचेही स्वातंत्र्य त्यांना राहिले नाही. जिवंत राहायचे असेल तर त्या झोपडपट्टीत हातभट्टी लावणाऱ्या, मटका काढणाऱ्या दादांचे आधिपत्य मान्य करणे त्यांना भाग पाडलं. गावातले गुंड आणि शहरातले दादा हे या देशातल्या लोकांचे पुढारी बनले. त्यांना आपली कृष्णकारस्थाने करण्यासाठी शासनातील अधिकारी आणि राज्यकर्त्यांतील उच्चपदस्थांच्या संरक्षणाची आवश्यकता लागू लागली. खऱ्या अर्थाने देशातील सत्ता या गुंडांच्या आणि दादांच्या हाती गेली. शेतीमालाच्या स्वातंत्र्योत्तर शोषणाच्या धोरणाचा या देशातील राजकारणावर झालेला हा परिणाम आहे.

१९४७ साली स्वातंत्र्यलढ्यात देशाकरिता त्याग केलेले, तुरुंगवास भोगलेले, देहदंड सोसलेले काही लोक आमदार, खासदार झाले असतील; पण ते १९७० सालापर्यंत गावगुंड आणि शहरी दादांच्या राजकारणातील वाढत्या वर्चस्वामुळे पडद्याआड नाहीसे झाले. गावातील गुंड आणि शहरातील दादा यांना आपले धंदे चालविण्यासाठी जसे उच्चपदस्थांचे संरक्षण लागते, तसेच राजकर्त्यांनाही त्यांची जरुरी असते. गुंड आणि दादा यांना राजकारणावर प्रभुत्व ठेवण्यासाठी एका उजळ मुखवट्याची जरुरी असते. तो मुखवटा त्यांना नेहरूंच्या घराण्याच्या नावाने मिळाला. या मुखवट्यामागे राहून हे गुंड आणि दादा या देशातील राजकारणात प्रभुत्व ठेवून आहेत.

आणि मग इंदिराजींना देशभक्तीला आवाहन करायला वाव राहिला नाही. पं. नेहरूंच्या काळात समोर थोडे तरी देशभक्त होते. आता जर कुणी देशभक्तीचे आवाहन केले तर लोकांना हसू येईल; मग इंदिराजींनी अर्थशास्त्रामधले एक नवीन तंत्र वापरले, 'खुळखुळा तंत्र.' पोर भुकेने रडते आहे आणि त्याला दूध तर देता येत नाही अशा वेळी एका बाजूला खुळखुळा वाजवला, की त्याच्या आवाजाकडे बघत थोडावेळ तरी आपली भूक विसरून रडायचे थांबते. देशाचे लक्ष मूळ प्रश्नावरून विचलित करण्यासाठी इंदिराजींनी हे 'खुळखुळा तंत्र' वापरले. कुठं

एखाद्या राज्यातील मुख्यमंत्री बदला, आपल्याच मंत्रिमंडळात खांदेपालट करा, आकाशामध्ये एखादे अवकाशयान सोडा, कुणाला अंटार्टिकाला पाठवा, कुठे ॲटमबॉम्ब फोडा, एशियाडसारखे खेळ भरवा, नाम-चोगमसारख्या परिषदा भरवा. खुळखुळेच खुळखुळे. आवाज ऐका आणि पोटातली भूक विसरा. त्यामुळे देशाच्या परिस्थितीत काही आशादायक बदल झालाच नाही.

देश देशभक्तीच्या आवाहनापासून इंदिराजींच्या खुळखुळे तंत्रापर्यंत आला आणि आज स्थिती अशी आली आहे, की देशभक्तीच्या आवाहनाचा प्रश्नच नाही आणि खुळखुळ्यांचाही काही उपयोग नाही. राजीव गांधींचा स्वभाव कितीही उदारमनस्क हसता-खेळता असो, इतिहासात जी धोरणे ठरत असतात ती व्यक्तिगत स्वभावावर ठरत नसतात. भोवतालच्या परिस्थितीची घडी पाहून स्वभावाला मुरड घालावी लागते. राजीव गांधींचा स्वभाव कसाही असो, त्यांना आता देशभक्तीचे आवाहन करणे शक्य नाही, खुळखुळा दाखविणे शक्य नाही; त्यांच्यापुढे आता एकच पर्याय राहिलेला दिसतो, तो म्हणजे दांडगटशाही. त्याचे प्रत्यंतर या अधिवेशनाबाबत शासनाने सुरू केलेल्या दडपशाहीत दिसून येते. जिथे-जिथे विरोध उभा राहील तिथे-तिथे दांडगटगिरी आणि झुंडशाहीने लोकांना चेपणे हेच धोरण त्यांना राबवावे लागेल. आज जर इथे शेतकरी संघटना याऐवजी फिक्की (FICCI) असा भलामोठा फलक लावून कारखानदार, व्यापारी एकत्र येऊन सगळे मिळून शेतकऱ्यांना कसं लुटायचं असा विचार करीत बसणार असते तर देशाचे पंतप्रधानसुद्धा कदाचित अध्यक्ष म्हणून आले असते; पण इथे शेतकरी-देशातील सगळ्यांत मोठा व्यवसाय करणारे आपल्या व्यवसायातील लूट बंद करावी म्हणून एकत्र जमताहेत तर त्यांच्या गाड्या येऊ नयेत म्हणून पोलिसांनी रस्ते अडविले. हा दांडगटगिरीचाच प्रकार आहे. अर्थात यात आश्चर्यकारक काही नाही.

जेव्हा आर्थिक प्रश्न सोडवता येत नाही, लोकांचे लक्षही त्यापासून विचलित करता येत नाही तेव्हा लोकांच्या मनात एक भीती निर्माण केली जाते. राजीव गांधींचा लोकसभेतील प्रचार हा असाच लोकांच्या मनात भीती उत्पन्न करणाराच होता. देश तुटतो आहे, देश बुडतो आहे अशी आरडाओरडा चालू करा म्हणजे लोकांना भीती वाटते. इंदिराजींच्या खुळखुळा तंत्रानंतर राजीवजींनी वापरलेले हे 'बागुलबुवा तंत्र' खुळखुळा वाजवूनसुद्धा मूल जेव्हा रडायचे थांबत नाही तेव्हा त्याला 'बाहेर बागुलबुवा आहे, तो तुला खाऊन टाकील' अशी भीती दाखवून गप्प बसवतात त्यातलाच हा प्रकार आहे. म्हणजे देशभक्तीच्या आवाहनाकडून एका खुळखुळयाच्या आवाजाकडे आणि खुळखुळयाच्या आवाजा कडून



बागुलबुवाच्या भीतीकडे अशी या देशाच्या राजकारणाची वाटचाल झाली आहे.

खरोखरी हे अपरिहार्य आहे काय? लोकसभा निवडणुकीत देशाचे अखंडत्व, देशाची एकात्मता धोक्यात असल्याची हाकाटी केली गेली. खरेच या देशातील भाऊ भावाशी काही द्वेषापोटी भांडतो? देशामध्ये आज जी जातीपाती, धर्माची, भाषेची, प्रांतांची भांडणे चालू आहेत. त्याचे कारण एकमेकांविषयी मनात द्वेष आहे हे नाही. शेतकरी संघटनेने शेतीमालाला भाव मिळवून दिला की नाही हा प्रश्न वेगळाच; पण शेतकरी संघटनेने एक गोष्ट निश्चितपणे सिद्ध केली, की या देशातल्या शेतकऱ्यांच्या मनात कुठेही जातीपाती, धर्म, भाषा, प्रांत असे क्षुद्र वाद नाहीत. 'हा ब्राह्मण काय शेतकऱ्यांत काम करणार' ही पुढाऱ्यांची कावकाव दुर्लक्षित करून शेतकऱ्यांनी संघटनेचा केलेला स्वीकार, १९८१ मध्ये सीमावाद बाजूला ठेवून निपाणीला २३ दिवस रस्त्यावर एकादिलाने बसलेल्या कानडी व मराठी भाषीक शेतकऱ्यांचे आंदोलन, ज्या काळात भरदिवसा पंजाबमधील रस्त्यांवर माणसे एकमेकांचे मुडदे पाडीत होते त्या काळात लाखभर शीख, मुस्लिम, हिंदू शेतकऱ्यांनी चंडीगड येथील राजभवनाला ६ दिवस घातलेला घेराव याने हे सिद्ध होते, की भारतातील शेतकऱ्याच्या मनात कुठेही हे क्षुद्र वाद नाहीत. हे फक्त राजकारणी पुढाऱ्यांच्याच मनात आहेत. चंडीगड येथील राजभवनाच्या घेराओनंतर त्यातील सर्व शेतकऱ्यांच्या सहभागाने पंजाबप्रश्नाची खरी कल्पना येऊन इंडियन एक्सप्रेसचे श्री. स्वामीनाथन अय्यर यांनी म्हटले आहे, 'पंजाब पेटला आहे अशी सर्वत्र हाकाटी असताना वेगवेगळ्या पंथांचे, धर्मांचे लोक इतक्या शांतपणे शेतकरी संघटनेच्या झेंड्याखाली एकत्र बसलेले पाहताना माझ्या डोळ्यावर विश्वासच बसत नाही. माझं असं मत झालं आहे, की पंजाबचा प्रश्न जर सोडवायचा असेल तर तो शेतकरी संघटनेच्या हाती सोपवून द्यावा.' पंजाबमधील शीख-हिंदू वाद, हरियानातील जाट-लाला वाद, महाराष्टातील ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद, देशातील या प्रकारचे सर्व वाद हे शेतीच्या शोषणामुळे निर्माण झालेल्या तणावांचा फायदा घेण्यासाठी या देशातील धार्मिकांनी त्यांना दिलेले क्षुद्र विकृत स्वरूप आहेत.

देशातील परिस्थिती इतकी भयानक असूनही निवडणुका झाल्या म्हणजे पुन्हा-पुन्हा तीच मंडळी सत्तेवर येतात, ही मंडळी आपल्या काही उपयोगाची नाहीत, किंबहुना आपल्या अधोगतीस कारणीभूत ठरत आहेत हे समजत असूनसुद्धा लोक खुळखुळ्याच्या आवाजाने भुलून किंवा बागुलबुवाला घाबरून पुन्हा त्यांनाच सत्तेवर आणतात असे पूर्णांशाने म्हणता येणार नाही. निवडणूक म्हणजे शेवटी पर्यायांची निवड असते आणि प्रबळ विरोधी पर्याय उभा करण्यात विरोधी पक्ष अयशस्वी

ठरतात हे खरे लोकांच्या मतदान कौलाचे कारण आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस (आय) च्या यशामागे इंदिरा गांधींच्या हत्येमुळे तयार झालेली भावनेची लाट, हिंदू प्रतिक्रिया, शहरातील उच्चभ्रूंचा राजीव गांधींना पाठिंबा, तरुणांचा पाठिंबा, स्त्रियांचे भावनेपोटी झालेले मतदान अशा प्रकारचे घटक असूही शकतील; पण त्यांच्या प्रचंड यशाचे प्रमुख कारण समर्थ पर्यायांचा अभाव हेच आहे.

शेतकरी संघटनेने लोकसभेच्या निवडणुकीत एक भूमिका घेतली याचा अर्थ असा नव्हे, की सत्तेत बदल झाला तर शेतीमालाच्या भावाचा प्रश्न सुटेल असे संघटनेला वाटते. शेतीमालाला भाव न मिळणे हा या देशाच्या अर्थव्यवस्थेचा भाग आहे. निवडणुका लढवून शोषितांना न्याय मिळवून देता येत असता तर लाखो लोकांना रस्त्यावर यायला सांगून, लाठ्या व बंदुकीच्या समोर उभे राहायला सांगण्याची जरुरीच पडली नसती; पण निवडणुकीच्या या खेळाचे नियम आणि पट दोन्ही सत्ताधारी शोषकांचेच आहेत. सर्व प्रकारची प्रचार-प्रसार माध्यमे त्यांच्याच हाती आहेत. या सर्वांवर विरोधी पक्षांनाही मात करता आलेली नाही. त्यामुळे शेतीमालाला भाव मिळवून देण्याचा आणि पर्यायाने देशाचे दारिद्र्य नष्ट करण्याचा एकच उपाय आहे; तो म्हणजे शेतकरी संघटना मजबूत करणे. सत्तांध राज्यकर्ते शेतकऱ्यांबरोबर लाठीकाठीच्या भाषेशिवाय बोलत नाहीत. मग निःशस्त्र शेतकऱ्यांनी या राज्यकर्त्यांना जिथे टोचेल तिथेच टोचले पाहिजे. राज्यकर्त्यांचा प्राण त्यांच्या खुर्च्यांत आहे. त्या हादरविल्याखेरीज सत्तांध झालेल्या या लोकांची मग्रुरी कमी होणार नाही. त्यांचा दबाव कमी होणार नाही. अशा प्रकारचा बदल सत्ताधाऱ्यांत झाला नाही तर या देशाचा विनाश झपाट्याने होईल हे ध्यानात घेऊनच संघटनेने गेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस (आय) ला विरोध करण्याचे धोरण स्वीकारले.

देशाच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणायची असेल तर सर्वसामान्य माणसाच्या आयुष्यात एखादा प्रकाशाचा किरण निर्माण करील असा कार्यक्रम नजरेसमोर ठेवून, सर्व विरोधी पक्षानी आपापले क्षुल्लक मतभेद बाजूला ठेवून एकत्र येऊन लोकांसमोर एक समर्थ पर्याय उभा केला पाहिजे.

देशाच्या जगण्यासाठी शेतीमालाच्या शोषणाची प्रक्रिया त्वरित थांबली पाहिजे, ही या देशाची आत्यंतिक गरज आहे.

(८ फेब्रुवारी १९८५)

□□



## एकोणावीस

# राजीव गांधी – राजकीय व आर्थिक आढावा

१९८४ ची शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्यवर्षाची लढाई अपेक्षेच्या मानाने कमी यशस्वी झाली. हा पुष्कळसा दुर्दैवाचा भाग. पंजाबमधील शेतकरी आंदोलनाला अकाली आंदोलनाचे ग्रहण लागले. महाराष्ट्रातील आंदोलनाची घोषणा ३१ ऑक्टोबर ८४ रोजी टेहरे येथील मेळाव्यात व्हायची होती आणि त्याच दिवशी शेतकऱ्यांची प्रचारयात्रा न भूतो न भविष्यती अशा प्रचंड संख्येने टेहऱ्याजवळ येऊन ठेपली असताना पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्यावर प्राणघातक हल्ला झाल्याची बातमी येऊन ठेपली. दुसऱ्या दिवसापासून हजारो शीख भावांच्या शिरकाणाचे सत्र चालू झाले. लष्करात जागोजाग उठाव झाले. सनदशीर आंदोलनाचा मार्ग काही काळ तरी बंद झाला.

येत्या निवडणुकांच्या संधीचा फायदा घेऊन शासनावर दबाव आणण्याची शक्यताही आता राहिली नाही. गावबंदी प्रखरपणे अमलात आली; पण इंदिराजींच्या 'बुन्द' पुढे प्रभावी ठरली नाही. देशाच्या सुरक्षिततेला धोका असल्याचे वातावरण तयार करण्यात आले. सहानुभूतीच्या लाटेचा फायदा घेण्यात आला. विरोधी पक्षांच्या नाकर्तेपणामुळे राज्यकर्त्या पक्षाचे फावले. शेतकरी संघटनेने अचूक रणनीती वापरून एवढ्या अवघड परिस्थितीतही खुद्द पंतप्रधानाच्या मुखातून 'कृषिमूल्य आयोगाचे' नाव बदलून 'कृषि मूल्य आणि उत्पादनखर्च आयोग' करण्यात आल्याचे वदवून घेतले. इंदिराजी निवडणुकीच्या वेळी हयात असल्या तर शेतकरी संघटनेकडे येऊन त्यांना संघटनेच्या मागण्या मान्य कराव्या लागल्या असत्या असे म्हटले तर त्यात अतिशयोक्ती होणार नाही.

राजीव गांधी पंतप्रधान झाले. भरघोस बहुमताने सत्तेत आले. महाराष्ट्र राज्यातही त्यांच्या पक्षाला निसटते का होईना बहुमत मिळाले. एकाच घराण्यातील तिसरा वारस भारतासारख्या खंडप्राय देशाचा पंतप्रधान होतो, एवढेच नव्हे तर प्रचंड बहुमताने होतो आणि याहूनही वरचढ म्हणजे काही महिन्यांत तो आजोबा-आईपेक्षाही अधिक कर्तबगार व कार्यक्षम असल्याचे डिण्डिम पिटले जाऊ शकतात

ही मोठी चिंतेची बाब आहे. देशाचे नेतृत्व करावयास आवश्यक असलेला गुण ६० कोटींच्या देशात एकाच घराण्यात तीन पिढ्या लागोपाठ सापडावेत हे संख्याशास्त्रीयदृष्ट्या असंभाव्य आहे. जगातल्या इतर कोणत्याही लोकशाही व्यवस्थेत हे झालेले नाही. एवढेच नव्हे तर निखळ हूकमशाही व्यवस्थेतही कधी घडलेले नाही.

पण आपल्या देशात हे घडले आहे. पंतप्रधान झाल्यानंतर आठ महिन्यांनी राजीव गांधींनी राजकीय क्षेत्रातच नव्हे तर आर्थिक धोरणाबद्दलही प्रचंड वाहवा मिळविली आहे. शेतकरी संघटनेचे पुढील कार्यक्रम आखण्याच्या दृष्टीने राजीव गांधींचे मूल्यमापन करणे अत्यंत आवश्यक आहे.

प्रत्यक्ष पंतप्रधानाची सूत्रे हाती घेईपर्यंत राजीवजींची राजकारणातील कारकीर्द फारशी स्पृहणीय नव्हती. स्वच्छ चारित्र्याचा नेता म्हणून त्यांचा उदोउदो करण्यात येत असला तरी आंध्र प्रदेशातील रामाराव मंत्रिमंडळाची बरखास्ती, कर्नाटकातील मोईली यांचा आमदार खरेदीचा उपद्व्याप, काश्मीरमध्ये फारुक अब्दुल्लांशी जागांबाबत झालेले मतभेद आणि नंतरची निवडून आलेल्या मंत्रिमंडळाची बरखास्ती, महाराष्ट्रातील आमदारांवरील गुन्हेगारी आरोपासंबंधीच्या कायद्याबाबतची धरसोड, तमीळनाडू निवडणुका स्वतंत्रपणे लढवायचा निर्णय आणि त्याचा फजितवाडा, पंजाब प्रश्नाच्या अत्यंत कठीण अवस्थेत भिंद्रनवाले यांचा धार्मिक नेते म्हणून उल्लेख, निवडणुकीच्या काही काळ आधी पाकिस्तानशी युद्ध छेडले जाण्याच्या संभाव्यतेची घोषणा, एक ना अनेक घोडचुकांचा प्रचंड इतिहास राजीवजींनी अल्पावधीत घडवून आणला होता. अमेथी मतदारांना खूष करण्यासाठी शेकडो रुपये खर्चून पाईपमधून तेल आणून तेथेच वरखताचा कारखाना काढणे, सोनिया गांधी यांनी मारुती प्रकल्पावर पगारी संचालकाचे पद स्वीकारणे, इटली देशातील स्नामप्रोजेटी महामंडळाला देण्यात आलेली प्रचंड कंत्राटे या गोष्टी पाहिल्यावर स्वच्छ चारित्र्याच्या उदोउदोतही फारसा अर्थ नाही हे स्पष्ट आहे.

या उलट काही मोठ्या कामगिऱ्यांचे श्रेय राजीव गांधींना दिले जात होते. तेल उत्पादनातील वाढ, इलेक्ट्रॉनिक उद्योगासंबंधी नवे धोरण, दूरदर्शन प्रसारणाची झपाट्याने वाढ, टेलिफोन व्यवस्थेचे आधुनिकीकरण, एशियाड आदी परिषदा यांच्या यशात त्यांचा मोठा भाग असल्याची कुजबूज होती.

इंदिरा गांधींच्या मृत्यूनंतर राजीव गांधींना बहुमताचा पाठिंबा मिळण्याचे खरे कारण मात्र वेगळेच आहे. इंदिराजीच्या अंतिम संस्काराच्या वेळी राजीवजींना देशभरच्या लोकांनी दूरदर्शनवर पाहिले. अत्यंत कठीण प्रसंगी त्यांच्या चेहऱ्यावरचा



धैर्याचा, निश्चयाचा, दु:खाचा भाव त्यांच्यामागे खंबीरपणे उभ्या असलेल्या सोनिया गांधी आणि त्यांची राजबिंडी मुले राहुल आणि प्रियांका, काय सांगावे, एखाद्या सिनेमातले हे दृश्य असते तर त्याला ऑस्कर पारितोषिक मिळाले असते. दृश्य वास्तवातील होते म्हणून पारितोषिक पंतप्रधानकीचे मिळाले. दूरदर्शनच्या प्रसाराच्या राजकारणावर घडणाऱ्या परिणामाचे उदाहरण. त्यानंतर ज्या ज्या घटना घडल्या त्यांच्या अर्थ आज या बैठकीच्या निमित्ताने समजून घ्यायचा आहे.

राजकीय क्षेत्रात राजीव गांधी यांचे यश देदीप्यमानच म्हटले पाहिजे. त्यांनी ज्याला हात लावला त्यांचे आजपर्यंत सोने झाले. राजीवने जे जे केले, बरे- वाईट कसेही असो त्याची वाहवाच झाली.

इंदिराजींच्या हत्येनंतर शीखविरोधी दंगे झाले. ते घडवून आणण्यात भगत, वैं माखन आदी इंदिरा पक्षाच्या नेत्यांनी पुढाकार घेतला होता. तसे दाखवणारा सज्जड पुरावा PUCLT सारख्या संस्थांनी पुढे आणला आहे. पंतप्रधानांना या सगळ्या कारवायांची माहितीच नव्हती असे समजणे भोळेपणाचे होईल. किंबहुना या दंग्याचे कर्तृत्व अगदी राजीवपर्यंत पोचते अशी जनमानसात एक शंका आहेच; पण त्या परिस्थितीत अशा कर्तृत्वाला जनतेचा पाठिंबा मिळाला. भगत, माकन प्रचंड मतांनी निवडून आले.

गुप्तहेर प्रकरणाचा खूप गवगवा करण्यात आला. पहिल्या काही खबऱ्यांना पकडल्यानंतर राजीव गांधी यांनी स्वत: लोकसभेत मोठ्या गंभीर स्वरांत त्यासंबंधी घोषणा केली. राष्ट्रपती, पंतप्रधान, संरक्षण मंत्रालय, देशात सर्वोच्च जागांत खबऱ्यांचा बुजबुजाट होता हे ऐकून लोकांना धक्का बसला. कित्येक वर्षे इंदिरा राजवटीत हा प्रकार चालला याबद्दल इंदिरा पक्षाला दोष कोणीच दिला नाही उलट राजीव गांधींचे कौतुकच झाले. संडे ऑब्झर्व्हच्या विनोद मेहता यांनी म्हटले,

'जगांतील इतर कोणत्याही देशात असे बुजबुजलेले शासन टिकायचीच वानवा झाली असती. आपल्या देशात त्याचबद्दल पंतप्रधानांचे कौतुक चालले आहे.'' राजीव गांधींनी हे प्रकरण उघडकीस आणले का दबवले? आजपर्यंत पकडलेले जासूस अगदीच किरकोळ आहेत. त्यांनी चोरलेले कागदपत्र अगदीच फालतू आहेत. यातून अर्थ निघतो तो एवढाच- एक जर राजीव गांधींनी सत्तास्थानांतील महत्त्वाच्या व्यक्तींपर्यत गुप्तहेर जाळे पोचले आहे असे दिसल्यानंतर प्रकरण दाबून टाकले किंवा पहिल्यापासूनच सवंग लोकप्रियतेसाठी त्यांनी एका अगदी किरकोळ प्रकरणाबद्दल सनसनाटी तयार करण्याचा प्रयत्न केला. पक्षांतरबंदी विधेयक मोठ्या

तत्परतेने मंजूर करून घेतल्याबद्दल राजीव गांधींचे खूप कौतुक झाले. पक्षांतरबंदी कायदा करणे इतके सोपे होते तर इंदिराजींनी असा कायदा पूर्वीच करून का टाकला नाही? याचे उत्तर उघड आहे. आपल्या कारकिर्दीत इंदिराजींनी पक्ष आणि माणसे फोडण्याचे काम सर्वांत जास्त केले. त्या काळात पक्षांतरबंदीचा कायदा करण्यात त्यांना काहीच स्वारस्य नव्हते. इंदिराजींच्या हत्येनंतर राजीवजींनी न भूतो भविष्यति असे यश मिळाले, ते राखून ठेवण्याच्या बुद्धीने पक्षांतरबंदी तातडीने करण्यात आली. हा कायदा अत्यंत दोषास्पद आहे. संसदीय लोकशाहीचा या कायद्याने अंत केला आहे. या सर्वांची जाणीव लोकांना पुढेमागे होईल पण आज तरी त्यांच्या मनात कौतुकच आहे.

नेहरू घराण्याच्या वाटणीत राजीवजींना राजबिंडे रूप, खानदानी गर्भश्रीमंतीतून येणारा आत्मविश्वास आणि सत्तेच्या आसपास असणाऱ्यांमध्ये येणारी सावधानता, बहुश्रुतता उदंड मिळाली आहे. परदेशांतील त्यांचे दौरे, पत्रकार परिषदा, सकाळ-संध्याकाळ दूरदर्शनवरून घरोघर, गावागावात दाखवल्या जात आहेत. अमेरिकेतील दूरदर्शनवर राजीव गांधी पाहुन सर्वांचे ऊर अभिमानाने भरून आले. राजीवजींचे कैसे बोलणे! राजीवजींचे कैसे चालणे! राजीवजींची सलगी देणे! कैसे असे? असे वातावरण तयार झाले. अमेरिकेतील गाजलेल्या पत्रकार परिषदेत राजीवजींनी दिलेली अनेक उत्तरे अगदीच अपुरी होती, काही चुकीची होती. निदान एक उत्तर तरी घातक होते; पण आज त्याची चिंता कोणालाही नाही. आज कौतुकाचा महापूर चालला आहे.

पंजाब प्रश्नावर संत हरचंदसिंग लोंगोवाल यांच्याबरोबर तडतोड झाली. (१५ ऑगस्ट रोजी आसाम प्रश्नावरही.) ज्या तऱ्हेने, झपाट्याने, निश्चयाने वाटाघाटी करण्यात आल्या ते सर्वच या देशाला नवीन आहे. पण प्रश्न उरतो तो हा, की याच प्रकारची तडजोड करण्याची शक्यता अनेक वेळा तयार झाली होती. पंजाब प्रश्नावर ही तडजोड १९६१ साली होऊ शकली असती. निदान लाखावर अकाली सत्याग्रही तुरुंगात जात असताना करता आली असती. मग देश तुटण्याची वेळ येईपर्यंत हे प्रकरण ताणण्यात का आले?

आज लोक हे प्रश्न विचारीत नाहीत. राजीवजींना कशाबद्दलच कुणी काही विचारीत नाही.

पराभूत अर्थव्यवस्थेत तंत्रज्ञानही पराभूत राहिले आणि परदेशांतील तंत्रज्ञान आणि देशातील तंत्रज्ञान यातील तफावत वाढत चालली. आम्ही ॲम्बेसेडर, पद्मिनी गाड्याच वापरत राहिलो, कापड गिरण्या जुनाटच राहिल्या. गणकयंत्र



उत्पादन अगदीच प्राथमिक अवस्थेत राहिले. स्वावलंबनाच्या नावाखाली शासकीय संरक्षण वापरून ग्राहक लुटला गेला. सार्वजनिक आणि खासगी दोन्ही क्षेत्रातील उद्योगधंद्यात कार्यक्षमता रसातळाला गेली. हिंदी माल भिकार गुणवत्तेबद्दल बदनाम झाला.

भिकार मालाच्या किमती मात्र वाढत राहिल्या. जनसामान्यांना, शेतकऱ्यांना लुटून कारखानदारी उभी केलेली; त्यामुळे त्यांच्या हातात क्रयशक्ती उरली नाही. कापडाच्या दुकानात सेल लावूनही मालाचे साठे हलत नाहीत आणि लक्षावधी माणसे उघडी-नागडी फिरतात. कारखानदारीवर पोसलेल्या वर्गात काळ्या पैशाच्या साठ्याने एक नवा उपभोगवादी समाज तयार झाला आहे. पाश्चिमात्य देशात जे म्हणून मिळते ते-ते या वर्गाला भारतात हवे आहे. अगदी तातडीने हवे आहे. कपडे धुण्याची, भांडी घासण्याची, केर काढण्याची, स्वयंपाकाची यंत्रे, दूरदर्शन, व्हिडिओ सगळे-सगळे हवे आहे. या वस्तू तयार करणारे कारखाने आणि तंत्रज्ञान त्यांना हवे आहे. एका बाजूला सध्याच्या कारखान्याच्या मालाला गिऱ्हाईक नाही तर ज्या चैनीच्या वस्तूंना ग्राहक आहे त्या तयार करण्याचे तंत्रज्ञान देशात नाही.

नेहरूंच्या काळापासून औद्योगिकीकरणाच्या नावाखाली जो डोलारा उभा करण्यात आला तो किती पोकळ होता हे आता उघडकीस येत आहे. भारी उद्योगधंद्यांची कार्यक्षमता इतकी प्रचंड, की लोखंड, कोळसा, वीज जगातल्या इतर कोणत्याही देशातल्यापेक्षा येथे महाग. वापराच्या वस्तू महाग आणि भिकार गुणवत्तेच्या, तयार होणाऱ्या मालाला खप नाही, कारखानदारी बुडायला आली. शेतकऱ्यांच्या शोषणाच्या आधारावर कारखानदारी उभी करण्याच्या नेहरू योजनेचा फुगा फुटायला आला आहे.

या परिस्थितीतून तोड काढण्यासाठी शासन आज वाटेल ते करायला तयार आहे. करसुट घ्या, आयात घ्या, निर्यात करा, काहीही करा, पण उद्योगधंदे वाढू द्यात, असे शासन कारखानदारांपुढे गुडघे टेकून सांगत आहे.

कारखानदारांकडून मिळालेल्या सवलतीचा दुरुपयोग होणार नाही याची काही एक हमी नसताना शासनाने त्यांना एकतर्फी सर्वकाही देऊ केले आहे. आजपर्यंतच्या घटना पाहता राजीव शासनाच्या भोळ्या आशा प्रत्यक्षात येण्याची काहीही शक्यता दिसत नाही.

अंदाजपत्रकानंतर किमती भरमसाट वाढल्या. करसुटीमुळे कराची वसुली सुधारेल अशी आशा ठेवण्यासारखी परिस्थिती आज तरी दिसत नाही. शहरी मालमत्तेच्या किमतीत काहीही फरक पडलेला नाही, उद्योजकतेत गुंतवणूक

करण्याऐवजी शेअर बाजारातील सट्टयाला ऊत आला आहे. मेहनत, कष्ट करून, स्पर्धा करून उत्पादन वाढवावे व त्यातून स्वत:चा फायदा करावा ही भारतीय भांडवलदारांची प्रवृत्तीच नाही.

अर्थव्यवस्थेतील निर्बंध उठवण्याला नोकरशाहीचाही छुपा का होईना विरोध राहणार आहे. त्याच्या जादा मिळकतीचे संरक्षण करण्याचा प्रयत्न प्रत्येक नोकरशहा करणार आहे, इलेक्ट्रॉनिक उद्योग क्षेत्रातील निर्बंधाबद्दल हा अनुभव आजही येतो आहे.

कारखानदार नव्या मुक्त व्यवस्थेच्या आव्हानाला उतरू शकणार नाहीत. माजलेली नोकरशाही आपल्या हितसंबंधांचे संरक्षण करील आणि नवे आर्थिक धोरण कोलमडेल हे तर खरेच; पण त्यापलीकडे जाऊन आणखी एक गोष्ट समजली पाहिजे. हे नवे आर्थिक धोरण यशस्वी झाले तरी त्यात देशातील जनसामान्यांचे आणि पर्यायाने देशाचे अकल्याणच आहे.

यांत्रिकीकरणामुळे, आधुनिकीकरणामुळे संबंधित कारखान्याची कार्यक्षमता वाढेल, दरडोई उत्पादन वाढेल, उत्पादन खर्चही कदाचित कमी होईल. पण देशात भांडवल दुर्मीळ आहे. बेरोजगारी प्रचंड आहे. देशाची राष्ट्रीय उत्पादन वाढवायचे असेल तर प्रत्येकाला काम मिळेल अशी व्यवस्था केली पाहिजे. बेरोजगारीत नुकसान फक्त बेकारांचे नसते, देशाचेही असते. बेकार माणूस अगदी हाताने काम करू लागला तरी जे उत्पन्न वाढेल त्याला सर्व देश मुकत असतो. याकरिता भांडवलसामुग्रीची वाटणी अशी झाली पाहिजे, की ज्यामुळे एकूण सर्व श्रमशक्ती वापरली जाईल. अशी व्यवस्था देशाच्या हिताची आहे. भारी उद्योगधंद्यांतली काही अपरिहार्य भांडवली गुंतवणूक सोडली, तर कमीत-कमी भांडवलात जास्तीत-जास्त रोजगार कसे उपलब्ध होतील हेच पाहिले पाहिजे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या नावाखाली पंडितजींनी भारी उद्योगधंद्यांत भांडवल अडकवले. त्यांचा नातू आज त्याच घोषणेखाली उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनाकरितासुद्धा भांडवलाचा भारी उपयोग करू पहात आहे. यातून कारखान्यांची कार्यक्षमता वाढल्याचा भास होईल; पण एकूण अर्थव्यवस्थेच्या उत्पादकतेचा ऱ्हासच होईल.

'सतीच्या घरी बत्ती, छिनालेच्या दारी हत्ती' हे पंतप्रधान राजीव गांधींच्या आर्थिक धोरणाचे सूत्र आहे. ज्या उद्योजकांनी गेल्या अडतीस वर्षांत सर्व फायदे मिळवूनसुद्धा देश परावलंबी ठेवला, त्यांना सर्व काही देऊ करण्यात येत आहे. ज्या शेतकऱ्यांनी देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी बनवला, त्यांना दिल्या फक्त तीन गोष्टी. छोट्या शेतकरी मजुरांसाठी तीन हजार रुपयांपर्यंत फुकट विमा.



आता घरचे कोणी मेले तर संबंधितांचे हात ओले करता-करता चार-पारशे रुपये त्याच्यामार्फत पोचायची शक्यता आहे. ग्रामीण भागातील रोजगार हमीसाठी एकूण रक्कम ठेवण्यात आली आहे रु. ४०० कोटी. म्हणजे दर शेतकऱ्याच्या डोई रुपये ८ सुद्धा नाही. जवळ-जवळ इतकीच रक्कम मूठभर सरकारी नोकरांच्या केवळ वाढीव महागाई भत्त्याकरिता राखून ठेवली आहे आणि शेवटी पीक विमा योजना या नावाखाली पीक कर्जाचा विमा करण्याची सोय करण्यात येत आहे. पीक बुडाले तर बँकेचे कर्ज फिटण्याची खात्री आहे. शेतकऱ्याच्या हाती करंटीच ठेवणारी ही करंटी योजना आहे.

राजीव गांधींच्या नव्या धोरणात कापड उद्योगासंबंधीचे धोरण शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. कापड गिरणी मालकांना आता जुन्या गिरण्या बंद करण्याची मुभा आहे. नवी यंत्रसामुग्री वापरून गिरण्यांची उत्पादनक्षमता कितीहि वाढवता येईल. कापूस आणि कृत्रिम धागे यांचा त्यांच्या मनाला येईल तस उपयोग करता येईल. यासाठी कृत्रिम धाग्याची आयात करण्याची परवानगी मिळेल. त्यावरील आयातकरही कमी करण्यात येतील. जनता किंवा स्वस्त कापड तयार करण्याची त्यांच्यावरील जबाबदारी आता हातमागाच्या बोडक्यावर टाकण्यात आली. यंत्रमागांनी मोठ्या हिमतीने गिरण्यांशी स्पर्धा चालवली आहे. तोसुद्धा जाच नको म्हणून यंत्रमागावर बंधने घालण्यात आली आहेत. ज्या गिरण्या बंद पडतील त्यांतील बेकार होणाऱ्या कामागारांना पुनर्वसनाच्या कार्यक्रमाचे एक मधाचे बोट लावण्यात आले आहे.

पण सर्वात भयानक परिस्थिती होणार आहे ती कापूस उत्पादक शेतकऱ्यांची. कापड धंदा मुख्यत: कापसावरच आधारलेला राहील. कापूस उत्पादक शेतकऱ्याला योग्य भाव मिळावा या दृष्टीने भारतीय कापूस महासंघ (सीसीआय) प्रयत्नशील राहील. कापसाचे भाव स्थिर राहावेत यासाठी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी महासंघ संपर्क राखेल... ही केवळ आश्वासनांची आतषबाजी आहे. ती प्रत्यक्षात यावीत याकरिता काही ठोस कार्यक्रम नाही. राजीव गांधींची सर्व तडफ व कार्यक्षमता राजकीय क्षेत्रापुरती आणि औद्योगिक क्षेत्रापुरती मर्यादित दिसते. शेतीचा प्रश्न आला, की त्यांची राजवट गळबटते हा आजपर्यंतचा अनुभव आहे. 'कृषि मूल्य आयोगाचे' नाव बदलून ते 'कृषि मूल्य व उत्पादन खर्च आयोग' करणे संघटनेच्या दडपणाखाली शासनाला भाग पडले. या आयोगाच्या प्रत्यक्षात कामकाजाच्या पद्धतीत काय फरक पडणार हे शासनाने अद्यापही जाहीर केलेले नाही. शेतकऱ्यांचा विश्वास संपादन करण्यासारखे राजीव गांधींनी काहीही करून दाखवलेले नाही.

कापूस उत्पादक शेतकऱ्यांना राजीव गांधींच्या नव्या अर्थ धोरणाचा सगळ्यांत मोठा तडाखा बसणार आहे. आजही अपुऱ्या किमतीमुळे तो खचत आहे. मोठ्या प्रमाणावर कृत्रिम धागा वापरात आला तर महाराष्ट्रातील कापूस उत्पादन तर हळूहळू बंदच करावे लागेल.

स्वातंत्र्याचा लढा महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली कापूस उत्पादकांचा, विणकरांचा प्रश्न प्रतीकात्मक बनवून, चरख्याच्या निशाणाखाली लढला गेला. महात्मा ते राजीव गांधी यात संपूर्ण उलटापालट आहे. स्वदेशी वस्तू आणि ग्रामोद्योग यावर भर देऊन देशातील शेतकऱ्यांची, कारागिरांची लूट थांबवण्याच्या महात्माजींच्या तंत्रापासून परकीय सामुग्रीची खुली आयात करून 'विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या' घोषात देश परकीय आर्थिक वर्चस्वाखाली ढकलण्याची तयारी राजीव गांधी करीत आहेत.

गोऱ्या इंग्रजांची नीती आज वेगवेगळ्या नावांखाली काळा इंग्रज चालवीत आहे. याचा प्रतिकार कसा करावा? महात्मा गांधींनीच याचे उत्तर देऊन ठेवलेले आहे. या नव्या धोक्याला तोंड द्यायचे असेल तर सर्व शेतकऱ्यांनी कृत्रिम धाग्याच्या कापडावर बहिष्कार टाकला पाहिजे. हे कपडे कितीही सोयीस्कर असोत, कमी खर्चाचे असोत; शेतीमालाला भाव पाहिजे असेल तर कृत्रिम धाग्याचे कापड वापरणे निषिद्ध मानले पाहिजे.

एवढेच नव्हे, गावोगाव या विलायती धाग्याच्या आणि कापडांच्या आणि कपड्यांच्या होळ्या पेटल्या पाहिजेत; तरच राजीव गांधींच्या राजबिंड्या मुखवट्यामागील देशी-परदेशी कारखानदारांच्या या नव्या आक्रमणाला अडवता येईल.

*(२३ ऑगस्ट १९८५)*

□□



वीस

# ''आम्ही लटिके ना बोलू''

वर्तमानपत्रात, मासिकात आपल्या जवळच्यापैकी कोणाचे नाव, फोटो छापून आले म्हणजे आपण केवढ्या कौतुकाने तो अंक मिळवतो. वाचतो, जपून ठेवतो. म्हणजे साहित्यात आपले, आपल्या ओळखीचे आपण शोधत असतो. मग खरे म्हटले तर शेतावर राबणाऱ्या आपल्या सगळ्यांच्या आयुष्याचे चित्रण, प्रतिबिंब आपण साहित्यात शोधायला पाहिजे.

दरवर्षी पावसाळा यायच्या आधी बीबियाण्याची जमवाजमव, खर्चासाठी सावकाराची मिनतवारी, सोसायटीतली कारस्थाने, भानगडी, पाऊस येतो किंवा नाही याची चिंता, आल्याचा आनंद. येत नसला तर पोटात उठणारा भीतीचा गोळा, पिकावर येणाऱ्या तणांच्या आणि रोगांच्या धाडी, पीक उभे राहिल्यावर होणारा आनंद, बाजारात गेल्यावरची शोकांतिका, वाढते कर्ज, पुढाऱ्यांची मग्रुरी, आग लागलेल्या घरांतून निसटताना व्हावी तशी गावच्या आयुष्यातून सुटण्याची ज्याची त्याची स्वत:पुरती धडपड या किड्यांसारख्या जीवनात लिहिण्यासारखी प्रचंड साधन सामुग्री आहे; पण ७० टक्के लोकांच्या आयुष्याचे प्रतिबिंब साहित्यात कधीच पडले नाही.

खुरपताना, गवत कापताना, पिके काढताना, जात्यावर शेतकरी स्त्रियांनी उत्स्फूर्तपणे म्हटलेली गाणी माळरानातच विरून गेली. मोटेवर, नांगरावर बैलांच्या साक्षीने शेतकऱ्यांनी ढाळलेले दु:खाचे कढ तापलेल्या जमिनीतच जिरुन गेले.

शेतकऱ्याची पिके लुटून नेलेल्या दरोडेखोर लुटारूंच्या तळावर गायिली गेलेली उत्तान, उन्मत्त गाणी साहित्यात आली.

मोठ्या लुटारूंनी दरबार भरवायला सुरुवात केल्यावर त्यांचे कौतुक करणाऱ्या भाट-शाहिरांची प्रतिभा गाजली. त्यांचे मनोरंजन करणाऱ्या कलावंतिणींच्या लावण्यांचा पूर आला, संगीताच्या मैफली झडू लागल्या.

पिके लुटून पेठा, शहरे वसवणाऱ्या व्यापाऱ्यांच्या, कारकुनांच्या समाजाचे साहित्य तयार झाले. साहित्य असो, संगीत असो, कला असो, शेतकऱ्याचे

असे त्यात काहीच नाही.

इतिहास जसा विजेते लिहितात तसेच साहित्य-संगीत-कलासुध्दा विजेत्यांच्याच असतात. आमचे काहीच नाही; मग आम्हाला लुटणाऱ्यांच्या लावण्या-तमाशात आम्ही आपले मनोरंजन करून घेऊ लागलो; पण त्यात चंद्रकांत राजाच्या मुलीची कहाणी आली, शेतकऱ्याच्या मुलीची नाही.

मग त्यातले जवळचे साहित्य आम्हाला संतांचे वाटू लागले. कुठेतरी देव आहे, स्वर्ग आहे, मुक्ती आहे, एका नामात गुंगले, की सर्व दुःखाचा विसर पडतो. शेवटी देहाच्या दुःखाचा काय विचार करायचा? आत्मा अमर आहे या दिलाशात गावोगाव 'रुप पाहता लोचनी'च्या भजनात सुटका शोधू लागलो.

शहरात गेलेली शेतकऱ्यांची पोरे शहरात रमली. त्यात लिहिण्याचे कसब असणाऱ्यांनी गावाविषयी लिहिले; पण शहराला काय पटेल काय आवडेल याचा विचार करीत लिहिले. 'हरामखोरांनो! तुम्ही माझे गाव लुटले. या पापाचा तुम्हाला झाडा द्यावा लागेल.' हा टाहो कोणी फोडला नाही. उलट आपल्या ग्रामीण जन्मामुळे साहित्यात आपल्याला काही राखीव जागा असावी असा आक्रोश करणारी एक साहित्य आघाडी उभी झाली. शेतकऱ्यांच्या दुःखाचं भांडवल करून त्यावर साहित्यात स्थानाचा जोगवा मंडळी मागू लागली.

दूरदर्शन आता गावोगाव येईल. आज त्यावर अनेक कथा चालू आहेत. हमलोग, खानदान, ये तो है जिंदगी, रजनी इत्यादी-इत्यादी. या हमलोगमध्ये आम्ही लोग कुठेच नाही. खानदानी शेतकरी कुटुंब नाही. या जिंदगीत आमचे आयुष्य कोठेच नाही. पाच टक्क्यांच्या आयुष्याच्या चित्रणाने ९९ टक्के दूरदर्शन भरला आहे; पण आपल्या घरच्या लुटून नेलेल्या वैभवाने भरलेल्या त्यांच्या महालांचे आम्ही जिभल्या चाटीत कौतुक करतो; हे आमचे नाही या विचाराने संतापून उठत नाही.

हे अपरिहार्य आहे. साहित्य गुलामांचे नसते, विजेत्यांचे असते. सगळ्या जगाकडे बघायचे झाले तर, इंग्रजी वाङ्मयाच्या वैभवशाली दरबारात इंग्रजीची ऐट दाखविणाऱ्या इंडियन लेखकांना इंडियातील ग्रामीण साहित्यिकांइतकेसुद्धा स्थान नाही. ताकद साहित्याची नसते, त्यामागील समाजाच्या सधनतेची असते. युरोपातील देश आज इंग्रजी शिकत नाही, अमेरिकी शिकतात. आम्ही अक्षरशः गुलामांचे गुलाम आहेत.

संघटनेच्या कामाच्या ओघात माझ्या लक्षात आले की, शेतकऱ्यांची जीभ कापली गेलेली आहे. दुसऱ्या कुणाची तरी जीभ लावूनच त्यांना बोलता येते.



(ग्रामीण साहित्यिक शहरी विद्वानांची जीभ लावतात, पुढारी मुंबईची जीभ लावतात. अगदी सोसायटीचा सेक्रेटरीसुद्धा तालुक्याची जीभ लावून बोलतो. शेतकऱ्याच्या जिभेने कोणीच बोलत नाही.)

आम्ही बोललेले जगात ऐकले जाईल अशी साधने आमच्याकडे नसतील. शेती लुटून औद्योगिकीकरण करणारी व्यवस्था संपेपर्यंत ती साधने आमच्याकडे येणारही नाहीत; पण तोपर्यंत आमची जीभ तोंडात ठेवली पाहिजे. शब्द कसेही येवोत-अशुध्द, बोबडे, वेडेवाकडे, तालहीन-सूरहीन, सौदर्यहीन; पण त्यांतला अर्थ हा आमच्या अनुभूतीचा प्रामाणिकपणा टिकवणारा पाहिजे. साहित्याच्या बाजारी 'मुंगी व्याली शेळी झाली' वाङमयाला उठाव असला तरी निदान आमच्या-आमच्यात तरी आमचा निश्चय 'आम्ही लटिके ना बोलू'.

आमची गुलामगिरी, आमचे नाकर्तेपण अर्थकारणातून राजकारणात गेले, समाजकारणात गेले. साहित्यात आणि संस्कृतीच्या क्षेत्रात एक कण जिवंत ठेवू शकलो तर, त्या बीजातून शेतकरी आंदोलन यशस्वी झाल्यावर नव्या प्रामाणिक संस्कृतीचे तरू कोटी-कोटी तयार होतील.

*(२६ जुलै १९८५)*

□□

## एकवीस

# चंदीगढ आंदोलनाचा बोध

शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्यवर्षाची सुरुवात तर सुरेख झाली. अगदी अपेक्षेबाहेर चांगली झाली.

पंजाबच्या जवळ-जवळ लाखभर शेतकऱ्यांनी चंडीगड येथील राजभवनास घेराओ घातला. देशभरच्या इतर राज्यांतील शेतकऱ्यांनीही उपस्थित राहून आपली एकता सिद्ध केली. अत्यंत शिस्तीने आणि शांततेने हा लढा पार पडला. शेवटी वाटाघाटीतून बहुतांश मागण्या पदरात पडल्यावरच घेराओ उठवण्यात आला. विजय मेळावा झाला. उत्सवाच्या जल्लोषात शेतकऱ्यांनी गहू बंद, कर्ज बंद, गांव बंद या त्रिसूत्रीच्या प्रतिज्ञा घेतल्या.

आता पुढच्या कार्यक्रमाची जोरदार तयारी पंजाब, हरियानात सुरू झाली आहे. हा लेख प्रकाशित होईल तेव्हा भास्करराव बोरावके व मी पुन्हा हरियाना राज्यात असू. चंद्रकांत वानखेडे यांनी लिहिलेले सविस्तर वर्णन 'संघटक'च्या अंकात आहे. त्या वर्णनात आणखी कितीतरी वाढवण्यासारखे आहे आणि तरीही ते अपुरेच राहील. चंडीगडच्या राजभवनाभोवतालच्या रस्त्यावर काढलेले ते धुंद दिवस वर्णायला कोणी उत्स्फूर्त प्रतिभेचा महाकवीच हवा.

चंडीगडच्या आंदोलनात नवीन काय होते? सगळा वेळ मला, सतत निपाणीच्या आंदोलनाची आठवण येत होती. भाकरीची, निवाऱ्याची सोय, भजन- भाषाणाच्या कार्यक्रमातील उत्साह, शिस्त, शांतता निष्ठा या सगळ्या गोष्टी निपाणी आंदोलनात होत्या. चंडीगडला सगळ्या पंजाबातील लाखभर शेतकरी आले होते. निपाणीला अर्ध्या तालुक्यातून चाळीस हजार शेतकरी आले होते. चंडीगडला आठवडाभरच सत्याग्रह चालला. निपाणीला आम्ही पुरे बावीस दिवस बसलो होतो; तरीही चंडीगड आंदोलनाची अनेक वैशिष्ट्ये आहेत. अनेक नवे धडे, बोध या आंदोलनात शिकण्यासारखे आहेत.

पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे आंदोलनातील अनेक राज्यांचा सहभाग. चाकण, नाशिक, निपाणी, अगदी दूध आंदोलनातसुद्धा फक्त संबंधित शेतकरी भाग घेत



होते. निपाणीला निदान नाशिकचा, नगरचा, धुळ्याचा शेतकरी येईल अशी अपेक्षा होती. निदान धान्याधुन्याची मदत येईल असे वाटत होते, ते घडले नाही. चंडीगड आंदोलनात महाराष्ट्राचा जथा आला होता. हरियानाचे शेतकरी आले. मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश व आंध्रचे प्रतिनिधी होते. पंजाबच्या शेतकऱ्यांना याचीच मोठी अपूर्वाई वाटत होती. त्यांच्या उत्साहाला उधाण आले होते.

परभणीला निर्णय झाला होता. स्वयंसेवकांची नोंद झाली होती. पंजाबातील वातावरणासंबंधी विपरीत बातम्या येत होत्या. महाराष्ट्रात अनेकांनी चंडीगडला जाण्याविरुद्ध सल्ला दिला, जाऊ नका म्हणून तळमळून सांगितले. स्वयंसेवकांचा निश्चय अटळ पाहुन शिवीगाळसुद्धा केली. संघटनेचे पाईक भेदरले नाहीत. धोका आहे हे तर उघडच दिसत होते; पण आपापल्या गढी-किल्ल्यात स्वस्थ बसून राहण्याचे राघोबादादांचे शिंदे-होळकरी राजकारण त्यांनी नाकारले. दरीवरून घोड्याची उडी घेणारा प्रतापसिंह चेतकाच्या पायातील लांबी आणि दरीच्या रुंदीचा हिशेब फुटपट्टीने करत बसला नाही. त्याने घोडा फेकला आणि वीराला वरणारी विजयश्री त्याने मिळवली.

अनेक राज्यांतील वेगवेगळ्या जातीधर्मांची, अलग-अलग भाषा बोलणारी शेतकरी मंडळी जमली. शांततेने, शिस्तीने त्यांनी कार्यक्रम पार पाडला. चंडीगडच्या जनतेच्या मनातील भीती निवळत गेली आणि सर्व उत्तरेत या आंदोलनाविषयी उत्साहाला उधाण आले.

'पंजाबात गेल्या तीन वर्षांत घडलेली एकमेव शुभ घटना!' एका संपादकाची प्रतिक्रिया. दुसऱ्या काही प्रतिक्रिया पहा.

'सर्व राजकीय पक्षाना चिंता वाटत आहे.'

'धार्मिक संघर्ष किती उथळ आहे हे शेतकऱ्यांनी दाखवून दिले.'

'शेतकऱ्यांना राजकारणापेक्षा अर्थकारण जास्त महत्त्वाचे वाटते.'

'सर्व देशाला नवी दिशा दाखविणारे क्रांतिकारी आंदोलन.'

सत्याग्रही शेतकरी जवळजवळ सगळे शीख पंथाचे. आठवडाभरच्या भाषणात त्यांनी सर्व पक्षांवर कडक टीका केली. अकालींवर सुद्धा! अनेक पक्षांनी आपली मंडळी पाठवली. काही पक्षनेतेसुद्धा आले. त्या सर्वांना परस्पर वाटेला लावण्यात आले. येथे सर्व क्षुद्र वाद संपले होते.

जाती-भाषा-वादांवर मात करण्याची आपली ताकद शेतकरी आंदोलनाने पूर्वी सिद्ध केलीच आहे. महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांनी ब्राह्मणवाद उठवू पाहणाऱ्यांचा मुखभंग केला. कर्नाटकातल्या तंबाखू शेतकऱ्यांनी भाषावाद झुगारून दिला. 'गुंडूराव

शेतीमालाला भाव देणार असेल तर सगळा महाराष्ट्र कर्नाटकात घालवायला आम्ही तयार आहोत' या घोषणेला प्रचंड दाद दिली होती.

चंडीगडला यापुढे जाऊन विक्राळ धर्मद्वेषावरही मात करण्याची आपली ताकद शेतकरी आंदोलनाने दाखवून दिली. जाती, भाषा, धर्माचे क्षुद्र वाद हे देशाची विकासाची गती खुंटल्यामुळे निर्माण होतात. ओढ्याला तुंबारा पडला, की शेवाळे माजते, किड्यांची वळवळ, हाणामारी चालू होते. किड्याकिड्यातील वाद सोडवू म्हटल्यास सुटणार नाहीत. किंबहुना ते वाद वाढवण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न होतो.

विकासाचा खुंटलेला मार्ग खुला करणे, तुंबारा काढणे हा क्षुद्रवाद संपवण्याचा एकच रस्ता आहे. संघटनेच्या एकसूत्री कार्यक्रमात हे वाद संपवण्याचे सामर्थ्य आणि क्षमता आहे हे सर्वांच्या नजरेसमोर आले. चंडीगड आंदोलनाची ही सर्वांत मोठी सिद्धी आहे.

विजेच्या दराचे आंदोलन पुरे चौदा महिने चालले होते. शासन काही निर्णय घेत नव्हते. चंडीगडच्या धरण्यामुळे शासनाला निर्णय घेणे भाग पडले. बहुतेक मागण्या मान्य झाल्या. विजेच्या दरांच्या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी तज्ज्ञसमिती नेमण्यात आली. तज्ज्ञांच्या शिफारसी लक्षात घेऊन नवीन दर जाहिर होईपर्यंत विजेच्या बिलांची वसुली स्थगित करण्यात आली. हे सर्व निर्णय समानधानकारक तर होतेच; पण त्याहुनही एक महत्त्वाची गोष्ट- वीजबोर्डाचा उत्पादनखर्च वाढला असल्यामुळे दरवाढ अपरिहार्य आहे असे शासनाचे म्हणणे होते. संघटनेचे म्हणणे होते खर्च भरून निघेल असा दर त्यांना मिळालाच पाहिजे; पण हाच दर कृषिमूल्य आयोगाने गव्हाचा, भाताचा उत्पादनखर्च काढताना धरला पाहिजे. ही मागणी पंजाब शासनाने मान्य केली. तज्ज्ञसमितीने दरासंबंधी शिफारशी करताना वीजबोर्डाचा उत्पादनखर्च तर लक्षात घ्यावयाचा आहेच; पण त्याबरोबर कृषिमूल्य आयोगाने त्याच्या हिशेबात कोणता वीजदर लक्षात घेतला होता हेही पाहावयाचे आहे. चंदीगडच्या आंदोलनातील ही कामयाबी पुढील इतिहासात सर्वांत महत्त्वाची ठरेल.

शेतकऱ्यांनी शिस्त पाळली. शांतता ठेवली ही गोष्ट तर खरीच; पण त्याबरोबर चंडीगडच्या प्रशासनाचेही जाहीर कौतुक करावयास पाहिजे. चंडीगड शहर केंद्रशासित प्रदेश आहे. संघटनेचे भांडण चंडीगड प्रशासनाशी नव्हते. पंजाब शासनाशी होते. चंडीगड प्रशासनावर शेतकरी आंदोलन म्हणजे नसतीच ओढावलेली आफत होती; पण आंदोलन कसे हाताळावे याचा त्यांनी आदर्श वस्तुपाठ घालून दिला.



आवश्यकता पडल्यास, शांतताभंग झाल्यास आंदोलन अगदी निर्घृण मार्गानेसुद्धा मोडून काढण्याची जय्यत तयारी प्रशासनाने ठेवली होती; पण संघटनेच्या शांततेच्या हेतूची खात्री पटताच प्रशासन आणि संघटना यांनी एकत्र बसून धरणे कोठे कोठे बसेल याचे निर्णय केले. स्वच्छता, दिवे, पाणीपुरवठा याची व्यवस्था प्रशासनाने केली. पंजाब शासनाशी बोलणे करण्याबाबतही पुढाकार घेतला.

महाराष्ट्रात, कर्नाटकात शासनाने गेल्या चार वर्षात घेतलेली नेमकी उलटी भूमिका पाहण्यासारखी आहे. अगदी शांततेने बसलेल्या शेतकऱ्यांवर लाठीहल्ला, गोळीबार करणे, प्रमुख कार्यकर्त्यांना वारंवार अटक करणे, त्यांच्यावर शेकडोंनी खोटे खटले लादणे, ते म्हणजे कोणी गुंड दंगेखोर आहेत असा भास निर्माण करणे, रस्त्यावर शेतकरी यायच्या आधी त्यांना गोळ्या घालून मारणे, शाळांत, घरांत घुसून अगदी आयबहिणींनासुद्धा लाथा-बुक्क्यांनी तुडवणे ही महाराष्ट्रातील शासनाची नीती राहिली आहे.

याला अपवाद फक्त १९८० सालचे चाकण आंदोलन. मी स्वत: त्या वेळी उपोषण करीत असल्यामुळे मला अटक झाली नाही. सगळ्या रस्त्यावर हजारो शेतकरी बसून होते. शेतकऱ्यांनी शांतता पाळली, शासनानेही संयम राखला, डोके फिरू दिले नाही. चाकणला रक्तपात झाला नाही. कारण त्या वेळी महाराष्ट्रात राष्ट्रपतींची राजवट होती. पुढाऱ्यांची सत्ता नव्हती. अंतुले, वसंतदादा मुख्यमंत्री असते तर चाकणच्या रस्त्यावरही त्यांनी शेतकऱ्यांचे रक्त सांडले असते.

कार्यकर्त्यांना अटक करणे, शेतकऱ्यांना उधळून लावण्यासाठी त्यांच्यावर बळाचा क्रूर वापर करणे ही नीती राजकीय पक्षातील पुढाऱ्यांचे सरकारच वापरते. कारण या दुष्ट कंसमामांना शेतकरी संघटनेत आपले मरण स्पष्ट दिसत असते. आपल्या राजकीय स्वार्थापोटी ती शेतकऱ्यांची पोरे शेतकऱ्यांचाच गळा कापतात. शेतकरी आंदोलन हे खऱ्याखुऱ्या सत्याग्रहाचे आहे. त्यावर झालेला बलप्रयोग हा अगदी अनावश्यक होता हेही चंडीगडच्या आंदोलनाने दाखवून दिले आहे.

चंडीगढच्या आंदोलनाचे आणखी एक महत्त्व आहे. अणुबॉम्बचा स्फोट घडवून आणण्यासाठी बॉम्बमध्ये एक लहानसा स्फोट घडवून आणावा लागतो. चंडीगढचे आंदोलन ही यंदाच्या शेतकरी विस्फोटाची वात आहे. सर्व पंजाब, हरियाना गहू थांबवायला, कर्ज बंद करायला, गावबंदी करायला सज्ज झाला आहे. महाराष्ट्राची पाळी दिवाळीच्या सुमारास येणार आहे. आमची तयारी आम्ही कमी पडू देता कामा नये. कांदा मरत आहे. ऊस मेला आहे. या सगळ्या अन्यायाची चीड मनात ठेवून आंदोलन उभे करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. १९८४ च्या

स्वातंत्र्यलढ्याचा निर्णायक टोला देण्याचे काम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांकडेच येणार आहे. सध्या गावबंदी प्रचार, 'शेतकरी संघटक'चा प्रसार एवढा कार्यक्रम महाराष्ट्रापुढे आहे. पुढच्या लढाईची तुतारी उठायच्या आधी हे काम महाराष्ट्रात किती प्रभावीपणे पार पडले यावर १९८४ च्या स्वातंत्र्यलढ्याचे यश शेवटी अवलंबून राहणार आहे.

(६ एप्रिल १९८४)

□□



बावीस

# निवडणूक आंदोलनाची सुरुवात

सहकारी संस्थांच्या, विशेषकरुन सहकारी कारखान्याच्या निवडणुकांचे ढोल वाजू लागले आहेत. होणार, नाही होणार असे म्हणता-म्हणता साखर कारखान्यांच्या निवडणुका झपाट्याने म्हणजे मे महिन्याच्या शेवटपर्यंत उरकून घेण्याचा शासनाचा बेत दिसतो.

गेल्या पंधरवड्यात वेगवेगळ्या जिल्ह्यातील कार्यकर्ते माझ्याकडे येऊन गेले. या निवडणुकांसंबंधी शेतकरी संघटनेचे धोरण काय? प्रत्येक कारखान्यात संघटनेच्या कार्यकर्त्यांनी काय करावे? असे अनेक प्रश्न घेऊन कार्यकर्ते माझ्याकडे येत होते.

वस्तुत: या विषयाची सविस्तर चर्चा मनमाड येथे भरलेल्या ४ सप्टेंबर १९८३ च्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत झाली होती. परभणी येथील अधिवेशनातही या विषयाचा ऊहापोह झाला होता. आर्थिक संस्थांच्या निवडणुकांसंबंधी काहीही गोंधळ कार्यकर्त्यांच्या मनात असण्याचे कारण नव्हते. तरीही या विषयावरचे संघटनेचे धोरण एकदा स्पष्टपणे मांडण्याचे ठरवले आहे.

सहकारी संस्थांचे सभासद वेगवेगळ्या पक्षांचे असतात, गटांचे असतात, शेतकरी संघटनेचेही असतात. संघटनेचे कार्यकर्ते कोणत्या ना कोणत्या सहकारी संस्थेचे सभासद असतातच. गावाची विविध सेवा सहकारी सोसायटी, तालुक्याचा खरेदी-विक्री संघ, बँका, बाजार-समित्या, दूध सोसायट्या, सूतगिरण्या, साखर कारखाने या ना त्या संस्थेचा प्रत्येक शेतकरी सभासद असतोच.

या सहकारी संस्थांच्या निवडणुकींचा तसे म्हटले तर राजकारणाशी काहीही संबंध नाही. संस्थेच्या सदस्यांचे कल्याण साधणे हे त्यांचे उद्दिष्ट असावयास पाहिजे. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची निवड केवळ उमेदवारांची व्यक्तिगत सचोटी, कर्तबगारी, सेवावृत्ती लक्षात घेऊनच शेतकऱ्यांनी करावयास पाहिजे. लायक पदाधिकाऱ्यांची निवड झाली तरच शेतकरी सभासदांना लाचलुचपत करावी न लागता कर्जे मिळू शकतील, शेतीमालाला रास्त नाही तर अधिक चांगला भाव मिळेल.

शेतकऱ्यांच्या सहकारी संस्थांची सुरुवात मोठ्या चांगल्या हेतूने झाली; पण

शेतीमालाला रास्त भाव मिळू न देण्याच्या शासनाच्या धोरणामुळे सहकारी संस्थांतील पदाधिकाऱ्यांच्या लवकरच लक्षात आले, की या संस्था म्हणजे निव्वळ शेतकऱ्यांच्या डोळ्यात केलेली धूळफेक आहे. त्यातून निष्पन्न काहीच होत नाही.

विविध सेवा सहकारी सोसायटी कितीही प्रामाणिकपणे चालवा, शेतकरी नवे-जुने करीत, कर्जात अधिकाधिक बुडतच जातो. कारण मुळात शेती तोट्यात आहे.

दूध सोसायटी अगदी स्वच्छ रीतीने कर्तबगारीने चालवली, तरीही शेतकऱ्याच्या हातात पडणाऱ्या किमतीत त्याचा उत्पादनखर्चही भरून निघत नाही.

साखर कारखाना कितीही सचोटीने, धडाडीने चालवा, उसाला किफायतशीर भाव मिळतच नाही. हे एकदा लक्षात आले, की सहकारी संस्थांचे सुरुवातीला अगदी प्रामाणिक आणि कळकळ असलेले कार्यकर्तेसुद्धा निराशेपोटी स्वार्थामागे लागतात, मग बाकीच्या हौशी-गवशी मंडळीविषयी विचारायलाच नको.

शेतीमालाला रास्त भाव मिळू न देण्याच्या शासकीय धोरणामुळे सहकारी संस्थांचा मूळ हेतू धुळीस मिळाला आणि इंडियाच्या भारतावरील स्वामित्वाची सूत्रे सांभाळणाऱ्या रावबहाद्दूर रावसाहेबांची जोपासना करण्याचे काम या सहकारी संस्था करू लागल्या. सहकार म्हणजे स्वाहाकार , सहकार म्हणजे भ्रष्टाचार, सहकार म्हणजे राजकारण अशी दुर्दैवी परिस्थिती तयार झाली.

खासदारकी -आमदारकीच्या निवडणुकीत ज्यांची सोय लावता येत नाही अशा चमच्यांच्या चंगळीची व्यवस्था करण्याचे सहकारी संस्था हे सोईस्कर साधन बनले. याहीपुढे जाऊन आमदारकी नसली तरी चालेल, पण कारखाना पाहिजे, आमदारकी मिळाली तरी त्याच्या बरोबरीला कारखाना पाहिजे अशा मागण्या होऊ लागल्या आणि त्या पुरवल्याही जाऊ लागल्या.

जवळजवळ सगळ्या संस्थांत किमान दोन गट असतात. त्यांच्या निवडणुका मोठ्या धडाक्यात होतात. लक्षावधी रुपये खर्चून होतात. निवडून आल्यानंतर हाती लागणारे घबाड इतके मोठे असते, की त्याच्या लोभाने लालचावलेले काय वाटेल ते कायदेशीर-बेकायदेशीर, नैतिक-अनैतिक प्रकार करायला कोणताही गट मागे पाहत नाही.

साखर कारखान्यात हाती लागणारे घबाड मोठे. प्रत्येक खरेदीवरचे कमिशन, प्रत्येक कामावरचे कमिशन, साखरेवरचे वरकड उत्पन्न, दारूवरचे वरकड उत्पन्न, कारखान्यावर उपलब्ध होणाऱ्या चैनीमौजीच्या, खाण्या-पिण्याच्या सोयी, कारखान्याच्या खात्यावर मिळणाऱ्या चंगळीच्या सोयी, राजकीय मोठेपणा, पुढे होणाऱ्या शक्यता हे पाहता सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुका खासच अटीतटीच्या व्हाव्यात हे साहजिकच आहे.



दुर्दैवाची गोष्ट अशी, की या अध:पतनात शेतकरी सदस्यही सामील झाले. आपल्या संचालकाची पात्रता काय, चारित्र्य काय याची संपूर्ण स्पष्ट कल्पना असताही शेतकरी -सभासद निवडणुकीचा भाद्रपद आला, की कोणत्या ना कोणत्या गटाची बाजू घेऊन निवडणुकीत झुंजतात.

कोणताही गट निवडून आला तरी उसाला किंमत मिळूच शकत नाही. कारखान्याच्या कारभारात जितका हात घुसवता येईल तितकाच हाताला काही लागण्याचा संभव. आपल्या नात्याचा, ओळखीचा, जातीचा कोणी संचालक झाला तर त्याच्या मेजवानीच्या वेळी उडणाऱ्या उष्ट्यांचा तरी काही भाग आपल्या ओठी पडेल या आशेने शेतकरी सभासद हिरीरीने प्रचारात भाग घेतात. वर्षानुवर्षे हे राजकारण चालले आहे. पिढ्यान्‌पिढ्या चालणाऱ्या परंपरागत वैराचे रूप गटागटातील स्पर्धांना आले आहे. तर काही ठिकाणी सत्तेच्या लोभाने उघडउघड उलथ्यापालथ्या उड्या घेणारे दलबदलूही दिसतात.

शेतकऱ्याच्या उसाला भाव मिळावा म्हणून सहकारी साखर कारखान्यांची चळवळ उभी करणाऱ्या महर्षींच्या आत्म्याला आजचे हे दृश्य पाहून किती यातना होत असतील? १९८० साली देश हलवून सोडणारे ऊस आंदोलन झाले. एखादा खास अपवाद सोडल्यास कोणीही संचालक किंवा अध्यक्ष शेतकऱ्यांशी इमान राखून उभा राहिला नाही.

सचालक मंडळाचा कारखाना चालवण्याशी काहीही संबंध राहिलेला नाही. नोकरवर्ग कारखाना चालवतो. १९८० साली तुरुंगात असताना कै. माधवराव बोरस्ते अत्यंत बेचैन असत. दररोजच्या साखर प्रमाणावर लक्ष ठेवणारे ते, आपल्या गैरहजेरीत काय झाले असेल याची त्यांना चिंता वाटे. तुरुंगातून सुटल्याबरोबर ते कारखान्यावर गेले. दुसरे दिवशी पुन्हा भेटल्यावर मला म्हणाले, ''शरदराव काय गंमत आहे. सगळे संचालक मंडळ गैरहजर आणि साखरेची रिकव्हरी वाढली की.''

कारखान्याच्या कामाशी संबंध नाही, स्वाहाकारी आणि शेतकऱ्यांच्या लाचारीवर मिजास मारणारे-अशा या संचालक मंडळांच्या निवडणुकीत संघटनेचे धोरण काय राहील? शेतकरी संघटनेत जसे पक्षीय राजकारणापासून दूर असलेले कार्यकर्ते आहेत, तसेच वेगवेगळ्या पक्षांत काम करणारेही आहेत. पक्षाची मंडळी त्यांच्या त्यांच्या पॅनेलमधून कारखान्यांच्या निवडणुका लढवू शकतात. त्याचप्रमाणे पक्षनिरपेक्ष कार्यकर्त्यांनाही स्वतंत्रपणे व्यक्तिगत रूपाने निवडणूका लढवण्याचा अधिकार आहे यात काही वाद नाही. काही प्रसंगी दोन बलाढ्य गटांच्या यादीपैकी एका यादीतही ते जाऊ शकतात; पण कोणत्याही पॅनेलमध्ये जाण्याचा त्यांचा निर्णय त्यांचा, केवळ व्यक्तिगत निर्णय असेल.

शेतकरी संघटनेला दोन टग्यांच्या गटांतील मारामारीत काहीही स्वारस्य नाही. कोणताही गट निवडून आला तरी उसाला भाव मिळण्याच्या दृष्टीने काहीच फरक पडणार नाही. तेव्हा या गटाला पाडून त्या गटाला निवडून आणण्याचे प्रयत्न करण्याचे संघटनेला काहीच कारण नाही. अशा गटागटांच्या झगड्यात भाग घेतल्याने संघटनेचा फायदा तर नाही; पण अगदी न भरून येण्यासारखे नुकसान होण्याचा प्रचंड धोका आहे.

संघटनेची आजची उज्ज्वल प्रतिमा तिच्या नि:स्वार्थ वैराग्यामुळे आहे. कारखान्यांच्या राजकारणाच्या चिखलात उतरल्यामुळे ही प्रतिमा निश्चितपणे डागाळेल. संघटनेचे कार्यकर्ते संचालक आणि इतर संचालक यांत फरक करणेच सामान्य शेतकऱ्याला शक्य होणार नाही आणि इतर पक्ष आणि संघटना यात तरी शेवटी काय फरक आहे, अशी वैफल्याची भावना पसरेल.

म्हणून सध्याच्या परिस्थितीत संघटनेच्या कोणा कार्यकर्त्यांस या ना त्या पॅनेलमधून उभे राहावयाचे असेल तर तो त्याचा व्यक्तिगत निर्णय असेल. आपण संघटनेचे काम केले आहे हे तो आपल्या प्रचारात सांगूही शकेल; पण असे कार्यकर्ते निवडून आल्यानंतर जे काम करतील त्याची जबाबदारी संघटनेवर राहणार नाही.

आर्थिक सहकारी संस्थांच्या निवडणुकीचे संघटनेस वावडे असायचे कारण नाही. संघटनेला अधिकृतपणे कोणत्याही कारखान्याची निवडणूक लढण्यास काहीच हरकत नाही; पण इतर पॅनेल असतात तसाच संघटनेचा पॅनेल अशा पद्धतीने संघटना निवडणुका लढवणार नाही.

सर्व क्षुद्र राजकारणापासून दूर राहुन केवळ शेतकऱ्यांच्या उसाला भाव मिळवून देण्याकरिता प्रतिज्ञाबद्ध असलेले असे पॅनेल उभे करता येत असेल तर संघटनेनेही या निवडणुकांत उतरावयास काही हरकत नाही. महाराष्ट्रातील सत्तर एक कारखान्यांपैकी बहुतेक कारखान्यांत अशा तऱ्हेचे पॅनेल उभे करण्याइतकी संघटनेची ताकद नाही आणि कार्यकर्त्यांची हिंमतही नाही. पण दहाबारा कारखान्यांत अशा तऱ्हेचे वैशिष्ट्यपूर्ण संघटना पॅनेल उभे करता येईल. या कारखान्यांत असा प्रयत्न अवश्य करावा. हरलो, जिंकलो याला काही महत्त्व नाही. त्या निमित्ताने उसाच्या भावाच्या प्रश्नाचा जबरदस्त प्रचारतरी होऊन जाईल. इतर कारखान्यांतील निवडणुकांकडे संघटनेने लक्षही देऊ नये. तेथे कोणीही टग्या निवडून आला तरी आपल्याला त्याच्याशी लढावेच लागणार आहे.

१९८४-८५ सालच्या गळीत हंगामात उसाचे आंदोलन पुन्हा एकदा उभे करावे लागणार हे निश्चित आहे. पंजाब हरियानातील गहू आंदोलन १ मे रोजी चालू होत आहे. शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्यवर्षातील निर्णायक लढा पुन्हा एकदा महाराष्ट्रातील शेतकऱ्याला ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये द्यावा लागेल आणि ऊसउत्पादक शेतकऱ्याला



त्यात प्रमुख भूमिका घ्यावी लागेल हे उघड दिसत आहे. या आगामी लढ्याची तयारी म्हणून कारखान्यांच्या निवडणुकांकडे संघटनेने पाहिले पाहिजे.

गेल्या आंदोलनात संचालक मंडळे आंदोलनात उतरली नाहीत. या वेळी काही कारखान्यांची संचालक मंडळे बिनीचे सत्याग्रही म्हणून उतरतील तर आंदोलनाला एक वेगळेच स्वरूप येऊ शकेल.

या दृष्टीने ज्या ज्या कारखान्यात संघटनेचे सत्याग्रही पॅनेल उभे करता येईल तेथे तेथे ते करावे. अशा पॅनेलच्या प्रचारासाठी संघटनेच्या नेत्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी. पॅनेल यशस्वी झाले तर त्यांच्या कामाची जबाबदारी संघटनेवर राहील. संघटनेचे संचालक मंडळही इतर मंडळांसारखेच वागेल तर वचने पुरी न करणाऱ्या, गैरकारभार करणाऱ्या संचालक मंडळावर कार्यवाही करण्याची जबाबदारी संघटना घेईल.

संघटनेचे पॅनेल असावे कसे? चिखलफेकीच्या गलीच्छ इतिहासांतून दूर पडण्यासाठी पहिली अट म्हणजे पॅनेलचे सर्व सदस्य पूर्वी संचालक मंडळावर काम केलेले नसावेत. या एकाच उपायाने आपण पॅनेलला स्वच्छ रूप देऊ शकू. जुन्या सचालकांपैकी स्वच्छ कोण आणि कोण नाही याची चर्चा करत बसावयाचे म्हटले तर त्याला अंत नाही आणि अर्थही नाही. तेव्हा पूर्वी संचालक असलेल्या सर्वांनाच दूर करावे हा सर्वांत सोपा उपाय.

यामुळे अर्थात काही प्रामाणिक, सचोटीच्या जुन्या संचालकांना बाजूला राहावे लागणार आहे; पण संघटनेच्या निष्ठावान कार्यकर्त्यांत एवढी त्यागाची आणि शिस्तीची भावना असली पाहिजे. संचालक मंडळाच्या बाहेर राहूनही आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा ते तरुण संचालक मंडळाला देऊ शकतील.

सर्व नवे सदस्य असले तर त्यांना काम करणे कठीण जाईल ही कल्पना सर्वस्वी चूक आहे. संचालक मंडळाचे काम अधिकारीवर्गाकडून काम करून घेणे हे आहे. त्यासाठी शेतकऱ्यांच्या उसाला भाव मिळवून देण्याची कळकळ ही महत्त्वाची आहे.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे संघटना पॅनेलचा निश्चित कार्यक्रम असला पाहिजे. या कार्यक्रमाच्या आधारावरच निवडणूक लढवली गेली पाहिजे. परभणीच्या अधिवेशनात संघटनेच्या साखर कारखान्यांच्या निवडणुकीचा जाहीरनामा घोषित करण्यात आला होता.

या आधारावर आता कार्यकर्त्यांनी कारखान्याच्या निवडणुकांच्या तयारीस लागावे, ताकदवान पॅनेल उभी करावीत. संघटनेकडून ती मंजूर करून घ्यावीत. कार्यक्रम ठरवावेत उस आंदोलनांची सुरुवात कारखान्यांतील निवडणूक आंदोलनाने होत आहे.

(४ मे १९८४)

□□

## तेवीस

# स्वातंत्र्ययुद्ध जवळ आले

६ सप्टेंबर रोजी वर्ध्याला रवी काशीकर यांच्या घरी मुक्काम झाला. झोपी जाताना सर्व कार्यकर्ते खूप आनंदात होते. ३ सप्टेंबरला पुण्याला झालेल्या कार्यकर्त्यांच्या बैठकीने सर्वांचा उत्साह दुणावला होता. ४ व ५ तारखेस बागलाण, कळवण आणि दिंडोरी तालुक्यात झालेले ४ सभांचे कार्यक्रम खरोखर वेड लावण्याइतके सुंदर झाले.

ब्राह्मणगाव येथे ४ तारखेच्या रात्री मुक्कामाला पोचेपर्यंत पाच ठिकाणी गावकऱ्यांनी केलेल्या स्वागतासाठी थांबावे लागले. प्रत्येक जागी छोट्या सभाच घ्याव्या लागल्या. ब्राह्मणगाव तर शृंगारूनच तयार होते. हजारो दिव्यांच्या माळांचा लखलखाट, पताका, झेंडे, गुढ्या उभारलेल्या होत्या, मिरवणूक आणि सभा प्रचंड झाल्या.

दुसरे दिवशी गावोगावचे स्वागत स्वीकारीत सटाण्याला पोचलो. सटाण्याच्या सभेचे वैशिष्ट्य म्हणजे सर्वच भाषणे महिलांनी केली. सटाण्याच्या महाविद्यालयातील विद्यार्थिनीही आता गावोगाव प्रचारासाठी बाहेर पडल्या आहेत. शेतकरी चळवळीतील हा एक महत्त्वाचा टप्पा मानावा लागेल. सभेत जमलेल्या हजारो मायबहिणींच्या तोंडून-

*किसानांच्या बाया आम्ही शेतकरी बाया*
*नाही राहणार आम्ही आता दीनवाणी गाया*
*हवे आमच्या पोराबाळा पोटभर खाया ॥*

हे सानेगुरुजींचे गीत ऐकत सगळेजण भारावून गेले. सहज विचार मनात आला. संघटनेच्या व्यासपीठावरुन यापुढे बोलायचे काम फक्त मायबहिणींकडेच द्यावे.

कळवणची मिरवणूक सटाण्याच्या अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी निघालेल्या मिरवणुकीची आठवण करुन देणारी होती. सभेवर कळवणमध्ये त्याच दिवशी होणार असलेल्या मंत्रीद्वयांच्या कार्यक्रमाची छाया पडलेली होती. सभेच्या शेवटी सर्वांना शांततेची शपथ घालून आम्ही वणीला जायला निघालो. पण गावात



आणली गेलेली एस. आर. पी. ची प्रचंड फौज पाहिली. कलेक्टर हजर, डी.एस. पी. हजर. लक्षात आले, सरकारने आज काही शेतकऱ्यांना जिवे मारावयाची तयारी केलेली दिसते. रामचंद्रबापूंना बरोबर घेऊन परत सभेच्या जागी गेलो. सभेचा प्रचंड जमाव गावबंदीच्या कार्यक्रमाला गेला तर त्याचा फायदा शासन घेणार हे उघड होते. वणीला हजारो शेतकरी दोन तासांपासून ताटकळत होते. तेथे जायचे नसते तर रामचंद्रबापू, शांतारामतात्या, देवीदास, मी-आम्ही सर्व जमाव ताब्यात ठेवू शकलो असतो. एरवी ते शक्य नव्हते. आम्ही परत पोचेपर्यंत छडीमाराला सुरुवात झालीच होती. लाउडस्पीकरच्या मदतीशिवाय सर्व शेतकऱ्यांना खाली बसविले आणि निघून जाण्यास सांगितले. पंधरा मिनिटांत रस्ता साफ झाला. पुढारी जिद्दीला पेटून प्रचंड फौजफाटा घेऊन कार्यक्रम घेऊ लागले तरी शेवटपर्यंत गावबंदीचा दबाब तर ठेवावा पण पोलिसांशी सामना कुशलतेने गनिमी काव्याने टाळावा या तंत्राचे उदाहरण प्रत्यक्ष घडले. फौजफाटा घेऊन पुढाऱ्यांना फिरावे लागले तरी गावबंदीचा कार्यक्रम यशस्वी झाला असे मानले पाहिजे.

दिंडोरी तालुक्यात अशोक गायकवाड आणि त्याच्या सहकाऱ्यांनी गेल्या काही महिन्यांत जागृतीचा चमत्कार दाखवला आहे. वणीच्या सभेनंतर तातडीने मनमाडला जाऊन आगगाडी पकडली, अमरावतीला पोचलो. अमरावतीची सभाही कार्यकर्त्यांच्या अपेक्षेबाहेर चांगली झाली. १८ ऑक्टोबर रोजी हिंगणघाट येथे कापूस शेतकरी संमेलन घ्यायचे ठरले.

वर्ध्याला पोचून झोपायला रात्रीचे दोन वाजले; पण सगळे आनंदात होते. उद्या चंडीगडच्या मेळाव्यासाठी निघायचे.

सकाळी सकाळी पुण्याहून भास्करराव बोरावके यांचा फोन आला-सरकारने चंडीगडच्या मेळाव्यावर बंदी घातली आहे. पंजाबमधील शेकडो कार्यकर्त्यांची धरपकड झाली आहे, चंडीगडला जाणारे सगळे रस्ते सैन्याच्या मदतीने अडवले आहेत. आता काय करावे? वातावरण एकदम बदलले. भास्करराव, नरेन्द्र अहिरे, सुरेशचंद्र म्हात्रे, रमाकांत देसले, शंकर धोंडगे मनताडहून निघायचे होते. बद्री देवकर, विजय जावंधिया आणि मी वर्ध्याहून तिथे वेगळे पोचायचे होते. आम्ही ठरवले, कसेही करून चंडीगडला पोचायचे. ९ तारखेला आंतरराज्य समन्वय समितीची बैठक झाल्यानंतर पुढचे काय ते ठरवू.

सुरतहून गुजराथच्या भुलाभाई पटेल आणि बिपिन देसाई यांचाही फोन लगेच आला. तेथून सहा कार्यकर्ते निघणार होते. आता बंदी घातल्यावर निघावे कसे?

मी म्हटले, बंदी घातली, की बसून राहायचे असे ठरविले तर संघटनाच बंद करावी लागेल. महात्माजींनी सर्व सत्याग्रह बंदी असतानाच केले. बिपिनभाईंना हा मुद्दा बिनतोड वाटला. ते आठ तारखेलाच चंडीगडला पोचणार होते. दिल्लीला आमच्याकरिता हालहवालीचा निरोप ठेवायची त्यांना सूचना केली.

बंदीचा निषेध करण्यासाठी नागपूरला पत्रकार परिषद घ्यायचे ठरले. ८ तारखेला ती आटोपून कशीबशी गाडी पकडली. पुढे काय वाढून ठेवले आहे याची धास्ती होतीच. गाडी ९ तारखेला सकाळी पोचली. सरळ चंडीगडला जाणारी 'हिमालय राणी' गाडी चुकली, म्हणजे आता बसने रडखडत जाणे आले. गेल्या दोन वर्षांत हा प्रवास इतक्यावेळा झाला आहे, की आठवणीनेसुद्धा अंगावर काटा उभा राहतो. समोरच दादर-अमृतसर गाडी उभी होती. त्यातच चढलो. विजयने धावत जाऊन बाहेरून तिकिटे काढून आणली. ताज्या वर्तमानपत्रांचा मोठा गठ्ठाही तो घेऊन आला. वर्तमानपत्रे चंडीगडच्या शेतकरी मेळाव्यावरील बंदीसंबंधी बातम्यांनीच भरली होती. म्हटले, ठीक झाले. अगदी राजभवनाच्या भव्य घेराओलासुद्धा जितकी प्रसिद्धी मिळाली नव्हती तितकी या मेळाव्याला सरकारी बंदीमुळे मिळाली. दादर-अमृतसर, सर्व स्टेशनांवर आणि स्टेशनांमध्येही थांबत थांबत चालली होती. कुणाची आंघोळ नाही, दाढी नाही, काहीतरी अचरबचर न्याहारी केलेली. मनात सारखे चुकलेल्या 'हिमालय राणी' साठी हळहळत होतो. त्या वेळी हे माहीत नव्हते, की 'राणी' ने गेलो असतो तर चंडीगड स्टेशनवर स्वागतासाठी पोलिसच हजर होते.

अंबाल्याहून बस पकडली- चंडीगडला जाणारी. बद्री, विजय, मी वेगवेगळ्या बाकांवर बसलो. मी बऱ्याच दिवसांनी पँट शर्ट घातले होते. चष्मा काढत जाऊ नका म्हणून डॉक्टरांनी वारंवार बजावले तरी सतत तो नाकावर ठेवणे अवजड वाटते. आज निग्रहाने डोळ्यांवर चष्मा ठेवला. चंडीगडच्या प्रवेशदारापाशी सी. आर. पी. आणि लष्कराची प्रचंड नाकेबंदी होती. अगदी अश्रूधुराची नळकांडीच नाही, तर गोळीबाराचीसुद्धा तयारी होती. जिकडे पाहावे तिकडे खाकी करडे कपडे. मला धुळ्याच्या जनावरांच्या मोर्च्याच्या दिवसाची आठवण झाली. त्याच्या दसपट सैनिक येथे हजर होते. मनात म्हटले चंडीगडच्या पोलिस खात्यात सी.आय.डीत मला जाणणारे अनेक आहेत. आता कोणीतरी आपल्याला ओळखणार आणि उतरवणार. बाहेरुन निर्विकारपणाचे सोंग तरी करीत बसून राहिलो. पोलिस आत आले. माझ्यापुढच्या बाकावर मळके धोतर, कुडता घातलेला, डोळ्यात फूल पडलेला एक म्हातारा बसला होता. त्याला पोलिसांनी



दरडावयाला सुरुवात केली; कुठून आलास? कोठे चाललास? तो बिचारा रडकुंडीला आला होता. बसमधील प्रवासी गंभीर झाले होते. बसमधल्या एका प्रवाशाला उतरवले जात होते. कारण तो शेतकऱ्याप्रमाणे हीनदीन दिसत होता. नोव्हेंबर १९८२ मध्ये एशियाडच्या वेळी सर्व शिखांना असेच बसमधून उतरवले जात होते. शिखांच्या मनात कडवटपणा त्या वेळी तयार होऊ लागला. असाच कडवटपणा शेतकऱ्यांच्या मनात झाल्याशिवाय राहील काय? शेतकरी असण्याच्या अपराधासाठी बसमधून उतरवून दिले जावे या भावनेने तरी शेतकरी एक होईल काय?

गंमत म्हणजे आमच्या 'इंडियन' पोशाखामुळे आमच्याकडे कोणाचेच लक्ष गेले नाही, बस पुढे निघाली. सुटकेचा नि:श्वास टाकला. चंडीगडच्या बसस्टॉपाशी प्रचंड पहारा आणि बंदोबस्त असणार हे उघड होते. तेहतीस सेक्टरपाशी मी हातात फक्त ब्रीफकेस घेऊन उतरून गेलो. बद्री आणि विजयही पुढे जाऊन बसस्टँडच्या आधी उतरले. त्यानंतरचे २४ तास भूमिगत गेले. भास्कररावांची टोळी सुखरूप पोचली आहे हे कळले. गुजराथची मंडळी मात्र तुरुंगात बलबीरसिंग राजेवाल यांना भेटायला गेलेली, तेथेच पकडली गेली. पंजाबचे सर्वच कार्यकर्ते अटकेत होते. फक्त अजाबसिंग खारांशी संपर्क झाला. मोर्च्याचे सेनापती अजमेरसिंग लोखोवाल अटकेत नव्हते. मुलाखती देत होते; पण त्यांचा आमचा संपर्क जमेना.

चंडीगड शहरातही नाक्यानाक्यावर प्रत्येक वाहन तपासले जात होते. सगळ्या धर्मशाळा, खोल्या, हॉटेले पोलिसांनी रात्रभरात पिंजून काढली. सातआठशे शेतकऱ्यांना रात्री पकडले. मी आणि बद्री यांची व्यवस्था अगदी आरामात झाली. तेथेच आम्ही पत्रकारांनाही भेटत होतो; पण पोलिसांना अखेरपर्यंत पत्ता लागला नाही. पत्रकारांना आमच्यापर्यंत आणून पोचवायचे काम, वेगवेगळ्या राज्यांतील व्यक्तींना वेगवेगळ्या जागी छपवणे, त्यांच्या जेवण्याखाण्याची सोय, सगळे सगळे काम तसे म्हटले तर संघटनेशी काहीच संबंध नसलेले अनेक स्नेही करत होते. त्यांच्याविषयी एकदा कधीतरी स्वतंत्रपणे लिहावयास पाहिजे. आज तरी त्यांची नावेसुद्धा जाहीर करणे शक्य नाही.

दहा तारखेला बंदोबस्त आणखीच वाढविला गेला. सर्व पंजाबभर चंडीगडकडे येणाऱ्या बसगाड्या बंद केल्या होत्या. रस्त्यारस्त्यात चौक्यापहारे बसवून शेतकऱ्यांना अडविण्यात येत होते. बरोबर एक वाजता सभेच्या जागी जाऊन स्टेजवर पोचण्याचा बेत आखला; पण तेवढ्यात लोखोवाल यांनी मेळावा रद्द केल्याची घोषणा केल्याचे कळले. मग सेक्टर पाचमधील ॲडव्होकेट मल्लीक यांच्या घरी गेलो. वाटेत पत्रकार,

आंतरराज्य समन्वय समिती गोळा करीत गेलो. वकील साहेबांनी जेवण तयार ठेवले होते. बाहेर पोलिसांच्या गाड्या येऊन धडकल्या. स्वस्थ जेवण केले. नंतर पोलिसांना आत बोलावले. त्यांनी आम्हाला अटक करत असल्याचे सांगितले.

चंडीगडच्या मेळाव्यावरील बंदी ही एक महत्त्वाची घटना आहे. पंजाबमधील शेतकरी आंदोलन सदैव शांतिपूर्ण आणि शिस्तपूर्ण झाले आहे. सर्व प्रकारच्या लोकांनी त्याचे कौतुक केले आहे. या मेळाव्याच्या वेळी गडबड होईल अशी शंकासुद्धा घेण्याचे काही कारण नव्हते. नागपूर विद्यार्थी मेळाव्यातल्या गुंडगिरीची ज्यांच्या नाकाला घाण येत नाही, त्याच पंतप्रधानांनी आणि राजकुमारांनी शेतकरी मेळाव्यावर बंदी घालावी याला काय उपमा द्यावी?

अकाली दलाने आणि स्वत: राज्यकर्त्या पक्षाने नुकतीच अमृतसरसारख्या कठीण जागी संमेलने भरवली. सरकारने त्यांना परवानगी दिली. 'सरबत खालसा' साठी तर ट्रक भरभरून माणसे पाठविण्याचे काम सरकारी अधिकाऱ्यांनी केले. पण चंडीगडच्या मेळाव्यावर मात्र बंदी घातली गेली.

सरकारने स्वत:च वावड्या उठवायला सुरुवात केली. या मेळाव्यालाच आंदोलन म्हणायला सुरुवात केली. सरकारी वक्तव्ये आणि वर्तमानपत्रांत दिलेल्या मोठ्या जाहिराती वाचून करमणूकच होत होती. कोणी म्हणे मेळाव्यातून शेतकरी पुन्हा राजभवनाला घेराओ घालणार आहेत. कोणी म्हणे येथूनच दिल्लीला कूच करणार आहेत... सगळा मूर्खांचा बाजार.

दोन हजारांवर कार्यकर्त्यांना अटक झाली, मोरिंडा आणि सरहिंद येथे थांबलेल्या शेतकऱ्यांवर लाठीहल्ला झाला, गोळीबारही झाला, सुदैवाने कोणी दगावले नाही. बंदोबस्तासाठी लाखो रुपयांचा चुराडा झाला. एवढे सगळे कशासाठी? पंजाबमधील शेतकरी आज काय मागत आहे? केवळ चंडीगडच्या घेराओच्या वेळी दिलेल्या आश्वासनांची पूर्ती. जोल समितीचा अहवाल प्रसिद्ध करा. त्यावर निर्णय होईपर्यंत कर्जवसुली, विजेच्या बिलांची वसुली तहकूब ठेवा. मार्च महिन्यात हे शासनाला मान्य होते. आजमात्र त्याच मागण्या शासन नाकारीत आहे.

पंजाबच्या आजच्या परिस्थितीत राज्यकर्ते आणि विरोधी पक्ष दोन्ही बदनाम झाले आहेत. शेतकरी संघटना हीच एक विश्वसनीय प्रामाणिक ताकद म्हणून पुढे येत आहे. या पोटदुखीतूनच ही बंदी आली, ज्या किसान युनियनने चंडीगड येथे अकालींना दूर ठेवले, धान्यबंदीचा कार्यक्रम अकाल्यांनीही जाहीर केल्यावर ज्या युनियनने स्वत:चे आधी जाहीर झालेले धान्यबंदीचे आंदोलन स्थगित केले, त्या



युनियनवर आज अकाली हस्तक असल्याचा बिनबुडाचा आरोप केला जात आहे. जर युनियनच्या कामात अकाल्यांचा यत्किंचितही संबंध असता तर इतर राज्यांतले माझ्यासारखे कार्यकर्ते त्यांच्याकडे फिरकलेही नसते हे शासनाला काय समजत नाही?

सरकार गुंड बनले आहे. शांतता राहणे म्हणजे हातून सत्ता जाणे हे कळल्यामुळे सरकारचे डोके फिरले आहे. सर्व दमनशक्ती अगदी फौजसुद्धा वापरून अस्वस्थता तयार केली जात आहे.

या मेळाव्यामुळे, बंदीमुळे पंजाबमधील शेतकऱ्याचा उत्साह मात्र दुणावला आहे. गावबंदी, कर्जबंदी इत्यादी कार्यक्रमांबरोबर त्यांनी आता एक नवा निश्चय केला आहे. येत्या रबी हंगामात किमान २५% तरी गव्हाचे उत्पादन कमी करायचे. हमसे जो टकराएगा ! वो भूखसे मर जायेगा!

पंजाबच्या शेतकऱ्यांचा उत्साह पाहिला. चंडीगडला जायच्या आधी नाशिक अमरावतीला शेतकऱ्यांच्या आंदोलनाचे उधाण आलेले पाहिले. दुसऱ्या बाजूला कळवण आणि चंडीगड येथे शेतकऱ्याला दडपून टाकण्याची तयारीही पाहिली, स्वातंत्र्ययुद्ध अगदी जवळ आले आहे हे खरे.

(२१ सप्टेंबर १९८४)

□□

चोवीस

# तुफान आले आहे...

शेतकरी संघटनेच्या महाराष्ट्र प्रचारयात्रेने महाराष्ट्रभरच्या शेतकऱ्यांमध्ये उत्साहाची एक प्रचंड लाट तयार केली. प्रत्येक जिल्ह्यात यात्रेच्या वाटेवर जागोजाग हजारोने शेतकरी जमत होते. मायबहिणी आरती ओवाळून यात्रेचे स्वागत करीत होत्या, शेतकरी संघटनेच्या घोषणांनी वातावरण निनादून जात होते. महत्त्वाच्या गावी सभांना शेतकरी इतक्या प्रचंड प्रमाणात हजर राहत होते, की प्रत्येक ठिकाणी एवढी मोठी सभा पूर्वी कधीच झाली नव्हती असे सगळे मान्य करीत होते. ३० ऑक्टोबर रोजी यात्रा झोडगे गावी पोचली. संध्याकाळी अगदी नाममात्र दहापंधरा मिनिटांची सभा घ्यायचे ठरले होते; पण सभेचा जमावच इतका प्रचंड होता की अगदी पुरी दोनतीन तासांची सभा घ्यावी लागली. ३१ ऑक्टोबर रोजी समारोपाच्या सभेसाठी टेहऱ्याला जायचे. आंदोलनाचा नवा कार्यक्रम काय जाहीर होणार याची सर्व उत्सुकतेने वाट पाहत होते. स्वातंत्र्ययुद्धाची रणभेरी फुंकली जाण्याची वेळ आली होती.

प्रचारयात्रेच्या आधी दक्षिण महाराष्ट्रांतील मोटारसायकल प्रचार फेरीही अशीच अफाट यशस्वी झाली होती. स्वातंत्र्य आंदोलनाच्या रॉकेटची ती पहिली पायरी होती. महाराष्ट्र प्रचारयात्रेने दुसरी मोठी पायरी पुरी केली. तिसऱ्या पायरीवर ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी रॉकेट आकाशात झेपावण्यास सज्ज झाले.

झोडगे येथून निघालेली प्रचारयात्रा कित्येक किलोमीटर लांब होती. वाटेवरच्या सर्व गावांत उत्साहाला उधाण आले होते. रॉकेट उड्डाणाची सर्व तयारी झाली होती. आता शेवटची आदेशाची निशाणी दाखवायचाच काय तो अवकाश होता आणि एवढ्यात प्रचंड वेगाने आकाशात ढग भरून आले. काळाकुट्ट अंधार झाला. रॉकेटच्या उड्डाणाची दिशा, वेग, सगळे हिशेब बदलून गेले.

टेहरे गावी पोचण्याच्या आधी अर्धा तासच फक्त पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यावरील अमानुष हल्ल्याची बातमी पत्रकारांनी सांगितली. पंतप्रधान जखमी झाल्या आहेत, डॉक्टर शर्थीचे प्रयत्न करीत आहेत असे कळले. वैद्यकशास्त्र



आता पुढे गेले आहे. अमेरिकेचे अध्यक्ष रेगन यांजवर असाच हल्ला झाला होता; पण डॉक्टारांनी त्यांना अक्षरश: मृत्यूच्या जबड्यांतून ओढून बाहेर काढले होते. आज ते स्वस्थ आहेत, एवढेच नाही, नुकतेच पुन्हा एकदा चार वर्षांकरिता अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली आहे. मनात आशा वाटत होती- यातून पंतप्रधान वाचतील.

अडीच वाजता सभेला सुरुवात झाली. संघटनेचे अध्यक्ष रामचंद्रबापूंनी प्रास्ताविक भाषणात या हल्ल्याचा निषेध केला. पंतप्रधानांच्या प्रकृतीस आराम पडो अशी प्रार्थनाही केली. वेगवेगळ्या राज्यांतील प्रतिनिधींची भाषणे चालू होती. आम्ही व्यासपीठावरून पोलिस अधिकाऱ्यांशी संपर्क साधत होतो.

कार्यक्रमाची घोषणा करण्याचे काम शेवटी माझ्याकडे दिले होते. भाषणाला उठायच्या आधीच पोलिसांकडून निरोप आला होता. डॉक्टरांचे प्रयत्न चालू आहेत. आशेची निराशा अजून झालेली नव्हती; पण भाषणात जीव राहिला नव्हता. यांत्रिकपणे ठरलेल्या कार्यक्रमाची घोषणा केली गेली. घोषणा करीत असताना मनात दाट शंका होती. हा कार्यक्रम पार पडणार काय? हे रॉकेट पूर्वीच्याच हिशेबाने तिसऱ्या पल्ल्यावर येईल काय?

१९८४ हे शेतकऱ्यांचे स्वातंत्र्यवर्ष असे जाहीर करताना बांधलेले अनेक आडाखे पुन्हा तपासून घेण्याची गरज निर्माण झाली. निर्णायक दोन महिन्यांत शेवटच्या आघाडीच्या वेळी सर्व हिशेब पुन्हा मांडावयाची वेळ आली.

पंतप्रधान इंदिरा गांधींच्या निधनाची बातमी संध्याकाळी सहा वाजता मिळाली. सर्व राष्ट्र शोकाने सुन्न होऊन गेले. नोव्हेंबर महिन्यातले सगळे कार्यक्रम रद्द केले. नाशिक जिल्ह्यातील निवडणूक प्रचाराचे दौरे रद्द झाले. सर्व देशभर गुंडांनी जातीय अत्याचारांचे थैमान घातले. राजीव गांधी यांनी पंतप्रधानकीची शपथ घेतली. पक्षाध्यक्षपदही त्यांच्याकडेच सोपविण्यात आले. इंदिराजींच्या रक्षाविसर्जनाचा कार्यक्रम होताच नवीन पंतप्रधानांनी राष्ट्राला उद्देशून एक भाषण केले. लगेच दुसऱ्या दिवशी निवडणुकाही जाहीर झाल्या. 'पंतप्रधानांचे निधन झाले; पंतप्रधान चिरायू होवो' या पद्धतीने सर्व धोरणे- आर्थिक, राजकीय नेहरू कुटुंबातील तिसऱ्या पंतप्रधानांनी पुढे चालवण्याचे जाहीर केले. निवडणुकीच्या धावपळी चालू झाल्या. विरोधी पक्ष अत्यंत विस्कळीत अवस्थेत सापडले. निवडणुका लढवण्याची तांत्रिक व्यावहारिक तयारी विरोधी पक्षही करतच होते. पण... इंदिराजींच्या निधनाने देशात तयार झालेल्या भावनेच्या ओघाने त्यांच्या पावलाखालची वाळू चांगलीच सरकली आहे.

या नवीन वातावरणात शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्य आंदोलनाच्या रणनीतीचा आढावा घेणे आवश्यक झाले. दि. २२ नोव्हेंबर ८५ रोजी संघटनेच्या कार्यकारिणीची बैठक बोलावण्यात आली आहे. जिल्हा आणि तालुका प्रमुखांनाही या बैठकीस बोलावण्यास आले आहे. 'शेतकरी संघटक'चा हा अंक टपालात पडावयाच्या आधी वर्तमानपत्रांतून या बैठकीने घेतलेल्या निर्णयाची अंतिम बातमी तुम्हाला वाचायला मिळेल. अत्यंत बिकट परिस्थितीत ही बैठक भरणार आहे. नव्या परिस्थितीसाठी नवा पवित्रा घेणे आवश्यक आहे. सविनय कायदेभंग, सत्याग्रह, जेलभरो या प्रकारच्या आंदोलनांस वातावरण कितपत योग्य आहे? देशातील सर्वसाधारण जनतेची सहानुभूती नवीन आंदोलनास मिळेल काय? निवडणुकीच्या धामधुमीत, शोकभावनेच्या आधारावर निवडणुका जिंकून नेण्याच्या विश्वासांत असलेले शास्ते शेतकरी आंदोलन कसे हाताळतील? असाधारण परिस्थितीचा फायदा घेऊन आंदोलन लष्करी ताकदीने तुडवून काढण्याचा प्रयत्न करतील काय? आंदोलन प्रभावी करण्यासाठी काही नवीन पवित्रे घेणे जरूर आहे काय? निवडणुकांचे साधन उलटवून आंदोलन प्रभावी करणे शक्य होईल काय? या सर्व प्रश्नांचा विचार कार्यकारिणी करेल. एक गोष्ट विश्वासपूर्वक सागतो- वेळापत्रकात थोडाफार फरक पडू शकेल; पण शेतकरी आंदोलन आता यशस्वी होऊनच थांबेल, त्याआधी नाही.

आंदोलन तडीस नेण्यासाठी जे घडत आहे, त्याचा वास्तविक अर्थ समजावून घेणे आवश्यक आहे. पंजाबमधील घडामोडी म्हणा, देशात इतरत्र चाललेले भाषेचे, जातीचे, धर्माचे वादविवाद म्हणा हे काही अपघात नाहीत. देशाच्या पंतप्रधानांना सुरक्षितपणे फिरता येऊ नये अशी परिस्थिती देशात तयार व्हावी हा केवळ अपघात नाही. स्वातंत्र्याच्या चार दशकांच्या शेवटी नव्या पंतप्रधानांची निवड करताना ७० कोटी लोकांच्या या देशात राज्यकर्त्या पक्षाला घराण्यांतील वारसाखेरीज अन्य कुणाचा विचारही करता येऊ नये हा काही अपघात नाही.

देशात सध्याच्या दुर्दैवी घटना केवळ अपघात आहेत; काही मूठभर माथेफिरूंनी, अतिरेक्यांनी घडवून आणलेले हे उत्पात आहेत असे समजणे भयानक चूक होईल. पंतप्रधानांची हत्या, त्याआधी घडलेली पंजाबची शोकांतिका आणि नंतर घडलेले जातीय उद्रेक हे दुर्दैवी आपघात नाहीत. देश झपाट्याने विनाशाकडे जात असल्याची ही चिन्हे आहेत.

दुसऱ्या महायुद्धानंतर शंभरावर देश परकीय अमलातून सुटून स्वतंत्र झाले. राजकीय स्वातंत्र्यामुळे आर्थिक सत्ता देशांतील सर्वसामान्यांच्या सुखासाठी राबवली



गेली नाही. सगळीकडे 'गोऱ्या इंग्रजा' ऐवजी 'काळा इंग्रज' आला. जनसामान्यांचे शोषण चालूच राहिले. नव्याने स्वतंत्र झालेल्या या देशात खेडी भणंग होत राहिली. काही मूठभर शहरांत सर्व कारखानदारी एकवटली. सर्व आर्थिक सत्ता फार थोड्या लोकांच्या हाती आली. या सर्व देशांत लोकशाही प्रक्रिया संपली; लष्करी हुकूमशाही आली. आपला देशही आता याच दिशेने चालला आहे.

देश बुडतो आहे ही धोक्याची सूचना मी दोन वर्षे सतत सगळ्या सभांतून देतो आहे. नुकत्याच घडलेल्या घटनांनी आताच मने बधिर झाली आहेत; पण देशाला बुडण्याच्या रस्त्यावरून खेचून दूर काढण्याची हिंमत कोणी दाखवली नाही तर याहून भयानक घटना देशाच्या कोपऱ्याकोपऱ्यात होऊ शकतील. आता वेळ अश्रूंची नाही. शांत मनाने कठोर आत्मपरीक्षण करण्याची आहे.

१९४७ साली स्वातंत्र्य मिळाले तेव्हा आम्ही होतो कोठे? काय भव्य स्वप्ने आणि आशा मनात बाळगून होतो आणि आज हे काय घडते आहे? चाळीस वर्षांच्या स्वातंत्र्यानंतर निम्म्यावर लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली जगते आहे. खेडी ओस पडत आहेत, शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. हजारोच्या संख्येने रोज खेड्यांतून शहरात गलीच्छ वस्त्यांची, झोपडपट्ट्यांची प्रचंड झपाट्याने वाढ होते आहे.

लाचार झालेल्या शेतकऱ्यांवर सहकारी संस्थांसारख्या संस्थांच्या मलिद्यावर पोसलेल्या गांवगुंडांची अधिसत्ता आहे. शहरांतील झोपडपट्ट्यांवर हातभट्टी, तस्करीपासून सर्व गलीच्छ धंदे चालवणाऱ्या दादांचे वर्चस्व आहे. सर्व देशातील राजकीय नेतृत्व गावगुंड आणि दादा यांच्या हाती गेले आहे.

कोणी सहकारी बँका खातो आहे, कोणी साखर कारखाने, कोणी शासकीय योजनांची लूट करतो आहे, कोणी तस्करी करतो, कोणी दारूचा धंदा चालवतो, कोणी मटका चालवतो, कोणी आयातनिर्यात परवान्याचा धंदा करतो, कोणी जमिनीच्या खरेदीविक्रीत आणि घरबांधणीत हात धुऊन घेतो आहे. या राजकीय नरराक्षसांच्या भुकांना अंत नाही. आता हजारो लाखोच्या कमाईने यांचे भागत नाही. कोट्यवधींचा रतीब या बकासुरांना दररोज लागतो. या पुढाऱ्यांनी सगळे मिळवले; जनमानसांतली प्रतिष्ठा फक्त यांना मिळवता आली नाही. समाजात उजळ माथ्याने मिरवता यावे यासाठी त्यांना एक उज्ज्वल प्रतिमा पाहिजे होती. पंडित नेहरूंनी देशांतील लोकशाही संस्था आणि परंपरा रुजवण्यासाठी जिवापाडा मेहनत केली. देशासाठी अपरंपार स्वार्थत्याग आणि कष्ट करण्याची त्यांची कुलरीती चालत आली आहे. या प्रतिमेचा जयजयकार करणे, दादागुंडांना भाग आहे. या

प्रतिमेखेरीज ते लोकांपुढे जाऊच शकत नाहीत, त्यांना हुसकाटून लावतील. मनांत लाज, संकोच न बाळगता घराणेशाहीचा उदोउदो करणाऱ्या पुढाऱ्यांच्या लाचारीचे हे इंगित आहे.

देशातल्या भ्रष्ट अनैतिक राजकारणाचे आणि लोकशाही संस्थांच्या अधोगतीचे कारण स्वातंत्र्यानंतरचे 'काळ्या इंग्रजां'चे आर्थिक धोरण हेच आहे.

गेल्या चाळीस वर्षांत झालेला हा देशाचा अध:पात समजून घेतला पाहिजे. सर्व जगाला एक नवी दृष्टी देणाऱ्या महात्मा गांधींच्या देशात जात, भाषा, पंथ, धर्मांचे जिवघेणे विवाद का फोफावले याचे कारण समजून घेतले पाहिजे.

शासनाने आतापर्यंत आखलेली सर्व धोरणे योग्यच होती, ती यापुढेही नेटाने चालवली जातील अशी भूमिका घेतली तर देशाला अध:पाताच्या रस्त्यापासून वाचविणे शक्य नाही. देश यापुढे फार झपाट्याने बुडून जाईल.

या परिस्थितीत शेतकरी आंदोलनावर एक फार मोठी जबाबदारी येऊन पडली आहे. आता प्रश्न शेतीमालाच्या भावाचा राहिलेला नाही; आता प्रश्न ग्रामीण अर्थव्यवस्थेपुरता मर्यादित नाही; सर्व देश वाचविण्याची जबाबदारी शेतकऱ्यावर येऊन पडते आहे. कोणतीही आशा, लोभ न ठेवता संघटनेच्या कामाकरिता वणवण फिरणारे कार्यकर्ते स्वातंत्र्यानंतर या देशात फक्त शेतकरी संघटनेकडेच दिसतात. लक्षावधी शेतकऱ्यांच्या सभा प्रचंड शिस्तीने संघटनेच्याच होतात. संघटनेत ना जातीचा भेद, ना धर्माचा, ना भाषेचा. संपूर्ण देशाच्या समाजजीवनाला एक वेगळी दिशा देऊन क्षुद्रवादांपासून, नाशाच्या रस्त्यापासून वाचवण्याची ताकद आणि दृष्टी फक्त शेतकऱ्यांचीच आहे. शेतकरी आंदोलनाची ही ऐतिहासिक भूमिका राहणार आहे. तुफान आले आहे. सुकाणू सांभाळण्याची आता खरी परीक्षा आहे.

(२३ नोव्हेंबर १९८४)

□□



पंचवीस

# निवडणूक आणि शेतकरी आंदोलनाचे तंत्र

निवडणूक हे आंदोलन आणि संघटना प्रभावी करण्याचं साधन असू शकतं हे मी गेल्या चार वर्षांत अनेकदा माडलं आहे. सत्तेच्या खुर्चीवर जाण्यात संघटनेला काहीही स्वारस्य नाही. निवडणुकीतून मिळणारी सत्ता ही चालू व्यवस्थेच्या आतली सत्ता असते आणि व्यवस्थेच्या आतल्या मार्गाने मिळणारी सत्ता ही व्यवस्था-परिवर्तनाची असू शकत नाही; फार तर त्या व्यवस्थेत खीळ घालणारी असू शकते. या व्यवस्थांतर्गत निवडणुकीच्या मार्गाने जी मंडळी तुम्हाला खुर्चीपर्यंत चढू देतात, तर खुर्चीवर गेल्यावर तुम्ही प्रभावी राहणार नाहीत याचीसुद्धा काळजी घेतात. आजची व्यवस्था ही शेतीच्या शोषणावर उभी राहिलेली व्यवस्था आहे. शेतीचे शोषण थांबायला हवे असेल तर ही व्यवस्था बदलली पाहिजे. म्हणूनच शेतकरी संघटनेला निवडणुकीतून येणाऱ्या सत्तेत स्वारस्य नाही.

निवडणुकीने मिळणाऱ्या खुर्चीवर कुणीही बसलं तरी आजच्या व्यवस्थेत शेतकऱ्यांचा प्रश्न सुटणं अशक्य आहे. आज शेतकऱ्यांची बाजू कोणीही मांडत नाही. आपल्याला शेतकऱ्यांची, शेतकरी संघटनेची ताकद अशी निर्माण करावयाची आहे, की खुर्चीवर कुणीही बसो, त्यांना शेतकऱ्यांची मागणी लाथाडणे अशक्य व्हावे. निवडणुकीने येणारी सत्ता आपल्या उपयोगाची नाही; पण आपल्याला ज्यांच्या विरुद्ध लढा द्यायचा आहे त्यांचं मर्मस्थान कुठंतरी या निवडणुकांतच गुंतलेलं असतं हे लक्षात घेऊन त्यांचा वापर करून आंदोलन प्रभावी करणे हे धोरण आपण सटाण्याच्या पाहिल्या अधिवेशनापासूनच ठरविलेल आहे.

त्या दृष्टीने निवडणुकीत घ्यावयाची भूमिका ठरवावी लागेल. यासाठी आधी आपण आंदोलन काय करणार, आंदोलनाची दिशा काय ठरवणार आहोत, अल्पमुदतीचं आंदोलन असेल तर त्याचे स्वरूप काय असेल आणि दीर्घ मुदतीचं असल्यास त्याचे स्वरूप काय असेल याचा सांगोपांग विचार करावा लागेल. हा आराखडा तयार झाला म्हणजे मग निवडणुकीसंबंधी धोरण आखता येईल. तुम्ही

जर आंदोलन करणार नसाल तर निवडणुकीच्या फंदात पडण्यात धोका आहे. काही विचाराने जर निर्णय घेतला नाही तर तुम्ही याला पाठिंबा द्या की त्याला, कितीही चतुरपणाचा आव आणा हा निवडणूक सहभागाचा भस्मासुर चार वर्षांत उभ्या राहिलेल्या संघटनेची राख करून टाकील. आंदोलनाची आघाडी मजबूत असेल तर छोट्याशा आंदोलनासाठी हा निवडणूकविषयक मोठा डोस म्हणजे संघटनेच्या दृष्टीने वीष आहे. ते शेतकरी संघटनेला, शेतकरी आंदोलनाला खतम केल्याशिवाय राहणार नाही.

तेव्हा प्रश्न असा निर्माण होतो, की आंदोलनाचं स्वरूप काय असावं? आजच्या परिस्थितीत दीर्घदृष्टीचं आंदोलन या देशामध्ये शक्य आहे असे मला वाटत नाही. आपल्याला आपलं आंदोलन एखाद्या दुर्गम कड्यावर चढणाऱ्या माणसाप्रमाणं, तो जसा दोन हात आणि दोन पायांपैकी तीन अवयव पहाडावर घट्ट रोवून चौथ्याने कुठे आणखी वर पकडण्यासारखी जागा आहे का चाचपत असतो, त्याप्रमाणं आखावं लागेल. गवसलेली पक्की जागा सोडून दिली तर खाली पडून कपाळमोक्ष होण्याची शक्यता जास्त असते, तेव्हा यापेक्षा जास्त दीर्घदृष्टी ठेवणे आजच्या परिस्थितीत शक्य नाही.

जोपर्यंत या देशातील गरिबी हटत नाही तोपर्यंत हा देश बुडत जाणार आहे आणि जोपर्यंत शेतकऱ्यावर, शेतमजुरांवर अन्याय होतो आहे तोपर्यंत या देशातील गरिबी हटू शकत नाही. तेव्हा, जर शेतकरी संघटनेचा विचार मान्य झाला नाही तर हा देश बुडणार आहे हा आपला सैद्धांतिक पाया आहे. यापलिकडचे रणक्षेत्र आपल्याला दिसत नसल्यामुळे निर्णय घेताना त्याचा विचार करण्यात काही अर्थ नाही. आज आपल्या देशात पाच वर्षांनी काय होऊ शकतं असा विचार करून रणनीती ठरविण्यासारखी परिस्थिती नाही; कारण आठ दिवसांनी काय होऊ शकेल हेसुद्धा कुणाला सांगता येत नाही.

तरीसुद्धा निर्णय घेताना लोकांच्या मानसिकतेचाही विचार करायला हवा. केंद्रात नुकतेच एक तरुण उमदे नेतृत्व सत्तेवर आले आहे. त्याला संधी द्यावी अशी एक लोकभावना असू शकते हेही आपण विसरता कामा नये; पण शेतकरी संघटनेसारखा संघटनेच्या अधिवेशनाला येणाऱ्या लोकांवर होणारी दडपशाही त्याला कळत नसेल तर ते अकार्यक्षम आहे आणि कळत असेल तर ते निर्दयी आहे असे म्हणावे लागेल. शेतकरी संघटनेचे निवडणुकविषयक धोरण आखताना या निवडणुकीचे निकाल काय काय असू शकतील, पर्यायी निकालांचा संघटनेवर कसा कसा परिणाम होऊ शकेल या सर्वांचा विचार करावा लागेल.



यानंतर काही सैद्धांतिक गोष्टींचाही विचार करायला हवा. मी काही लहानपणापासून आंदोलनात उतरलेला माणूस नाही; मी माझं अर्धं वय उलटून गेल्यानंतर आंदोलनात पडलो आहे. त्यामुळे कदाचित सामाजिक, आर्थिक प्रश्नांवर आंदोलन चालविणाऱ्या इतर मंडळीपेक्षा माझा विचार रणनीतीच्या बाबतीत वेगळा ठरत असेल. अन्याय झाला, की लगेच आंदोलन केलंच पाहिजे हे काही बरोबर नाही. अन्याय होतो; पण त्या अन्यायाचा प्रतिकार करण्याची ताकद नसते तेव्हा तो अन्याय सहन करायचा असतो; तो संताप, तो क्रोध, ती चीड गिळून घ्यायची असते. तो सगळा संताप, क्रोध, चीड ज्या वेळी टोला मारण्याची आपल्यात ताकद निर्माण होईल त्याच वेळी वापरायची असते. शिवाजी महाराजांनी हीच रणनीती वापरली. जेव्हा ताकद असेल तेव्हाच आंदोलन करायचे, नाही तर ताकद गोळा होईतो निमूट खंदकात बसून राहायचं.

दुसरा सिद्धांत असा, की एका समाजव्यवस्थेच्या आत क्रांती यशस्वी होऊ शकते, बंड यशस्वी होऊ शकतं पण शासनाविरुद्ध आंदोलन यशस्वी होऊच शकत नाही. शासनानं जर ठरवलं, की एखादं आंदोलन यशस्वी होऊ द्यायचं नाही तर ते आपल्या हातातील शस्त्रांनी कितीही दीर्घकाळ चाललेलं आंदोलन अयशस्वी ठरवू शकतं. गिरणीकामगारांच्या दोन वर्षे चाललेल्या संपाबाबत शासनाने हेच केलं. अधिवेशनाला येणाऱ्या शेतकऱ्यांच्या गाड्या रस्त्यावर पाइप टाकून अडविणे, पंजाबमध्ये सशस्त्र सैनिकांकरवी शेतकऱ्यांना झोडपून काढणे हे त्यातलेच प्रकार आहेत. तेव्हा आंदोलनात शासनाशी टक्कर देण्याची रणनीती अवलंबिली तर ते आंदोलन यशस्वी होऊ शकत नाही.

हे दिसायला इतकं स्पष्ट आहे, तर मग आंदोलन तरी कशाला करायचं असा प्रश्न साहजिकच उभा राहील; पण आंदोलन करायचं म्हणजे आपल्या प्रश्नाबद्दल शासनाला टोचणी लावायची असते, लोकांच्यात जागृती घडवायची असते; ज्या शोषणाविषयी, अन्यायाविषयी लोक अज्ञानात असतात, ते त्यांच्या निदर्शनास आणून द्यायचं असतं, आंदोलन हा एक शिक्षणाचा भाग आहे. गेल्या पाच वर्षांत शेतकरी आंदोलनांनी शेतकऱ्यांना काय मिळालं? शेतीमालाला भाव मिळाले का? नाही. एखे वर्षी मिळाला आणि चार वर्षांत निघून गेला; पण शेतीमालाच्या भावाच्या प्रश्नातूनच त्यांच्या सर्व समस्यांची उकल होणार आहे, हे प्रशिक्षण शेतकऱ्यांना या आंदोलनातूनच मिळालं. जसं शास्त्र शिकताना थोडं प्रात्यक्षिकही करावं लागतं तसंच आंदोलनाचं आहे; पण केवळ आंदोलनाच्या ताकदीवर सशस्त्र सैन्य हाती असलेल्या शासनाशी मुकाबला करून जिंकू शकेल अशी आता

परिस्थिती नाही. पूर्वी एके काळी हे शक्य होतं. फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळी शेतकऱ्याच्या हातातली शस्त्रं आणि सैन्याच्या हातातली शस्त्रं जवळजवळ सारखी होती, तेव्हा हे शक्य होतं. पण आज सैन्याच्या हातातील शस्त्रं आणि सामान्य माणसाच्या हातातला शस्त्रसामुग्रीचा अभाव हे पाहिलं तर आंदोलन यशस्वी करण्याची तंत्रं ही पार गनिमी काव्याची, वेडीवाकडी जाणारी अशीच असावी लागतात.

आणखी एक मुद्दा म्हणजे जिथं अन्याय होत असेल, शत्रू प्रबळ असला तरी तिथेच आंदोलन केले पाहिजे हे चुकीचं आहे. मगरीने पाणी सोडून चालत नाही. ती पाण्यातच राहिली तर ती हत्तीलासुद्धा ओढून नेऊ शकते; पण ती जर पाण्याबाहेर पडली तर लूत भरलेलं कुत्रंसुद्धा तिला बेजार करू शकतं. आंदोलन करतानासुद्धा हेच तंत्र लक्षात ठेवायला हवं- वेळ आपली पाहिजे, जागा आपली पाहिजे आणि आंदोलन करण्याची ताकदही असली पाहिजे. हे सगळं लक्षात घेऊन जास्तीत जास्त परिणामकारक आंदोलन उभं करणं म्हणजे कुशल रणनीती.

कोणी कितीही टीका करो; पण शेतकरी संघटनेने या सगळ्या गोष्टी लक्षात घेऊन रणनीतीची आखणी केलेली असल्यामुळे गेल्या पाच वर्षांत तिची ताकद इतकी वाढली आहे, की केवळ विरोधीच नव्हे तर राज्यकर्त्या पक्षालाही दबून, नमून वागावं लागत आहे. राज्यकर्ता पक्ष शेतकऱ्यांना दमदाटी करून घाबरवण्याचा प्रयत्न करू लागला आहे; इतर पक्ष जे आजवर संघटनेबद्दल अवहेलनेने बोलत होते ते 'यांच्याही म्हणण्यात काही तथ्य आहे' अशी भूमिका घेत आहेत. इतका दरारा शेतकरी संघटनेने निर्माण केला आहे.

शेतकरी संघटनेने आजपर्यंत वेळोवेळी ज्या गोष्टी केल्या, त्यांतून सतत आपली ताकद वाढविली. पुढेही आपल्याला जे निर्णय घ्यायचे आहेत ते आपली ताकद कमी होणार नाही याची काळजी घेऊनच ठरवायला हवेत. निवडणुकीचा वापर आपल्याला आंदोलन प्रभावी करण्यासाठी करावयाचा आहे. कुणीही सत्तेवर आले तरी चालू व्यवस्थेमध्ये ते शेतकऱ्यांच्या समस्या सोडवू शकत नाहीत; पण आज जे आपल्याला एकत्र जमण्यास अडथळे आणले जात आहेत, महात्मा गांधीनीं दिलेला सविनय कायदेभंगाचा हक्कही तुडवला जातो आहे, आपल्या प्रश्नांना केवळ लाठ्याकाठ्यांच्या भाषेने उत्तरे दिली जात आहेत अशी मस्ती राज्यकर्त्यांत राहू नये असा आपला दरारा निर्माण होईल अशी भूमिका आपल्याला घ्यायला हवी.

(२२ फेब्रुवारी १९८५)

□□



सव्वीस

# राजीवजींचा निवडणूक भूलभुलय्या

गेल्या चारपाच दिवसांत पंतप्रधान राजीव गांधी यांनी शेतीच्या अर्थशास्त्रासंबंधी विशेषत: शेतीमालाच्या उत्पादनखर्चावर आधारित किफायतशीर भावासंबंधी ठिकठिकाणी काही घोषणा केल्या आहेत.

१३ फेब्रुवारी १९८५ रोजी मी कोपरगाव येथे केलेल्या 'पंतप्रधानांनी महाराष्ट्रात निवडणुकीच्या निमित्ताने होणाऱ्या सभांमधून केंद्र शासनाच्या शेतीमालाच्या किफायतशीर किमतीचे धोरण स्पष्ट करण्याची संधी घ्यावी' या आवाहनाला पंतप्रधानांनी जो प्रतिसाद दिला आहे ,त्याबद्दल शेतकरी संघटना त्यांची आभारी आहे.

शेतकरी संघटना, तसेच पंजाब, हरियाना, बिहार, मध्य प्रदेश, गुजरात, आंध्र प्रदेश या राज्यांतील समविचारी न-राजकीय संघटना गेले १५ महिने कृषिमूल्य आयोगाच्या ठिकाणी कृषिउत्पादनखर्च आयोग नेमावा अशी मागणी सातत्याने करीत आहेत. या आयोगाचे अपेक्षित स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.

१) हा आयोग पूर्णपणे तांत्रिक असावा.

२) त्यावर कोणत्याही स्वरूपाच्या राजकीय-आर्थिक जबाबदाऱ्यांचे ओझे लादू नये.

३) या आयोगाचे कामकाज गोपनीयतेच्या पडद्याआड न चालता खुले असावे.

४) आयोगाने काढलेल्या उत्पादनखर्चात संबंधित पिके प्रत्यक्षात काढता येतात हे दाखविण्यासाठी नमुना शेते असावीत.

५) शेतकऱ्यांना प्रत्यक्षात निदान आयोगाने काढलेला खर्च भरुन येईल इतकी किंमत मिळेल याबद्दल आयोगाने लक्ष राहिले पाहिजे.

६) त्याने खर्च काढताना शेतमजुराची मजुरी, मग तो बाहेरचा असो वा घरातला रोज २० रु. धरावी.

आतापर्यंत यासंबंधी पंतप्रधान व संबंधित खात्यांशी केलेल्या कोणत्याही पत्रव्यवहाराला साधी पोच देण्याचा शिष्टाचारही पाळला गेला नाही. पंजाबमधील शेतकऱ्यांनी या मागणीसाठी शांततापूर्ण मार्गाने अनेक वेळा निदर्शने व आंदोलने

केली. १२ ते १८ मार्च १९८४ या काळात चंडीगड राजभवनासमोर केलेली निदर्शने, १ मे ते ८ मे ८४ या आठवड्यात गहू मंड्यांवर संपूर्ण बहिष्कार, २० जुलै ८४ पासूनचे सततचे सत्याग्रह हे त्यातील काही ठळक टप्पे आहेत.

महाराष्ट्रात शेतकरी संघटनेने १९८४ च्या सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात दोन प्रचंड प्रचार यात्रा काढल्या, राजकीय पुढाऱ्यांना शेतीमालाच्या रास्त भावाचा प्रश्न या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नावरील आपली भूमिका मांडण्यास भाग पाडण्याच्या हेतूने सुरू केलेला, सध्या ज्याची सर्वत्र चर्चा आहे असा 'गावबंदी'चा कार्यक्रम, ३ फेब्रुवारी १९८५ रोजीचे प्रातिनिधिक एक तासाचे रास्ता रोको आंदोलन इत्यादी मार्गांनी हा प्रश्न जागता ठेवला.

शासनास हलविण्याच्या कामी हे सर्व प्रयत्न अयशस्वी झाले, पण अखेरी निवडणुकीतील निकड सरस ठरलेली आणि पंतप्रधानांना त्यामुळे रास्त भावाच्या प्रश्नावर जाहीरपणे बोलायला लागलेले दिसते.

पंतप्रधानांची ही वक्तव्ये म्हणजे शेतकरी चळवळीने बसविलेल्या जबरदस्त जरबेची प्रचीती आहे.

१) पंतप्रधानांच्या या घोषणा म्हणजे त्यांनी प्रावीण्य मिळवलेल्या निवडणूक भूलभलय्याची एक चुणूक आहे. '.... काँग्रेस (आय) ची सरकारे असलेल्या राज्यांतच शेतकऱ्यांना रास्त भाव मिळाले आहेत'' (चितोडगड, टाईम्स ऑफ इंडिया. १९ फेब्रु. ८५) हे पंतप्रधानांचे विधान लक्षात घेतले तर त्यांच्या घोषणांकडे गांभीर्याने पाहावे अशी अपेक्षा कुणी करू नये.

शेतीमालाची किंमत हा केंद्राच्या अखत्यारीतला विषय आहे. राज्य सरकारचे त्यावर फारच थोडे नियंत्रण असू शकते. कॅांग्रेस (आय) च्या सत्तेखाली असलेल्या महाराष्ट्र राज्यातील जे कापूस-उत्पादक शेतकरी कमी किमतीने खरेदी करणाऱ्या एकाधिकार कापूस खरेदीतून बचावण्यासाठी आपला कापूस प्रसंगी सीमेवरील पोलिसांना लाच देऊन शेजारी तेलगू देशमच्या आधिपत्याखाली असलेल्या आंध्र प्रदेशात नेऊन विकतात, ते पंतप्रधानांची ही भाबडी विधाने ऐकून फक्त गालातल्या गालात हसतील.

२)विशेषत: महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसमोर त्यांनी 'राज्यात जर काँग्रेस (आय) चे शासन आले तर शेतकऱ्यांना रास्त भाव मिळतील. (मुंबई सकाळ १९-२-८५) ' अशी जी गाजरं नाचविली आहेत, त्याने पंतप्रधानांचा खराखुरा मतलब तेवढा स्पष्ट होतो.

३) नजीकच्या भविष्यकाळात शासन शेतीमालाला रास्त भाव मिळण्याच्या



दृष्टीने एक योजना जाहीर करील असे आश्वासन देत असतांना स्वातंत्र्योत्तर काळातील त्यांच्या अगोदरच्या शासनांनी याबाबतीत उलटीच वाट चोखाळली हे मात्र कबूल करीत नाहीत.

श्री. सी. सुब्रह्मण्यम् यांच्या शब्दांत सांगायचे तर-

शेतकऱ्यांच्या दृष्टीने भारतीय शेतीव्यवसाय तुटीची बाब बनली होती. त्याला त्याचे श्रम किंवा त्याने शेतीत केलेल्या गुंतवणुकीच्या प्रमाणात मिळकत होत नव्हती. याचे मुख्य कारण म्हणजे दुसऱ्या महायुद्धाच्या काळात अवलंबिले गेलेलेच किमत धोरण स्वातंत्र्यानंतरही चालू ठेवले... खरेदीची पद्धतच मूळात क्रूर होती... किमती उत्पादकाऐवजी ग्राहकांना लाभकारक होतील अशाच निश्चित केल्या.

श्री. राजीव गांधींनी शेतकऱ्यांना रास्त भावाचे आश्वासन देणे आणि श्रीमती इंदिरा गांधींच्या शासनाचीच धोरणे पुढे चालू ठेवण्याची ग्वाही देणे या दोन गोष्टी एकाच वेळी करू नयेत.

४) शेतीमालाच्या किमती आणि कृषिमूल्य आयोगासंबंधी शेतकरी आंदोलनांच्या मागण्यांकडे पंतप्रधानांनी जे आजपर्यंत दुर्लक्ष केलेले आहे, त्यावरून त्यांच्या मनात धोरणात्मक बदल वगैरे काही नसून केवळ निवडणूकस्वार्थ आहे हे सिद्ध होते.

५) शेतीव्यवसायात लागणाऱ्या वस्तूंचा खर्च कमी करण्याचा पंतप्रधानांचा उद्देश स्वागतार्हच आहे. त्यामुळे शेतीमालाच्या किमती न वाढवताही शेतीमालाला रास्त भावाचे आश्वासन मिळण्यास मदत होईल; पण त्यासाठी अनुदानांची कुशल यंत्रणा उभारावी लागेल; तीसुद्धा भ्रष्टाचाराला चालना देणारी ठरेल हेही ध्यानात घ्यायला हवे. यापेक्षा बजेटमधील उपलब्धतेचा वापर करून गरीब ग्राहकांना अनुदान देणे अधिक इष्ट ठरेल.

६) बिहारमधील आपल्या एका सभेत पंतप्रधान म्हणाले, 'शेतकऱ्यांच्या जीवनमानाची पातळी पंजाब आणि हरियानातील शेतकऱ्यांइतकी उंचावण्यात येईल.' (इंडियन एक्सप्रेस, १८ फेब्रु. ८५) पंजाब आणि हरियानातील हरितक्रांतीने शेतीउत्पादनात फार मोठी वाढ झाली हे खरे असले, तरी याचा फायदा शेतकऱ्यांना न होता तो व्यापारी आणि ग्राहकांनाच झाला. गाजावाजा झालेल्या आणि शासनाला दाबून ठेवणे आवश्यक वाटलेल्या जाले समितीच्या अहवालाशिवाय शेतकऱ्यांच्या आर्थिक पिळवणुकीविषयी अनेक अभ्यास-अहवाल पंजाबमध्ये आहेत. आज गहू, भात आणि उसाच्या किमती किफायतशीर नाहीत हे जर पंतप्रधानांना मान्य असेल तर पंजाब-हरियानातील शेतकरी आर्थिक कोंडीत आहे

हेही त्यांनी मान्य करायला हवे. पंजाबमधील शेतीव्यवसायातील वाढता कर्जबाजारीपणा हे पंजाबसमस्येमागील मूलभूत कारण आहे हे पंतप्रधानांनी जाणणे अत्यावश्यक आहे; पण ते तर सरळ सरळ 'फोडा आणि झोडा' नीतीचेच खेळ खेळत आहेत.

पंतप्रधानांना खरोखरीच जर शेतीमालाच्या रास्त भावाचा प्रश्न गांभीर्याने हाताळावयाचा असता तर त्यांनी त्यांच्या दहाकलमी कार्यक्रमात त्यासंबंधीचे कलम घालायला हवे होते. त्यांच्या सध्याच्या घोषणा या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत शेतकरी संघटनेने निर्माण केलेल्या दबावाचा परिणाम आहे. आपल्या या घोषणांकडे गांभीर्याने पाहिले जावे असे जर पंतप्रधानांना वाटत असेल तर त्यांनी तातडीने किमती ठरविणाऱ्या यंत्रणेच्या पुनर्रचनेसंबंधी कार्यवाही सुरू करावी आणि ती पूर्ण होईपर्यंतच्या काळासाठी बदलत्या किंमत निर्देशांकाच्या पायावर शेतीमालाचे हमी भाव जाहीर करावेत.

*(८ मार्च १९८५)*

□□



सत्तावीस

# शेतीमालाच्या भावाचा प्रभाव

**या** विधानसभा निवडणुकांमध्ये कोणत्याही पक्षाला यश मिळो, एक गोष्ट निश्चित, या निवडणुकीत विजयी ठरलेला सर्वांत प्रभावी उमेदवार शेतीमालाचा भाव हा आहे. लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळी शेतीमालाच्या भावाच्या प्रश्नावरच, सर्व देशभर इंदिरा पक्षाच्या बाजूने भरघोस मतदान झाले असताना महाराष्ट्रात मतांचे प्रमाण तीन टक्क्यांनी घटले व विदर्भात दहा टक्क्यांनी घटले. या पार्श्वभूमीवर शेतकरी संघटनेने विरोधी पक्षांना एक आघाडी, एक नेता व एक कार्यक्रम अशा धर्तीवर युती करण्याचे आवाहन केले आणि अभिनंदनीय गोष्ट अशी, की विरोधी पक्षांना जे गेल्या पाच वर्षांत जमलं नव्हतं ते आठ दिवसात त्यांनी घडवून आणलं. एक आघाडी -नाव पुरोगामी लोकशाही दल, एक नेता- शरद पवार, एक कार्यक्रम -पंधराकलमी कार्यक्रम आणि त्यातले पहिले कलम शेतीमालाला उत्पादनखर्चावर आधारित भाव. महाराष्ट्रात या आघाडीच्या मागं शेतकरी हातात रुमणं घेऊन उभा राहिला आहे अशा तारांवर तारा पंतप्रधान राजीव गांधींच्या कॉम्प्युटरवर जाऊन थडकू लागल्या आणि दि.२० फेब्रुवारीपासून खुद्द पंतप्रधानांनी शेतीमालाला उत्पादनखर्चावर आधारित भाव देण्यासंबंधी घोषणा करायला सुरुवात केली.

शेतीमालाचा भाव हे एकच कलम, तेच शेतकऱ्यांचे परब्रह्म, तेच देशाचे सर्वस्व असे शेतकरी संघटनेचे धोरण राहिले आहे. सत्तावीस नक्षत्रांतील फक्त नऊ पावसाची म्हणून २७ उणे नऊ बरोबर शून्य याप्रमाणेच शेतीमालाचा भाव हे कलम नसेल तर बाकी भाराभर कलमांचा काही उपयोग नाही. फक्त या कलमावरच निवडणुकीत लक्ष एकवटले पाहिजे. बाकी सर्व घोषणा. बाकी सर्व आश्वासनं, बाकी सर्व कार्यक्रम हे या कलमावरुन लक्ष विचलित करण्यासाठी निवडणुकीत वापरले जातात आणि शेतकऱ्यांचे लक्ष विचलित झाले, की शेतीमालाच्या भावाचा प्रश्न खाली दडपला जातो.

सत्तारूढ पक्ष व पंतप्रधान असे लक्ष विचलित करण्यात पटाईत आहेत. गेल्या

लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळी माजी पंतप्रधानांच्या मृत्यूनंतर देशाला धोका आहे, देश वाचवा अशा घोषणा करण्यात आल्या. १९६२ च्या चीनच्या आणि १९६५ च्या पाकिस्तानच्या आक्रमणाच्या वेळी त्या वेळच्या पंतप्रधानांनी 'देश वाचवा' अशा घोषणा केल्या आणि सर्व लोक पोटातली भूक विसरून, आपले दैन्यदारिद्र्य विसरून देशाच्या मदतीला धावून गेले. यावेळच्या 'देश वाचवा' या घोषणेनेही सर्व लोक धावून गेले व सत्तारूढ पक्षाला भरघोस मतदान केले. लोकसभा निवडणुकीनंतर खरोखरच सहा आठवड्यांत देश बुडायचा थांबला का, देशाच्या अखंडत्वाचा धोका संपला ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. जातिभेद व धर्मभेदाच्या भावनेतून देशाला धोका असेल तर ते भेद नष्ट करायचा खरोखर प्रयत्न होतो आहे? शहादा येथील राजीव गांधींच्या सभेच्या वेळी सहा निरपराध, वीस वर्षे या भागात कामधंद्यासाठी राहत असलेल्या शिखांना पोलिस चौकीत डांबून ठेवण्यात आले. अशा प्रकारांनी हे भेद संपणार आहेत का?

लोकसभेच्या वेळी 'देश वाचवा' या घोषणेने लोकांचे पोटाच्या प्रश्नावरचे लक्ष उडविले. विधानसभा निवडणुकीच्या वेळी तर तऱ्हेतऱ्हेचे प्रकार सत्तारूढ पक्षांनी वापरले. पहिलं म्हणजे गुप्तहेर प्रकरण- अनेक महत्त्वाच्या मंत्र्यांच्या खुर्चीखाली हे गुप्तहेर आरामात वावरत होते. हे प्रकरण खरे असेल तर एकच सिद्ध होते की सत्तारूढ पक्षाचे सरकार इतके दिवस अत्यंत अकार्यक्षम होते. या सर्व प्रकरणाची पूर्ण न्यायालयीन चौकशी करावी आणि या प्रकरणात कोणी मंत्री संबंधित आहेत का याचीही पूर्ण शहानिशा करावी. या प्रकरणाची दुसरी बाजू अशी, की दिल्लीतील अनेक पत्रकार मंडळी म्हणू लागली आहेत, की या प्रकरणात काही अर्थ नाही. केवळ बनाव आहे. म्हणजे थोडक्यात लोकांचे लक्ष विचलित करायचा नवीन खुळखुळा आहे. दुसरे प्रकरण म्हणजे स्वच्छ प्रशासनाची आणि भ्रष्टाचार हटवण्याची घोषणा. याचाही अर्थ असा, की सध्या प्रशासन अस्वच्छ आहे आणि भ्रष्टाचार बोकाळला आहे आणि हे सर्व सत्तारूढ पक्षाचेच सरकार असतानाच झाले आहे. भ्रष्टाचार दूर करण्याचा एक उपाय म्हणून घोषणा झाली, की या विधानसभा निवडणुकीत इंदिरा पक्ष भ्रष्ट उमेदवारांना तिकिटे देणार नाही. असं खरंच करायचं असतं तर इंदिरा पक्षाला निवडणूकच लढवता आली नसती. त्यातल्या त्यात सफाई करायची म्हणून इंदिरा पक्षाने डॉ. बळिराम हिरे, शिवाजी पाटील निलंगेकर, प्रतिभा पाटील आणि बोराडे यांना तिकिटे नाकारली. हेतु हा, की येवढ्या मोठ्यामोठ्यांना लोळवणारा पंतप्रधान आपल्या पोटापाण्याच्या प्रश्नाचंही काहीतरी करेल या आशेने शेतकऱ्यांचं लक्ष शेतीमालाच्या भावाच्या प्रश्नावरून उडेल; पण या सर्वांना तिकीटे नाकारली तरी इंदिरा पक्षानं त्यांच्या घरात तिकिटे दिली आहेत. डॉ. बळिराम हिऱ्यांच्या पत्नीला, शिवाजी पाटील निलंगेकरांच्या मुलाला, प्रतिभा पाटलांच्या पतीला, बोराड्यांच्या मेव्हण्याला आणि जावयाला अशी दोन तिकिटे दिली आहेत. यातून भ्रष्टाचार समूळ नष्ट होणार नाही. झाडाची जशी वरवरची छाटणी केल्यावर अजून जोमाने फूट होते तसा भ्रष्टाचार अजून जोमाने वाढेल. त्याचबरोबर लक्ष वेधून घ्यायचा अजून एक झगमगीत उपाय इंदिरा पक्षाने वापरला. निरनिराळ्या सिनेमानटांनी गावोगाव जाऊन इंदिरा पक्षाचा प्रचार केला. लातूरमध्ये मिथुन चक्रवर्तींनी सांगितलं, की लातूरच्या उमेदवाराला, विलासराव देशमुखांना निवडून द्या. मी लातूरला 'डिस्को डान्सरचा' फुकट कार्यक्रम करेन. मुंबईत मिळकत-कराच्या थकबाकी वसुलीसाठी ज्या धाडी पडल्या, त्यातून हे प्रचार करणारे नट वाचले हा काही केवळ योगायोग आहे का? लोकांचे लक्ष विचलित करायचा अजून एक उपाय म्हणजे पक्षांतर बंदी विधेयक, त्यावरच्या चर्चा वगैरे. हे विधेयक आता ८०% खासदारांचं घट्ट बहुमत लोकसभेत आल्यावर येत आहे; परंतु गेल्या अनेक वर्षांत पक्षांतर घडवून अनेक सरकारे पाडणे आणि एका राजकीय भ्रष्टाचाराची निर्मिती करणे हे काम तर जास्तीत जास्त सध्याच्या पंतप्रधानांच्या मातोश्रींनी केले होते.

एवढ्या सगळ्या खुळखुळ्यांनीही हातात रुमणं घेऊन 'पुलोद'च्या पाठीशी खंबीरपणे उभे असलेल्या शेतकऱ्यांचं लक्ष विचलित होत नाही हे पाहिल्यावर दि.२० फेब्रुवारीपासून राजीव गांधींनी शेतीमालाच्या भावाच्या प्रश्नावर तोंड उघडलं. आणि मग त्यांनी आपल्या पक्षाच्या हातात असलेल्या राज्यातच शेतीमालाला भाव मिळतात, इथपासून आम्ही राज्यात सत्तारूढ झालो तर शेतीमालाच्या भावाचा प्रश्न सोडवू इथपर्यंत विधाने करण्याचा सपाटा लावला.

पण हाही खुळखुळा कदाचित कमी पडेल असे वाटल्याने त्यांनी २३ फेब्रुवारीला एक घोषणा करून टाकली. १६ नोव्हेंबर १९८३ पासून शेतकरी संघटना मागणी करीत आहे, की कृषिमूल्य अयोग रद्द करून त्याजागी कृषि उत्पादनखर्च आयोग नेमावा. त्याचे स्वरूप कसे असावे हेसुद्धा संघटनेने मांडले आहे. आजपर्यंत या मागणीसंबंधी काही उत्तर शासनाकडून आले नाही; पण २३ फेब्रुवारीला सायंकाळी शासनाने अचानक घोषणा केली: 'कृषिमूल्य आयोगाचे पुनर्नामांकन कृषि खर्च आणि मूल्य आयोग असे करण्यात येत आहे.' नाव बदललं; पण या आयोगाचं काम बदललं की नाही हे कळायला मार्ग नाही. कारण त्याचा तपशील अजून ठरायचा आहे म्हणे. मग इतक्या घाईने घोषणा करण्याची गरज काय? या

घोषणेनंतर लखनौमधील एका जाहीर सभेत पंतप्रधान म्हणाले, 'यापुढे हा आयोग शेतीमालाच्या उत्पादनखर्चात विजेचा खर्च आणि पाण्याचा खर्चही धरेल.' आजपर्यंत हे खर्च हिशेबात धरले जात नव्हते याचा हा सरळसरळ कबुलीजबाब आहे. तीन वर्षांपूर्वी त्या वेळेचे कृषिमंत्री श्री. राव वीरभद्रसिंगांनी कारभाऱ्याचा खर्च, औतअवजाराच्या दुरुस्तीचा खर्च, वाहतुकीचा खर्च इत्यादीबाबत असाच कबुलीजबाब दिला होता. हे कबुलीजबाब एक-दोन माणसांचा खून करणाऱ्या खुन्याच्या कबुलीजबाबापेक्षा भयानक आहेत. कृषिमूल्य आयोग तयार झाल्यापासून गेल्या वीस वर्षांतील त्यांच्या शेतकरीविरोधी धोरणामुळे जो जो शेतकरी कर्जात बुडाला आणि हाय खाऊन मेला, जे जे शेतकरी आपली आपली घरेदारे सोडून, आपले आपले संसार मोडून देशोधडीला लागले, ज्यांना दुष्काळी कामांवर खडी फोडून आपले हात रक्तबंबाळ करून घ्यावे लागले, ज्यांना जगण्याकरिता शहरात जाऊन नरकप्राय वस्त्यांत राहावे लागले या सर्वांच्या या स्थितीस हा कृषिमूल्य आयोग आणि त्यावर प्रमुख असणारे पंतप्रधान, कृषिमंत्री हे सर्वच जबाबदार आहेत. पंतप्रधानांनी निवडणूक प्रचार सभेत का होईना कबुलीजबाब दिला आहे. त्यांना आपल्या पूर्वजांनी केलेल्या पापाचे क्षालन खरोखरी करायचे असेल तर त्यांनी खरा प्रश्न समजून घेतला पाहिजे. केवळ घोषणा करून निवडणुकीच्या गंगेत बुचकाळी मारून पापक्षालन होईल असे समजून चालू नये.

केवळ निवडणुकीत मतं मिळवायची घोषणा म्हणून राजीव गांधी शेतीमालाला भाव देण्यासंबंधी बोलत नसतील तर या मागणीचे व्यापक स्वरूप त्यांनी लक्षात घ्यावं. गेली ३७ वर्षे शेतकऱ्यांची पद्धतशीरपणे लूट करुन कारखानदारी आणि भांडवलाची निर्मिती करण्याची नीती सत्तारुढ पक्षाची होती. १९६० साली या देशाचं शेतीतून तयार होणारं उत्पन्न एकूण उत्पन्नाच्या ६० टक्के होतं आणि त्यावर देशाची ७५ % जनता जगत होती. आज एकूण शेतीचं उत्पादन खूप वाढूनही हे उत्पन्न देशाच्या एकूण उत्पन्नाच्या ३३ % झालं आहे आणि त्यावर जगणारी जनता ७१ % च राहिली आहे आणि दुसरी महत्त्वाची आकडेवारी ही, की १९७० साली किमतीचा निर्देशांक जर १०० धरला तर आज तो सरासरी ३४० आहे. कारखान्यात तयार होणाऱ्या काही वस्तूंचा निर्देशाक ५८० च्या वर आहे आणि अन्नधान्याचा मात्र २९० आहे. म्हणजे शेतीचं क्षेत्र किमतीच्या बाबतीत सतत मागे हटत राहिलं आहे. १९७० च्या ज्वारी इ. च्या किमती आणि आजच्या किमतीची तुलना केली तर २९० हा आकडाही जास्त फुगवलेलाच वाटता;. पण अगदी सरकारी आकडेवारीनं जरी पाहिलं तरी या दोन महत्त्वाच्या गोष्टींनी हे सिद्ध



होतं; की सर्व देशाची संपत्ती शहरात एकवटते आहे आणि खेडी ही इंग्रजांच्या राजवटीत असतानासारखीच नाडली जात आहेत. हेच धोरण सत्तारूढ पक्षाने आजवर ३७ वर्षे वापरले आहे. शेतीमालाला भाव मिळू नये म्हणून तुटवडा असेल तेव्हा लेव्ही, मुबलकता असेल तेव्हा लिलाव, तालुकाबंदी, जिल्हाबंदी. राज्यबंदी, निर्यातबंदी, गरज नसमाना चढ्या भावाने भरमसाट आयात हे सर्व प्रकार वापरुन शेतकऱ्याला नागवले आहे, देशातील तीन चतुर्थांश लोकांचा व्यवसाय कायम तोट्यात ठेवला आहे. याचा परिणाम म्हणून गावचं नेतृत्व सार्वजनिक मालमत्तेवर हात मारणाऱ्या गावातील गुंडांकडे गेलं आहे आणि शहरातील नेतृत्व हे हातभट्टीवाल्या, स्मगलिंग करणाऱ्या, कन्स्ट्रक्शन रॅकेट आणि असले मोठे उपद्व्याप करणाऱ्या दादांच्या हाती गेलं आहे. ज्या भ्रष्टाचारामुळे निवडणुकीत एका उमेदवारास ५०, ५० लाख रुपये खर्च करता येतात तो भ्रष्टाचार, ती समांतर अर्थव्यवस्था शेतकऱ्याला नाडून औद्योगिकीरण व भांडवल तयार करायच्या नीतीतून निघाली आहे. शेतीमालाला रास्त भाव मिळविण्याच्या एका मागणीमागे ही सर्व व्यवस्था उलटी पालटी करण्याची ताकद आहे, त्याचबरोबर सबंध देशाच्या समतोल विकासाचं अर्थशास्त्र आहे.

हे सर्व समजावून घेऊन राजीव गांधींनी जर शेतीमालाच्या भावाविषयी घोषणा केली असेल, तर त्याला अर्थ आहे. नाही तर मतं मिळवण्यासाठी वापरलेला तो एक नवीन खुळखुळा आहे.

या देशाच्या परिस्थितीचा आणि तिच्यामागील कारणांचा अभ्यास न करता देश पुढे नेण्याच्या गोष्टी कुणी करू नयेत. ज्या देशाचा जगात आर्थिक यादीमध्ये जवळजवळ शेवटचा नंबर लागतो, ज्या देशामध्ये आजही दीड लाख खेड्यांत पिण्याचे पाणी नाही, अडीच लाख खेड्यांत जायला रस्ता नाही, जिथलं निरक्षरतेचं प्रमाण वाढत आहे, लाखो खेडी खरजेनं त्रस्त झाली आहेत, ज्या देशातल्या हजारो शेतमजुरांना, आदिवासींना हंगाम संपला, की घरात काही नाही म्हणून आपल्या मुलांना झाडांचा पाला उकडून खाऊ घालावा लागतो त्या देशाचे पंतप्रधान एकीकडे गंगाजलशुद्धी (जी गंगा चुकीच्या औद्यागिकीकरणाच्या नीतीने अशुद्ध झाली आहे) तर दुसरीकडे संगणकाचा वापर करून, अत्याधुनिक विज्ञानाचा वापर करून आधुनिक युगामध्ये जगाच्या पुढे जाण्याच्या गोष्टी करतात तेव्हा त्यांना महंमद तुघलखाचा दुसरा अवतार म्हणू नये तर काय म्हणावे?

देशातील पंचाहत्तर टक्के जनता शेतीवर जगणारी, तरीही शेतकरीविरोधी सरकारचे बहुमत ८० टक्क्यांचे. याचं कारण शेतीमालाच्या भावावरून निरनिराळ्या

प्रकारांनी लक्ष विचलित करण्यातील यश. शेतकरी संघटनेने या निवडणुकीत हे लक्ष विचलित न होऊ देण्याची मोहीम उघडली. शेतकरी, आदिवासी शेतकरी यांचं भांडण असू शकत नाही हे नवापूर भागातील आदिवासींनी महाराष्ट्र प्रचारयात्रेत, धुळे अधिवेशनात आणि या निवडणुकीतही सिद्ध केले. शेतकरी, आदिवासी यांच्यामधील भांडण, शेतकरी-शेतमजुर यांतील भांडणे एवढेच नव्हे तर जातीयतेतून निघालेल्या सर्व भाडणांचे मूळ आर्थिक आहे. दोन अतिदरिद्री असलेल्या भावाभावांत श्रीमंत उपऱ्याने त्यांचं लूट करण्याचं कारस्थान लक्षात येऊ नये म्हणून भांडण लावलेलं असतं. यातूनच शेतकरी कर्जबाजारी होतो, शेतमजूर उपाशी राहतो, हंगाम संपल्यावर बेकार होतो. त्याला पोट बांधून भूक मारावी लागते. आदिवासी शेतकऱ्याच्या एकाधिकारात तर इतर शेतकऱ्यांहूनही जास्त लूट होते. या सर्वांच्या दु:खदारिद्र्याचं कारण एक, त्याचं आपापसात भांडण लागायचं कारण एक, ते म्हणजे काळ्या इंग्रजाचं शेतीविषयक शोषणाचं धोरण.

सत्तारूढ पक्षाच्या या फूट पाडण्याच्या धोरणाबरोबरच तात्पुरत्या स्वरूपाची गाजरं दाखवायचीही कामं निवडणुकीच्या वेळी जोरात चालतात. अल्पभूधारकांना नांगर वाटणे, गावच्या देवळाला पाच पाच हजार देणगी देणे असे प्रकार चालू होतात. शेतकऱ्यांनी केवळ स्वत:चा स्वार्थ लक्षात घेतला तरी या गाजरामागचं कारस्थान लक्षात येईल. ज्या गावाला ५ हजार रु. देणगी देण्यात येते तेथे दहा लाखांचा कापूस होतो. कापसाचा उत्पादनखर्च सरकारी आकडेवारीप्रमाणे ९०० रु. क्विंटल व मिळणारा भाव ६०० रु. क्विंटल. म्हणजे जर पाच हजार रुपयांसाठी सत्तारूढ पक्षाला मत दिलं आणि त्यांचं तेच लुटीचे धोरण चालू राहिलं तर गावाला दरवर्षी १५ लाखाऐवजी १० लाख रुपये मिळतील. ३०० रु. चा नांगर आणि ५ हजार रुपये देणगीपोटी एका गावातून सत्तेच्या ५ वर्षांत २५ लाख रुपये लुटण्यांची आपण सोय करून दिली असेच होईल.

गावागावात घराण्यांच्या वैरामुळे किंवा पाटील- सरपंच अशा प्रकारच्या दोन तटांमुळे आधीच अर्धी मते सत्तारूढ पक्षाला जातात. मग खुळखुळे दाखवून, लाचारी जोपासून अजून मते मिळवली जातात आणि शासनाची शेतकरीविरोधाची तटबंदी अजून पक्की होते.

शेतीमालाला भाव मिळवायचा असेल तर निवडणुकीच्या खिंडीत गाठून सत्तारूढ पक्षाला पराणी टोचली पाहिजे. सत्तारूढ पक्षाला मतदान म्हणजे त्यांच्या शेतकऱ्यांच्या शोषणाच्या धोरणाला पाठिंबा दिल्यासारखेच आहे. ही शेतकरी



संघटनेची निवडणुकीत भूमिका आहे.

चार वर्षे दहा महिने शेतकरी त्याच्या चिंतेत काढतो. पेरलेलं बियाणं उगवेल की नाही, उगवलं तर त्याच्यावर कीड पडेल का, कीड पडली तर औषध मिळेल का, औषध मिळालं तर त्यानं कीड मरेल का, धान्य पिकलं तर ते विकेल का, विकलं तर त्याला योग्य भाव येईल का, कारभारीण दोन दांडाचं लुगडं ठिगळं लावून वापरते, तिला नवीन लुगडं घेऊन देता येईल का, पोराची चड्डी फाटली आहे-त्याला नवीन चड्डी घेता येईल का, सोसायटीच्या कर्जाचं मुद्दल सोडा; पण व्याज तरी भरता येईल का, नाही तर सोसायटीची जीपगाडी येऊन घरची भांडीकुंडी उचलून घेऊन जाईल आणि भर बाजारात बेअब्रू करेल, मग काय करायचं?.. असे प्रश्न शेतकऱ्यांच्या मनात; तर शेतात रोजगार मिळेल का, पोटापुरतं तरी खायला मिळेल का, हंगाम संपल्यावर काही दुसरा कामधंदा मिळेल का ही भीती शेतमजुरांच्या मनात. असं असताना एकदा निवडणुकीचे ढोल वाजायला लागले, घोषणाबाजी, रंगीबेरंगी करमणुकीचे प्रकार सुरू झाले की शेतकऱ्यांचे, शेतमजुरांचे लक्ष विचलित होते. ते होऊ नये हा शेतकरी संघटनेचा निवडणूक आंदोलनातील मुख्य हेतू.

शेतकरी संघटनेचा आर्थिक विचार हा या निवडणुकीत झुंडशाही आणि घोजणाबाजीवर मात करू लागला आहे. शेतमजूर-शेतकरी, आदिवासी शेतकरी हे सर्व शेतीधंद्यावर जगणारे शेतकरी संघटनेच्या झेंड्याखाली एक येऊ लागले आहेत आणि यातूनच सर्व राजकीय पक्षांच्या, सत्तारूढ पक्षाच्यासुद्धा तोंडी शेतीमालाच्या भावाची भाषा आणण्याची, रेड्याच्या तोंडी वेद वदवायची किमया शेतकरी संघटनेने घडवून आणली आहे. 'शेतीमालाचा भाव' हा आपला उमेदवार यशस्वी झाला आहे.

*(१५ मार्च १९८५)*

□□

अठ्ठावीस

# अरे, पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली

**शे**तकरी आंदोलनाचे एक नवे पर्व २ ऑक्टोबर १९८५ रोजी चालू होत आहे. पुन्हा एकदा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांवर आंदोलनाचे नेतृत्व करण्याची जबाबदारी येऊन पडली आहे.

दोन ऑक्टोबर, महात्मा गांधींचा जन्मदिवस. यंदा या दिवसापासून बनावट कापडाच्या बहिष्काराचा, होळीचा कार्यक्रम सुरू होईल. सहा ऑक्टोबर १९८५ रोजी राहुरी येथे भरणाऱ्या ऊसउत्पादकांच्या परिषदेत एका नवीन लढ्याचाही विचार करण्यात येईल; पण याचा अर्थ असा नव्हे, की हा लढा केवळ कापूस व ऊस शेतकऱ्यांचाच आहे किंवा त्यांच्यासाठीच आहे किंवा त्यांनीच करावयाचा आहे; तर हा लढा सर्व शेतकऱ्यांचा आहे, गरिबांचा आहे. बलुतेदारांचा आहे. थोडक्यात, हा लढा देशातल्या गरिबांचा आहे. यात पुरुष आले, स्त्रिया आल्या; दलित आले, सवर्ण आले; हिंदू आले, मुसलमान आले, शीख आले; सर्व धर्मांचे, पंथांचे लोक आले.

मी कापूस पिकवीत नाही, मी कशाला या आंदोलनात भाग घेऊ, मी ऊसबागायतदार नाही मी आपला घरीच बसेन... असे जो जो म्हणेल तो सबंध शेतकरी आंदोलनाचा घात करील. शेतकऱ्यांच्या लढ्याचे १९८० मध्ये कांदा-ऊस हे साधन होते, यंदा कापूस-ऊस आहे; पण लढा सर्व शेतीमालाचा आहे.

शेतीमालाच्या भावाचा प्रश्न सर्व शेतकऱ्यांचा आहे. ज्वारी, बाजरी, नागली, वरी, भात, तूर, हरभरा, उडीद, कांदा, तंबाखू कोणतेही पीक असो, त्यांच्यासाठी हा लढा आहे. या सगळ्या मालाला किंमत मिळावी; ती किंमत मिळण्याच्या वाटेवरचा अडसर दूर हावा म्हणून कृषिमूल्य आयोग बरखास्त करावा, त्या जागी कृषि उत्पादनखर्च आयोग नेमावा, ही मागणी पंढरपूरच्या विठोबाच्या पायाशी संघटनेने पहिल्यांदा १६ नोव्हेंबर १९८३ रोजी, कार्तिकी एकादशीला केली. त्यानंतर अनेक तऱ्हांनी, मार्गांनी ही मागणी पुढे केली. अर्ज केले, निवेदने दिली, पंजाब पुरा पेटला असताना चंडीगड येथील राजभवनाला तर हजारो शेतकरी वेढा घालून



बसले, तुरुंगात गेले. महाराष्ट्रात हजारोच्या प्रचारयात्रा निघाल्या. पुढाऱ्यांना बंदी झाली. शेकडो शेतकऱ्यांनी लठ्या खाल्ल्या, तुरुंग पाहिला. निवडणुकीच्या खिंडीत शासन बरोबर सापडेल असे वाटले; पण श्रीमती इंदिराजींच्या खुनामुळे वाचले. तरीही शेवटी पंतप्रधानांना 'कृषिमूल्य आयोगा' चे नाव बदलून ते 'कृषि उत्पादनखर्च आणि मूल्य आयोग' असे करण्यात आल्याचे जाहीर करावे लागले.

१९८४ च्या शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्यलढ्याचा हा देदीप्यमान इतिहास काही कोणा एका शेतकऱ्याकरिता नव्हता, सगळ्यांकरिता होता.

निवडणूक झाली, सरकारची गरज संपली आणि शेतकऱ्यांचे मरण ओढवले. पंजाबपरिस्थितीमुळे तयार झालेल्या तणावाच्या गंभीरतेकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे असे पाहून सरकारने गरिबांचे नरडे पकडले. श्रीमंतांची दिवाळी सुरू झाली. श्रीमंतांना कर्जमाफी, त्यांना खुले परवाने, परदेशांतून यंत्रसामुग्री आणण्याची मुभा, सरकारी नोकरांना पगारवाढ, करांत सूट इ. इ. अशी लयलूट. शेतकरी, शेतमजुरांच्या दु:खात मात्र काही नाही.

या सगळ्या धोरणांत शेतकऱ्यांचा गळा दाबणारी नीती कापडधंद्याची. यापुढे भांडवलदारांना बाहेरून यंत्रसामुग्री आणण्याची पूर्ण मुभा आहे. बनावट धागा आयात करण्याची परवानगी आहे. झुळझुळीत पॉलिएस्टर, टेरिलीन शहरातील राजबिंड्यांच्या अंगावर शोभणार आहे. अर्धे उघडे राहणाऱ्याच्या पाठीवरचे फाटके कपडेही आता ओरबाडून काढले जाणार आहेत. बनावट धाग्यांवर बंधने असूनही कापूस उत्पादक शेतकऱ्याला गेल्या वीस वर्षांत भाव मिळाला नाही; मग बनावट धाग्याची खुली आयात बिनधास्त झाल्यावर कपाशीला विचारतो कोण? कपास पिकवणारा मेला, त्यांच्यासोबत श्रमणारा खलास झाला. त्याला भाव मिळेल असे नुसते म्हटल्याने मिळत नाही. लांब धाग्याच्या वरलक्ष्मी कापसाच्या गाठी देशात पडून आहेत. देशातल्या गिरण्या तो वापरू शकत नाहीत. मग नवीन कापड धोरण या लांब धाग्याच्या कापसाकडे का झुकले नाही? बनावट धाग्याकडे का झुकले? परदेशांतून बनावट धागा आयात करण्यासाठी दरवाजे खुले केले, मग या पडून राहिलेल्या वरलक्ष्मीला बाहेर तरी जाण्याची शक्यता का नसावी? तुमच्या मनात भाव द्यायचा आहे तर कृषिमूल्य आयोगाच्या पुनर्रचनेविषयी घोषणा का करीत नाही?

राजीव गांधींचे कापडधोरण म्हणजे महात्मा गांधींच्या कल्पनेतील स्वतंत्र भारताच्या चित्राच्या विरुद्धचे टोक आहे:

-महात्माजींनी कापसावर जोर दिला. आवश्यक तर देशात तयार होणाऱ्या

रेशमाकडे दुर्लक्ष झाले तरी चालेल असे म्हटले.

राजीवजींनी परदेशी आयातीतून तयार होणाऱ्या बनावट धाग्याला उचलून धरले.

-महात्माजींनी हातमाग, यंत्रमागसुद्धा नको; चरखा पाहिजे; घरोघर चरखा चालला पाहिजे असा आग्रह धरला.

राजीव गांधी परदेशांतून शास्त्र आणि तंत्रज्ञानाच्या घोषांत यंत्रसामुग्री आयात करणार आहेत.

-प्रत्येकाच्या अंगावर कपडा हे महात्म्याचे स्वप्न ;

तर शहरांतील लोकांना पाहिजे तितके झुळझुळीत कपडे मिळत नाहीत याची राजीवजींनी चिंता. महात्माजींचे अपुरे राहिलेले स्वातंत्र्यआंदोलन शेतकरी संघटना पुढे चालवत आहे असे मी अनेकदा म्हणतो, त्याचे आगामी आंदोलन हे सर्वस्पष्ट उदाहरण आहे.

स्वातंत्र्य येते येते म्हणता नाहीसे झाले. गोऱ्या इंग्रजाची जागा काळ्या इंग्रजाने घेतली. गरिबी वाढत राहिली, भारतावर इंग्लंडऐवजी 'इंडिया'चे राज्य चालू झाले. आता शेतकऱ्यांना पुन्हा एकदा परदेशी बनावट कापडांविरुद्ध उभे करणे भाग आहे.

राजीवराज्याच्या रूपाने शहरी लुटारूंनी सरसावून आघाडी उभारली आहे. बनावट कापडाच्या राजीवस्त्रांच्या साह्याने ती येते आहे. इंडियाच्या आर्थिक धोरणात जे जे काही हीन आहे, दुष्ट आहे, राक्षसी आहे त्या सर्वांची राजीवस्त्रे ही प्रतीके आहेत. पॉलिएस्टर, टेरेलिन, नायलॉन, अक्रीलिन ही सगळी वस्त्रे गरिबांच्या रक्ताने भरलेली आहेत.

शिवाय आंदोलन म्हटलं, की खिशाला तोशीस आलीच. रस्ता अडवायचा तर पोलिस पकडतील का, लाठ्या चालवतील का, गोळ्या चालवतील का हा त्रास असतोच. खटल्यासाठी चकरा मारून खिसा पार रिकामा होतोच होतो, शिवाय मानसिक त्रास होतो तो वेगळाच. हा त्रास आपण सहन केला, करायची तयारीही आहे. त्या मानाने बनावट कपड्यांच्या होळीत हा त्रास कमीच आहे; पण जरा खिशाला तोशीस घेतली तर परिणाम मात्र मोठा साधता येतो.

ही वस्त्रे मी इतके पैसे खर्चून विकत घेतली ती टाकू कशी? लग्नाच्या वेळी ही मला सासुरवाडीकडुन मिळाली, ती जाळू कशी? ती एकूण स्वस्त पडतात, धुवायला सोपी असतात, ऐटदार दिसतात, थोड्या कपड्यांत भागते, ती होळीत टाकू कशी? असा विचार केलात, की तुम्ही स्वतःच्या हाताने शेतकरी आंदोलन



संपवलेत; शेतकऱ्याला पुन्हा एकदा पाताळात गाडलेत.

बनावट कपड्यांची होळी एक प्रतीक आहे. शेतकरी आणि देश सुखी व्हावा म्हणून पुन्हा एकदा आमच्या आयुष्याच्या मशाली पेटवण्यास आम्ही सज्ज झालो आहोत.

*(६ सप्टेंबर १९८५)*

□□

## एकोणतीस

# बनावट धाग्याचा गळफास

शकुंतलेच्या प्रेमात पडलेला दुष्यन्त राजा राजवाड्यावर परत आला आणि न राहवून त्याने शकुंतलेविषयीचं त्याचं प्रेम विदूषकाजवळ व्यक्त केलं. मग त्याचं त्यालाच वाटलं, की विदूषक चार ठिकाणी बोलून ही गोष्ट सगळीकडे पसरवेल. म्हणून मग दुष्यंत स्वत:च म्हणाला, 'मी काय बोललो ते विसरून जा. ते मी थट्टेनं बोललो होतो.'

सरकारच्या कापड धोरणात काही भाग तरी असा थट्टेत बोलण्यासारखा नक्कीच आहे. उदाहरणार्थ, आजपर्यंत कापड धोरण ठरवताना कापडधंद्यांची गिरण्या, यंत्रमाग, हातमाग अशी विभागणी करण्यात येत होती. यापुढे कापूस पिंजणे, सूत कातणे, कापड विणणे आणि रंगकाम वगैरे कापड बनण्याच्या निरनिराळ्या प्रक्रियांच्या आधारे विभागणी करण्यात येईल आणि याप्रमाणे धोरण ठरवण्यात येईल, असं सुरुवातीला जाहीर केलं आणि नंतरमात्र गिरण्यांना वेगळं धोरण, यंत्रमागांना नोंदणी करणं आवश्यक अशी बंधनं आणि हातमागाला तर १३-१४ कलमांचा कार्यक्रम म्हणजे विभागणीत काहीच फरक नाही.

आधी घोषणा केली, की यापुढे आजारी गिरण्यांचे लाड बंद करण्यात येतील, गिरण्या कार्यक्षमतेने चालवता आल्या नाहीत तर बंद केल्या जातील आणि कालपरवाची बातमी अशी-अशा तेरा आजारी गिरण्यांचं राष्ट्रीयीकरण करण्यात आलं आहे.

तसंच हातमाग भरभराटीला यावा म्हणून तेरा, चौदा कलमांचा कार्यक्रम जाहीर केला. त्यांतलाच एक भाग म्हणजे, 'जनता कापड तयार करण्याची मक्तेदारी हातमागावर सोपविण्यात आली आहे.' दोन दिवसांपूर्वीची बातमी अशी, की जनता कापड तयार करण्याची जबाबदारी एन. टी. सी. म्हणजे सरकारी कापड गिरण्यांकडे दिलेली आहे.

कापड धोरणात असंही एक वाक्य आहे, की कापसाला भाव मिळतील अशी व्यवस्था करू. याबाबत कापूस महामंडळाला खास अधिकार दिले आहेत. या



अधिकारांनी कापसांच्या किमती स्थिर राहाव्यात म्हणजे वाढू नयेत म्हणून महामंडळ कापूस आयात करू शकतं आणि कापड धोरणातच गिरण्यांना कोणताही धागा वापरायचं पूर्ण स्वातंत्र्य दिलेलं आहे. आजवर गिरण्यांवर ८० टक्के धागे कापसाचेच वापरावेत हे बंधन असूनही कापडाच्या किमतीत जेवढ्या काळात तिपटीने वाढ झाली (३०० टक्के) तेवढ्याच काळात कापसाच्या भावात मात्र निमपटीहून थोडी जास्त वाढ म्हणजे ६० टक्के वाढ झाली व आता तर गिरण्यांनी कापूस वापरला नाही तरी चालणार आहे, मग कापसाला योग्य भाव मिळतील अशी व्यवस्था तरी कोणती? निर्यात करून भाव मिळतील म्हटलं तर निर्यातीचं धोरण असं, की लांब धाग्याच्या कापसाच्या २८ लाख गाठी पडून आहेत. त्यातून उपकार केल्यासारखं तीन लाख गाठींची निर्यात केली.

गेल्या निवडणुकीत शेतीमालाच्या भावाचा प्रश्न वर काढून शेतकरी संघटनेने प्रचंड दबाब आणला. परिणाम असा झाला, की सगळेच शेतीमालाला उत्पादनखर्चावर भाव देऊ म्हणून बोलायला लागले. कुणी करत काहीच नाही. आता राज्यकर्त्या पक्षानं पंजाब निवडणुकीसाठी काढलेल्या जाहीरनाम्यातही म्हटलं आहे, की शेतीमालाला रास्त भाव देऊ. कापसाला भाव देण्याची व्यवस्था करण्याची घोषणा हा यातलाच एक प्रकार.

एका बाजूला राजकीय प्रश्नांचा ऊहापोह चालू असतानाच आर्थिक घोषणा करण्यात येत आहेत. काही राजकीय धोका वाटू लागला, की आपण कोणावर विश्वास टाकू ते सांगता येत नाही. एका संस्कृत श्लोकात एक विनोदी गोष्ट सांगितलेली आहे. एका म्हाताऱ्या माणसाने एका तरण्याताठ्या मुलीशी लग्न केलेले असते; पण ती नवी तरणी नवरी काही त्याला दाद देत नसते. एक दिवस रात्री चोर घरात शिरतो, त्याबरोबर लगेच ती नवरी घाबरून नवऱ्याला मिठी मारून बसते. म्हातारा खूष होऊन चोराला म्हणतो, 'तुला पाहिजे ते खुशाल घेऊन जा. इतके दिवस मला जे जमलं नव्हतं, ते तुझ्यामुळे झालय !'

तसेच या राजकीय प्रश्नांच्या तणावामुळे आपण कुणाच्या गळ्यात पडू, कुणावर विसंबून राहू ते सांगता येत नाही. आर्थिक धोरणाबद्दल एक प्रकारची बधिरता येऊन जाते.

आर्थिक धोरणाची दिशा बदलत चालली आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर जगात सर्वच ठिकाणी बेकार, आर्थिक दृष्ट्या कमकुवत वर्गाला मदत म्हणून धर्मादाय स्वरूपाच्या योजनांचा मोठा बडेजाव होता. अमेरिका, इंग्लंड, रशिया, चीन सर्वच ठिकाणी आता बेकार कमकुवतांना मदत करण्यात आर्थिक दृष्ट्या शक्तिमान

असणाऱ्यांवर खूपच ओझं पडतं, ते काढून टाका अशा प्रकारचा नवा अर्थविचार वर येतोय. आपल्या देशाच्या (राजीव सरकारच्या) अंदाजपत्रकात, आयातनिर्यात धोरणात, कापड धोरणात हाच अर्थविचार दिसतो.

आपल्या देशाच्या स्वातंत्र्यचळवळीच्या इतिहासात कापड-उद्योगाला मोठे स्थान आहे. ब्रिटिशांची आर्थिक नीती स्पष्ट करताना कापूस स्वस्तात स्वस्त विकत घेऊन कापड महागात महाग विकणे हे उदाहरण सांगितलं गेलं. स्वदेशी कापडाचा वापर, परदेशी कापडावर बहिष्कार हे कार्यक्रम राबवले गेले. चरखा हे स्वातंत्र्यचळवळीचं चिन्हच झालं.

कापड धोरण जाहीर करायच्या आधीची परिस्थिती अशी: १९५१ मध्ये माणशी ११ मीटर कापड उपलब्ध होतं. १९६५ मध्ये कापसापासून केलेलं १४.७ मीटर आणि बनावट धाग्यांचं १.७ मीटर होतं. १९८३-८४ मध्ये हेच प्रमाण ९.६ मीटर कपाशीपासून केलेलं आणि ३.६ मीटर बनावट धाग्याचं असं होतं.

कापडबाजाराचे दोन भाग आहेत. एक भाग म्हणजे बनावट धाग्याचं विलायती कापड. ज्यांच्यापाशी पैसा आहे अशा लोकांची या मालाला मागणी आहे. मालाला उठाव आहे. दुसरा भाग म्हणजे कपाशीचं कापड. या कापडाचे साठे देशात प्रचंड प्रमाणात पडून आहेत. देशात कित्येक लाख लोक वस्त्रहीन आहेत. त्यांची कापड विकत घ्यायची ऐपत नाही. दोन दोन वर्षे गिरण्यांचा संप चालूनही देशातील बहुसंख्य लोकांची कापड विकत घ्यायची ऐपत नाही म्हणूनच कापड पडून आहे.

नवीन कापडधोरण सांगतं, की ज्यांना विकत घ्यायचर ऐपत नाही ते सर्व मरू देत. त्यांच्याकडे लक्ष देऊ नका. जे श्रीमंत आहेत त्यांना पाहिजे ते कापड मिळावे म्हणून गिरण्यांना कोणत्याही प्रकारचा धागा कितीही प्रमाणात वापरण्याची मुभा आहे. त्यासाठी आपल्या देशात बनणारे धागे पुरेसे नसतील तर आयात करावयाची पूर्ण मुभा. आयातीवर जकात नाही. अबकारी करात सवलत. गिरण्या आधुनिक करा, त्यासाठी यंत्रसामुग्री नसेल तर आयात करा. त्या आयातीच्या जकातीत माफी घ्या, सर्व काही घ्या.

या सर्व धाग्यांचा कच्चा माल पेट्रोलियमच आहे, त्यामुळे धागा इथे बनत असला तरी पेट्रोलियमची आयात आहेच.

हे सर्व कार्यक्षमता वाढवण्यासाठी करायचं. याने कदाचित कार्यक्षमता वाढेलही; पण काही थोड्या गिरण्यांची. पूर्ण देशाची कार्यक्षमता कमीच होणार आहे. उपलब्ध भांडवल आणि उपलब्ध श्रमशक्ती याचं योग्य प्रमाणात वाटप झालं, तरच सर्व देशाची कार्यक्षमता वाढेल. खूप भांडवल आणि कमी श्रमशक्ती



एखाद्या ठिकाणी एकत्रित केली तर कदाचित त्या ठिकाणची कार्यक्षमता वाढेल, संपूर्ण देशाची नाही.

आणि खरं तर ही कार्यक्षमता वाढेल की नाही याविषयीही जबरदस्त शंका आहे. नवीन-नवीन, निरनिराळ्या गोष्टी कमीत-कमी किमतीत उपलब्ध करून देणे ही खऱ्या व्यवस्थापकाची जिद्द असते. ती आपल्या उद्योजकात आजवर तरी दिसली नाही. दिल्लीहून एक परमिटचा चिठोरा आणून श्रीमंत होणे हीच त्यांची आजवरची कर्तृमकी!

कोणताही धागा कितीही प्रमाणात वापरायच्या परवानगीचा एक परिणाम निश्चित आहे. कापूस शेतकरी मरणार आहे आणि त्याची पर्वा कुणालाही नाही.

आजवर सर्व औद्योगिकीकरण शेतीच्या शोषणातूनच झालं. इंग्लंडचे औद्योगिकीकरण भारत पारतंत्र्यात असताना भारताच्या शेतीच्या शोषणातून झालं. आजवर 'इंडियाचं' औद्योगिकीकरण 'भारताच्या' शोषणातून झालं, होत आहे. कापड धोरण हे या शोषणाचंच एक हत्यार आहे.

कोणतंही धोरण मांडलं जाईल तेव्हा शेतकरी भावांनी एक प्रश्न विचारावा- 'माझ्या आईबापांवर आणि माझ्या आयुष्यावर या धोरणाचा काय परिणाम होणार आहे?'

*(२० सप्टेंबर १९८५)*

□□

## तीस

# शेतकरी शहरात उतरणार?

दुष्काळी परिस्थितीची वाढती तीव्रता लक्षात घेता दि.६ ऑक्टोबरच्या राहुरीच्या ऊसउत्पादक परिषदेत शेतकरी संघटनेने महाराष्ट्राच्या दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्याचेच नवीन कार्यक्रम जाहीर करण्याचे ठरवले आहे.

धूमकेतू दिसला, की संकट येते, असा लोकसमज आहे. बिचाऱ्या हॅलेच्या धूमकेतूच्या कपाळी हा प्रवाद चिकटणार असा रंग दिसतो. जानेवारी १९८६ मध्ये तो दिसायला लागेल तोवर बहुधा महाराष्ट्रातील सुमारे दोन कोटी ग्रामीण जनता पाण्याच्या शोधात वणवण भटकताना सापडेल. कर्नाटक, गुजरात, राजस्थान आणि मध्य प्रदेशातसुद्धा परिस्थिती याहून वेगळी असणार नाही.

मॉन्सूनेन या वेळी संपूर्ण पश्चिम भारताचा पट्टाच वगळलेला दिसतो, खरिपाची पिके तर हातातून गेलीच; पण पुढच्या आठवड्यात जर पाऊस झाला नाही तर रब्बी पिकांचीही काही आशा नाही. देशात धान्य तुडुबं भरलेलं आहे त्यामुळे भूकबळी तरी पडू नयेत; पण चाऱ्यांचा प्रश्न बिकट होणार आहे, हजारो गुरं चाऱ्याविना मरतील. नाहीतर खाटकाला विकावी लागतील. आतापर्यंत शेकडो गुरांची अशी वाट लागलेलीच आहे.

खरा प्रश्न उभा राहणार आहे पिण्याच्या पाण्याचा. गेली चार वर्षे महाराष्ट्रातल्या शेकडो खेड्यांना उन्हाळ्याच्या चार महिन्यांत टँकरने पिण्याचे पाणी पुरवले गेले. यावर्षी भर पावसाळ्यात काही गावांना टँकरने पाणी पुरवावे लागले. हजारो विवरे (बोअर) घेतली; पण त्याने काही प्रश्न सुटला नाही. कारण भूगर्भातील पाण्याची पातळी झपाट्याने खाली जात आहे. टँकरनी पाणी पुरवायचे म्हटले तरी ते जवळपासच्या विहिरीतलावातून भरूनच न्यावे लागते. या वर्षी अशा सर्व विहिरी- तलाव आताच कोरडे पडू लागले आहेत. पाण्याचे सर्व उपलब्ध साठे प्रामुख्याने पिण्यासाठी वापरात आणावे लागतील आणि हा पाणीपुरवठा करणे सध्याच्या यंत्रणेच्या क्षमतेच्या बाहेरची गोष्ट आहे. सैन्याला बोलवावे लागेल आणि त्या दृष्टीने आताच सैन्याला तयार रहायला सांगणे योग्य होईल.



चाऱ्याची प्रचंड टंचाई होणार आहे आणि शेजारच्या राज्यांमधील शिलकी चारा आणावा लागेल. तगाई आणि कर्जवाटपाबरोबर चाऱ्याचा पुरवठासुद्धा झाला नाही तर फक्त चाऱ्याचे भाव कडाडतील. जिथे शक्य असेल तेथे गुरांच्या छावण्या (कॅटल कॅम्प्स) उघडणे शहाणपणाचे ठरेल, मात्र हे कॅम्प्स २० कि. मी. हून जास्त अंतरावर असू नयेत.

देशात भरपूर धान्य भरलेले असले तरीही भूकबळींची शक्यता काही नाकारता येत नाही. दूरदूरच्या दुर्गम खेड्यापाड्यात धान्य पोचवावे लागेल. त्याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे धान्य विकत घ्यायला लोकांनी पैसे कुठून आणायचे? रोजगार हमी योजनेत चट्कन चालू करता येण्यासारखी सर्व कामे जवळजवळ संपली आहेत. अतिशय मोठ्या प्रमाणावर दुष्काळी कामांची आवश्यकता आहे आणि आता कामे शोधायलाही कल्पकता वापरावी लागणार आहे. रस्त्यांच्या, धरणांच्या, आणि रेल्वेमार्गाच्या भरावाची कामे सुरु केली पाहिजेत. खोल मुळाच्या त्रासदायक तणांचा, काँग्रेस गवतासारख्या गवताचा अगदी खाजगी जमिनीवरूनही नायनाट करणे अशीही कामे घ्यायला पाहिजेत. या वेळी भूमिहीन व अल्पभूधारकच नव्हे तर बऱ्यापैकी जमीनधारणा असलेल्या शेतकऱ्यानांसुद्धा कामाच्या शोधात बाहेर पडावे लागणार आहे.

बऱ्याच शेतकऱ्यांचे पैसे ठेवी व शेअर्सच्या स्वरूपात सहकारी सोसायट्या, दूध सोसायट्या इ. सहकारी संस्थांमध्ये अडकून पडलेले असतात. दुष्काळात मागणी केल्यावर या ठेवी व शेअर्सच्या तारणावर बिनव्याजी कर्जे मिळाली पाहिजेत. तेवढीच त्यांचे हाल कमी व्हायला मदत होईल.

दुष्काळ, मग तो कितीका भयानक असेना, तो त्याचे नरबळी आणि गुरांचे बळी घेऊन निघून जाईल; पण सत्ताधारी पक्ष आणि शासनमात्र ही देवदत्त संधी साधून जनतेला त्यांच्या उपकाराचे मिंधे करून ठेवील तर विरोधी पक्ष त्यांच्या प्रचारासाठी या दुष्काळाचा जास्तीत जास्त उपयोग करतील. नोकरशाही त्यातून स्वत:ची तुंबडी भरून घेईल. मग पुढचा दुष्काळ येईपर्यंत सर्वजण दुष्काळ नावाची भयानक गोष्ट विसरूनही जातील.

नवीन तडफदार पंतप्रधान एकविसाव्या शतकाच्या कितीही बाता करीत असले तरी १९८५ चा हा दुष्काळ देशाने अजून विसाव्या शतकातही प्रवेश केला नाही हे दाखवतो आहे. शास्त्र आणि तंत्रज्ञानाचा भरघोस वापर इलेक्ट्रॉनिक्स् आणि बनावट धाग्यांच्या क्षेत्रात नाही, तर जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या पाण्यासारख्या मूलभूत गोष्टी उपलब्ध करून देण्यासाठी होणे आवश्यक आहे. ओढे , नाले आणि नदीच्या पात्रामध्ये मूलभूत यंत्रणेची जेवढी गरज आहे तेवढी शहरांमध्ये खचितच नाही. शेती

हा अजूनही पावसाच्या मर्जीवर चालणारा जुगारच आहे. या देशाला व त्याच्या राज्यकर्त्यांना खरं तर जगातले पेट्रोलियमचे साठे कमी होत आहेत या गोष्टीपेक्षा भूगर्भागातील पाण्याची पातळी खाली खाली जात आहे याची चिंता जास्त असली पाहिजे. सर्व बुद्धिमत्ता आणि साधनसंपत्ती भूगर्भातले पाण्याचे साठे परत भरून काढण्यासाठी वापरली पाहिजे. नाही तर येत्या काही वर्षांतच आज उजाड पडत चाललेल्या शेतांचे वाळवंटात रूपांतर व्हायला वेळ लागणार नाही; परंतु राजीव गांधी तर त्यांच्या पूर्वजांपेक्षाही अधिक हिरीरीने खेडीपाडी, ग्रामीण भाग उद्ध्वस्त करून चोरलेल्या किंवा भीक मागून आणलेल्या परदेशी तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ऐषआरामाची, उपभोगाची केंद्रे या देशात उभी करायच्या कामाला लागले आहेत.

राजीव गांधीची आर्थिक धोरणे पाहून जॉर्ज ऑरवेलच्या 'ॲनिमल फार्म'ची आठवण होते. जसे 'ॲनिमल फार्म'मध्ये क्रांती होताच डुकरांचा मक्तेदार वर्ग तयार झाला आणि आपल्या इतर चतुष्पाद बांधवांच्या पोटावर पाय देऊन द्विपाद माणसांशी व्यापारसंबंध प्रस्थापित करण्याची भाषा बोलू लागला. त्याचप्रमाणे स्वातंत्र्य मिळाल्यानंतर इंडियन 'डुकरां'नी दोन पायावर चालण्याची कला अवगत केली आणि शेजारच्या 'द्विपादां' बरोबर व्यापार-उदीम सुरू करुन आपल्याच देशबांधवांचे शोषण सुरू केले. आज चतुष्पादापेक्षाही अधिक वाईट जीवन जगणाऱ्या भारताच्या रहिवाशांची कवडीमात्र पर्वा नसलेला एक नवा मक्तेदार वर्ग राजीव गांधींच्या नेतृत्वाखाली पुढे येतो आहे आणि भारताचे रहिवासी भयचकित होऊन या घडामोडी पाहत आहेत.

अस्मानी-सुलतानी संकट कोसळल्यानंतर आपली गावे सोडून बाहेर पडणाऱ्या शेतकरी-शेतमजुरांना भारताच्या आर्थिक शोषणाचा ब्रिटिश वारसा पुढे चालवणाऱ्या राज्यकर्त्यांच्या नगरांमधून फार फार तर विस्थापित म्हणून झोपडपट्ट्यांमध्ये, फुटपाथवर जागा मिळेल आणि सरतेशेवटी पददलितांचे, भिकाऱ्यांचे जिणे त्यांच्या कपाळी येईल. या वर्षी या उद्ध्वस्तीकरणाची नुसती सुरुवात होत आहे. हॅलेच्या धूमकेतूचे आकाशात दर्शन होण्याच्या सुमारासच 'भारता'तील लक्षावधी निर्वासितांचे लोंढे पाणी आणि अन्नाचा शोध घेत आणि 'जगण्या'साठी इंडियन शहरांवर कोसळणार आहेत. या शेतकऱ्यांच्या पूर्वजांनी दुसऱ्या महायुद्धाच्या काळात बंगालमध्ये दुष्काळात कलकत्याच्या रस्त्यावर हूं का चुं न करता प्राण सोडले, तसेच ते मरण स्वीकारतील अशी काही लक्षणे दिसत नाहीत.

*(४ ऑक्टोबर १९८५)*

□□



## एकतीस

# राजीवस्त्रांची गुंतागुंत आणि मुरणारे पाणी

'महाराष्ट्र टाईम्स' मध्ये लागोपाठ तीन दिवस शेतकरी संघटनेच्या संबंधाने अग्रलेख लिहिले गेले. (उसात मुरणारे पाणी-९ ऑक्टोबर ८५, कापसाची गुंतागुंत-१० ऑक्टोबर ८५, राजीवस्त्रे की लोकवस्त्रे- ११ ऑक्टोबर ८५)

गेले काही दिवसात संघटनेबद्दल सर्वच माध्यमातून गदारोळ चालू आहे. पण 'महाराष्ट्र टाईम्स' कडून एवढी दखल घेतली जाणे हे विशेषच. अगदी गद्द रूक्ष विषयांबद्दल रस निर्माण करण्याची महात्माजींची एक शैली होती. पंतप्रधान राजीव गांधी यांनाही हे साधले आहे. पण वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन सारखी प्रचारसाधने हाताशी नसतांना शेतकरी संघटनाही मोठ्या प्रमाणावर लक्ष वेधून घेवू शकते याबाबत आता तरी वाद असू नये.

'महाराष्ट्र टाईम्स' संघटनेवर घसरला आहे. ही काही तशी नवीन गोष्ट नाही. किंबहूना 'म.टा.' ज्या दिवशी शेतकरी संघटनेच्या बाजूने लिहू लागेल त्या दिवशी आपले कांहीतरी चुकले आहे असे समजा. असा इशारा मी संघटनेच्या कार्यकर्त्यांना फार पहिल्यापासून देतो आहे.

आजच्या लिहिण्याचा उद्देशही प्रतिवाद करण्याचा नाही. शेतकरी संघटनेने एक नवे विकासाचे अर्थशास्त्र मांडले आहे. अडाणी समजल्या जाणाऱ्या शेतकऱ्यांना ते समजले आहे. शेतमजुरांना ते पटले आहे. ग्रामीण प्रश्नाचाच नव्हे तर समग्र देशाच्या विकासाच्या प्रश्नांचा संदर्भच त्यामुळे बदललेला आहे. निदान मराठी वाचकांकरिता तरी या विषयावर पुरेसे साहित्य उपलब्ध आहे. ते किमान चाळूनही न बघता, आंदोलन समजून घेण्याचा प्रयत्न न करता, जणु काही घडलेच नाही अशा थाटात अनेकजण संघटनेला अर्थशास्त्रच नव्हे तर सामान्य शहाणपणही शिकवतात. शेतीमालाला भाव मिळायला पाहिजे पण तेवढ्याने भागणार नाही, उउत्पादकता वाढली पाहिजे, शेतीउपयोगी वस्तूंच्या किमती कमी झाल्या पाहिजेत, शेतीवरून जनसंख्या हटवून बिगरशेती उद्योगांत ती गेली पाहिजे, शेतमजुरांचा-छोट्या शेतकऱ्यांचा प्रश्न याने सुटणार नाही, ग्राहकांचे यामुळे नुकसान होईल,

देशात चलनवृद्धी होईल, एक ना अनेक. इतके प्राथमिक मुद्दे अशा थाटात उठवले जातात की संघटनेला एवढ्या सखोल विचारांशी परिचय असणेच शक्य नाही याबद्दल बोलणाऱ्या लिहिणाऱ्यांची खात्री असावी.

आजपर्यंत संघटनेने कधीही अशा बुद्धिमंतांबरोबर वाद घातला नाही. जी काही साधने होती ती सर्व सर्वस्वी शेतकऱ्यांना जागे करण्यासाठी वापरली. 'म.टा.'च्या अग्रलेखाच्या संदर्भात आज लिहिण्याचे कारण एवढेच की त्यात छापले आहे तेव्हा ते प्रमाण असलेच पाहिजे असा कोणाचाही गैरसमज होऊ नये, केवळ चुकीच्या माहितीवर आधारित जे युक्तिवाद केले आहेत त्यासंबंधी क्रमवार खुलासा करावा. एवढाच हे लिहिण्याचा हेतू आहे.

### उसात मुरणारे पाणी

१. अ) 'देशातील विक्रमी अन्न उत्पादन पाहता, सरकारी धोरण शेतकऱ्यांच्या इतके विरूद्ध असते तर ही अवस्था प्राप्त झाली असती काय?' हा प्रश्न मी स्वत:ला विचारलेला नाही असे गृहित धरू. पण विक्रमी उत्पादन म्हणजे शेतीची प्रगती असे जर समजायचे तर देशातील सरासरी उत्पादन अत्यल्प असल्याबद्दल रडारड करण्याचे काही कारण पडले नसते.

ब) देशात विक्रमी उत्पादन झाले ते आधुनिक तंत्रज्ञान आणि सामुग्री, निश्चित पाणी पुरवठ्याच्या काही योजना सुपीक भागात एकवटल्यामुळे आणि त्या भागातही अपुऱ्या किमतीची भरपाई कर्जे व अनुदाने केल्यामुळे झाले. त्यामुळे फक्त एक नवा पुढारी शेतकरी वर्ग गडगंज झाला. सर्वसामान्य शेतकरी होता तेथे राहिला. लेवी, जिल्हाबंदी, राज्यबंदी, निर्यातबंदी, महाग आयात इ. मार्गांनी शासनाने शेतीमालाच्या किमती पाडल्या नसत्या तर याहूनही जास्त प्रगती दिसून आली असती. परंतु या विक्रमी उत्पादनाचे श्रेय नेहरू-गांधी आर्थिक धोरणाला नाही. एका छोट्या मध्यंतरात लालबहादूर शास्त्री आणि सी. सुब्रह्मण्यम यांनी दोन गोष्टी केल्या. हरित क्रांतीची सुरवात आणि कृषि मूल्य अयोगाची स्थापना. 'उपाशी राहू पण आयात करणार नाही' या धोरणाचा तो परिणाम होता. पी.एल. ४८० व गेल्या वीस वर्षातील अनावश्यक आयाती यातून अन्नधान्याच्या उत्पादनाची प्रगती झालेली नाही. या तथाकथित उत्पादनाच्या वाढीची गतीहि मंदावत आहे आणि अगदी पंजाबमध्येही पिकांऐवजी वनशेती इ. वाढवण्याची प्रवृत्ती वाढत आहे हे पाहतां विक्रमी पीक उत्पादनाने सुखावण्याचे कारण काहीच दिसत नाही. एखाद्या दुष्काळानेही चित्र उलटे झालेले दिसू शकेल.



२) राहुरी परिषदेबद्दल तरी 'नांव शेतकऱ्यांचे व गांव ऊसकऱ्यांचे' असाप्रकार नाही. या परिषदेचे नाव मुळी 'ऊस उत्पादक शेतकरी परिषद' असे होते. दुष्काळी परिस्थिती, तसेच ज्वारी, बाजरी, कांदा, तंबाखू, कापूस व दूध उत्पादक शेतकऱ्यांची अवस्था, शेतमजुरीचा किमान दर रू. २०/-,कृषि मूल्य अयोगाची पुनर्रचना या प्रश्नावरही तेथे विचार झाला. त्याबद्दल एक विस्तृत ठरावही झाला. तो स्वत: शेतकरी संघटनेचे अध्यक्ष भास्करराव बोरावके यांनी मांडला. पण परिषद प्रामुख्याने उसाच्या परिस्थितीचा विचार करण्यासाठी होती. अशा परिषदा पूर्वीही घेण्यात आल्या आहेत. उदा. दूध (धुळे १९८३), कापूस (हिंगणघाट, १९८४). राहुरी परिषदेला वसंतदादांचा पाठिंबा लक्षात घेऊन किंवा न घेता कोणत्याही साखर कारखान्याने एकही मालमोटार पाठवलेली नाही. शेतकरी आपल्याच खर्चाने व वर्गणीने जमा झालेले होते.

३) उसाचा उत्पादनखर्च शेतकरी संघटनेने प्रतिटन (१० % शर्करांश) ३३० रू. काढला आहे. महाराष्ट्र राज्याच्या कृषि मूल्य समितीच्या हिशेबापेक्षा हा कमी आहे. १९८० साली केलेल्या मागणीच्या हा फक्त १० % जास्त आहे. याच काळात घाऊक किमतीचा निर्देशांक २४८ वरून ३६० वर येऊन पोहोचला आहे. म्हणजे ४४ % वाढलेला आहे हे पाहिले म्हणजे शेतकरी संघटनेच्या मागणीतील संयम लक्षात येईल.

या रकमेत ४२ रू. वाहतूक खर्च, विक्रीकर इत्यादी मिळवून साखरेची किंमत काढण्याचा प्रयत्न करणे म्हणजे उस आणि साखर यांच्याविषयी विलक्षण अज्ञान दाखवणे आहे. कृषि मूल्य आयोग (ए.पी.सी.) उसची किमान किंमत ठरवतो. औद्योगिक उत्पादन खर्च आणि मूल्य कार्यालय (बी.आय.सी.पी.) गळिताचा खर्च काढते. दोघांच्याही हिशेबात शेतापासून कारखान्यापर्यंत उसाची वाहतूक करावी लागते आणि त्यामध्ये तो उस तोडावा लागतो आणि या कामासाठी खर्च येतो ही बाब गेली किमान २५ वर्षे लक्षात घेतली गेलेली नाही. शेतीमालाच्या भावासंबंधी जो क्रूर पोरखेळ शासन करते त्याचाहा एक नमुना आहे. हा खर्च हिशेबात धरला गेल्यास लेवीची किंमत जी आज रू. ३.३६ प्रति किलो आहे ती ३.७८ पर्यंत वाढेल.

सहकारी कारखान्याचे उसउत्पादक सभासद आपल्या स्वत:च्या कारखान्यात उस गाळतात. कारखान्याला उस विकीत नाहत. या परिस्थितत या व्यवहारावर खरेदी कर लावणे अन्याय्य आहे म्हणूनहा कर रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. यामळे गळिताचा खर्च कमी होईल व शेतकऱ्यांना जास्त वाजवी

किंमत मिळेल. ग्राहकाच्या किमतीवर खरेदी कर माफीचा काहीच परिणाम होणार नाही.

मळीपासून तयार होणाऱ्या मालावरील नियंत्रणाचा उपयोग सहकार सम्राट प्रामुख्याने वरकड मिळकतीसाठी करतात. यातून राजकीय पक्षाच्या थैल्या भरतात. वरपर्यंत पैसे पोचवले जातात. हे असे व्हावे यासाठी शासन काळजीपूर्वक मद्यार्काचे खुल्या बाजार-पेठेतील भाव, कारखान्यांच्या विक्रीचे दर यात मोठी तफावत ठेवते. ही नियंत्रणे दूर केल्यास ऑन मनी बंद होईल व पूरक उत्पादनाचा उपयोग साखरेचा उत्पादन खर्च कमी करण्याकरिता होईल.

हा हिशेब महाराष्ट्रातील प्रमुख पत्रास नव्हे मित्रास सांगण्याची वेळ यावी आणि हा हिशेब न उमजता त्यांनी राहुरी परिषदेच्या मागण्यांवर चौफेर दुगाण्या झाडाव्यात याचे प्रमुख कारण शेती आणि शेतकरी याबाबत कोणीही उठावे आणि लिहावे, कोण विचारणार आहे ? ही भावनाच असावी. कोणत्याही औद्योगिक क्षेत्राबद्दल इतके उथळपणे लिहिणे महाराष्ट्र टाईम्सने केले नसते. निदान याच ठरावातील याच परिच्छेदातील शेवटचा भाग वाचला असता तरी साखरेच्या हिशेबाचा पाढा रू. पाच, सात, आठ, दहा पर्यंत त्यांनी चढवला नसता. परिषदेने लेवी व्यवस्था काढून टाकण्याचा प्रस्ताव शासनास मान्य नसेल तर कारखान्यात तयार झालेली १०० % साखर शासनाने रु. ५ प्रति किलो या भावाने घ्यावी अशी सूचना केलेली आहे. म्हणजे ग्राहकास ती साखर रु. ५.५० /- प्रति किलो या भावाने सर्रास घेता येईल.

४) लक्षावधी कोरडवाहू शेतकरी शेतमजूर हेही ग्राहक आहेत हा कांगावा शहरातील सुखवस्तू ग्राहकांनी फार परिणामकारकरित्या अनेक वर्षे चालवलेला आहे. स्वस्त धान्याच्या दुकानांत ठेवायची साखर खेडेगांवातील दुकानात क्वचित पोचते हे सर्वज्ञात सत्य आहे. शेतकरी, मजूर त्यांच्या मिळकतीत वाढ झाल्याखेरीज ते साखरेला शिवून शकत नाहीत. आज साखरेचा भाव केवळ ४.५० रुपयापासून ५.५० पर्यंत वाढला तर महाराष्ट्रातील ऊसउत्पादकास रु. २२०/- ऐवजी रू. ३३०/- भाव टनामागे मिळेल. शेतमजुराची मजुरी रोजी दहा रुपयांवर जाईल. १९८० मध्ये उसाची किंमत रु. ३००/- मागितली असता रोज रु. ७/- धरला होता. याचा अर्थ शेतीमालाच्या किमती ज्या प्रमाणात वाढतील त्यापेक्षा जास्त प्रमाणात शेतकऱ्यांचे व मजूर यांचे उत्पन्न वाढते. शेतीमालाला रास्त भाव हा शेतीशी संबंधित असलेल्या समग्र जनांच्या-पुढाऱ्यांचा अपवाद वगळता-कल्याणाचा कार्यक्रम आहे. त्यांच्यात कांगावाखोरी युक्तिवादाने भावी फूट पडू



शकणार नाही. याच कारणाने शेतमजुरांचा नारा लावणाऱ्या कार्यक्रमात डझनभर शेतमजूर हजर राहत नाहीत, तर शेतकरी संघटनेच्या कार्यक्रमास हजारोंच्या संख्येने येतात; आपणहून येतात.

५) साखर कारखाने हे राजकारणाकरिता झाले, हे डॉ. दांडेकरांचे विधान अगदी खरे आहे. पण त्यांना मंजुरी शासनाने दिली. एकदा मंजुरी मिळाली आणि कारखाना सुरू झाला की कारखान्यात उस घालणे शेतकऱ्यांना अपरिहार्य होते. कारखान्याच्या परिसरात गूळ गाळणेसुद्धा अशक्य होते.

कारखान्याच्या संचालक मंडळांना उसाच्या भावात काहीच स्वारस्य नसते. कारण साखर सम्राटांच्या या महाराष्ट्र राज्यात उसाला भाव नाही. इतर बहुतेक राज्यंच्या तुलनेत महाराष्ट्रात लेव्हीच्या साखरेची किंमत सर्वांत कमी आहे. महाराष्ट्रातील टन टन वजनाचे पुढारी उसाच्याशेतकऱ्याच्या जीवावर चरतात आणि त्याच्याच नरडीवर पाय देतात, जो भाव मिळेल त्यातूनही कपाती करतात. कारखान्याच्या परिसरात स्वतःचे साम्राज्य तयार करतात आणि शहरी विद्वान जाऊन त्यांचे कौतुक करतात.

शेतकरी संघटना उसाला मिळणारी किंमत हे कारखान्याच्या यशाचे एकमेव गमक धरते. या एकाच मुद्दावर संघटनेने गेल्या पांच वर्षांत साखर सम्राटांचा दबदबा धुळीस मिळवायला आणला आहे. हे संघटनेचे एक मोठे श्रेय आहे. साखर सम्राटांच्या कारवायांबद्दल संघटनेवरच तोफा डागण्यात लेखाची लांबी वाढण्यापलिकडे काहीच साध्य होणार नाही.

६) 'महाराष्ट्र टाईम्स'कारांनी पाण्याच्या प्रश्नाविषयी देखील अनभ्यस्तपणे आकंडवतांडव केलेले आहे. १९८१-८२ मध्ये महाराष्ट्रातील निव्वळ बागायती खालील जमीन २१ लाख हेक्टर होती. त्यातील फक्त ३ लक्ष ६६ हजार हेक्टर उसाखाली होती. यापैकीही ५०,००० हेक्टर उस या कारखान्यांनी तयार केलेल्या सिंचन योजनांमुळे बागायतीखाली असलेल्या जमिनीवर होता.

धरणावरील कालव्यातून आलेल्या पाण्याने बागायत झालेल्या जमिनीचे प्रमाण महाराष्ट्रात ४३ % इतकेच आहे. हे पाणी उसाला दिले म्हणजे संपून जाते असे नाही. वरकड पाणी फार मोठ्या प्रमाणावर जमिनीत परत जिरते आणि खालील प्रदेशात पुन्हा उपलब्ध होऊ शकते. याउलट उसाकरता पाणी वापरले नाही तर ते कालव्याने आणि आणि लांबपर्यंत नेता येईल हे सदाच शक्य नसते.

ही सर्व माहिती एवढ्याकरता सांगितली की पाण्याच्या प्रश्नावर ठोकळेबाजपणे बोलणे संपावे. पाण्याचे नियोजन मुलतः चुकलेले आहे, हे सत्य आहे. धरण

आणि कालवे ही पाणी नियोजनाची व्यवस्था राजकारणी आणि भ्रष्टाचारी यांच्या सोयीची असते. श्री. विलासराव साळुंखे, ना.धो. महानोर यांनी प्रत्यक्षात आणून दाखवलेल्या पद्धतीनेही लहान लहान योजनांनी पाणी जमिनीत जिरवणे आणि भूगर्भातील साठे वाढविणे ही शास्त्रीय पद्धत आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या वेळी पुणे येथील निवृत्त अभियंता श्री. एन.एस. जोशी यांनी या विषयावर अभ्यासपूर्वक लेख लिहून धरण कालवा योजनांना विरोध दर्शविला होता. १९५८ साली मी स्वत: मुंबई विद्यापीठाच्या प्रबंधात हा विचार मांडला होता. कालव्यांच्या पाण्यावर धान्य पिकवणे परवडणार नाही, नवीन बागायती क्षेत्रे धान्याची गुदामे होणार नाहीत, साखर सम्राटांची कुरणे हातील, हा इशारा दिलेला होता. पण त्यावेळी य विचाराला मागास समजले गेले. शास्त्र आणि विज्ञान यांचे उद्गाते पं. जवाहरलाल नेहरू यांच्या आधुनिक तीर्थक्षेत्रांचा उदो उदो झाला. आता त्यांचे त्यावेळचे समर्थक हाकाट्या पिटीत आहेत. त्या हाकाट्यासुद्धा अशापद्धतीने पिटल्या जात आहेत, की जणू हा शेतकऱ्या-शेतकऱ्यामधील संघर्षाचा प्रश्न आहे. उसाकरिता हे पाणी वापरले जाऊ नये अशी समाजधुरीणांची खरोखरच इच्छा असेल तर मार्ग अत्यं सोपा आहे. त्या जागी जी पिके घेतली जावीत असे त्यांना वाटते त्या पिकांना अधिक आकर्षक किमती मिळण्याची व्यवस्था केली तर दोन वर्षात पीकपद्धती बदलून जाईल. उस शेतकरी स्वत:च पर्याय शोधत आहे. नाशिक जिल्ह्यात विनायकराव पाटील उसाऐवजी निलगिरी आणत आहेत. ज्वरी जास्त आकर्षक बनेल तर शेतकरी आनंदाने उस सोडून देतील आणि ज्वारी पिकवतील.

पण शासनाच्या पाणी नियोजनाच्या गैरव्यवस्थेच्या पापाचा आणि उसाला रास्त भाव मिळण्याचा संबंध काय? जोपर्यंत शासकीय इच्छेनुसार उस पिकला आहे तोपयृत त्याचा उत्पादनखर्च भरून निघालाच पाहिजे एवढी साधी सोपी मागणी संघटनेने केली आहे.

**कापसाची गुंतागुंत-**

७) शेतकरी संघटनेने बहिष्काराच्या कार्यक्रमात वापरलेला शब्द 'राजीवस्त्र' असा आहे. 'राजीव वस्त्र' नाही. या विषयावर वृत्तपत्राल लिहिले गेलेले आहे. 'Reaganomics' या धर्तीवरचा हा मराठीतील तयार केलेला पहिला शब्द अशी टिपणीही इंडियन एक्सप्रेसच्या वार्ताहराने केलेली आहे. अशा परिस्थितीत राजीव वस्त्र याचाच पुन: पुन: वापर संघटनेविरुद्ध द्वेषाचे वातावरण तयार करून



देण्याचा प्रयत्न नसावा असे मी गृहित धरतो.

८) 'महाराष्ट्र टाईम्स'च्या मध्यमवर्गीय वाचक, स्त्रिया, पॉलिएस्टर, नायलॉन इ. साड्या वापरतात. देशातील ज्याला सर्वसामान्य वर्ग म्हणता येईल त्यात आजही हे अपवादात्मक आहे. पण होळी किंवा बहिष्काराचा कार्यक्रम 'मध्यमवर्गीय' स्त्रियांच्या वापरातील वस्त्रे कोणती याबद्दल पूर्ण माहिती घेऊन घेता येतो. किंबहूना असावापर होतो म्हणूनच बहिष्काराचा कार्यक्रम घ्यावा लागतो. कोणीच वापरत नसलेल्या वस्तूंवर बहिष्कार टाकून उपयोग काय? अर्थात महाराष्ट्र टाईम्सच्या युक्तिवादाचे आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. सार्वजनिक काकांपासून महात्मा गांधींपर्यंत सर्वांविरूद्ध तत्कालीन बुद्धिमंतांनी हा युक्तिवाद वापरलेलाच आहे.

९) कापसाच्या आकडेवारीबद्दल महाराष्ट्र टाईम्सने काही मूलभूत शंका उपस्थित केल्या आहेत. मी सर्व ठिकाणी पडून राहिलेल्या साठ्याचा उल्लेख लांब धाग्याच्या कापसाचे साठे, उदा. वरलक्ष्मी एच्.४ असा केला आहे. तेव्हा वरक्ष्मीबद्दल मला विशेष आस्था असल्याबद्दलचे सर्वच कवित्व अनाठायी आहे. १९८४-८५ मध्ये रुई पुरवठ्याची परिस्थिती -

| | |
|---|---|
| मागी वर्षातील शिल्लक | १६ लाख गाठी |
| यंदाचे उत्पादन | १०५.५ लाख गाठी |
| आयात | १.०७ लाख गाठी |
| एकूण पुरवठा | ११८.५७ लाख गाठी |

कापड गिरण्यांशी संबंधित मंडळी, जी सध्या नवीन वस्त्रोद्योग धोरणामुळे खूष झालेली दिसतात, त्यांनी वर्षाच्या सुरुवातीपासून शिल्लक १२ लाख गाठीच असेल, उत्पादन तर ७६ लाख गाठीवर जाणारच नाही असा कांगावा करून निर्यातीस विरोध केला आणि उलटी आयात करवून घेतली.

कापसाच्या वापराची १९८४-८५ या वर्षाची परिस्थिती अशी-

| | |
|---|---|
| गिरण्यांचा वापर | ८३ लाख गाठी |
| इतर वापर | ४.६५ लाख गाठी |
| निर्यात | १.८५ लाख गाठी |
| एकूण वापर | ८९.५० लाख गाठी |

गिरण्यांची आवश्यकता ८६ लाख गाठींची असल्याची हाकाटी करण्यात आली होती. पण प्रत्यक्षात वापर त्याहून कमी झाला. या अवस्थेत देशात पडून राहिलेल्या गाठींची संख्या २९ लाच आहे. अखूड धाग्यची आयातच करावी लागली. हेपाहता हासाठा लांब धाग्याचाच आहे हे उघड आहे. या साठ्यांपैकी

गेल्या वर्षीप्रमाणे यंदाही १६ लाख गाठी पुढील वर्षाकरिता शिल्लक ठेवणे आवश्यक आहे असे मानले तरी निदान १० लाख गाठी कापसाच्या निर्यातीची परवानगी देणे शक्य होते.

१०) परवानगीप्रमाणे सर्व कापसाची निर्यात करता आली असती किंवा नाही, हा प्रश्न अलाहिदा, 'परदेशी बाजारपेठा भारतीय कापूस केव्हा याची वाट पहात आहेत' असे मी म्हटल्याचे म.टा.ला कुठे सापडले ते सांगितले असते तर बरे झाले असते. परदेशी बाजारपेठ ही काबीज करायला अत्यंत कठीण गोष्ट. शेतीमालाच्या निर्यातीबद्दल शासनाच्या धरसोडीच्या आणि घायकुतीच्या धोरणामुळे कांदा, कापूस यासारख्या ताब्यातल्या बाजारपेठाही आपण गमावल्या आहेत. पण परवाना प्रथम काढायचा आणि मग बाजारपेठ शोधायला जायचे या पद्धतीने निर्यात करता येत नाही. सर्व अडचणी लक्षात घेताही जर निर्यातीची परवानगी योग्य वेळी मिळाली नसती तर बऱ्याच प्रमाणात यंदा निर्यात करणे शक्य झाले असते.

ज्या 'इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल विकली' या अंकाचा उल्लेख महाराष्ट्र टाईम्सने केला आहे त्याच अंकातील दुसऱ्या एका लेखातील काही वाक्यांचे भाषांतर देत आहे, 'शासनाचे कापसाच्या निर्यातीबद्दलचे धोरण अदूरदर्शीच राहिले. निर्यात धोरणाचा आर्थिक गरजा आणि बाजारपेठेतील अपेक्षित परिस्थिती यांच्याशी काही संबंध राहिला नव्हता. गिरणी उद्योगाचा प्रचंड दबाव आणि पुरवठा परिस्थितीचा अंदाज घेण्यात आलेले अपयश यांचा प्रभाव धोरणावर पडलेला दिसतो.

'एका वेळी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील परिस्थिती इतकी सोयीची होती की भारत लांब आणि त्यापेक्षा अति लांब धाग्याच्या कापसाची कितीतरी जास्त निर्यात देशातील किंमतीपेक्षा जास्त किंमतीने करू शकला असता.

'आता सर्वसाधारणपणे हे मानले जाते की, भारताकडे अतिलांब धाग्याचा पुरेसा साठा शिल्लक राहतो आणि निर्यात परवाना नसल्याकारणाने त्याच्या निर्यातीत अडथळा येऊ देऊ नये.'

याबद्दल अधिक मल्लिनाथी अनावश्यक आहे; पण तरी एक मुद्दा लक्षात राहतोच. मागणीपेक्षा उत्पादन जास्त झाल्यावर अमेरिकेत सरकारने आर्थिक मदत देउन उत्पादन क्षेत्रे कमी करण्यास तेथे प्रोत्साहन दिले हे म.टा.ला माहीत आहे. गेली अनेक वर्षे लांब धाग्याच्या कापसाला शासन उत्तेजन देत आहे. राजीव गांधी यांना नवीन कापड धोरण अंमलात आणण्यापूर्वी कापसाच्या पिकांचे प्रमाण कमी



करण्याची संधी शेतकऱ्यांना देणे, आर्थिक मदत बजूलाच राहिली- शक्य होते का नव्हते? धोरणाची घोषणा ६ जून रोजी झाली. म्हणजे कापसाच्या यंदाच्या पिकासाठी जमवाजमव झाल्यानंतर झाली. बनावटी धाग्यांच्या आयातीची अशी कोणती घाई होती की एक वर्षसुद्धा ती थांबू शकली नसती? या धंद्यातील बहुराष्ट्रीयांना हे धागे आणि त्यासंबंधी यंत्रसमग्री विकण्याची निकडीची गरज सध्याच्या मंदीत आहे, हे सोडता अशी कोणतीच घाई नव्हती. याखेरीज जे शासन बनावटी धाग्यांच्या खुले आम आयातीला परवानगी देते ते शासन कापसाच्या निर्यातीलाही खुला परवाना का देत नाही? मग आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळवता येते किंवा नाही हे प्रत्यक्षात पाहून घेऊ, नाहीतर कापूस उत्पादन बंद करून टाकू.

११) भारतातील शेती उत्पादकतेच्या दृष्टीने अकार्यक्षम आह यात काहीही शंका नाही; पण याचे प्रमुख कारण शासनाच्या किंमत धोरणामुळे शेतीत नवीन गुंतवणूक करणे म्हणजे कर्जाच्या फासात मान देणे होय. जेथे फायदा होऊ शकतो, निदान जेथे शासन आड येत नाही, तेथे शेतकरी उत्पादकतेचा काय चमत्कार करून दाखवतो हे महाराष्ट्रातील द्राक्ष शेतकऱ्यांनीदाखवले आहे. दूध उत्पादकांनीहीदाखवले आहे. 'आनंद'च्या प्रयोगात वीस वर्षांत जी उत्पादनवाढ झाली नाही ती महाराष्ट्राती शेतकऱ्यांनी दुधाच्या किमतीत एका वर्षात रु. १.४० प्रति लिटरची वाढ मिळाल्यावर करून दाखवली. राजीव गांधी यांचे शासन स्पर्धेवर आधारलेल्या कार्यक्षमतेच्या शोधात आहे म्हणतात. ही कार्यक्षमता त्यांना कारखानदारीत सापडणे दुर्मिळ. परकीय स्पर्धेपासून संरक्षण आणि राखीज बाजारपेठ यांच्या बळावरच भारतीय कारखानदार जगू शकतात. याउलट शेतकरी परदेशातून महाग किमतीने विकत आणलेल्या गव्हाचा, तांदुळाचा सामना करीत आला आहे. त्याचा गळा घोटण्याचे थांबवा. भारतातील शेतकरी इतर कोणत्याही शेतकऱ्यापेक्षा कमी भरणार नाही.

१२) ग्रामोद्योग व्यवस्था आणि अणुबाँब तयार करण्याची क्षमता यांचा मेळ कसा बसवावा, अशी चिंता म.टा.ला त्रस्त करीत असावी. अणुबाँब डझन दोन डझन तयार झाले तरी त्यामुळे देशाचे संरक्षण होईल ही कल्पना कितपत ग्राह्य आहे हे सध्या सोडून देऊ. पाकिस्तानसारख्या तंत्रज्ञानाच्या उधार उसनवारीवर जगणाऱ्या एखाद्या देशाच्या आक्रमणाला तोंड द्यायला कदाचित हे बाँब उपयोगी पडतीही; पण शेवटी देशाचा बचाव हा खेड्यापाड्यातून व्हावा लागेल. परदेशातून आणलेल्या शस्त्रांस्त्रांची दोन-तीन आठवडे आतषबाजी करायीच आणि नंतर कोणीतरी आपले भांडण सोडवायला येईल याची वाटत पहायची, ही संरक्षण

नीती बहुतेक तिसऱ्या जगातील देश वापरतात. पण ही रणनीती एखाद्या बड्या सत्तेशी संघर्ष उपस्थित झाल्यास कितपत उपयोगी पडणार आहे? परकीय आक्रमणाचा बागुलबुवा उभा करून तथाकथित औद्योगिकीकरणाचा पाइपुरावा करण्याचे काम अविकसित देशातील राज्यकर्ते सगळीकडेच करतात. आपला देश हा त्यातलाच एक.

पण विज्ञान आणि तंत्रज्ञान जोपासना कशी होणार? हा प्रश्न प्रत्यक्षात म.टा.कारांच्या मनात असावा.

चैत्रगौर सजवण्याकरिता शेजारणी-पाजारणींकडून खेळणी जमा करावीत अशा पद्धतीचे विज्ञान-तंत्रज्ञान धोरण शासन राबवीत आहे. या देशातील बहुसंख्य लोकांच्या आजच्या जीवनाशी अप्रस्तुत असे विज्ञान-तंत्रज्ञान जोपासले जात आहे. ज्यांना विज्ञान-तंत्रज्ञानाची चिंता आहे, त्यांना या देशाशी सुसंबद्ध अशी अनेक आवाहने स्वीकारता येतील. भूगर्भातील पाणी आटत आहे, जमिनीत पाणी अधिकाधिक जिरवण्याचे नवे मार्ग शोधून काढले नाहीत रत देशातील एक मोठा भाग वाळवंट होणार आहे. गणकयंत्र, दूरदर्शन आणि बनावटी धागे यांची उचल म्हणून विज्ञानदृष्टी नव्हे. ती तर परदेशी बहुराष्ट्रीयंची अडतेगिरी, दलाली करणे आहे. विज्ञानबुद्धीचा वापर ही महत्त्वाची गोष्ट आहे. पाश्चिमात्य तंत्रज्ञानातून तयार झालेल्या मालातून भातुकली खेळणे ही विज्ञाननिष्ठा नाही. देशात भांडवलाची उपलब्धता किती? उपलब्ध श्रमशक्ती किती? यांचा मेळ कोणत्याप्रकारच्या तंत्रज्ञानात बसेल का? त्यामुळे केवळ एक दोन कारखान्यांची नव्हे तर समग्र देशाची मिळून उत्पादकता अधिकतम गतीने वाढेल हे पाहणे म्हणजे विज्ञान आहे. या तऱ्हेने उत्पादकता वाढत गेल्यावर एक वेळ अशी येईल की, देश स्वत:च्या तंत्रज्ञानाच्या आधारावर जगात पुढे येईल. सध्याच्या धोरणामुळे आपण चिरंतन कालापर्यंत पाश्चिमात्यांची परभृतता स्वीकारीत आहोत.

१३) 'इकॉनॉमिक अँड पोलिटिकल विकली' च्या सप्टेंबरच्या अंकातील श्री. गोस्वामी यांच्या लेखाच्या आधारे राजीवस्त्रे ही लोकवस्त्रे आहेत असे सिद्ध करण्याचा महाराष्ट्र टाईम्सने लंबाचवडा प्रयत्न केला आहे.

'जास्त किमतीचे कापड काढले तरच फायदा होतो. साहजिकच मालकांचा ते कापड काढण्याकडे ओढा असणारच.' या वाक्यात स्वातंत्र्योत्तर काळातील सर्व आर्थिक धोरणांच्या अपयशाचा कबुली-जबाब आहे हे म.टा.च्या ध्यानात आले नसावे. देशातील सुती कापडाचा दरडोई वापर १९५० मध्ये ११ मीटर होता. १९६५ मध्ये तो १४.७ मीटरपर्यंत वाढला आणि त्यानंतर झपाट्याने कोसळत तो



१९८२ मध्ये ९.८ मी. पर्यंत येऊन पोचला. राजीवस्त्रांचा वापर १९५० मध्ये होतच नव्हता. तो १९८० मध्ये ४.६ मी.वर आला आणि त्यानंतर ३.७ मी. पर्यंत खाली गेला.

मुंबईतील गिरण्यांचा संप दोन वर्षे चालला. तरीसुद्धा कापड दुकानांतील सुती कापडाचे साठे संपले नाहीत. कारण ज्यांच्या अंगावर कपड नाही, त्याच्या हाती क्रयशक्ती नाही. ज्यांच्या हाती क्रयशक्ती एकवटलेली आहे त्यांना देशी राजीवस्त्रसुद्धा पटत नाही म्हणून दरवर्षी थोडीथोडकी नाही तर रू. २००० कोटींची सुपरफाईन राजीवस्त्रांची चोरटी आयात होते. महाराष्ट्रांतील एकाधिकार खरेदीत गेल्या बारा वर्षांत कापसाची किंमत ६० % नी वाढली तर सुती कापडाच्या किमती २५० % नी वाढल्या. इशर अहलुवालियाच्या नुकत्याच गाजलेल्या अभ्यासात, भारतीय उद्योगधंद्यांच्या अपयशाचे महत्त्वाचे कारण शेतीतील तोटा आणि जनसामान्यांच्या हातातील क्रयशक्तीचा अभाव, हे देण्यात आले आहे. स्पर्धेवर आधारलेली कार्यक्षमता ही परदेशातून आणलेल्या यंत्रसामुग्रीवर, बनावटी धाग्यांवर किंवा तंत्रज्ञानावर अवलंबून नसते किंवा निर्यात बाजारपेठेवर नसते. स्पर्धा ही भारतासारख्या खंडप्राय देशात प्रमुखत: देशांतर्गत बाजारपेठेतील ग्राहकांच्या ताकदीवर अवलंबून असते. देशातल उघड्या, उपाशीपोटींच्या हाती क्रयशक्ती पोचवणारे धोरण ही कार्यक्षण उत्पादनाची प्रथम आवश्यकता आहे. शेतीमालाचे भाव, योग्य मजुरी ही त्यातली पहिली पायरी आहे. राजीव गांधींचे सर्वच आर्थिक धोरण याउलटे आहे. उसनी यंत्रे, आडगिऱ्हाईकी तंत्रज्ञान, शहरी भद्रलोकांची बाजारपेठ हा त्याचा पाया आहे. आज त्याधोरणाचा उदोउदो करणारेसुद्धा थोडक्या वेळांत मदतीची आणि संरक्षणाची हाकाटी करू लागतील. कारण कार्यक्षमता आणि उत्पादकता ही त्यांच्या रक्तातच नाही आणि असली तरी ती वापरण्याची आवश्यकता बंदिस्त बाजारपेठेत त्यांना जाणवणारच नाही.

तेव्हा गोस्वामींच्या लेखात कापसाच्या कापडापेक्षा राजीवस्त्रांना मागणी अधिक आहे हे दाखवले यात आश्चर्य काहीच नाही. बहुसंख्य उघड्या-वाघड्यांच्या हाती क्रयशक्ती नाही, याचाच तो पुरावा आहे; पण हा लेख काळीपूर्वक अभ्यासला असता तर ७४-७५ % लोकांना हे कापड पसंत आहे किंवा विकत घेणे परवडते हा निष्कर्ष 'म.टा.'ने काढला नसता. रु. ३०००/- पेक्षा कमी मिळकत असलेल्या कुटुंबाचे प्रमाण गोस्वामींच्या नमुन्यात फक्त २५.५ % आहे. या वर्गातील कुटुंबांना राजीवस्त्रांचा स्पर्श झालेला नाही एवढाच त्यातला बोध. पण गोस्वामींच्या नमुन्यात अशा कुटूंबांचे प्रमाण वेगवेगळ्या तज्ज्ञांनी ४८ % ते ५२ % पर्यंत आजमावले

आहे. १९७५-७६ मधल्या नॅशनल कौन्सिल ऑफ अप्लाईड इकॉनॉमिक रीसर्च या संस्थेच्या अभ्यासाप्रमाणे वार्षिक ३६०० रु. मिळकतीच्या खाली ग्रामीण भागातील ६२.३६ % आणि शहरी भागातील ३०.९६ % कुटुंबे आहेत. म्हणजे देशातील अर्ध्या लोकसंख्येस राजीववस्त्रांचा स्पर्शही नाही. ग्रामीण भागात हे प्रमाण जवळ जवळ दोन तृतियांश आहे. जे राजीवस्त्रे वापरतात त्यापैकी फार थोडे राजीवस्त्रांच्या उत्पादनापैकी प्रचंड हिस्सा खरीदतात. हे लोकवस्त्र नाही. सर्वसामान्यांचे वस्त्रहरण करणारे दुर्योधन आहे. म.टा.ने संघटनेवर अमोघ म्हणून उगारलेल्या हत्याराची दैना ही अशी आहे.

'म.टा.'कारांना अगदी न समजणारा गोस्वामींचा लेख सापडला. पण त्यांच्याच पत्रात या विषयावर आलेले लेख आणि बातमीपत्रे त्यांच्या दृष्टीस पडली नसावीत. (दि. २८,३० ऑगस्ट, २,३० सप्टेंबर १९८५) यात काही गुंतागुंत तरी असावी किंवा काही पाणी मुरत असावे.

आज एक परिस्थिती स्पष्ट आहे. राजीव गांधींच्या आर्थिक धोरणाचा परिणाम म्हणून शेअर बाजार भडकला. बनावटी धाग्याच्या आणि राजीवस्त्रांच्या उद्योगाचे शेअर विशेष चढले. पण त्याला कार नवीन उद्योजग भांडवल नव्हे तर वायदेबाजारांत सट्ट्यांत झटकन लक्ष्मी शोधणारे भांडवल. याउलट उसाचा भाव १९८० मध्ये महाराष्ट्रात रु. ३००/- पर्यंत मिळाला होता तो आज रु. २००/- वर येऊन ठेपला आहे. कापसाचे दसऱ्याच्या मुहूर्ताचे भाव मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश येथे रु. ५०० ते ५१० पर्यंत फुटले आहेत. महाराष्ट्रातील किमान १४ जिल्हे दुष्काळात होरपळणार आहेत. शहरांतील लोकांना दुष्काळाने काहीच फरक पडणार नाही; पण शेतकरी खडी फोडणार आहे. या शेतकऱ्याला शहरी राजबिंड्यांच्या राजीवस्त्राचे कौतुक नाही. संगणकांचे नाही. दूरदर्शनाने त्याला त्याच्या भकास जीवनाची अधिकच तीव्र जाणीव होत आहे. कापूस पिकवणाऱ्यांनी ज्योत पेटवली आहे, उस शेतकऱ्यांनी ललकारी दिली आहे. सगळा शेतकरी लवकरच उठणार आहे, याची ही नांदी आहे.

□□

“

चालू कालखंडातील शेतीच्या शोषणाचे सर्वात महत्त्वाचे साधन शेतीमालाला अपुरे भाव देणे हे होय. शेतकऱ्यांवर होणारे इतर सर्व अन्याय दुय्यम महत्त्वाचे आहेत. त्याचा व्यवसाय किफायतशीर असला तर इतर कोणत्याही अन्यायाला तो सहज तोंड देऊ शकेल. कोणत्याही समाज-अर्थव्यवस्थेचे समर्थ चित्रण हे त्या व्यवस्थेच्या अंतर्गत वा बहिर्गत देवघेवीच्या शर्तींनी होते, उत्पादनाच्या साधनाच्या मालकीने नाही.

शेतीमालाच्या किमती अपुऱ्या ठेवण्यावर आज आपली भारत-इंडिया द्वैती व्यवस्था संपूर्णपणे अवलंबून आहे. प्रचलित व्यवस्थेचे कोणतेही अंग घ्या, कोणतीही समस्या घ्या. पुरे आकलन होण्यासाठी शेतीमालाच्या शोषणाशी त्याचा संदर्भ जोडल्याशिवाय पर्याय नाही.

जनशक्ती वाचक चळवळ

किंमत : रु. १५०/-